प्रीति भावना : प्रेरणा आणि स्वरूप

म. ग्रं. सं. ठाणें
विषय जिवंघ
सं. क्र. २८८७

REFBK-0023292

डॉ. एस. एस. भोसले

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

१/११/८१

(कु. मा. प.)
५०००-४-८०

संदर्भ
निबंध
२८८७
२३२९२
१७।९।१७

प्रीतिभावना : प्रेरणा आणि स्वरूप

डॉ. एस्. एस्. भोसले

REFBK-0023292



रणजित बुक स्टॉल

१७२३ / ७, सिटी बस रोड, राजारामपुरी, कोल्हापूर ४१६ ००२

प्रीतिभावना : प्रेरणा आणि स्वरूप

डॉ. एस्. एस्. भोसले

प्रीतिभावनेच्या प्रेरणा, स्वरूप आणि आविष्कार यांचा चिकित्सक मागोवा

प्रीति भावना :
प्रेरणा आणि स्वरूप

प्रथमावृत्ती
१९८१

प्रकाशन क्र. ४

प्रती : ११००

© सौ. उज्ज्वला भोसले
१६३८/६, 'ई', राजारामपुरी
कोल्हापूर ४१६ ००२

मुखपृष्ठ
वैजनाथ दुलंगे,
मॉडर्न आर्ट

किंमत पस्तीस रुपये

प्रकाशक
रणजित बुक स्टॉल
रणजित प्रकाशन
१७२३/७, सिटी बस रोड, राजारामपुरी
कोल्हापूर ४१६ ००२

मुद्रक
श्री. एस्. ए. मोहिते
श्री व्यंकटेश प्रिंटिंग प्रेस
२४०२ / ६, 'ए', वरुणतीर्थ,
कोल्हापूर

प्रिय

सौ. ताई

।। सौ. सुमन कृ सावन्त ।।

आणि

श्रीमान डॅडी

।। श्री. कृष्णराव उर्फ बापूसाहेब ता. सावन्त ।।

या उभयतांस

ऋणभार

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. अप्पासाहेब पवार, प्रो. वि. ह. कुळकर्णी, कवी अनिल, प्राचार्य भगवन्त देशमुख, वा. रा. ढवळे

कै. वि. स. खांडेकर, कै. ग. त्र्यं. माडखोलकर, कै. प्रा. ल. ग. जोग, कै. डॉ. भ. श्री. पंडित, कै. प्रा. अनन्त काणेकर

शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवा डॉ. सौ. उषा इथापे, सहाय्यक कुलसचिव ह. आ. पाटणकर, सूर्याजीराव साळोखे आणि व्ही. डी. माने

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे संस्थाधिपाल अच्युत तारी, माजी : सहाय्यक ग्रंथपाल यशवंत रांजणकर आणि कु. निर्मला जोशी

मुंबई विद्यापीठाचे ग्रंथपाल एस. सी. टिकेकर, शिवाजी विद्यापीठाचे सहाय्यक ग्रंथपाल सर्वश्री जाधव व कवाळे, पंढरपूर महाविद्यालय, पंढरपूर, छ. शिवाजी कॉलेज, सातारा आणि श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

यांचे ग्रंथपाल अनुक्रमे सर्वश्री : माजी : जनार्दन लांडे पाटील, बी. टी. वाडकर व : माजी : आण्णासाहेब पाटील, करवीर नगर वाचन मंदिराचे कार्यकर्ते अण्णासाहेब पातकर

माझे मामा डी. एस. सावंत, भगिनी सौ. ताई व मेहुणे बापूसाहेब सावंत

माझ्या आई ती. वहिनी व पत्नी सौ. उज्ज्वला

दैनिक ' समाज 'चे कै. सर्जेराव पाटील व ' वसन्त ' मुंबईचे दत्तप्रसन्न काटदरे

चित्रकार सर्वश्री दुलंगे व मन्सूर शेख

टंकलेखक सर्वश्री कुलकर्णी, खानवेलकर, कवडे व भोईटे

श्री व्यंकटेश प्रिंटिंग प्रेसचे आत्मारामपंत मोहिते, डी. के. उर्फ दाजी मोहिते, कॉन्ट्रॅक्टर बाळकृष्ण शिर्के व शशिकान्त चिले

व त्यांचे मनमिळाऊ कामगार

" ..The Author acknowledges his indebtedness to the University Grants Commission, New Delhi and to the Shivaji University, Kolhapur for grant-in-aid received by him towards the cost of publication of this book.."

अनुक्रम

एक ।। प्रीतिभावना ।।
।। मूळ, प्रेरणा आणि स्वरूप ।। ९ : ५४
।। भूमिका : १ ।। १०·१५
।। मागोवा : २ ।। १६·५४

दोन ।। प्रागैतिहासिक ते अभिजात वाङ्मय ।।
।। प्रीतिभावनेची उत्कट, प्रमत्त व उदात्त रूपे ।। ५५ : ११५
।। संदर्भ : ३ ।। ५६· ८२
।। प्रवाह : ४ ।। ८३·११५

तीन ।। सामान्य विवेचन ।।
।। प्रीतिभावना : आदि ते अन्त ।। ११६ : १२४
।। निष्कर्ष : ५ ।। ११७ : १२४

टीपा ।। १२५·१२६

पार्श्वभूमी ।। १२७...

लेखकाची इतर निवडक पुस्तके

- खांडेकर : व्यक्ती आणि साहित्य / आवृत्ती संपली.
- प्र. के. अत्रे : साहित्य आणि समीक्षा
- सूर्ययुगाची सुरुवात / आवृत्ती संपली.
  ...कवी नारायण सुर्वे यांच्या कवितेवरील प्रबंध...
- प्रेरणा आणि निर्मिती / वैचारिक लेखसंग्रह / आवृत्ती संपली.
- राजर्षी शाहू : काळ, विचार आणि कार्य / आवृत्ती संपली.
- क्रांतिसूक्ते : राजर्षी शाहू छत्रपती / आवृत्ती संपली.
  ...शाहू छत्रपतींच्या मराठी भाषणांचा टीपा–टिप्पणीसह अभ्यास...
- A Royal Philosopher Speaks : Shahu Chhatrapati
  ..Lectures in English delivered by Rajarshee His Highness the Shahu Chhatrapati of Kolhapur in choronological order..
- प्रातिनिधिक कथा : अण्णा भाऊ साठे

आगामी

- म. फुले : संदर्भ, प्रेरणा आणि कार्य
  ...कै. डॉ. ना. गो. नांदापूरकर व्याख्यानमालेत दिलेली व्याख्याने...
- नांगरी परंपरेचे लोकाविष्कार / वैचारिक लेखसंग्रह
- अण्णा भाऊ साठे : जीवन व साहित्य
- कुसुमाग्रज : विचार आणि साहित्य

एक

॥ प्रीतिभावना ॥

मूळ, प्रेरणा आणि स्वरूप

मराठी ग्रंथ संग्रहालय
२८८७
दा. क्र. २३२८२
निबंध
२७।४।१
संदर्भ शाखा (स्थळ

भूमिका : १

माणसाची गोष्ट वेगळी आहे...

चांगल्यावाईटाची आवडनिवड जोपासण्याची विवेकशक्ती माणसाजवळ आहे. त्यामुळेच तो पशूकोटीतून उत्क्रांत पावत पावत माणूस झाला. माणूस जसा समाजशील प्राणी आहे तसा तो प्रयोगशील जीवही आहे. अदृश्य, अमूर्त आणि अस्पर्श्य असे, केंद्रबिंदू स्थानी असलेले मन त्याच्या कुडीचे नियंत्रण करते, आणि बुद्धी ताल, तोल सांभाळते. त्याच्या जोडीला माणसाजवळ प्रेम आणि सौंदर्य यांची आसक्ती आहे. पण जोडी जोडीच्या केवळ एवढ्या सामर्थ्यावरच त्याला पशूकोटीतून मनुष्यकोटीत प्रवेश करून घेणे अवघड होते. स्वैर, स्वच्छंदी, विस्कळित चार घटका, मौजमजा देऊ शकतात पण घडण करणारा संवाद त्यातून निर्माण होऊ शकत नाही.

संवादनिर्मितीची प्रक्रिया

टोळ्याटोळ्यांचे भटकन्ती जीवन मागे पडले, आणि वैवाहिक जीवनाचे यमनियम उपजले ते या संवाद निर्मिण्याच्या भावनेतून ! त्यातून माणसाच्या आयुष्यक्रमाला सुस्थिरता आली, व्यवस्थितपणा लाभला; आणि त्यातूनच संरक्षणास, संवर्धनास व सुधारणा-उत्कर्षास सुरुवात झाली. पशूकोटीतील बंधनहीन जीवनाला हळूहळू बांधणीची कल्पना आली व रुप धारण करायला जीवनानेही प्रारंभ केला. आणि उभ्या मानवजातीतील परस्पर जीवनाचे विकारप्रेरित प्रासंगिक साहचर्य व उपक्रम यास सुस्थिर व सुसंस्कृत स्वरूप मिळाले. ओघाने अनेक आवश्यकताही निर्माण झाल्या : त्यामध्ये एकत्रित बसण्या-उठण्याची, चालण्या-बोलण्याची, राहण्याची आणि मिळून जगण्याची गरज प्रमुख होय. निश्चित आश्रयस्थानाची कल्पना त्यापोटी उपजली. गृहसंस्थेचा उदयही या कल्पनेतून झाला. पुढे लक्षणेने स्त्रीलाच 'घर' ही संज्ञा प्राप्त झाली 'स्त्री म्हणजेच घर' असे

ऋग्वेदात म्हटले असून ('जायेदस्त' : ३·५·३·४) 'न गृहं गृहमित्या दृ गृहिणी गृहमुच्यते ' असा मनुने त्याचा अनुवाद केला आहे. त्याचा उत्कट परमोत्कर्ष दांपत्य–जीवनात आढळतो; त्याला तोड नाही. पण मानवेतर सृष्टीच नव्हे तर वनस्पती सृष्टीतही त्याची आढळणारी विलसिते लक्षणीय आहेत. त्यादृष्टीने चराचर सृष्टीतील प्रीतिभावनेचा आढळ व स्थान अजोड आहे. तसे म्हणायला हवे.

प्रीतिभावना ही मानवी जीवनातील एक मूलभूत प्रवृत्ती आहे. माणसाच्या जीवनाबरोबर ती निर्माण होते, त्याच्या जीवनाच्या संगतीने ती वाढते, ती त्याचे जीवन जोपासते नि काळवंडूनही टाकते; जीवनाच्या नाना कळा–व्यथांना ती रंगरूप देते, स्पर्शगंधांना स्वाद आणते; पण त्याबरोबर ती नष्ट न होता; मंदावणाऱ्या ज्योतीच्या तेजासारखी हरिणाच्या बेंबीतील कस्तुरीप्रमाणे आख्खे मानवी जीवनच सुगंधित करून सोडते. माणूस आणि नाळ यांचा जसा अतूट संबंध तसाच माणूस, मानवी जीवन आणि प्रीतिभावना यांचाही आहे.

आधारवडाचे 'पुरातन सूत्र'

प्रीती मानवी जीवनाची आधारवड आहे. जीवनविषयक अनेकस्वरूपी प्रश्नोपप्रश्नांची उत्तरे या आधारवडाच्या बुंध्यात असतात. कमलदलात अलगद शिरणाऱ्या भृंगाप्रमाणे प्रीतीचे गुंतणे आणि गुंतवून टाकणे असते. प्रीतीविना माणूस जगू शकतो, पण ते 'केवळ' असे जगणे अवघड, कष्टप्रद असते. अर्थात त्याविना त्याला 'उभे' मात्र राहता येत नाही. प्रीतिभावना चिरंतन आहे. दांपत्यजीवनात ती असीम उत्कटतेने उसळते : वासनेचे 'प्रीती'त प्रीतीचे 'शान्ती' त रूपांतर होते. 'एक ठेव, एक ठेवा' अशी परस्परांची परस्परांबद्दल भावना निर्माण होते. दांपत्यजीवनातील हे 'पुरातन सूत्र' आहे तर आपल्या प्राणप्रिय उमेचे अर्धे शरीर पतीरुपात धारण करणाऱ्या शंकराचे-अर्धनारीनटेश्वराचे रूप भारतीय दांपत्यजीवनाचे प्रतीक आहे.

वास्तविकरीत्या दांपत्यजीवनात कोण श्रेष्ठ नि कोण कनिष्ठ असा प्रश्नच उपस्थित होत नाही. तरीही भारतीय परंपरेने स्त्रीपेक्षा पुरुषाला अधिक महत्त्व दिले आहे. स्त्रीला 'क्षेत्रा 'ची तर पुरुषाला 'बीजा 'ची संज्ञा देऊन, मनुस्मृतिकारानी या अवघड प्रश्नाची सोडवणूक करण्याचा प्रयत्न (मनुस्मृती : अध्याय ९· ३४· ३५) केला आहे तर 'वाजसनेय ब्राह्मणा ' त स्त्री, स्वतःचा देह आणि संतान ही सारी मिळूनच पुरुष पूर्ण होतो असा उल्लेख येतो. याचा अर्थ, पती–पत्नीमध्ये कोणत्याही रीतीचे तात्त्विक अंतर

नाही असा होतो. म्हणून मीलनापासून मृत्युची गाठ बसेपर्यंत अभंगपणा हा दांपत्य जीवनाचा गाभा राहतो. यासाठी वैदिक धर्माने 'पाणिं गृण्हीयात' असा आचारधर्म सांगून ठेवला आहे. वैदिक विवाहसंस्थेचे ते वैशिष्टच आहे.

म्हणून वैदिक धर्माने 'धर्मप्रजास्त्यर्थोहि विवाह:' असे घोषित करून दांपत्यजीवनाचा गंभीर अर्थ दाखवून दिला आहे. दांपत्यजीवनात अद्वैताची मिठी पडते, त्यामध्ये शरीरसुख मागे पडते, वासनायुक्त प्रेम वासनारहित होते; 'संसारा' ची ताटी सर्वांगांनी उमलते. अनंतकाळापासून विश्वप्रकृती, अक्षय शक्तीचा स्त्रोत असलेल्या स्त्रीच्या रूपाने समूर्त होऊन पुरुषासाठी प्रेरणा, शक्ती आणि सामर्थ्य देत आली आहे: माधुर्याच्या बाबतीत ती शरद्‌तील चंद्राशी आणि ऐश्वर्यात मार्तण्डाशी स्पर्धा करते.

चिरंतन मूल्यशोधार्थ यात्रा

मानवी जीवन हे एरंडाचे झाड नाही आणि त्याला साक्षी ठेवून वाढणारे वाङमय ही केवळ शुष्क शब्दावळ नाही. जीवनातल्या चिरंतन मूल्यांच्या शोधासाठी चाललेली ती अखंड, अथक् यात्रा आहे. ललित लेखकाच्या आत्म्याचा उद्‌गार ही माणसाच्या जीवन–क्रमाची शुष्क बखर नव्हे. हे खोटे नाही. ललितकला ही मूलतः कला आहे, पण त्याबरोबरच ती एक सामाजिक शक्तीही आहे. ललितकला ही संमिश्र कला आहे. शुद्ध कलांचे सगळे नियम तिला जसेच्या तसे लागू पडत नाहीत. म्हणून साहित्याची जीवनाशी नेहमी जवळिक आहे. म्हणजे प्रीतीखेरीज जीवनाला उभारी नाही आणि जीवनाशिवाय साहित्याला आधार नाही. मानवी जीवनातील प्रीती हे श्रेष्ठ मूल्य आहे, चैतन्यपूर्ण सुंदर गोष्ट आहे. समग्र मानवी जीवन व्यापून उरणारी प्रीतिभावना अनेक अंगांनी प्रकट होते: साहित्य, चित्र, संगीत, शिल्प ही त्याची काही माध्यमे. माणूस ज्या भावना भोगतो: प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणत्याही स्वरूपाने का असेना पण त्यांचा भोगवटा करतो: अनुभवतो आणि जाणतो त्या साऱ्याची: शक्यतेनुसार साऱ्याची: अभिव्यक्ती करणे हा त्याचा धर्म आहे. 'स्वान्त सुखाय' अशा त्याच्या धडपडीबरोबरच सामाजिक ऋणमुक्तीचा वसाही यामागे असतो. ह्यात कुणाचे किती प्रमाण हे ठरवून मांडणे कठीण आहे; दोहोंचाही सहभाग राहतो. प्रेमसौंदर्यांसारख्या सार्वकालिक भावनेच्या आविष्करणात दोन गोष्टी घडतात: संपूर्ण मानवी जीवनाच्या समग्र अस्तित्वाचे 'दर्शन' घडते आणि त्यातून भावलेले, जाणवलेले अनिर्वचनीय 'सत्य' सभोवतालच्या जगाला समृद्ध करते.

उभ्या जगाला जीवन सवे घेऊन चालते : या जीवनाला किती कळा आहेत म्हणून सांगावे ?

अनंत, अगणित, असंख्य कळा. या कळाच कलेचे रूप घेतात. त्यातून कलेच्या कक्षा रुंदावतात, जीवनाच्या विस्तारतात.

माणसाचे जीवन हे सरळ रेषेत जाणारे गणित थोडेच आहे ? माणसाच्या जीवनाला गणिताचे नियम लागू नाहीत. गणितात एक अधिक एक बरोबर दोन होतात. जीवनाच्या गणितात एक अधिक एक बरोबर तीन, चार, पाच असे किती होतात म्हणून सांगावे? हे असे का होते हे कोडे सोडविणे हाच मुळी साहित्यातील गुंतागुंतीचा प्रश्न आहे. हे वाढणारे का वाढतात आणि क्वचित कमीही का भरतात याची सोडवणूक करण्याचा अट्टाहास म्हणजे साहित्याची जीवनाशी सांगड होय; जीवनातल्या चिरंतन मूल्यांच्या शोधासाठी चाललेली चैतन्ययात्रा होय : विचार, भावना आणि कल्पना यांच्या उलाढालीने साहित्यात ती आविष्कृत होते. जीवन–जगतातील नानाविध गोष्टींचे, बाबींचे, घटना–प्रसंगांचे आणि घडामोडींचे जीवनावर आघात–प्रत्याघात होतात. जीवन काहींचा स्वीकार करते, काहींचा धिक्कार. काही स्वीकारावेच लागते, तर काही फेकावे. त्यातून जीवन घडते, बनते. हे घडणारे, बनणारे जीवन विविध कलांतून प्रकटते. सरळ रेषेतील जीवन कोणत्याच प्रकारचे वैशिष्ट्य राखत नाही. त्यात उत्थानपतनाचा प्रश्नच नसतो. हर्षामर्षाला मूल्य नसते. खळखळ किंवा घालमेल यास अवसर नसतो. आणि साहित्याचा उत्कर्ष तर जीवनाच्या 'शोधा'ने, 'वर्णना'ने होतो. रहस्यमय जीवनाचे हे शोध–वर्णन रहस्योद्ग्राही उद्घाटन करणारे असते. जीवनातल्या भावभावनांचे आणि विचारविलसितांचे स्वाभाविक परिवर्तन आणि त्यांचा सहज गतिक्रम दाखविणे हा कलेचा खरा उद्देश आहे. त्यासाठी मानवी जीवनाला आघात–प्रत्याघाताचे धक्के बसावे लागतात, साहित्याची उर्मी त्यातून उसळते, फुटते.

वाटा–वळणांचा मागोवा

शेकडो वर्षांपासून ललित साहित्यात असे उसळणे होत आले आहे. मानवी जीवनाला त्यात साफल्य मिळाले आहे. बाह्य जग : स्थूल जग : साहित्याचा आधार आहे पण अर्न्तजगताने साहित्याला सावरण्याची क्षमताही आपल्यापाशी राखून ठेविली आहे. त्यामुळे प्रतिभावंत कलावंत साहित्याच्या दाराने जीवनातील सौंदर्य, साधुत्व आणि सामर्थ्य यांचे रेखांकन रसिकांसमोर सादर करीत जातो. याचा अर्थ प्रिस्टलेच्या भाषेत असा आहे : [१]

..." कलेचा हेतू एकच आहे : मानवाची जीवनविषयक अनुभूती सखोल करणे, तिच्या

कक्षा विस्तृत करणे, ती उंचावणे, तिला उदात्तत्तेचो जोड देणे, ती सामर्थ्यसंपन्न करणे आणि तिचे ताजेपण टिकविणे..." हाच 'प्रत्यय' कै. खांडेकरांनी पुढील शब्दात मांडला आहे : [२]

"...ललित वाङमय केवळ कल्पनेतून, निव्वळ वैयक्तिक अनुभूतीतून निर्माण होत नाही. अनुभूती हे बीज आहे. ते बीज ज्या मातीत पडते, त्याला उन्हापावसाची जी साथ मिळते, ते वाढू लागल्यावर त्याला जे खतपाणी मिळते, त्यातूनच त्याचे अंतिम स्वरूप निश्चित होते. ज्या ललित वाङमयाला पहिल्या पावसाने भिजलेल्या आपल्या मातीचा वास येतो, ज्याच्यामध्ये आपल्या निरभ्र आकाशाची आणि सशाच्या पिलांप्रमाणे खेळत राहणाऱ्या चिमुकल्या पांढऱ्या ढगांची प्रतिबिंबे पडलेली असतात, ज्यात पाच हजार वर्षे या समाजाला आधार देत आलेल्या मूल्यांची शीतल छाया आढळते, पिढ्यान् पिढ्या हसवीत, रडवीत आणि रंजवीत आलेल्या साहित्यगुणांचा ज्यात विकास आढळतो, ते वाङमय लोकांना जवळचे वाटते."...

आणि जीवन व साहित्य याचे आदिकारण तर प्रीती. उभ्या जीवनात ती आहे. त्यामधील संजीवनी दांपत्यप्रीती. साऱ्या सृष्टीला ती महोन्नत करते.

तसेच पाहिले तर, जीवनाच्या सान्निध्याने उभ्या राहणाऱ्या कलांमध्ये अ-सामाजिक काही असत नाही. साहित्य व जीवन यांचा अन्योन्य संबंध मृग व कस्तुरी यासारखा आहे. त्यामुळे साहित्याचे शरीर कलात्मक असले तरी आत्मा सामाजिकच असतो. मात्र मानवी जीवनाशी निगडित प्रीतिभावनेची दखल मराठी साहित्याने फारशी घेतलेली नाही. त्यामुळे प्रीतिभावनेचा शास्त्रशुद्ध विचार नाही, तसे आविष्करणाचे रूपदर्शनही नाही. अपवाद थोडाफार मराठी काव्याचा करता येईल. विविध स्तरावरील कवींच्या काव्याचा विचार करताना त्यांची प्रेमविषयक कविता वेगळी काढून त्यावर थोडेफार लिहिले गेले आहे; पण ते तेवढेच ! याचा अर्थ हा की, काव्याचा अपवाद करता मराठी साहित्याच्या इतर वाङमयप्रकारांतील प्रीतीसंबंधी लेखन टिपणांपलिकडे गेलेले नाही. ग्रंथापर्यंत पोचण्याचा आत्मविश्वास टिपणकारांना मिळालेला नाही. त्यामुळे टिपणे खूप पण ग्रंथराज नाही. त्यादृष्टीने मराठी साहित्याला बव्हंश अपरिचित, अनोळखी असा विषय हाताळण्याचा नम्र प्रयत्न आहे. प्रीतिभावना ही मानवी जीवनातील एक प्राणभूत गोष्ट असल्याने तिचे स्वरूप हलकेफुलके नाही, थिल्लर नाही; ते उत्कट, उदात्त आणि गंभीर आहे. मानवी जीवनाच्या मूल्यांकनाची ती एक कसोटी आहे आणि म्हणूनच

मागोवा : २

मानवी जीवनाच्या बैठकीत गृहस्थी जीवनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्त्री–पुरुष विशेषतः दांपत्य, त्यातील प्रमुख आधार आहे. विश्वप्रकृती, स्त्रीरूपात पुरुषासाठी, अनंतकाळापासून प्रेरणा, शक्ती आणि सामर्थ्य देत आली आहे. स्त्री अक्षयशक्तीचा स्रोत; पुरुषांच्या उत्कर्षाचा आधार आहे. केवळ चारित्र्य, गुणशीलता आणि शीलवर्धन यापुरतीच स्त्री महत्त्वाची, आदरणीय नाही तर समाजजीवनातील सुव्यवस्था, शांतता आणि ऐश्वर्य यांच्या प्रतिष्ठापनेचे तिचे कामही तितकेच महत्त्वपूर्ण आहे. स्त्री सृष्टीचे साधन व प्रकृतीचे मूर्त रूप बनून पुरुषासाठी सौंदर्य, प्रीती, समर्पण, अनन्यता आणि आनंदनिधान यांचा अलोट साठा बनून येते. तिच्या निर्मितीची, निर्मिकाची सारी कलाचातुरीच अपूर्व आहे. हे अपूर्वत्व इतके गुंतागुंतीचे की, हजारो वर्षांच्या सहवासानंतरही स्त्री अगम्य राहिली, पूर्णाशाने जाणता येऊ नये अशी उरली. केवळ ती ब्रह्माची ब्राह्मी, विष्णूची वैष्णवी किंवा शिवाची शैवीच राहत नाही; ती मानिनी बनते, कामिनी बनते, कविता होते. कारण ती तशी असते. अनेक रंगगंधांचे रुप लेऊन ती येते; वावरते.

प्रीतिभावनेची बहुविधता

अशा स्त्रीपुरुष सान्निध्याने उपजणारी प्रीतिभावना अनुकूलवेदनीय मनोवृत्ती आहे. ती व्यक्ती, जीव किंवा पदार्थांचे सौंदर्य, गुण, शील किंवा समीपता इत्यादी कारणांमुळे उत्पन्न होते; मानवी जीवन व्यापून उरते. पण मराठीत अनेक शब्दांप्रमाणे 'प्रेम' हा शब्द अतिशय स्थूल स्वरूपात वापरण्यात येतो. त्यामध्ये स्त्रीपुरुषापासून तो अवघ्या विश्वातील प्राणिमात्रातील परस्पर आकर्षणापर्यंत : प्रेमापर्यंत : सारे त्यात समाविष्ट होते. याचा अर्थ, सजीव सृष्टीसकट निर्जीव आणि अमूर्त सृष्टीसंबंधातही प्रेम हीच संज्ञा वापरली जाते. त्यादृष्टीने प्रेम ही संज्ञा ठिसूळ, सैल आणि खूपशी लवचिक आहे. तिला बंदिश नाही. रिचर्डसनने, प्रेमामध्ये प्रामुख्याने स्त्री–पुरुषांना परस्परांबद्दल वाटणाऱ्या

आकर्षणाचा अंतर्भाव केला आहे. खरे तर आपुलकी, जिव्हाळा, आकर्षण, मस्ती, आवड, मैत्री, लालसा, आदर, मृदूता या भावनांचा प्रेमात समावेश केला जातो, पण तेवढेच प्रेम नाही; ते याहून वेगळे आहे. प्रेमाशी या भावना समानार्थी असल्या तरी प्रेमाची परी काही वेगळीच आहे; उत्कट आणि सखोल आहे. गाढ आणि मृदु आहे. रिचर्डसनने म्हटले आहे : [२]

... " Love is used specifically for personal affection between the sexes and can never properly denote mere animal passion which is expressed by such words as appetite desire, lust... Love in its full sense, denotes something spiritual and reciprocal, such as Cam have no place in connection with subjects that minister merely to senses. " ...

म्हणजे प्रेमामध्ये स्त्री व पुरुष, प्रियकर आणि प्रेयसी म्हणून प्रमुख आहेत. पतीपत्नींना परस्परांबद्दल वाटणारे आकर्षण, मित्रमैत्रीणींना परस्परांबद्दल ओढणारी ओढ, अपरिचित स्त्री–पुरुषांना परस्परांबद्दल खेचणारे आकर्षण असे सारे त्यात येते. : प्राथमिक स्वरूपाचे शारीरिक, बौद्धिक–सुसंस्कृत प्रेम, सात्विक पतीपत्नीप्रेम, उत्तान शृंगार, निरभिलाष प्रीती, मधुरभाव इत्यादी सर्वांचा त्यात अंतर्भाव आहे. मात्र प्रीतिभावनेच्या उत्कट प्रकारात : दाम्पत्य प्रेमात : काम, प्रेम, प्रणय आणि मधुरभाव इत्यादी छटा विशेषत्वाने आढळतात : स्त्री पुरुषांमधील प्रेमाचा प्रमुख आधार कामभावना आहे. स्त्रीपुरुष प्रेममध्ये त्यांच्या त्यांच्या स्वतंत्र व्यक्तित्वाची पृथक् सत्ता राहत नाही; दोन्ही व्यक्तित्वांचे नीरक्षीर मिश्रण होते. एकाचे शरीर, मन आणि आत्मा, दुसऱ्याच्या शरीर, मन आणि आत्म्याशी एक होऊन जाते. असे तादात्म्यमूलक प्रेम स्थायी आहे. ऋग्वेदामध्ये 'काम' 'कामनापूर्ती' या अर्थाने आला आहे. 'एको हं बहुस्याम' च्या मुळाशी हीच भावना आहे. वेदामध्ये वर्णिलेला 'विश्वरेतस्' हा सृष्टीचा आधार असून तोच 'काम' आहे. अथर्ववेदाच्या कामसूत्रामध्ये 'काम' चा अर्थ 'संकल्पमय' असा सांगितला आहे :

रुपत्महनमृषमं धृतेन कामं शिक्षामि हविष्य ज्येन
नीचैः सपत्मान मम पादपत्यमधिष्टुतो महती वीयेण

'बृहद्आरण्यक उपनिषदा' च्या चौथ्या ब्राह्मणात प्रजननाच्या विषयाला घृणास्पद मानू नये असे म्हटले आहे. तर 'तैतिरिय ब्राह्मणा' मध्ये कामाची तुलना समुद्राशी केली आहे :

' समुद्र इव हि कामो नैव हि कामस्यन्तो स्ति न समुद्रस्य '

भारतीय धर्मशास्त्रामध्ये कामाची गणना चार पुरुषार्थामध्ये केली असली तरी अर्थ आणि काम धर्माने नियंत्रित केले आहेत. वात्स्यायनाने कामसूत्र १ · २ · १ मध्ये 'शता युवे पुरुषो विभज्य काल मन्ये न्यानुबद्ध परस्परस्यानुपघात् त्रिवर्ग सेवेन ' असे सांगून ठेवले आहे. धर्माविरुद्ध काम फलदायक न होता अमंगलकारी होतो असा कालिदासाच्या 'कुमारसंभव ' नेही आध्यात्मिक अर्थ नमूद केला आहे. केवळ शारीरिक सौंदर्योपासना कल्याणप्रद होत नसून वात्स्यायनाने कामाची परिभाषा देतानाच मनावर अधिष्ठित आत्म्याशी संयुक्त त्वचा, डोळे, कान, जिव्हा व नाक या पंचेद्रियांना इच्छानुकूल, शब्दस्पर्शरुपरसगंध या विषयांना प्रवृत्त करतो असे म्हटले आहे. वात्स्यायनाची परिभाषा 'काम ' आणि ' सेक्स ' यामधील अंतर स्पष्ट करते. वात्स्यायन–कालिदास आदीनी कामाला धर्माशी नियंत्रित करून त्याला व्यापक, सामाजिक दृष्टीची बैठक दिली आहे.

भिन्न भिन्न काळी कामाचा अर्थ निरनिराळा राहिला आहे. मात्र प्रत्यक्ष लोकजीवनात त्यास बहुतांश धर्मनिरपेक्ष असेच स्थान मिळाले आहे. मनोवैज्ञानिक क्षेत्रात ' सेक्स ' सर्वप्रमुख, मूळ प्रवृत्ती आहे. फ्राईडने ' सेक्स लिबिडो ' स मूलाधार मानले. काम किंवा ' सेक्स ' एक स्थूल शारीरिक भूक आहे. प्रेमामध्ये कामतृप्तीपेक्षा आत्यंतिक ऐंद्रियांची मात्रा अधिक राहते. कामजन्य संबंध केवळ अतृप्ती असेपर्यंत सीमित राहत असला तरी प्रेमजनित संबंध चिरस्थायी बनतो; चिरनूतन असतो. प्रीतिभावनेचे स्थायित्व मूलभूत, सार्वत्रिक व स्थळकालनिरपेक्ष आहे, असते. अशा स्वरूपाच्या भावना नेहमीच आस्वाद्य असतात. साहजिकच प्रीतिभावना वरवर साधी, सरळ आणि सोपी दिसली तरी ती अतिशय संमिश्र आणि व्यामिश्र रूपाची आहे. साहजिकच विश्लेषणापेक्षा तिचे संश्लेषण अधिक सोपे आहे. प्रेम देणारा आणि घेणारा यांचे स्नेहसंबंध जुळल्याखेरीज प्रीतीचे अंकुर फुटत नाहीत. प्रीतीने जीवने फुलतात, त्यांना फळेफुले येतात; त्याचबरोबर स्वतः विषयीची ' आत्मभावना 'ही आंजारली गोंजारली, सुखावली जाते. या ' आत्मभावने 'त स्वतःविषयीचा अहंकार असतो, तशी ' स्वामित्वा ' ची कल्पनाही असते. स्वतःची कुणावर तरी 'मालकी' आहे, आपण कुणाचे तरी 'धनी' आहोत किंवा आपल्याला कुणीतरी 'काहीतरी' मानते आहे किंवा देते आहे; आणि त्यासाठीही आपण एकमेव आहोत या अहंकाराची त्यात जोपासना होते. कुणीतरी आपल्याठायीची ही 'असाधारण योग्यता' ओळखल्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे परस्परांची ' ओळख पटणे ' होय. त्यासाठी आपुलकीची अट आणि सतत सहवासाची गरज असते. त्यामुळे परस्पर परिचय होतो, निकटतेने एकमेकांच्या स्वभावातील साम्य–वैधर्म्याची ओळख पटते, सुखदुःखांची जाणीव होते. परस्पर परस्परांच्या सुखदुःखांचे

वाटेकरी बनतात; आणि एकत्रित राहून सुखदुःखांचा अनुभव घेण्याच्या कल्पनेला तर प्रेमात अतिशय मोठे मोल आहे. आपुलकीतून प्रेमाचा उदय होत असला तरी आपुलकी संपते केव्हा आणि प्रेमाचा उदय होतो केव्हा किंवा आपुलकी विकसित होता होताच प्रेमाला प्रारंभ होतो केव्हा हे सांगणे तेवढे सहजशक्य नाही. आदर किंवा आपुलकी ही वयाची वडिलकी, ज्ञानाचे थोरपण, उपकारांचे ओझे इत्यादीमुळेही निर्माण होऊ शकते. पण हे निर्माण होणे वेगळे आणि प्रीतिभावनेत त्याचे रूपांतर होणे वेगळे. केवळ आदराच्या भावनेने प्रेम निर्माण होईल हे संभवत नाही. त्यासाठी मनाची विशिष्ट बैठक असावी लागते. हिंदु समाजातील पती-पत्नी प्रेमात आदराच्या भावनेला वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळालेले आहे. पत्नीला पतीबद्दल वाटणारा आदर आणि पतीच्या मनात गृहदेवता म्हणून पत्नीला असणारे मानाचे स्थान हा दांपत्यप्रेमातील एक महत्त्वाचा अविभाज्य भाग आहे. दांपत्यप्रेमाच्या उत्कटतेला त्याचे होणारे साहाय्य नाकारता येणारे नाही. त्याबरोबरच निष्ठा, त्याग, कौतुकाची भावना इत्यादी बाबींचाही विचार महत्त्वाचा आहे. साहजिकच ज्यासंबंधी काही वाटते त्यासाठी पडेल ती गोष्ट करण्याची मनाची तयारी होते. अशी निष्ठा आणि त्याग हा प्रीतिभावनेचा प्राणभूत घटक असतो.निष्ठेवाचून प्रेम आणि प्रेमाखेरीज निष्ठा यास कसलाच अर्थ नसतो. निष्ठेने केलेला त्याग प्रेमाला : सौंदर्याला : लेणे चढवितो, तर त्यावाचून उभा झालेला त्याग जीवन हलके बनवितो. याच्या बुडाशी असणारा दृढविश्वास महत्त्वाचा असून त्यावाचून प्रीतिभावना उभीच राहू शकत नाही. निष्ठेच्या अभावी प्रीतीचे नंदनवन उजाड होऊन जाते तर त्यागाच्या अभावी त्याला क्षयरोग्यासारखे सदाचे पिवळट रूप मिळते. त्याग-निष्ठा यांच्या सधनतेवर प्रेमाची उंची मापण्याची रीत त्यामुळेच आली. रामायणकालीन प्रभू रामचंद्र आणि आधुनिक काळातील डचूक ऑफ विंडसर ही त्याची प्राचीन-ऐतिहासिक उदाहरणे होत.

कै. प्रा. वि. पां. दांडेकर 'प्रेमाच्या पावित्र्यात' मध्ये प्रीतिभावनेच्या बहुविध रुपांचा शोध घेताना लिहितात : [४]

> .." प्रीती, भक्ती, इच्छा, आकांक्षा, लोभ आणि तृष्णा ही प्रेमाची निरनिराळी विकृत-अविकृत अशी स्वरूपे होत. रमणीचे आपल्या वल्लभावर प्रथमदर्शनी जडणारे जे प्रेम ती प्रीती, पतिव्रतेचे आपल्या पतीवर आमरण टिकणारे जे प्रेम ती भक्ती, तरुणीचे एखाद्या तरुणावर ज्या प्रेमस्वरूपामुळे मन जाते ती इच्छा, एखाद्या प्रेमी जीवाला त्याच्या दृष्टीने अत्यंत सुंदर किंवा सर्वांगपरिपूर्ण वस्तू मिळविण्याची जी स्फूर्ती उत्पन्न होते ती आकांक्षा, एखाद्या विकाराने बहकलेल्या प्राण्याने स्वतःला प्रिय परंतु न मिळणारी वस्तू विकृत स्वरूपात का होईना मिळविण्याची आकांक्षा

बाळगणे ती लालसा. ती पूर्ण होण्याकरिता लागणारा तो लोभ आणि लोभामुळे जीवाची जी तळमळ सुरू होते ती तृष्णा, अशा तऱ्हेने अत्युच्च स्वर्गकोटीपासून तो तहत् नरकापर्यंत नेऊन गाडणाऱ्या प्रेमाची ही विकृत–अविकृत स्वरूपे सर्व जगभर पसरलेली दिसतात."

अर्थात ही विकृत–अविकृत रूपे कुणाला कशी दिसावीत हा ज्याच्या त्याच्या वैयक्तिक. दृष्टीचा, आवडी–निवडीचा, रूचीअभिरूचीचा प्रश्न आहे : कुणी सुंदरावरच प्रेम करील तर कुणाला अतिशय कुरूपहीप्रेमपात्र म्हणून चालू शकेल; अशक्य काहीच नाही. त्यादृष्टीने लैलामजनूच्या अमरकथेतील किस्सा उद्‌बोधक आहे :

एकदा खलिफाने लैलाला विचारले, "जिच्याकरिता मजनू वेड्यासारखा वणवण भटकतो ती लैला तूच का ? इतर लावण्यवती स्त्रियांपेक्षा काही तू श्रेष्ठ नाहीस."

त्यावेळी लैलाने दिलेले उत्तर अतिशय मार्मिक आहे. ती म्हणाली : "आपण मजनूच्या नेत्रातून पहा म्हणजे त्याच्या वेडाचं कारण कळेल."

प्रेम डोळ्यांनी नव्हे तर मनाने जाणून घ्यायचे असते. प्रिय व्यक्तीच्या दुर्गुणाकडे दुर्लक्ष करूनही मनाने ते भोगायचे असते. प्रेमाच्या अधिसत्तेत सत्तेला आणि सत्तेच्या साम्राज्यात प्रीतीला मूल्य असत नाही. प्रीतिभावनेत हृदयाला महत्त्व असते, हृदयावर हृदयांची सत्ता चालते. हृदयाची सत्ता बांधिलकी पत्करीत असली तरी ती सुसह्य असते, तीत तक्र री असल्या तरी कुणाच्याही तक्रारी नसतात. रूखरूख असूनही कुणालाच त्याची दगदग नसते. साहजिकच प्रेमाच्या जगात सत्ता दिसत असूनही ती नसते. प्रेमाचे स्वरूप एकदेशीय नसून सार्वदेशीय आहे. त्याचे रूप द्विविध आहे : ते चैतन्यदायी, पराक्रमाला प्रेरणा देणारे तसेच अवचित् खुंटविणारेही आहे. मात्र प्रामुख्याने त्याचे स्वरूप विधायक आहे : प्रेमामुळे सभोवती चैतन्याचा समुद्र उफाळत राहतो, उत्साहाला आणि चैतन्याला त्यात उधाण येते. समग्र जीवन न्याहाळून घेण्याची त्यामधली ताकद मात्र अपूर्व असते. सुप्रसिद्ध हिंदी टीकाकार श्री रामचंद्र शुक्ल लिहितात : [५]

..." वह प्रियको अपने समग्र जीवनका सौंदर्य जगतके बीच दिखाना चाहता है यह प्रवृत्ती इस बातका पूरा संकेत करती है कि मनुष्यकी अंतःप्रवृत्तीमें जाकर प्रेमका जो विकास हुआ है वह सृष्टिके बीच सौंदर्यविधानकी प्रेरणा करनेवाली एक दिव्य शक्तिके रूपमें मनुष्यका प्रेमसौंदर्य–वास्तुसौंदर्य, कर्मसौंदर्य, वाक्‌सौंदर्य, भावसौंदर्य

सब देखना और दिखाना चाहता है " ४

प्रेमाने मनुष्य अतिशय आत्मकेंद्रितही होताना दिसतो. त्यामुळे तो इतका आंधळा होतो की, त्याला त्याखेरीज काही सुचत नाही की काही रुचत नाही; जीवनाकडे तो पुरीपुरी पाठ फिरवितो, प्रेमाची मृत्युशी गाठ घालतो, मरणात प्रेमाचे साफल्य पाहतो. अशा प्रेमिकाच्या दृष्टीने जीवनापेक्षा प्रेमाचे मोल जास्त ठरते. उर्दू काव्यात याचा प्रत्यय ठळकपणे येतो. तत्कालीन स्त्री–पुरुषांवरील सामाजिक निर्बंधामुळे, स्त्री असूर्यपश्या असल्यामुळे उर्दू काव्यात अशा कल्पनाकलित प्रेमाचा सुकाळ दिसतो. प्रेम आणि मरण, त्याचप्रमाणे प्रेम आणि अपराध यांची सांगड त्यात दिसते. प्रेम प्रखर, जीजिविषु आणि वर्धिष्णु वृत्तीचे आहे. परस्परांवरील दृढ निष्ठेवर, पाणी नसताही मुळे जमिनीत खोलवर रूजावीत त्याप्रमाणे प्रखर विरोधातही प्रेमाची मुळे खोलवर रूजतात. पण कामभावनेवरच अधिष्ठित प्रेमाला मात्र मृत्यू येण्याची शक्यता असते. अनेक कारणांमुळे कामप्रवृत्ती नाहीशी होऊ शकते : वय, शारीरिक–मानसिक दुर्बलपणा, लहरीवृत्ती अशी त्याची अनेक कारणे असतील. साहजिकच, त्यावर आधारित प्रेमही नाहीसे होते. कामभावना क्षणिक असते, प्रेम शाश्वत. कामविकाराची तीव्रता असते तेव्हा प्रीतीला नेहमीच भर असतो, बहर येतो. पण ती ओसरते तेव्हा अप्रीतीचा काळोख फैलावत जातो. कामविकारातून निर्माण होणारा प्रेमाचा भाग अधिक अद्भूतरम्य आणि काव्यमय असतो; खोटा म्हणता आला नाही तरी फुलांच्या सुवासाप्रमाणे उडून जाणारा असतो. स्त्री–पुरुषांच्या परस्पर सौहार्दपूर्ण दृष्टीने मात्र त्यास पक्वतेबरोबरच रसाळपणा येतो. पुरुषी जीवनात प्रेम एक अंग, तर स्त्रीजीवनाचे ते सर्वस्व असते. प्रेम देणे आणि घेणे हा स्त्रीचा स्वभावधर्म तर ते भोगताभोगता पराक्रमाला आवाहनामागून आवाहने देणे हा पुरुषाचा सहजस्वभाव असतो. मानवी जीवनातील प्रेमाचे विशदीकरण बर्ट्रांड रसेलने आपल्या 'Marriage and Morals' मध्ये चांगले केले आहे. रसेल लिहितो : ६

" ...प्रेम हे शारीरिक आकर्षणापेक्षा फार उच्च आहे. पुष्कळ स्त्री–पुरुषांना जो एकटेपणा वाटतो त्यापासून सुटकेचा प्रेम हा एक मार्ग आहे. बहुतेक माणसांना सहानुभूतिशून्य जगाची मनातून भीती वाटते, समाजाच्या निष्ठुरपणाबद्दलही त्यांच्या मनात खोल अढी असते. आकर्षणात्मक अनुरागाची आकांक्षा प्रत्येकाला असते. निसर्गाने मनुष्यप्राण्याला एकटे राहण्यासाठी काही निर्मिले नाही. सृष्टीचे वंशवृद्धीचे कार्य एकटयास करता येणे शक्य नाही. ज्याना उत्कट प्रेम व उच्च स्नेह माहीत नसेल त्यांना केवळ लैंगिक भावनेमध्येसुद्धा सुख लागणे कठीण आहे..."

यावरून प्रेम ही एक सृजनशील शक्ती असून ती तारते आणि मारतेही; मात्र निष्प्रेम जीवन कुणालाच नको असते; त्याहून प्रेमनिराशा परवडते आणि ओघाने मृत्युही ! श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी 'भंगलेले देऊळ' मध्ये या व्यथेचे वर्णन करताना म्हटले आहे : [७]

..." प्रणयाइतका उन्मादकारी मोह मानवी जीवनात दुसरा कोणता असू शकेल ? इतर मोह असे असतात की त्यांची धुंदी उपभोगामुळे येणाऱ्या श्रांततेने नंतर तरी उतरते डोळ्यांवरून. पण प्रणयाच्या धुंदीला ना अंत ना उसंत. मीलनापूर्वी उत्कंठेचे, मीलनाच्यावेळी अद्वैताचे आणि मिलनानंतर चिंतनाचे सुख उपभोगत असते आणि प्रत्येक सुखाची गोडी किती अवीट ! मला केव्हा केव्हा असे वाटते की हलाहल, अमृत आणि मदिरा या तिघा भावंडांचे परस्परविरोधी गुणधर्म मिसळून विधात्याने प्रणय ही चीज निर्माण केली असावी. विषाची दाहकता, सुधेचे माधुर्य आणि सुरेची मादकता या तिन्हींचा मिलाफ झालेला आहे प्रीतीत ! "...

कै. माडखोलकर यांनी प्रेमाला 'मोह' म्हटले असले तरी मोहात प्रकट होणारा क्षणिक आवेग, प्रासंगिक क्षणभंगुरता इत्यादीपासून प्रेम दूर असते. प्रेमात गाढपणा, दृढपणा आहे, सर्वोच्च समर्पण आहे; मोहात त्याचा अभाव आहे.

प्रीतिभावनेचा मुळारंभ

प्रीतिभावनेच्या मूळ रूपाचा शोध अनुभूती व तद्विषयक चिंतन या अंगाने घेणे इष्ट ठरेल.

प्रेमाच्या अनुभूतीनेच आत्म्याचे उन्मीलन होते. विशुद्ध प्रेमाची अनुभूती ही व्यापक, विराट व शक्तिशाली अनुभूती आहे. तीत अंतःकरणस्थित आत्म्याचा तात्काळ अनुभव मिळतो. त्यामुळे जीवन व प्रकृती यांचे रहस्य ध्यानात येते व गीतेतील सूत्रानुसार [८] 'सूत्रे मणि इव' प्रमाणे जीवनजगतातील समस्त पदार्थ एकाच दिव्यशक्तीत सामावून राहिले आहेत याचा साक्षात्कार घडतो. अशा अनुभूतीपूर्व साऱ्यांची अवस्था काहीशी निर्जीव, आनंदरहित व जड असते, मात्र अनुभवोत्तर सारे दिव्य, प्रफुल्लित, आलोकमय, जागृत आणि आनंदी बनते. या अनुभूतीमुळेच प्राणी प्रकृतीच्या बंधनातून मुक्त होतो. एवढेच नव्हे तर पवित्र होऊन, देह आणि चित्त यांनी उचंबळून येऊन आपल्या आत्म्याच्या आनंदमय स्वरूपात लीन होतो. प्रीतीच्या या उदात्त अनुभूतीच्या स्वरुपाचे पूर्ण संतोषकारक विश्लेषण या तत्वसूत्राच्या आधारावर केले तरच ते होऊ शकते. याची साक्ष 'कठोपनिषद्' : १·३·१०, 'गीता' : ३·४२, 'बृहदारण्यकोपनिषद्' : २·४·४ व 'शांकरभाष्य' : २·३·३७ मध्य

मिळते. त्यामुळे प्रीतिभावनेच्या वास्तविक सत्तेचे मर्मोद्घाटन होते. प्रेमाच्या वृत्तीचा विकास प्रकृतीत असतो. प्रकृतीचा हा धर्म इंद्रियांच्या माध्यमातून प्रकाशित होतो; पण हे समजावून घेणे म्हणजे प्रेम समजावून घेणे नव्हे. शाळेला जाण्यासाठी बाहेर पडलेल्या बालकाने शाळेला दांडी देऊन रस्त्यातच पतंग उडवीत बसण्यासारखेच हे आहे. खरे हे आहे की, मन आणि इंद्रिये यांच्या माध्यमातून अभिव्यक्त होणाऱ्या प्रीतिभावनेचा मूळ उगम आत्मा आहे. आत्म्याच्या प्रेरणेशिवाय कोणताही आनंददायक इंद्रिय व्यापार होऊ शकत नाही. वात्स्यायनाने ' कामसूत्रा 'मध्ये त्यास पसंती दर्शविली आहे. त्यादृष्टीने पाहता प्रीतिभावनेचे विवेचन दोन दृष्टीनी करता येते :

१. आत्म्याच्या दृष्टीतून : प्रेम शाश्वत असून आत्म्याचा तो धर्म आहे. २. देह व चित्त या दृष्टीतून : प्रेम हा केवळ प्रकृतीचा धर्म आहे. पैकी पहिली आध्यात्मिक तर दुसरी व्यावहारिक दृष्टी आहे. निराकाररूपात आत्मा साऱ्या शक्ती एकवटून एकसंधून आहे. आत्म्याच्या शाश्वत रूपातील धर्म, प्रेम किंवा आनंद यामध्ये विद्यमान आहे. मात्र त्याचे प्रकाशन आत्म्याला सगुणरुप मिळण्यावर असून चित्त व इंद्रिय यांच्याशी ते निगडित आहे. समग्र अन्तर्बाह्य जीवनाला प्रकाशदान करणारे ते सूर्यपिंडसदृश केंद्र आहे. चित्त व इंद्रिय यांच्या माध्यमातून प्रकाश विकेंद्रित होत नाही तोपर्यंत आत्मा निराकार रूपात असतो; प्रकृतीच्या साहाय्याने प्रकाश विकेंद्रित होतो. तेव्हा त्याचे सगुणरूप उन्मीलित होते. प्रेम व आत्मा या दोन्ही गोष्टी निर्गुणरूपात एकच आहेत; एक दुसऱ्यास पर्याय आहे. ही उच्च अवस्था ' Love is God, God is Love ' अशी असते. यावरून चित्त आणि देह यांचा अति निकटचा संबंध स्पष्ट होतो. देहाच्या साऱ्या गतीविधींचे नियंत्रण चित्तवृत्तीकडून केले जाते. आत्मा, देह व चित्त ग्रंथीस्वरुप आहे. ते योजक आणि विभाजक दोन्हीही आहे. त्या संबंधात ' पातंजलयोगसूत्र ' : ४६ व ' कैवल्यपद ' : ३२·३४ मध्ये विवरण आढळते. प्रीतिभावनेचा हा विचार आत्म्याला मूळ आधार मानून केला. चित्त व इंद्रिय यांच्या आधारेही प्रेमतत्त्वाचे विवरण करता येते : आत्मा मूलतः निर्गुण आहे; सगुण नाही. प्रेम चित्ताचा गुण आहे; कारण चित्ताच्या द्वारा ते देहाच्या माध्यमातून अभिव्यक्त होताना दिसते. कित्येक लोक आत्म्याच्याठायी विश्वास ठेवत नाहीत परंतु प्रेमाच्या बाबतीत आस्था ठेवतात. भगवान बुद्धाची गोष्टच घ्या ना. बुद्ध पुनर्जन्म मानीत होते पण ईश्वर त्याना साफ नामंजूर होता. तरीही ते असीम प्रेम व कारुण्याचे भोक्ते होते एकूण, कोणत्याही अवस्थेमध्ये प्रेमाचे प्रकाशन चित्त किंवा देह याद्वारा व्हायचे हे ठरलेले आहे. तात्पर्य हे की, देहाच्या संपर्काशिवाय कोणत्याच वृत्तीचा उदय होत नाही. आपल्या चित्तात प्रेम, क्रोध, घृणा, इर्षा इत्यादी नाना चित्तवृत्तींचा आविर्भाव देह असण्यावरच आहे. देह नाही म्हणजे चित्तवृत्तींचा उदय नाही. चित्ताच्या कोऱ्या भूमीचा उपयोग काय ? चित्ताच्या

भूमीत बीज उगवणार आणि अंकुरित, पल्लवीत, पुष्पित व फलित होणार ते आत्म्याच्या आधारे. त्यादृष्टीने प्रेम आत्म्याचा धर्म नाही तर चित्ताचा आहे; सगुण आत्म्याचा आहे. त्यामुळेच आध्यात्मिक पातळीवरील प्रीतिभावनेचे स्वरूप बरेचसे गुंतागुंतीचे बनते.

प्रेम : व्युत्पत्ती आणि व्याप्ती

ऋग्वेदासारख्या प्राचीन ग्रंथामध्ये 'प्रेम' हा शब्द आढळत नाही. तेथे 'प्रिय' शब्द मिळतो, 'प्रेम' लाभत नाही. ऋग्वेदात 'प्रिय' या शब्दाचा प्रयोग तिन्ही लिंगांमध्ये आणि सर्व विभक्तींमध्ये केला आहे. पुराणइतिहास काळात, श्रीमद्भागवत व नारदभक्ती सूत्रादी भक्तिप्रधान ग्रंथांमधून प्रेम हा शब्द मिळतो. 'प्रेमन्' ही भाववाचक संज्ञा आहे; शब्द आहे. तो संस्कृतमध्ये नपुंसक लिंगात तर हिंदीमध्ये दोन्ही लिंगांमध्ये उपयोजिला जातो. प्रसिद्ध 'वाचस्पती कोशा' मध्य त्याची व्युत्पत्ती 'प्रिय' शब्दापासून झाल्याचे सांगितले आहे. 'प्रियस्य भावः इमानिच् प्रत्यय आदेशः' (वाचपस्त्य कोश : पृ. ४५०) 'प्रियस्य भावः प्रेम' (पुल्लिग) प्रिय प्रकृती किंवा भावार्थक 'इमन्' प्रत्ययापासून प्रेम शब्द निघाला आहे; म्हणून 'प्रेमन्' चा अर्थ झाला प्रियता. या 'प्रिय' चा भाव म्हणजे प्रिय होणे होय. प्रेमन् शब्दाची व्युत्पत्ती 'प्री' (अर्थात् प्रसन्न करणे, आनंद घेणे किंवा आनंदित होणे) या धातुला मीनन् (मन) प्रत्यय जोडूनही होऊ शकते. या शब्दाचे लिंग नपुसकलिंगी होते. व्याकरणानुसार प्रेम शब्दाची आणखी एक व्युत्पत्ती होऊ शकते : 'प्रीञ् प्रीतौ' धातुपासून उणादि सूत्र 'सर्व धातुम्यः' पासून 'मानिन्' प्रत्यय लावून प्रेम शब्द होऊ शकतो. या प्रमाणे व्युत्पत्तीप्राप्त प्रेम या शब्दाचा अर्थ होतो : जो प्रेम देतो तो; ज्यामध्ये अनंत तृप्ती अंतर्भूत आहे तो.

'प्रेम' हा शब्द अत्यंत व्यापक आहे : विविध अर्थांनी तो प्रतीत होतो; त्याचप्रमाणे विविध अर्थांची व्याप्तीही तीत अंतर्भूत आहे. त्याच्या शब्दार्थावरूनच त्याची व्यापक कक्षा आणि त्यात सामावलेली विशाल भावना इत्यादींचा बोध होतो. 'वाचस्पती', 'कोशकार', 'अमरकोशकार' आणि अन्य सुप्रसिद्ध भारतीय कोशकार सर्वांनीच त्यास अनेक सूक्ष्म भावनांचा वाहक बनविलेला आहे. उदा० :

'सौहार्द स्नेहे हर्षे'
प्रेमा ना प्रियता हार्दे प्रेम स्नेहो ध दोहोदम्

पाश्चात्य कोशकारांनीही प्रीतिभावनेला व्यापकतेबरोबरच सूक्ष्मताही देण्याचा प्रयत्न केला

आहे. अर्थ, पौर्वात्य काय किंवा पाश्चात्य काय सर्व कोशकारांनी 'प्रेम' हा शब्द स्थूल इंद्रियापुरता किंवा त्याच्याशी निगडित अर्थापुरता मर्यादित केलेला नसून त्याचे व्यापकत्व सर्वदूर विस्तारून दाखविले आहे.

कोशकारांच्या अर्थाचा आधार, प्रायः व्याकरणगत व्युत्पत्ती व साहित्यगत प्रयोग यांच्याशी निगडित असतो. ते शास्त्रीय असतात. खेरीज कवी, भक्त, दार्शनिक, साहित्यिक, साधक यासारख्यांकडूनही शब्दांचे अर्थ निश्चित होत असतात, शब्दच्छटा पालटत जातात. त्यामागे अनुभव व अध्ययन यांचा आधार असतो. अशा वचनांकडे वळणे इष्ट ठरते.

... १. अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपं । मूकास्वादनवत् । प्रकाश्यते क्वापि पात्रे । गुणरहितं कामनारहितं प्रतिक्षणवर्धमानम्विच्छिन्नं सूक्ष्मतरलनुभवरूपम् । तत् प्राप्य तदेवावलोक्यति तदेव शृणोति । तदेव भाषयती । तदेव चिन्तयति : नारद

२. **एक मरोसा एक बल, एक आस विसवास**
एक राम घनस्याम हित, चालक तुलसीदास : तुलसी

३. '**अहंकाराच्या त्यागाने प्राप्त होणारी मुक्ती म्हणजे प्रेम**' असे ओस्वाल्ड श्वार्त्झने म्हटले आहे. 'Psychology of Sex' मध्ये तो लिहितो : [१०]

" ... The meaning of love, speaking generally is the justificance and reliverance of individuality through sacrifice of egoism "....

टेनिसन्ही अशीच भावना व्यक्त करताना आढळतो. अर्थात प्रेम न करण्यापेक्षा प्रेम करून ते असफल होण्यात मानहानी समजण्याचे कारण नाही. मात्र प्रेम न करण्याचा, प्रेम न देण्याचा, प्रेमाच्या भानगडीत न पडण्याचा सरळ अर्थ होतो : जीवनाचा निषेध किंवा वाहत्या जीवनाला अटकाव करणे, बांध घालणे; प्रतिबंध करणे. असे घडतच नाही असे नाही; पण घडणारे अपवादभूत असते हेही खोटे नाही. अशी व्यक्ती अर्थातच नेहमी अंधारात असते. प्रीतिव्यापारामुळे तिला लाभणारी अभेदावस्था मिळत नाही. प्रेमाजवळ तुच्छ वासना असत नाही. भिन्नभिन्न माणसे, विभिन्न सामाजिक वर्ग व प्राणी या सर्वांना एका सूत्रामध्ये बांधून ठेवणारी प्रेमाखेरीज दुसरी असाधारण गोष्ट नाही. म्हणून व्यवहार आणि दर्शन या दोहोंमध्ये ती स्वीकारार्ह आहे प्रीतीचा खरा अर्थ

मागोवा : २५ ◆◆◆

आहे वास्तविक सौंदर्याचे दर्शन. त्यामुळे खऱ्या प्रेमाच्या ठायी निर्मिकाच्या दर्शनाची साक्ष मिळते. कविवर्य टागोरांच्या मते, 'प्रीती ही केवळ एक भावनाच नाही; तो परमार्थ आहे; ते परम सत्य आहे; सृष्टीतील आनंदाची ती प्रेरणा आहे; ज्योतिर्मय ब्रह्म आहे.' साहजिकच हानीलाभाच्या दृष्टीतून प्रेमाकडे पाहणे इष्ट नव्हे; तिथे खऱ्याखुऱ्या प्रेमाचा लाभ होत नाही. तो बाह्योपचार ठरतो. प्रेमाची प्रचीती हा मानवी जीवनातील परम अनुभवाचा साक्षात्कार असतो. प्रेम ओझे नाही, जीवन ललितमधुर करणारी ती शक्ती आहे. प्रेम नसल्यास धनसंपत्ती भार आहे. प्रेम माणसाला अनिर्वचनीय तृप्ती व शांती प्रदान करते. ज्ञान : ध्यान यासारखा तो चैतन्यदायी प्रकाश आहे. घेण्यात नव्हे तर देण्यात प्रेम आहे; त्यातच त्याची खरी आस्वाद्यता आहे. प्रेम एक सार वस्तू आहे, बाकी सर्व फिजूल आहे. बिल डयुरांटने 'The Masions of Psychology' मध्ये त्याचे चांगले विवेचन केले आहे.

प्रेम ही संज्ञा व्यवहारात अतिशय लवचिक असून स्त्रीपुरुष प्रेमाचे उगमस्थान कामभावना आहे. पण कामभावना आणि कामवासना एक नव्हेत. कामवासना थयथयाटी, तर कामभावना संथ, शहाणी. कामवासनेत शरीराला, त्याच्या भोगण्याला, हव्या तशा भोगण्याला महत्त्व आहे तर कामभावना देहापेक्षा मनाशी निगडित आहे. कामवासना वादळी, फुंफाटी स्वरूपाची, उतू जाणारी तर कामभावना बंधित, सार्वकालिक, टिकाऊ आणि शाश्वत असते; तिचे रूप दानवी नसून मानवी आहे; अनैसर्गिक नसून नैसर्गिक आहे; सहजस्वाभाविक आहे. कामभावना ही सुसंस्कृत आणि संस्कारित असल्याने सर्वसाधारण समाजमनाला तिचे आकर्षण आहे.

प्रेम आणि प्रणय यामध्येही भेद असून Love आणि Romance असे त्याचे इंग्रजी-मधील पर्याय म्हणता येतील. प्रणयात शृंगाराला, अद्भूत पराक्रमाला अधिक महत्त्व असून प्रेम उत्कट, उच्च दर्जाचे, सात्विक असते. प्रणय बहुतांशी वैषयिक असतो; विवाहापूर्वीचा तो प्रणय आणि विवाहानंतरचे ते प्रेम असे स्थूलपणे म्हणता येईल. प्रेम : प्रणय : हा काहीसा पुरातन भाग आहे. त्यादृष्टीने मैत्री : स्त्री-पुरुषामधील मैत्री : हा आधुनिक विचारसरणीचा भाग आहे. समान बैठकीची भूमिका हा मैत्रीचा आधार असतो; तीत अपेक्षेपेक्षा निरपेक्षपणावर आणि शारीरिक आकर्षणापेक्षा मनोमीलनावर विशेष भर असतो. आधुनिक काळातील सहशिक्षण आणि स्त्रीस्वातंत्र्य इत्यादीमुळे मैत्रीच्या भावनेला दृढ आधार मिळालेला आहे. मैत्रीमध्ये स्थूलरूपाने दोषांवर पांघरूण आणि गुणांचा गौरव यास प्राधान्य मिळते. मैत्रीतील विशुद्धता मृदुत्वाने विनटलेली असते; त्यामुळे सुसंस्कृतच नव्हे तर सर्वसाधारणांच्या मनाला तिचे आकर्षण वाटते.

समृद्ध मैत्रीचा पुढील टप्पा म्हणजे, प्रेम व भक्ती यांच्या विलक्षण लोभसवाण्या मिश्रणाने, जिव्हाळ्याने, स्नेहभराने, आपुलकीने भरलेला मधुरभाव होय. भक्तीत वासनेला स्थान नसते, शारीरिकतेला गौण महत्त्व असते. विलीन होणे, समर्पित होणे, आराध्य दैवतात 'स्व' ला समर्पित करणे; स्वतःचे वेगळेपण न राखणे ही मधुरभावाची लक्षणे आहेत. आर्य स्त्रीचे प्रेम कधी कधी या पातळीवर जाऊन पोचल्याचा अनुभव येतो. तात्पर्य, प्रेमाच्या उत्क्रांतीचा मागोवा कामभावनेच्या गंगोत्रीत घेता येतो. कामभावना ही उपजत सहजप्रवृत्ती असून ती मानव व मानवेतर प्राणी यांना स्थूलरूपाने समान आहे. 'आहारनिद्राभयमैथुनच सामान्यमेतद पशुभिर्नराणाम्' मध्ये त्याचाच पायरव आहे.

संतती, त्या अनुरोधाने वंशवर्धन आणि वंशसातत्य इत्यादी दृष्टीने कामप्रवृत्तीची अपरिहार्य अटळता स्पष्ट असल्याने निसर्गाने ती मुळातून जन्माला घातली आहे. आदिमानवाच्या अनिर्बंध रानटी अवस्थेत स्त्रीपुरुषांना परस्पराबद्दल वाटणारे आकर्षण कामभावनात्मक होते. तिच्या पूर्तीसाठीच एकत्र येत, तृप्ती होताच दूर होत. मानवाचे रानटी अवस्थेतील कामजीवन पशुपक्ष्यांप्रमाणेच अनिर्बंध होते. डब्ल्यू बोएशे त्याचे वर्णन करताना लिहितो : [११]

> " ... And so you already clearly have to two poles of possibilities, as it were, in the animal kingdom : in one case all the young are common property maintained by the community amid ever slighter individualization of origin and in other case all the females accassible to one male performs on invaluable service to the community as a leader and in return all the females are elite disposal ... "

बोल्शेकृत नैसर्गिक अवस्थेचे हे दर्शन पुढे बदलते : टोळीतील प्रमुखाची साऱ्या स्त्रियांवरची मालकी मंदावली, श्रमविभागणीचे तत्त्व अस्तित्वात आले, मानवाच्या सांस्कृतिक विकासाने गती घेतली, त्यानुसार कामभावनेचे स्वरूपही बदलत गेले. या सांस्कृतिक विकासामुळेच स्त्रीपुरुषांच्या अनिर्बंध, अनियमित आणि बेबंद कामजीवनाला चौकट मिळाली. साहजिकच कामजीवनाला सातत्य लाभले, त्याच्या पूर्तीची हमी मिळाली; या हमीतच विवाहसंस्थेचा उगम आहे. महाभारताच्या आदिपर्वातील जाबालीची कथा विवाहसंस्थेच्या उत्पत्तीवर त्याचबरोबर निसर्गतः दुर्बल असलेल्या स्त्रीच्या स्वसंरक्षणाच्या अक्षमतेवरही उत्तम प्रकाश टाकते. निसर्गतःच दुर्बल स्त्रीला संरक्षण देण्याची जाणीव विवाहसंस्थेच्या उत्पत्तीच्या

मुळाशी नाही असे नाही. स्त्रीचे सौंदर्य व त्यानुरोधाने स्त्रीवरील स्वतःचे स्वामित्व व माणसाची पूर्णत्वाची इच्छा ही त्यामागील काही कारणे आहेत. अर्थात् विवाहसंस्थेची निर्मिती संरक्षणाच्या भावनेतून झाली हे मत सर्वसामान्यच आहे. विवाहसंस्थेवर अधिष्ठित कुटुंबसंस्थेत माणसाला सुरक्षितता वाटते. त्यासाठी त्याने विवाहसंस्थेचे रूप आकाराला घातले असून त्याद्वारा कामभावनेला धार्मिक अधिष्ठान मिळवून दिले आहे. त्याअर्थाने विवाहसंस्था ही प्राचीन संस्था असून त्यासंबंधीचे उल्लेख वेदांतही म्हणजे ख्रिस्तपूर्व १, ००० वर्षापूर्वीपासून आढळतात. सूत्रकालात विवाहांच्या आठ प्रकारांचे अस्तित्व दिसते तर मनुस्मृतीत त्यांचे यथोचित वर्णन आढळते.

अर्थात् पुराणकाळात स्त्रियांना स्वातंत्र्य होते. 'मनुस्मृती' व 'मत्स्यपुराण' इत्यादी ग्रंथांमधून तसे उल्लेख आढळतात. मात्र रामायण–महाभारतासारखे आदर्श ग्रंथ समोर असूनही स्त्रीविषयक एकूण दृष्टी, ती एक उपभोग्य वस्तू अशीच आहे. समाजस्थितीचा हा परिपाक दिसतो. मात्र वेदकालात कामजीवनावर विशेषसे निर्बंध नव्हते. प्रजापती आणि त्याची कन्या उषा, मनु आणि त्याची कन्या इला यांच्या मीलनाच्या उल्लेखावरून तत्संबंधीच्या समाजस्थितीचा सहजरीतीने बोध होतो.

प्रीतिभावना : तिची विविध रूपे

एकूण प्रीतिभावनेचा विचार करता, स्त्रीपुरुषांमधील सर्वसाधाण प्रेम आणि वैवाहिक प्रीती यामधील फरकाची सहज जाणीव होईल. वैवाहिक प्रेमामध्ये आपण एकमेकांचे आहोत ही भावना प्रबळ असते. ओस्वाल्ड श्वार्त्झ म्हणतो : [१२]

> "...It is feeling of belonging to another person. More closely and more completely then in any other human relationship, it is the sense of being wedded together with this other into the unit of the 'couple' of the 'we' the two mythical hates have found each other for ever. ..."

असे प्रेम सहजासहजी उपजत नसते. केवळ विवाहसूत्राने किंवा एकत्र येण्याने ते निश्चित होत नाही. विवाहामुळे मिळणारा सहवास, त्यातून उपजणारी 'साथी'ची भावना, यामुळे झालेले संस्कार इत्यादीमुळे ते सतत फुलत असते. त्यातून वैवाहिक जीवनातील प्रारंभीच्या कामप्रधान, उथळ आणि खळाळणाऱ्या प्रेमाला दृढता मिळते. त्याला

काहीशी गंभीरता आणि सखोलता प्राप्त होते. स्त्रीच्या वैवाहिक जीवनाचा विचार करताना प्रा. वि. वि. दीक्षित यांनी म्हटले आहे : [१३]

"... पूर्ण मानसिक ऐक्य विवाहोत्तर १०–१२ वर्षांनी तिला प्राप्त होते. व त्यानंतर उपाधिनिरपेक्ष प्रणयाचा उदय होतो. हा प्रणय, हा स्नेहभाव स्त्री आमरणान्त टिकविते. .."

हे सर्वार्थाने खरे आहे : सुरुवातीचे वैवाहिक प्रेम, आकर्षण भडक रंगाच्या फुलाप्रमाणे, तर पतीपत्नी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या समरस झाल्यानंतरचे वैवाहिक प्रेम जाईजुईच्या नाजुक फुलासारखे सौम्य सुगंध देणारे असते. पतीपत्नी एकमेकांच्या सुखदुःखांचे, आपत्ती–संकटांचे वाटेकरी असून नुसते सुखःदुखच नव्हे तर पापपुण्याचाही समावेश या भागीदारीत होतो. भारतीय तत्वज्ञानाचा तो महत्वाचा भाग आहे. भवभूतीच्या 'उत्तररामचरिता' त त्याची सुरेख गुंफण केलेली आढळते. विवाहोत्तर प्रेमातील अद्वैत मांडताना भवभूती म्हणतो :

अद्वैत सुखदुःखयोरनुगतं सर्वास्ववस्थासु यद्
विश्रामो हृदयस्य यत्र जरसा यस्मिनन् हार्यो रसः
कालेनावरणात्ययपरिणते यत्स्नेहासरे स्थितं
भद्रं तस्य सुमानुषस्य कथमप्येकं हि तत्प्रार्थयते

या अद्वैतासाठी विवाहाची अट आहे. त्यामुळे पतीपत्नीचे मन, आत्मा आणि शरीर यांचे मीलन होते. शारीरिक संबंधातून स्पष्ट होणारा मानसिक मीलनाचा भाग महत्वाचा आहे. वैवाहिक प्रेमामधील कामभावनेची अपरिहार्यता ओस्वाल्ड श्वार्त्झने वर्णन केली आहे. ते लिहितात : [१४]

"...Marriage without sexuality is not a platonic or idealistic or white or clean marriage, but no marriage at all..."

ही अपरिहार्यता कायदाही लक्षात घेतो. त्यातून मनाचे पूर्ण ऐक्य, अपरिमित निष्ठा आणि हालअपेष्टा भोगूनही अनिर्वचनीय सुख यांचा उगम होतो; जीवन जगण्याची सहजता प्रकट होते. परस्परांना ओळखून जीवन प्रवाही ठेवणे ही वैवाहिक जीवनाची गुरुकिल्ली आहे. 'एकोहि दोषो गुणसन्निपाते निमज्जतिन्दो किरणोष्विवाकं' : हा त्याचा पाया आहे;

विवाहामुळे हे घडू शकते. ते घडण्यातच वैवाहिक जीवन आहे. अन्यथा भरतीच्या लाटा ओसरताच उघड्या पडणाऱ्या वाळवंटासारखी जीवनाची अवस्था होते. ओस्वाल्ड श्वार्ट्झ सांगतो : [१५]

"... Love is the match that lights the fire at the hearts which since fire immomorial was held as the symbol of marriage "...

खरे तर प्रेम ही नैसर्गिक प्रवृत्ती असून विवाह हा मनुष्यनिर्मित करार आहे. त्यातूनच अपरिहार्यपणे सहवासातून प्रेम निर्माण होते आणि पतीपत्नीचे नाते अतूट बनते.

सुप्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेता प्लेटो याने 'मानवी मनाची सुंदर व स्पृहणीय गोष्टीबाबत होणारी हालचाल वा त्याबाबतची इच्छा म्हणजे प्रेम' असे म्हटले आहे. आदर्शवादी प्लेटोने

१. कामभावनायुक्त प्रेम : vulgar eros : व

२. स्वर्गीय प्रेम : Platonic love

असे प्रेमाचे दोन प्रकार मानले आहेत. प्लेटोच्या आदर्शवादी विचारसरणीतून त्याची स्वर्गीय प्रेमाची : Platonic Love : कल्पना विकसित झाली आहे. 'स्वर्गीय प्रेम म्हणजे आत्म्याला आदर्शाविषयी वाटणारे आकर्षण' असे प्लेटोचे मत आहे. ते व्यावहारिक पातळीवरचे नाही.

स्वार्थप्रेरित प्रेम खालच्या दर्जाचे, आनंददायक वरच्या दर्जाचे आणि त्याग किंवा आत्मसमर्पण या भावनांनी युक्त ते उच्च दर्जाचे प्रेम असे ग्रीक लोक मानतात. भारतीयांच्या सात्विक, राजस, तामस प्रेमाशी ही वर्गवारी मिळतीजुळती आहे. त्यादृष्टीने प्लेटोने Symposium मध्ये प्रेमाची दिव्यता स्पष्ट करून सांगणारी कल्पना मांडली असून ती मनोरंजक तितकीच बोधप्रद आहे. [१६] वेरियर एल्विनचे त्यावरील भाष्यही विचारास चालना देणारे आहे. [१७] " ॲरिटॉटलने प्लेटोच्या तत्वज्ञानाचा विस्तार केला असून प्रेमविषयक कल्पनेच्या संबंधात प्लेटोच्या व्याख्येला त्याने आदर्श स्वरूप प्राप्त करून दिले आहे. प्रेमाच्या प्रेरक शक्तीमुळे जगाला चालना मिळते, अपूर्णत्वाकडून पूर्णत्वाकडे जाता येते असे त्याने म्हटले आहे. सौंदर्यवादी विचारसणीवर या कल्पनेचा मोठा पगडा आहे. प्रेमाच्या ख्रिश्चन कल्पनेत आदर्शावरील आसक्तीरहित प्रेम अंतर्भूत आहे;

तर ' शिव्हेल्री'त स्त्रीदाक्षिण्याला अपार वाव आहे; साहजिकच विवाहबाह्य संबंधालाही संधी आहे; त्यामुळे त्यामधील उदाता, पावित्र्य, नीतीअनीती इत्यादीना अर्थात्च धक्काही पोचू शकतो.

प्रेमाबरोबर भक्तीच्या विविध आविष्कारात काही वेळा भक्त स्वतः प्रेयसी समजून परमेश्वराला आपला प्रियकर मानतो, त्या भावनेने त्याचा अनुनय करतो. अतिउत्कट असा हा आविष्कार होय. विदर्भातील सुप्रसिद्ध संत कै. गुलाबराव महाराज यांच्या उभ्या जीवनात असा आविष्कार आढळतो. भागवतातील रासक्रीडेच्या वर्णनात (भागवतः दशमस्कंध अध्याय : २९ते३३) मधुराभक्तीचा आविष्कार दिसतो. जयदेवाच्या 'गीतगोविंदा 'मध्ये राधाकृष्णप्रेमाचा चिरमधुर वर्ण्यविषय आहे. या मधुरभावाचा उत्कट आविष्कार बंगालमधील चैतन्य संप्रदायात झाल्याचे दिसते. राधेचे प्रेम हे त्याचे उज्ज्वल रूप असे मानण्यात येते. मधुरभावाला साहित्यशास्त्रात स्थान मिळवून देण्याकरिता श्रीचैतन्यदेवाचे शिष्य रूपगोस्वामी यांनी ' श्री हरिभक्तिरसामृतसिंधु ' आणि ' उज्ज्वल नीलमणी ' या ग्रंथांची रचनाही केली आहे.

सूफी संप्रदायाच्या तत्वज्ञानाचे मधुरभावाशी बरेचसे साम्य आहे. सूफी विचारसरणीत परमेश्वर आणि भक्त यांचे संबंध प्रियकर आणि प्रेयसी यांच्यातील प्रेमाच्या स्वरूपात वर्णिलेले असतात. ही प्रीती गूढ आणि काहीशी अनाकलनीय समजली जाते. मधुरभावात भक्त परमेश्वराला प्रियकर समजून सखीभावाने आराधना करतो तर सूफी संप्रदायात परमेश्वराला प्रेयसी कल्पून भक्त स्वतःला तिचा प्रियकर समजत असतो. अर्थात् याला काही अपवादही आढळतात. मात्र सूफी संप्रदायात प्रेमाचे उदात्तीकरण होऊनही प्रेमाची भावना उग्र स्वरूपातच अवतीर्ण झालेली दिसते. भक्ताला परमेश्वराबद्दल वाटणाऱ्या प्रेमात आवेग, उन्माद, मूर्च्छा हे भाव तेवढ्याच अतिरेकाने आढळून येतात. त्या प्रेमात शांतीऐवजी व्याकुळता आणि भेदभाव अधिक अनुभवाला येतो. सूफींच्या भक्तिपूर्ण प्रेमाचे वर्णन करताना डॉ. प्र. न. जोशी म्हणतात : [१८]

> '' ...प्रेम हे या भक्तिभावनेचे मुख्य लक्षण आहे. प्रेम हे अग्नी आहे. ते हृदयात व्याप्त होऊन एक प्रियकरावाचून सर्व वस्तूस जाळून टाकते.''.....

असे महंमद पैगंबराचेही मत आहे. सारांश, माषुक (प्रेय), आषुक (प्रेमी) व इश्क (प्रेम) या तिहींच्या विरहमीलनात सूफी भक्तिभावनेचे रहस्य आहे. मात्र आधुनिक युगातील प्रेम प्लेटोच्या आदर्शवादी प्रेमाला, मानसशास्त्राची जोड मिळून

उत्क्रांत झालेले आहे. त्यात निरभिलाष प्रेम आणि शारीरिक आकर्षण यांचा झगडा सतत चाललेला दिसतो पहिल्या–दुसऱ्या महायुद्धाने स्त्रीच्या दर्जात पडलेल्या फरकाने, सफ्रेजेट चळवळीसारख्या आंदोलनामुळे विवाहपूर्व प्रेम, पाश्चात्याइतके नसले तरी बऱ्याच प्रमाणात पौर्वात्यातही दिसू लागले आहे. तरीही पती–पत्नी प्रेमाच्या सनदशीर प्रीतिप्रकाराचाच प्रभाव अधिक आढळतो. सहवासोत्तर प्रेमाचाही बराच भाग दिसतो. आनंदीबाई जयवंत यांच्या ' उर्मिला ' कादंबरीत काही विशिष्ट मुदतीच्या कराराच्या विवाहपद्धतीचा उल्लेख आढळतो. ' उर्मिला ' मधील विलास एका रशियन तरूणीशी पाच वर्षांच्या कराराने विवाहबद्ध होतो. त्यामुळे सुमेधेशी तो विवाह करू शकत नाही. पण करारानुसार ते विवाहिताप्रमाणे जीवन घालवितात. एकमेकांचा सहवास हवासा वाटल्यास कराराची मुदत वाढवितात. सहवास नकोसा झाल्यास आपापल्या मार्गाने जातात. रमेश मंत्री यांच्या ' महानगर ' मधील नायक नायिका, करारसदृश नात्याने एकत्र येतात आणि विलगही होतात. एकूण विवाहसंस्थेतील बहुविध बदल आणि विवाहविच्छेदाचे कायदे यांचे स्वरूप पाहता प्रेमाखेरीज स्त्री-पुरुष एकत्र येणे आणि एकत्रित राहणे दोन्हीही शक्य नाही असे दिसते. केवळ रूढी, संस्कार किंवा कायदे इत्यादीमुळे कुणी बांधून घेणार नाही, घेतही नाहीत. प्रीतिभावनेवर अधिष्ठित वैवाहिक जीवन चिरसुखाचे साधन आहे, थातुरमातुरावर त्याची पायाभरणी होत नाही.

प्रीतिभावना : मानसशास्त्रीय उकल

माणसाची उत्पत्ती हीच प्रीतिभावनेचीही उत्पत्ती आहे. त्रिकालाबाधित प्रीतिभावना कालमानपरिस्थितीप्रमाणे बदलत, पालटत, आविष्कृत होत गेल्याचे आढळते. मानस–शास्त्राच्या दृष्टीतून प्रेम एक स्थिरवृत्ती : Sentiment : आहे. आपापल्या सहजप्रवृत्तीच्या : Instinct : सहचर प्राथमिक भावना विशिष्ट विषयावर बराच काळ केंद्रित झाल्या, त्याभोवती इतर दुय्यम भावनांची पटले चढत राहिली की त्यांच्या एकत्रीकरणाने होणाऱ्या संघटनेस स्थिरप्रवृत्ती : Sentiment : म्हणतात. त्यामध्ये प्रमुख, स्थिर व शेवटापर्यंत टिकणाऱ्या प्राथमिक भावनेचा, इतर दुय्यम भावनांच्या, अधूनमधून येण्याजाण्याने परिपोष होतो व त्या भावनेचे नाव त्या स्थिरप्रवृत्तीला मिळते. अशा स्थिरवृत्तीच्या बुडाशी, त्याची निगडित सहजप्रवृत्ती असते. प्रीतिभावनेच्या मुळाशी कामप्रवृत्ती : Pairing : ही सहजप्रवृत्ती आहे. कोणतीही सहजप्रवृत्ती ही मानसशारीर : Psycho Physical : असून, शरीर व मन याच्याशी ती निगडित असते. मॅक्‌डुगलने ' Energies of Men ' या ग्रंथात अठरा सहजप्रवृत्ती सांगितल्या आहेत. बोधना, भावना आणि प्रवर्तन अशी मॅक्‌डुगलने सहजप्रवृत्तींची तीन अंगे मानली आहेत. प्राण्यात

सहजप्रवृत्ती स्पष्टपणे आढळत असल्या तरी माणसात त्या अत्यंत अस्पष्ट स्वरूपात दिसतात; असे आधुनिक मानसशास्त्रज्ञांचे मत आहे. किंबहुना मानवात सहजप्रवृत्ती नाहीतच, असेही त्यांना वाटते. मात्र सहजप्रवृत्ती जन्मजात आणि नैसर्गिक असतात. त्यांचा आविष्कार सर्वकाळी, सर्वदेशी सारख्याच रीतीने होतो. कामभावना ही एक सहजप्रवृत्ती; ती प्रत्येक व्यक्तीच्या ठायी जन्मापासूनच असते. काही विशिष्ट काळ ती पूर्ण सुप्तावस्थेत असते. लहान मुले निरनिराळ्या वस्तू चोखण्याची क्रिया करीत असतात, तिच्या बुडाशी सुप्तावस्थेतील ही कामभावना असते, असे फ्रॉईडने सांगितले आहे. तिच्या जागृतीस बाह्य साधनांची, योग्य आलंबनाची आवश्यकता असते; त्याखेरीज तिचा आविष्कार होत नाही : आल्हाददायक वातावरण, वसंत ऋतु, शीतल चांदणे, फुलांचा सुवास वाहून नेणारा सुगंधित शीतल वारा, प्रिय व्यक्तीचे केवळ स्मरण, सुंदर स्त्री–पुरुष इत्यादी अनेक गोष्टी सुप्तावस्थेतील कामप्रवृत्ती कार्यकारी करण्यास साहाय्यभूत ठरतात. आलंबनावर अवलंबून असलेली कामभावना, त्यापासून आनंद प्राप्त करून घेण्याची इच्छा प्रकट करते. कधी कधी आलंबनाचा त्याग केला जाऊन त्या जागी ती व्यक्ती स्वतःच प्रतिष्ठित होते. त्यास 'स्वरति' किंवा 'नारसिसिज्म' (Narcissism) म्हणतात. 'स्वरति' ही विश्वव्यापी मूलभूत भावना असून त्यानंतर आलंबनावर अधिष्ठित असलेली कामभावना निर्माण झाली असे फ्रॉईडचे मत आहे. तो म्हणतो : [१९]

"... Reflection than at once disclosed that if a fixation of this kind to the subject's own body and his own person can occur if cannot be an entirely explained or meaningless phenomenon. On the contrary, if it is probable that this Narcissism is the universal original condition out of which object love develops later without there by necessarily affecting a disappearance of the Narcissism ... "

अर्थात् आलंबनावर आधारित प्रेम निर्माण झाल्यावर 'स्वरति' नाहीशी होत नाही.

ह्या प्रेमाच्या स्थिरवृत्तीच्या : Sentiment of love : मुळाशी असणाऱ्या कामप्रवृत्तीचे : Instinct of pairing : स्वरूप कसे असते ? काम हा शब्द मुळचा संस्कृत शब्द आहे. वा. शि. आपटे यांच्या कोशात त्याचे काम (कम्–घ) ... 1. Wish, desire 2. Object of desire 3. Affection, love 4. Love or desire of sexual enjoyment considered as one of the ends of life 5. Desire of carnel gratification,

lust 6. The God of love. असे अर्थ दिले आहेत. मानसशास्त्रात 'Love or Desire of sexual enjoyment' 'Desire of carnel gratification' ह्या अर्थाने त्याचा वापर करण्यात येतो. तर वात्स्यायनाने कामप्रवृत्तीची व्याख्या करताना म्हटले आहे : [२०]

... "Kama is the enjoyment of appropriate objects by the five senses of hearing, feeling, seeing, tasting and smelling assisted by the mind together with soul. The ingredient this is a peculiar contact between the organ of sense and its objects, and the consciousness of pleasure which arises from that contact is called Kama ..."

एकूण कामवासना ही सहजप्रवृत्ती असून तिच्या मुळाशी स्ववंशवर्धनाची मूलभूत प्रवृत्ती आहे. ती मानव–मानवेतर यांना समान आहे; 'जीवशास्त्रीय प्रवृत्ती' : Biological Instinct : आहे. मात्र मानवाच्या हाती तिला सौंदर्याचे आणि चैतन्याचे अपूर्व लेणे चढते. त्यास आदर्श आणि सफल जीवनाचा वसा लाभतो. हिंदू तत्वज्ञानात कामभावनेचा समावेश चतुर्विध पुरुषार्थात असून तिचे उदात्तीकरण झालेले आहे. कामभावनेने निर्माण होणारा संबंध हा करारासारखा तात्पुरता नसून मानवी जीवनावर दूरगामी परिणाम करणारा आहे. सरितासागराच्या मीलनाच्या उपमेने त्याचे स्वरुप स्पष्ट व्हायला हरकत नाही. अर्थात् कामप्रवृत्ती लैंगिक ग्रंथींच्या : Sexual glands : कार्यक्षमतेवर अवलंबून असते. त्यानुषंगाने शंका, असूया, आशा, निराशा, शौर्य, अभिमान इत्यादी विविध भावना मनात उद्भवतात; कार्य संपताच नाहीशा होतात. ह्या साऱ्या अस्थायी भावना विशिष्ट स्थिर भावनेच्या पोषणाला मदत करून तिचे संवर्धन करतात; त्यातूनच प्रेमाच्या स्थिरवृत्तीची संघटना बनते. प्रीती उभी राहते, जीवन जुळते, घडते, बनते.

या घडण्या-बनण्यातून प्रीतिभावनेचे रंग, स्वरुप आणि रूपे ध्यानी येतात : प्रीतिभावनेची कल्पना काहीशी आत्म्यासारखी आहे, अमूर्त आहे. प्रीतिभावनेचे सामर्थ्य व्यक्ती, देशकाल आणि परिस्थिती यांच्या संदर्भात स्पष्ट होत जाते. एकूणच मराठी साहित्यात निव्वळ प्रेम : निखळ प्रेम : असे फारसे नाही. कुठले ना कुठले तरी 'लेबल' घेऊनच ते अवतरले आहे. मग प्रेमाचा उद्भव, प्रेमातील लपंडाव, मीलनाची उत्सुकता, वियोगातील हुरहूर, सफल प्रेम वा वंचनेतील निराशा असले कुठलेही 'लेबल' असो, त्याचा विचार केल्याखेरीज प्रीतिभावनेचा विचार अशक्य ठरतो. त्यामुळे लेबलाखाली लपलेले प्रेम उजेडात

येऊन लेवलालाच प्रेम समजण्याची चूक घडत नाही. मराठी साहित्यात अल्प प्रमाणात विविध छटांनी प्रेम प्रकट होताना दिसते : प्रथमदर्शनी प्रेम, प्रेमोद्भव, प्रतिक्षा, निरोप–समयीची हुरहूर, विरहातील जळणे, पतीपत्नीप्रेम, संयोग, वियोगशृंगार, प्रेमभंग, निष्प्रेम जीवनाची दाहकता, दिव्य प्रीती, मधुरभाव, ग्रामीणांचे रांगडे प्रेम, निसर्गातील प्रेमभावना, दिव्यप्रेम, गूढवादी प्रेम, प्रतिकात्मक प्रेम, आध्यात्मिक प्रेम, अशरीरी प्रेम, अशा हच्या विविध छटा. चढतीवाढती, परिणत. पक्व व लोभसवाणी चित्रे घेऊन येणाऱ्या प्रथमदर्शनी प्रेमातील सरळपणा, त्यामधील रम्यता, प्रथमदर्शनाच्या अनुभूतीची जादू, जन्मजन्मांतरीचा जिव्हाळा कारणीभूत असल्याच्या भावनेने फुलून येणारी वृत्ती वगैरेमुळे तिचे प्राथमिक स्वरूपाचे, अव्याजमनोहर पण आकर्षक रूप प्रारंभापासून अखेरपर्यंत सर्वत्र आढळते. त्यात प्रेमाच्या कल्पनेतील गूढरम्यतेच्या मोहिनीऐवजी 'Love at first sight'या इंग्रजी कल्पनेचा प्रभावच अधिक दिसतो. साहजिकच गूढरम्यतेतून उद्भवणाऱ्या भावनाप्रधान नाजूक रचनेऐवजी चमत्कृतीचा, अद्भुताचा, योगायोगाचा काहीसा अतिरेकी वाटणारा आविष्कारही भेटतो. पुढेपुढे तिच्यामधील गूढरम्यता, अद्भुतता कमी कमी होत जाऊन सांकेतिकतेच्या बंधनातून ते मोकळे होते, परिणत बनते : प्रियकराला पाहताक्षणीच मन अर्पिले गेले आहे, त्यातून नाजूकसाजुक आविष्कार घडला आहे, प्रथमदर्शनातच मन देऊन टाकले असले तरी दाट परिचयाच्या अभावामुळे दुरावा कायम राहिला आहे. विरहाची व्यथा जाळते आहे. 'खेळ रंगत जातो' : विविध अंगांनी बाजूंनी. त्याचा शेवट काय होणार कुणालाच माहीत नसते. तरीही खेळ खेळावासा वाटतो, खेळला जातो; आशानिराशा, अपेक्षाआकांक्षा यामुळे उद्भवणारा दारूणपणा सहजतया झेलला जातो. प्रीतीच्या प्रारंभापासून याचनेपर्यंतच्या आणि सफलते-विफलतेअखेरच्या मानसिक-शारीरिक-दृष्टचा खडतर प्रवासात अनेकविध अवस्था येतात : आपल्या अवतीभोवतीची देशकालपरिस्थिती आणि प्रामुख्याने व्यक्तिगत भावजीवन यांच्या आधाराने. संस्कृत वा हिंदी साहित्यातील नायिकाभेदाप्रमाणे प्रत्येक अवस्थेचे शास्त्रशुद्ध चित्रण करण्याचा उद्देश मराठी साहित्यासमोर नव्हता. आजही नाही. समाजजीवनाच्या एखाद्या अंगाने सहजपणे प्रीतिभावनेचे रंग उधळले गेले आहेत. कुठल्याही अर्थाने प्रीतिभावनेचे सुसंगत तत्त्वज्ञान मांडावे म्हणून काही त्या आलेल्या नाहीत. एकूणच अभिजात मराठी साहित्यात, व्यापक थरावरील जीवनाचा विचार आणि 'काव्यात्मक दृष्टीकोन' इत्यादी कारणांमुळे वासनेचा गाळ नाही. नितळ, निरागस प्रीतीच्या चित्रणाबरोबरच त्याच्या अनेक रंगच्छटाही आढळून येतात. त्यादृष्टीने प्रीतिभावनेची मुख्यत: चार रूपे आढळतात. ती अशी :

१. प्रणय अथवा दांपत्यभावना
२. भक्ती अथवा ईश्वरपरायण शरणता

३. देशभक्ती अथवा देशप्रेम

४. सर्वसाधारण प्रेमवृत्ती अथवा प्रेम

दांपत्यजीवनातील प्रीतिभावनेत परस्परांच्या सहयोगाला, सहजीवनाला, सहविचाराला महत्त्व असते; त्यांच्या संयोगवियोगाला अपूर्वत्व येते. त्यादृष्टीने ग्लानी, शंका, मद, श्रम, दैन्य, निर्वेद, चिंता, मोह, स्मृती, विषाद, औत्सुक्य, अमर्ष, उन्माद, वितर्क इत्यादी संचारी भावांच्या व्यंजनेला आगळेपण लाभते. सहजता आणि स्वाभाविकता यानी ते विनटलेले असून स्वाभाविकपणेच एकूण प्रीतिभावनेच्या रूपामध्ये दांपत्यप्रीतीला प्राधान्य मिळालेले आहे, मिळतेही. देण्यातही आलेले आहे. मात्र मराठी साहित्यात साधारणपणे असे दिसते की, प्रीतिभावनेच्या आविष्करणाच्या बाबतीत साहित्यिक, परंपरागत ढाच्यात प्रणयोद्गार काढताना आढळतात. जीवनातील फिरत, उल्हास–फाल्गुन त्यात उमटून पडत नाही असे नाही, जरूर पडते; मात्र अभिव्यक्त प्रीतिभावना पूर्णतेपासून खूप दूर आहे. आदर्शाची पूर्तता होत नसली तरी सभीपतेची शक्यता मोजायची नाही असे थोडेच आहे ? माणसाची गतीविधी देशकालपरिस्थितीने मर्यादित आणि नियंत्रित केलेली असते. माणूस जरा-मरणाची शिकार असतो. साहजिकच कुठल्या ना कुठल्या बाजूने तो नेहमी सीमित व पराधीन राहतो. पण सूक्ष्म सांस्कृतिक व कलात्मक गतीविधींद्वारा त्याच्या पूर्णतेला सहजगत्या साहाय्यही होऊन जाते. मनुष्य त्या दिशेने सतत प्रवाही आहे. त्याआधारे त्याला मिळणारी उंची त्याच्या आत्मिक विकासाची अनुमापक आहे. समग्र, संपूर्ण आणि यच्चयावत् आंतरिक बळाने मिळू पाहणारी पूर्णता 'आदर्श' शब्दाने निर्देशित होते. त्याची प्राप्ती होवो वा न होवो, परंतु त्या दिशेने प्रवास करीत राहणे हा त्या प्रयत्नाचा एक भाग आहे. क्षितिजाच्या कडावर पोचूनही शेवटी क्षितिज दूरच्या दूरच राहते. हेही काहीसे तसेच आहे. त्यासाठी कलावंत युगानुयुगीची साधना करीत आले आहेत. तिचा अंतिम उद्देश, प्रेमसौंदर्याचे आदर्श रूप मिळविणे हा आहे; म्हणजे ब्रह्माचे आनंदस्वरुप प्राप्त करणेच होय. 'तैतिरिय उपनिषदा'तील 'रसो वे सः' मध्ये त्याचा अंतर्भाव आहे. दांपत्यप्रेमातील तलस्पर्शी अनुभव त्याचा द्योतक आहे. माणसाच्या जीवनव्यवहारांसाठी समाजात अनेक व्यावहारिक व्यवस्थांची आवश्यकता असली तरी माणसाच्या समस्त गतीविधींची मूलभूत प्रेरणा प्रीतिभावनाच आहे : तीच समाज व जीवन यामध्ये सौंदर्यदृष्टीची निर्मिती करीत असते. साहजिकच माणसाच्या सौहार्दपूर्ण विकासाचा अर्थच या मौलिक वृत्तीचा परिष्कार हा असतो. त्याचे समस्त उत्तरदायित्व कलावंतांनी स्वतःच्या खांद्यावर पेललेले असते. त्याचे मुख्य क्षेत्र हृदय व नवनवोन्मेषशाली भावनांचे क्रियाकलाप हे मुख्य वाहन असते. त्यादृष्टीने साहित्याच्या माध्यमातून कलावंताने घडविलेल्या प्रेम व सौंदर्यादी भावनांच्या निरुपणाचे अंतिम ध्येय मानवाचा पूर्ण विकास हे असावे हे नैसर्गिक आहे.

आपल्या मनापुरतीच प्रेम किंवा सौंदर्य यांची भावना राखून ठेवतो तो रुग्ण किंवा दूषित असतो. अशा एकान्त स्वार्थाने व्यक्ती स्वतःचा नाश करून घेते. माणूस जातपात, देश, प्रांत, वर्ण, लिंग, धर्म, संप्रदाय, विचारप्रणाली, संस्कृती, भाषा इत्यादी विभिन्न प्राकृतिक मानवकृत भेदांमध्ये चिरलेला आहे. परिष्कृत मानवी भावनेच्या नात्याने तो जोडला गेला असला तरी व्यवहार मात्र उलटा आहे. उच्चतम विधायक मानवतेच्या कल्पनेकडे जाण्याचा एक मार्ग साहित्यादी कलांचे माध्यम हा आहे. माणसांमाणसात अनंत भेद असूनही, प्रेमसौंदर्याच्या भावनांचा अनुभव साहित्यामध्ये सर्वत्र सारखेपणाने येतो. स्वाभाविकपणेच प्रतिभावनेच्या कलागत निरुपणात व्यक्ती-व्यक्ती, धर्म–धर्म व जाती-जाती यांना निकट आणण्याची शक्ती आहे. प्रेमसौंदर्याचे ते सांस्कृतिक कार्य आहे. त्यासाठी कला प्रचारी नव्हे, बोधवादी नव्हे, भोंगळ नव्हे पण समाजसन्मुख हवी. श्री. रंगराव दिवाकर यांनी 'Art for the People' या लेखामध्ये त्याची स्पष्टता विवरून दाखविली आहे :[२१]

" ... Art supplies food to the sense of beauty, helps to the culture of the emotions & enriches the very contest of life. Art makes life more worth living. Appreciation of beauty in life and nature as the first step or rather the basic of the creation of all art. Art is the attempt to recreate & promote interests of human effort what is appreciated & imagined to be beautiful by the human mind. The sense of beauty includes the sense of fitness, delicacy, stabilling, the sense of form & colour, the sense of touch & sound, infact everything that appears to aesthetic part of our being & personality has art a great part to play in the culture of our emotions. " ...

टॉलस्टॉयने 'What is Art' मध्ये त्यासंबंधी असे स्पष्टीकरण दिले आहे. तो म्हणतो :[२२]

" .. Art is not as the metaphysicians say, the manifestation of some mysteries idea of beauty or God it is not, as the aesthetic psychologists say a game in which man lost his excess of storedup energy; it is not the expression of man's emotion by eternal signs; it is not the production of pleasing object, and above all; it is not pleasure; but it is a means of union among men joining

them together to the same feeling & indispenable to the life and progress towards wellbeing of individuals and of humanity. ..."

त्यामध्ये दांपत्यभावनेला : त्यामधील प्रीतिभावनेला : सर्वश्रेष्ठ अग्रहक्काचे महत्त्व आहे; हे स्पष्ट आहे. त्यादृष्टीने इतर प्रीतिप्रकार गौण ठरावेत हे ओघानेच येते. तसे मानणे असयुक्तिक होत नाही.

प्रीतिभावना : परस्परसंबंधांचे स्वरूप

त्यादृष्टीने उपस्थित होणारे प्रीतिभावनेचे निरनिराळे परस्परसंबंध : काम आणि प्रेम, श्रद्धा आणि प्रेम, शृंगार आणि प्रेम, भक्ती आणि प्रेम इत्यादी तपासून पाहणे उचित होईल.

कामवासना, कामभावना आणि प्रेमभावना हे चढत्या क्रमाचे परस्परसंबंध, त्याच्या पायऱ्या आहेत. कामवासनाही पायरी प्राथमिक असून अधिकाधिक विशुद्धतेच्या दृष्टीने पुढील दोन घटकांची निर्मिती आहे. पूर्णतेने कामभावनाविरहित प्रेमभावना क्वचित्च सापडते. कामप्रवृत्तीच्या भावनात्मक आणि मानसिक भागालाच प्रेम ही संज्ञा आहे. कामभावना शबल स्वरूपाची असून तीत शारीरिक वासनेला वाव आहे; प्रेमामध्ये निर्मळतेला, विशुद्ध दृष्टीला संधी आहे. सुप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ हॅवलॉक एलिस व सिगमंड फ्रॉईड यांच्या मतानुसार प्रेमाचा उदय आणि विनिमय कामभावनेतच असतो. पण कामप्रवृत्ती ही व्यक्तीची शारीरिक गरज भागविते. ती व्यक्तीपुरती मर्यादित असते. प्रेमभावना सार्वत्रिक असते. ती व्यक्तीला मानसिक समाधान मिळवून देते. प्रेमभावना ही प्रायः दुतर्फा असते; कामभावना ही क्षणकालिक, तात्पुरत्या उपक्रमाने समाधान देणारी तर प्रेमभावना सतत वृद्धिगत होणारी, सतत विकसित होणारी, फारसा उपशम न होणारी अशी. पहिल्यात शारीरिक तृप्तीला किंवा लालसेला महत्त्व आहे तर दुसरीत मानसिक समाधानाला. काम व प्रेम यातील विरोधाचा विचार ओस्वाल्ड स्वार्त्झ याने 'Psychology of Sex' मध्ये केला आहे. तो म्हणतो : [२३]

"... The sexual impulse satisfies a need of the individual, and is therefore restricted the individual who feels it, where as love carries us away from our over to another being ..... The sexual impulse is blind, the male units, the female, that is to say, any woman would do for any man and any man for any woman.

It is a process cloud in anonymity. But love makes man see. It opens our eyes to the very being in instrinic values of the love. ..."

कामभावना काय किंवा प्रेमभावना काय दोन्हीही भावना मानवी जीवनाच्या विकासाला केव्हाही उपकारक आहेत. कै. बिपिनचंद्र पाल यानीही काम आणि प्रेमचे, चैतन्य संप्रदायाच्या दृष्टीकोनातून मार्मिक विवेचन केले आहे. कामवासना शारीरिकतेशी संलग्न आहे म्हणून कमी लेखून चालणार नाही. तिच्यामुळे मानवी जीवनाचे सातत्य कायम राहते आणि त्याचे संवर्धनही होते. प्रेमभावना आख्खे जीवनच उचलून धरते. कामवासना आपल्या प्रखर तेजाने क्षणभर आकाश उजळून टाकणारी वीज आहे तर प्रेमभावना संथ तेवत राहणाऱ्या शीतल, स्निग्ध आणि सुखद दीपज्योतीसारखी आहे. मानसशास्त्रामध्ये, कामवासनेला : Sex : प्रमुख मूळ प्रवृत्ती मानले आहे तर फ्रॉईडने तिला : Sex Libido : आपल्या मनोविज्ञानाचा आधारच मानला आहे. काम किंवा Sex ही एक स्थूल शारीरिक भूक आहे, त्यास स्त्रीपुरुष प्रेमाचा आधारही मानता येईल परंतु प्रेमाला समानार्थी असे त्याचे रूप समजता येईलच असे नाही. फ्रीडलिंडरच्या मताने, इंद्रियाद्वारा प्राप्त होणाऱ्या अत्युच्च उत्कट क्षणी, स्त्रीपुरुषांमध्ये केवळ शरीरसंबंधच राहत नाही तर त्यानुषंगाने प्रेमसंबंधातील स्थायीभावही निर्माण होतो. त्याच्या निर्मितीसाठी त्याने रूप : Sight : , शब्द : Oritary : , गंध : Smell : , स्पर्श : Touch : आणि चुंबन : Kiss : इत्यादी अनिवार्य गोष्टींवर जोर दिला आहे. वात्स्यायनाने या सर्व गोष्टींचा विचार पूर्वीच केला असला तरी चुंबनाचा विचार मात्र त्याने वेगळा असा केलेला नाही. पाश्चात्य कामक्रीडेत चुंबनाला विशेष महत्त्व आहे, पण त्याचा स्वतंत्र घटक मानण्याचे कारण नाही. वस्तुतः चुंबनामध्ये रस आणि स्पर्श यांची संकलित अनुभूती मिळते. भरतनाटचशास्त्रामध्येही कामोत्पादक प्रसंगात श्रवण आणि दर्शन इत्यादी गोष्टींचे महत्त्व सांगितले आहेच. रूपाचा सरळ संबंध डोळ्यांशी आहे. कुणाच्याही रूपाचे वर्णन ऐकून कानावर पडून कानामनाची काही तृप्ती होत नाही. प्रत्यक्ष दर्शनाचा आनंद वेगळाच असतो. रूपदर्शनाने स्त्रीचे प्रेम पुनर्जीवित होते असे डांटेने म्हटले आहे. गुणश्रवण, स्वप्नदर्शन किंवा चित्रदर्शन इत्यादीमुळेही पूर्वानुराग : अभिलाषा : उत्पन्न होतो. सर्वसाधारणपणे प्रेमाची वास्तविक स्थिती प्रत्यक्ष दर्शनानंतर, गाठीभेटीनंतरच निर्माण होते. रूपदर्शनानंतर प्रेमिक प्रेयसीचा मधुर आवाज ऐकण्यासाठी आतुर होतो, आणि पुनः पुन्हा ऐकूनही अतृप्तच उरतो. प्रत्येक व्यक्तीच्या शरीरात विशिष्ट गंध आहे. हॅवलॉक एलिस याने निग्रो, इंग्रज इत्यादींच्या गंधित प्रकृतीचे विस्तृत वर्णन केले आहे. वात्स्यायनाने 'कामसूत्रा' त गंधासंबंधी केलेली चर्चा खूपच वेधक आहे. नायिका

पद्मिनीच्या शरीराच्या गंधाचा उल्लेख साहित्यामध्ये आला आहे. गंधाइतकेच स्पर्शाचेही महत्त्व आहे. स्त्रीपुरुषांच्या परस्परांच्या स्पर्शाने अंगाअंगातून विद्युत्तारा छेडल्या जातात, अंग अंगात घुसावे आणि एकमेकात पार मिसळून वितळून जावे असे होते. अर्थात स्वेच्छेच्या अंगमर्दनातच हे घडू शकते. बळजोरीने नव्हे. शरीरांतर्गत रासायनिक प्रक्रियेमुळे हे घडते. फ्रीडलिंडरप्रमाणे वात्स्यायनानेही स्पर्शाचे महत्त्व सांगितले आहे. त्यात प्रथमदर्शनी जडणाऱ्या प्रेमामध्ये शारीरिक आकर्षणाला खूप मोठे महत्त्व आहे. प्रामुख्याने व्यक्तीच्या बाह्यसौंदर्यावर ते उभे असते. ही सौंदर्यानुभूती व्यक्तीगणिक वेगवेगळी असू शकते. सौंदर्य ही अंतर्गत इंद्रियानुभूतीचे प्रतिबिंब असते असे जॉर्ज जेफ्रे म्हणतो. मात्र अनेकांच्या मते बाह्यसौंदर्यच सौंदर्य आहे. केवळ नावीन्यात, नवीनपणात सौंदर्य नाही, तर सौंदर्यच नेहमी नित्यनवीन असते, तसे ते प्रकट होत जाते. नावीन्य सौंदर्याचा गुण होऊ शकते पण ते स्वत: सौंदर्य असत नाही. प्रमाणबध्दतेत सौंदर्य असते पण प्रमाणबध्दता म्हणजे सौंदर्य नव्हे ! सौंदर्याचा सर्वसाधारण आदर्श निश्चित करता येणे शक्य नाही. निरनिराळचा देशकालात त्याची निरनिराळी रूपे आढळतात. एवढे मात्र खरे की रूपलावण्याने मंडित शरीर प्रेमाच्या सृजनाचा मुख्य आधार आहे. मात्र प्लेटोने आपल्या 'संवादा' मध्ये मांडलेली प्रेमाची आदर्शवादी कल्पना मानवी प्रेमाच्या सीमेच्या आत पडत नाही. प्लेटोने मांडलेले प्रेम : आध्यात्मिक प्रेम : 'सत्यं शिवं सुंदरम्' चे प्रेम आहे. त्याची प्रेमकल्पना मांसल व्यक्तित्वाला स्पर्श करू शकत नाही. ती अतिसूक्ष्म अतींद्रिय विचारांच्या आधारावर उभी आहे. खरे प्रेम शरीराच्या आकर्षणात किंवा कामक्रीडेत नाही तर स्त्रीपुरुषांचे शरीर, मन आणि आत्मा यांच्या पूर्ण तादात्म्यात ते आहे. भगवान शंकर आणि पार्वती यांच्यामधील पूर्ण तादात्म्यामुळेच त्यास अर्धनारीनटेश्वर असे म्हटले गेले. त्याच्या अर्धनारीनटेश्वर चित्राचा आध्यात्मिक अर्थ दुसरा कोणता आहे ? केवळ शारीरिक आकर्षणाच्या आधाराने निर्माण होणारे प्रेम प्राणिशास्त्रीय स्तरावरील चीज आहे. डॉ. भगवानदास 'Science and Emotion' या ग्रंथात, स्त्रीपुरुषांची मीलनेच्छेची प्रक्रिया सांगताना म्हणतात : [२४]

..."Love is the desire union with the object loved and therefore even tends to bring subject and object to one level in order that they may unit & become one" ...

तर कार्ल मेनिंगरने 'Love against Hate' मध्ये सर्वसाधारणपणे भगवानदास सूत्र उचलून धरताना लिहिले आहे : [२५]

... "Love is experienced as a measure in proximity of a desire for fuller knowledge of one another, a yearing for mutual personality fusion." .....

प्रेमाला दृढता लाभण्याच्या दृष्टीने स्त्रीपुरुषांच्या चित्ताच्या एकतेच्या आवश्यकतेवर भर्तृहरीनेही भर दिला आहे. तो म्हणतो :

एतत्कामं पलंलोके यद् दयोरेकचित्तता
अन्यचित्तकृते कामे शवयोरिव संगम : ।

म्हणजे स्त्रीपुरुषांच्या प्रीतीमधील तादात्म्याबद्दल एकमत आहे. या स्थितीला पोचण्यासाठी आपल्या ' अहं ' चे पूर्ण विसर्जन करण्याची गरज पडते. मैत्रीच्या फार पुढची अशी ही गोष्ट आहे मैत्री औपचारिकतेच्या बाहेर जाऊ शकत नाही पण एकात्मतेमुळे दृढ होणारे संबंध अतिशय समृद्ध असतात. सच्च्या प्रेमात उपचार असत नाहीत. ' नारद भक्तिसूत्रा ' मध्ये प्रेमात कामना असत नाही, ते ' त्यास्वरूप ' असते असे सांगितले आहे. बाह्य कारणांमुळे वासनामय प्रेम निर्माण होते, किंबहुना बाह्य कारणांनी प्रेम पैदा होत नाही; त्यासाठी अंतर्गत कारणांचीही जरूरी असते.

भवभूतीने त्यानुरोधाने प्रेमाच्या उदात्त स्वरूपासंबंधी सांगितलेली चार सूत्रे ध्यानात घेतली पाहिजेत :

१. सुखदुःखामध्येही खऱ्या प्रेमात अद्वैत असते.
२. त्यामधील प्रत्येक अवस्थेत हृदयाचा संबंध असतो.
३. वृद्धावस्थेतदेखील त्यामधील रस कमी होत नाही.
४. प्रेम अनिर्वचनीय कारणांमुळे प्रादुर्भूत होते.

अर्थात्‌च भवभूती बाह्य कारणांशी प्रीतीची निर्मिती निगडित करीत नाही, तर 'जन्म जन्मान्तरीच्या संस्कारा' ची ती भूमी आहे असेच तो मानतो. गोस्वामी तुलसीदासानेही ' प्रीति पुरातन लखे न कोई ' असे म्हटले आहे. पण आजच्या विलक्षण जगाचा जन्मजन्मांतरीच्या संबंधावर विश्वास बसण्याची शक्यता फारशी नाही.

प्रीतिभावना : मानसशास्त्रीय जटिलता

मानसशास्त्रीयदृष्टचा प्रेमाचा विचार काहीसा जटिल दिसतो. अनेक भाव आणि मनोवृत्ती याबाबतीत मानसशास्त्रज्ञांतच स्थूलपणे एकमत नाही. मानसशास्त्रज्ञांनी प्रेमाला प्रामुख्याने भावनेत : Emotion : टाकले आहे. मॅक्डुगल प्रेमाला आनंदात : Joy : समाविष्ट करतो आणि त्यास साधित भावनेचीही संज्ञा देतो. डॉ. भगवानदास यानी प्रेम, घृणा इत्यादीस प्राथमिक भावनांतच समाविष्ट केले आहे. डेस्कार्टेस : Dexcartes : , स्पिनोजा : Spinoza : इत्यादीनीही प्रेमाला भावनेच्या श्रेणीतच ढकलले आहे. वुडवर्थच्या दृष्टीनेही प्रेम ही भावना आहे. शॅण्डने प्रेमभावनेस स्थायीभावाच्या कोटीत : Sentiment : टाकले आहे. रिबटचेही स्थूलरूपाने तेच मत आहे. स्पेन्सने प्रेमाला संपृक्त भावानुभूती : Compound feeling : मानले आहे, आणि सर्व भावात त्यास सर्वाधिक प्रभावी गणण्यात आले आहे. त्याच्यादृष्टीने त्यामध्ये तारूण्य, स्नेह : affection : , प्रशंसा, आदर, आत्मस्वीकृती, आत्मसन्मान, स्वामित्वाची भावना : Pleasure of possession :, स्वच्छंदीपणाची भावना आणि दाट सहानुभूती अशा घटकांचा समावेश होतो. फॉईड कामप्रवृत्तीस, जीवनाची मूलप्रवृत्ती : Sex instinct : मानतो. त्याच्या मते, दबलेली कामवासना प्रेमाची विविध रूपे धारण करते. सुप्रावस्थेतील हा ' काम ' अनेक गोष्टींचा सर्जक आहे.

भारतीय समाजात प्रेमाचे स्वरूप समाजकालपरिस्थितीनुसार बदलत आलेले आहे. धार्मिक, आर्थिक, राजकीय इत्यादी परिस्थितीच्या बदलानुसार प्रेमाच्या स्वरूपातही परिवर्तन होत आले आहे. त्यादृष्टीने पाहता, मूल्यवादी विचारसरणी प्रेमाचे स्वरूप चिरंतन, शाश्वत आणि सनातन मानते. राग, उत्साह किंवा हास्य इत्यादी मनोविकार किंवा भाव यांच्या आलंबनातील परिवर्तने त्यास मान्य असतात. त्याव्यतिरिक्त परिवर्तने अर्थातच अमान्य राहतात. विकास : उत्क्रांतीवादी दृष्टीचे लोक मानतात की, सृष्टीच्या प्रारंभी केवळ मिथुनत्वाची सहजप्रवृत्ती होती. पूर्णतेच्या प्रवृत्तीने त्याचे प्रेमात रूपांतर घडते. व्हॉल्टेअरने ' फिलॉसॉफिकल डिक्शन ' : Philosophical Diction : व फोरेलने ' सेक्स क्वश्चन ' : Sex Question : मध्ये याचे विवेचन केले आहे. समाजवादी विचारसरणीने, अन्य वस्तुप्रमाणे प्रेम परिवर्तनशील असल्याचे मानले आहे. तर कॉडवेल्ने सामाजिक संबंधाशी त्याचे गोत्र जमवून टाकले आहे. प्रेम व प्रणय या सकृतदर्शनी सारख्या छटा वाटल्या तरी त्या तशा नाहीत. प्रेम ही भावना सात्विक तर प्रणयाची भावना राजस असते. प्रेमात स्थिरता आणि जबाबदारीची जाणीव विशेष तर प्रणयात स्वैरता असते. प्रणय अशाश्वत तर प्रीती ही चिरकाल टिकणारी असते. पतीपत्नीमध्ये नुसते प्रेमच नसते तर त्याबरोबर दृढनिष्ठा व आधाराची भावना यांनाही महत्त्वाचे स्थान असते. म्हणूनच प्रेमाचे पुष्प सतत फुलत असते. निदान स्त्रीला तरी विकारी प्रेमापेक्षा

असल्या भावनात्मक प्रेमाबद्दल विशेष जिव्हाळा वाटतो. खेरीज शृंगाराऐवजी सौहार्दाची, सहानुकंपेची ओढ लागलेली असते. सुदैवाने ती पूर्ण झाली तर स्वतःला ती धन्य धन्य समजते. अर्थात प्रेमाचा विचार करताना शरीराला वगळून चालणार नाही हे जेवढे खरे तेवढेच शारीरिक आसक्ती म्हणजेच काही प्रेम नाही हे सदैव लक्षात ठेवणे बरे. पतीपत्नींच्या प्रेमातही मानसिक तादात्म्याची, सहृदयतेची, आत्मोपम्याची ओढ भावप्रवण मनाला लागून राहिलेली असते. हे विसरायचे म्हटले तरी विसरून चालत नाही.

याप्रमाणेच श्रद्धा आणि प्रेम यांचा निकट संबंध असून श्रद्धा सामाजिक तर प्रेम वैयक्तिक असते. श्रद्धेय व्यक्तीमध्ये काही विशेष गुणांचा प्रत्यय आल्याने त्याचे महत्त्व वाटून त्याबद्दल आदर वाटू व वाढू लागतो, त्यातून पूज्यभाव निर्माण होतो; साहजिकच, प्रशंसा व सन्मान दोन्हीही मिळतात. प्रेमात एकात्मता विनिमय पावते तर श्रद्धेत एकात्मता विस्तारत जाते.

देवर्षी नारदाने ' पूजादिष्वनुराग इति पाराशर्यः ' असे म्हटले आहेच. श्रीमद्भागवतात श्रद्धा आणि भक्तीचे मध्यवर्ती रूप म्हणून प्रेमाचा उल्लेख होतो. मानसशस्त्रीय दृष्टीने भक्ती आणि प्रेम यामध्ये मूलभूत फरक नाही; भक्ती प्रेमाचेच उदात्त स्वरूप आहे. प्रेम आणि पराक्रम यांचाही निकटचा संबंध आहे. स्त्री पराक्रमावर भाळते तर पुरुष सौंदर्यावर आसक्त होतो. पराक्रमाला प्रेमापासून प्रेरणा मिळते अशी कलावंतांची विचारसरणी दिसते. प्रेमापासून पराक्रमाला स्फूर्ती मिळते आणि प्रेम पराक्रमावरून जीव ओवाळून टाकते. पराक्रमाच्या अधिष्ठानाशिवाय प्रेम दीर्घकाळपर्यंत अस्तित्वात राहू शकत नाही. प्रियकराच्या पराक्रमाला प्रेयसीच्या प्रोत्साहनाची अपेक्षा असते, कधीकधी पराक्रमाच्या पायदळी प्रेम चुरडले जाते; तर कधीकधी पराक्रमाकरिता प्रेमाचा त्याग करावा लागतो. भारतीय तत्वज्ञानाने, प्रेमाला 'जन्मजन्मान्तरिचे शुभसंचित' मानले आहे. त्यामुळे पूर्वजन्मानुसार प्रेमाची सिद्धी घडते. त्यादृष्टीने पूर्वजन्मीचा तो ऋणानुबंध ठरतो. त्यामध्ये प्रेम हे रूप, गुण वा संपत्तीवर अवलंबून नसून पूर्वजन्मीची ओळख जीवाला पटताच, मनाच्या आकाशात प्रेमाची चांदणी उगवते. प्रेम ही एक चिरतरूण शक्ती आहे, ती संजीवनी आहे. एकूण, मानवी जीवितच मुळी प्रेमावर अधिष्ठित आहे. दांपत्यप्रीतीमधील अद्वैतात : मात्र प्रेमाच्या उपभोगाकरिता द्वैतात : परस्पर विश्वास, दृढता, निष्ठा यांचे अत्युच्च टिपण असते. प्रेम ही अंगामनाला स्पर्शून जाणारी, मानसिक संवेदना उचंबळून आणणारी भावना आहे. प्रीतिभावना ही चैतन्यप्रद आनंददायिनी अपूर्व शक्ती आहे. साऱ्या चराचरात ती भरून राहिली आहे. त्यामुळे अवघी मानवजात एकत्र आलेली आहे; बांधली गेलेली आहे. प्रीती ही ' ईश्वरी शक्ती ' असून ईश्वराबद्दल ' स्थिरचर

व्यापुनी दशांमुळे उरला ' म्हणतात, तसेच प्रीतिभावनेबद्दलही म्हणता येईल. प्रेमाच्या स्वरूपाविषयी श्री. ब. ह. पंडित यांनी म्हटले आहे : [२६]

"...ज्या ईश्वरापासून ही सृष्टी उत्पन्न झाली आहे, जो हिचे नियमन करीत आहे, ज्याच्यामध्ये, हिचा लय होणार आहे, त्या ईश्वराने हिच्या नियमनाकरिता जे काही उपाय योजिले आहेत त्यापैकीच प्राणिमात्रांमध्ये असलेले विकार होत. या अनेक विकारांपैकीच प्रेम हे एक आहे व ते ईश्वरापासून उत्पन्न झाले असल्यामुळे त्याच्या ठायी ईश्वराचेही काही गुण आहेत, परंतु ते ईश्वर नसल्यामुळे त्याच्यात आणि ईश्वरात थोडे वैषम्य आपणाला आढळते." ..

प्रत्येक प्राणिमात्राच्या शरीरात ईश्वर आत्म्याच्या रूपाने वास करतो, त्याप्रमाणे प्रेमही चराचरसृष्टीत : पशुपक्षी व वनस्पती यांच्या राज्यातही : संचार करताना आढळते. मोकळ्या मैदानात उगवणाऱ्या विविध वनस्पती प्रेमाच्याच प्रभावामुळे निर्माण होतात : फुले, सौंदर्य सुगंधाची लयलूट करतात. पक्षी गोड गीते गातात. पक्ष्यांची ही गोड गीते, भ्रमरांचा गुंजारव, कोकिळेचे 'कुहू कुहू' हा सारा प्रेमाचाच आविष्कार आहे; जन्माला आला आणि प्रेमाविना उरला असे क्वचित्‌च घडते. साहजिकच प्रीतिभावना सार्वत्रिक, सार्वकालिक आणि सार्वजनिक आहे; मात्र एकाच प्रेमाची, व्यक्तीच्या मनोवृत्तीगणिक विविध रूपे दृष्टोत्पत्तीस पडतात. त्याचबरोबर बुद्धी आणि मन यांच्या विकासानुसारही प्रीतिभावनेची निरनिराळी रूपे दिसतात. ह्या रूपांनुसार प्रीतिभावनेचे सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन भेद करता येतील : जे प्रेम कसल्याही परतीची अपेक्षा करीत नाही, प्रेमविषयापासून काही मागत नाही ते प्रेम सात्विक; ते स्वार्थाच्या पलिकडे असते, संतृप्ती देते. अतिशय उदात्त असते. राजस प्रीतिभावनेत सहेतुकतेबरोबरच दुसऱ्याच्या सुखात स्वतःच्या दुःखांचाही अंतर्भाव असतो. समान पातळीवरून प्रेमाची देवाण-घेवाण स्वार्थप्रधान राजस प्रेमाचे वैशिष्ट्य आहे. तामस प्रीतिभावनेत स्वार्थाचे प्रमाण राजस प्रेमाहून जास्त असते. त्यामधील व्यक्ती प्रेमविषयाच्या सुखापेक्षा स्वतःचेच सुख जास्त मानते. राजस व तामस प्रीतिभावना कनिष्ठ दर्जाची अतएव त्याज्य असून सात्त्विक प्रीतिभावना उच्च दर्जाची व श्रेष्ठ आहे. पण व्यवहारात त्याचे दर्शन अपवादाने घडते.

प्रीतिभावनेच्या बुडाशी स्वार्थ आणि परार्थ दोन्हीही आहेत. प्रचलित तत्वज्ञानाच्या परिभाषेनुसार त्या अनुक्रमे, स्वतःच्या सुखाचा व दुसऱ्याच्या सुखाचा विचार करण्याची वृत्ती या अर्थाच्या आहेत. प्रीतिभावनेच्या तृप्तीतून परस्परांना सुख मिळणे हा, नाही

म्हटले तरी स्वार्थ असतोच. तसे अपेक्षारहित काहीच नसते, हे खरे; पण त्याहून हे अधिक खरे की, प्रीतिभावनेत : तिच्या सर्व प्रकारांत : व्यक्तीचे स्वतःविषयीचेही प्रेम असते. 'बृहदारण्यकोपनिषद्' तील याज्ञवक्ल्य आणि गार्गी यांच्या संवादात या सूत्राची नोंद आहे.

मानवी जीवनात प्रीतिभावनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ती निसर्गदत्त, उपजत प्रवृत्ती आहे. माणूस जन्माला येताना जी अमोल धने घेऊन येतो त्यात प्रीतिभावनेला अग्रक्रम आहे. लहान मूल जन्माला आले की, 'तू त्याच्यावर प्रेम कर,' असे आईला शिकवावे लागत नाही, त्याचप्रमाणे लहान मुलालादेखील 'ही तुझी आई आहे. तू हिच्यावर प्रेम करायला पाहिजे' असे सांगावे लागत नाही. हेच सहजस्वाभाविक सूत्र सर्वत्र आहे. विशिष्ट वय झाले की, मोहोर फुटतो, हुरहूर लागते, गोड गोड जाणीव होऊ लागते. हे सारे निसर्गसिद्धच आहे. प्रीतिभावना हा मनोविकार बुद्धीपेक्षा भावनेशी अधिक संबंध ठेवतो. देखतादेखताच बसणारे प्रेम मानसिक आकर्षणातून निर्माण झालेले असते. फ्रॉईड म्हणतो की, 'प्रथमदृष्टीतील प्रेम हे भावक्षेत्रापासून भिन्न अशा मानसिक क्षेत्रात निर्माण होते.'[२७] मानसिक आकर्षणातून उद्भूत झालेले प्रथमदर्शनी प्रेम प्रथम डोळ्यांत निर्माण होते, मग मनात उतरते. तिथून पुढे क्रमाने त्याचा सहवास, संघर्ष, परिचय, मीलन, अपेक्षाभंग इत्यादी थरांतून विकास होतो. प्रथम दृष्टीभेटीत असणारे : चिकटणारे प्रेम : काहीसे रंगाऱ्याच्या स्वरूपाचे असते. सर्वसाधारण आकर्षण हा त्याचा आधार असतो. सहवासातून उद्भूत होणाऱ्या प्रीतिभावनेत तशी उतावीळच असते. प्रेमविषयीभूत व्यक्तीच्या सहवासात काही काळ जातो, त्या व्यक्तीच्या ठायी असलेल्या बऱ्यावाईट गुणांचा प्रत्यय येतो, सहवासाचे दृढतेत रूपान्तर होते. अर्थात् नेहमीच असे घडते असे नाही. कारण प्रथमदर्शनी प्रेमात मानसिकतेला तर सहवासजन्यतेत बौद्धिकतेला वाव असल्याने चिकित्सा येऊ शकते. अशी चिकित्सा सफलतेच्या दिशेने नेतेच असे मात्र नाही. डॉ. रामचंद्र शुक्ल यांनी म्हटले आहे :[२८]

> "...प्रेमकाव्योंमें प्रायः रूपलोभही प्रेमका प्रवर्तक दिखाया जाता है. पर प्रेमका एक और कारण जो रूपगुणसे सर्वथा स्वतंत्र और उसकी अपेक्षा अधिक निश्चित प्रभाववाला होता है, साहचर्य है...इस साहचर्यगत प्रेमकी विशेषता यह होती है कि इसका वेग साहचर्यकालमें तो कुछ अवसरोंपरही रहरहकर व्यक्त होता है, पर विच्छेद कालमें बराबर उमड पडता है..."

पतीपत्नीमधील प्रेम हे सहवासजन्य प्रीतिभावनेचे उत्तम उदाहरण ठरते. कॅथॉलिक जेसुइट

फादर एम्. सी. डी. आर्कनेही ते मान्य केले आहे. घराला लागणाऱ्या पायाप्रमाणे प्रेमाला लैंगिक आकर्षण हा पाया लागतो. स्त्रीपुरुषामधील आकर्षण हे प्रेमाला आवश्यक आहे व ते असल्याशिवाय प्रेमच संभवत नाही. पाया खोदल्यावर वरचा मजला बांधायला जसे दगड, चुना, माती वगैरे जिन्नस लागतात तसेच प्रेमाला सौंदर्य, शील, सहनुभूती वगैरे भावनांची जरूरी पडते. परंतु या साऱ्या भावना एका मोठ्या भावनेत सामावतील तेव्हाच प्रेमाचे मंदिर उभारले जाते. कोणत्याही वस्तुबद्दल प्रथमदर्शनी आपलेपणा, आदर किंवा अभिमान वाटणे याचेच नाव प्रेम. हा आपलेपणा वाटतो तरी कशामुळे ? आपण आपल्या हृदयातील चांगुलपणाची, सौंदर्याची, नीतीची, सद्गुणांची, कर्तबगारीची, बुद्धिमत्तेची आपल्या दृष्टीने काल्पनिक प्रतिमा तयार करून ठेवलेली असते. त्या प्रतिमेसारखी एखादी वस्तू हुबेहूब आपण दृश्य जगात पाहिली म्हणजे आपल्याला त्या वस्तुबद्दल आपलेपणा वाटतो. एल्विन वेरियरने सांगतले आहे : [२९]

"... Sex proves to be the surest means of arousing and sustaining love. The permanence of species is assured, and the same time the greatest variety of the individual encouraged."...

तर ओस्वाल्ड श्वार्त्झने स्पष्टच सांगून टाकले आहे : [३०]

"... Love needs sexuality to keep alive and dries up without the well of vatility. ..."

म्हणजे प्रीतिभावना ही आपोआप निर्माण होणारी नसून तिला अनेक कारणांची जरूरी लागते. तिचा कल, व्यवहार दुतर्फा होण्याकडे असतो. साफल्य हा तिचा उद्देश असतो; तिच्या पूर्णतेची ती निशाणी असते.

प्रीतिभावनेच्या उत्पत्तीत प्रथमदर्शन, सहवास यास महत्त्व आहे; सौंदर्यालाही आहे. सौंदर्याच्या कल्पनेत शारीरिक सौंदर्याबरोबरच मानसिक सौंदर्याचाही अंतर्भाव होतो. मात्र आकर्षणाचे पहिलेवहिले कारण म्हणून शारीरिक सौंदर्यालाच प्राधान्य राहते. बाह्य प्रसाधनांनी अधिकाधिक आकर्षक दिसण्याचे माणसाचे प्रयत्न किंवा 'प्रियेषु सौभाग्यफला हि चारुता' ही उक्ती त्याचीच निदर्शक आहे. अर्थात् बाह्य शारीरिक सौंदर्यापेक्षा अंतःसौंदर्य, मानसिक सौंदर्य अधिक गुंतागुंतीचे आणि समजण्यास कठीण

असते. पण बऱ्याचदा बाह्य सौंदर्यामुळे निर्माण झालेले आकर्षण अंतःसौंदर्यामुळे दृढ होण्यास मदत होते. अर्थात् सौंदर्याची कल्पना सापेक्ष असते, व्यक्तिगणिक बदलती असते; समाजातील 'नॉर्मस्' प्रमाणे त्याबाबत व्यवहार होत असतात एवढेच ! प्रेमाचा उद्भव लोभातून होतो असे डॉ. रामचंद्र शुक्ल यांचे मत आहे. अर्थात् लोभ वस्तुच्या तर प्रेम व्यक्तीच्या संदर्भात असते. लोभ परस्पर गुणावगुण, सौंदर्य, ठेवण वगैरेविषयी असू शकेल. काही असले तरी सौंदर्यातून निर्माण होणाऱ्या आकर्षणावर प्रीतिभावना अधिष्ठित असते. या अधिष्ठानाच्या तीव्रतेवर प्रेमाची सामर्थ्यसंपन्नता उभी असते. जर्मन तत्त्वज्ञ बुक्तरने म्हटले आहे : [३१]

...'' It is love in the form of attraction which chains stone to stone, earth to earth, star to star and which holds together the mighty rovating edification which we stand....''

दया किंवा करूणा हीही प्रीतिभावनेची उत्पत्तीची कारणे असून उर्दू काव्यात त्याचा मोठा प्रभाव दिसतो. तीत अनुनयाला, प्रेमाराधनेलाही महत्त्व आहे. देशकालपरिस्थिती-नुसार प्रियाराधनाची प्रवृत्ती बदलणारी आहे. आजच्या युगात ती एक कलाही बनली आहे.

विशुध्दतेचे अमूल्य लेणे

त्या संदर्भात मागे वळून पाहता, 'प्रेम' हा अतिव्याप्त शब्द असल्याचे स्पष्ट होते. ईश्वराप्रमाणे चराचर सृष्टीत त्याची सत्ता आहे. 'प्रेम' या शब्दाचा अर्थ अभिधेपेक्षा लक्षणा व व्यंजनेने समजून घ्यावा लागतो तर प्रेमाची सर्वव्यापी सत्ता उमजण्यासाठी 'जीवे जीव' मिसळून घ्यावा लागतो. पौर्वात्य-पाश्चात्य तज्ञांच्या मते एक गोष्ट स्पष्ट दिसते ती ही की, प्रेम हे केवळ स्थूल इंद्रियगम्य नाही; तर मनाच्या, चित्ताच्या व आत्म्याच्या उदात्त-उज्ज्वल स्थितीचे ते सुरम्य रूप आहे. त्यासाठी विचारवंतांच्या विचारसूत्रांची नको इतकी लांबण लावण्याची गरज नाही.

आधुनिक विज्ञानयुग हे हरेक गोष्टीची व्याख्या करण्याची इर्षा बाळगत असले तरी मानवी भावनांच्या व मानसिक गुणांच्या निश्चित व्याख्या करण्यात असफलही ठरते. अशा बाबींच्या ठोस पूर्णार्थगर्भी व्याख्याच मुळी अशक्य असतात. अर्ध्यामुर्ध्या व्याख्यांना अर्थ नसतो. प्रेम : प्रीतीही त्यास अपवाद नाही. स्थूलमानाने, विभिन्न मनुष्यांना व

सामाजिक आदि संबंधांना बांधणारे एक सूत्र म्हणजे प्रेम. बांधून एकत्र ठेवणे आणि हे बांधणे ' संकल्पमय ' राखणे ही प्रीतिभावनेची एक तलम वर्तनरीती. प्रेम ही माणसाला प्राप्त झालेली पूर्ण जाणीव असते : सगळचा बाबतीमधली. त्यातून काहीही सुटणारे नसते, सुटत नाही. समपातळीवर उभे होऊन द्वैताकडून अद्वैताकडे सरकत जाण्याची क्रिया प्रीतिभावनेत असते.

प्रेमाचे स्वरूप प्रामुख्याने दोन प्रकारांनी पुढे येते :

१. आध्यात्मिक स्वरूपाचे प्रेम आणि
२. व्यक्तिगत लौकिक स्वरूपाचे प्रेम

आध्यात्मिक स्वरूपाचे प्रेम परतत्त्वस्पर्शी तर व्यक्तिगत लौकिक स्वरूपाचे प्रेम जीवनस्पर्शी असते. आध्यात्मिक प्रेमाचा साक्षात्कार ही वेगळी गोष्ट आहे. त्याचा धावता परामर्श 'भूमिका ' : १ : पृ. २३ वरील दुसऱ्या परिच्छेदामध्ये घेतला आहे. तो पुरेसा ठरावा. अभ्यासविषयाच्या दृष्टीतून लौकिक प्रेमाच्या अनुभूतीचा प्रश्न विवेचनाच्या कक्षेत आवर्जून आधिक्याने येणेच इष्ट ठरते.

प्रेमाची अभिव्यक्ती जीवनाच्या विविध कृतींमधून करणे हा माणसाचा मूलधर्म आहे. मानसशास्त्रदृष्टचा मानवी मन हे अनेकविध वृत्तींचे समूहकेंद्र आहे. त्यामुळे प्रेम ही एक अलग, निराळी, सुटी किंवा वेगळी गोष्ट ठरत नाही. तर अनेकाभिमुख वृत्तींचा निदर्शक अशा भावनांचा तो एक वर्ग राहतो. प्रेम जड–चेतन, दृश्य–अदृश्य, इंद्रियगम्य–अतिंद्रियगम्य (अवघ्या भूतमात्रासंबंधी असेही म्हणता येईल.) वगैरेविषयी जसे असते तसे ते व्यक्तिगत, सामाजिक आदि पातळीवरही सख्यभाव जोडून राहते. त्यामध्ये खरे उन्मुक्त व अद्वैतस्वरूपी प्रेमाचा साक्षात्कार दांपत्यप्रीतीमध्ये दिसतो. त्यात परस्पर व्यक्तींच्या आत्म्याचे संपूर्ण आत्मसमर्पण असते; चित्ताची उन्मुक्त अवस्था असते; प्रीतीची अविरत अबाध गती असते. मूलत: 'अहंभाव त्याग ' असल्यामुळे दांपत्यप्रीतीला विशुद्धतेचे अमूल्य लेणे चढते.

प्रेम ही आकर्षणमूलक सुखद मनोवृत्ती आहे. सौंदर्यामुळे मनामध्ये सुखदानुकूल वेदना निर्माण होते. तर सुखद मनोवृत्तींनी अंत:करणातील विभिन्न वृत्तींचे उन्मीलन घडते. त्यातून माणूस निसर्ग, प्राणी, देश, भाषा, प्रदेश, व्यक्ती व व्यक्तिसमूह यांच्यावर प्रेम करतो. मात्र त्यांच्यामध्ये परस्पर अभिन्न 'रतिभाव' नसल्याने मनुष्य त्यांच्याशी आंतरिक

अनुराग संबंध निर्माण करू शकत नाही. असा परस्पर अभिन्न 'रतिभाव' स्त्रीपुरुषांमध्ये असतो. स्त्रीपुरुषांच्या प्रीतीमधील मूलाधार 'रतिभावना' हीच असते. 'काम' हा प्रीतिभावनेचे प्रेरक केंद्र असते. 'कामप्रवृत्तीनेच मनुष्याचे उभे व्यक्तिमत्त्व व्यापून टाकले आहे', असे डॉ. फ्रॉइडने म्हटले आहे.

मात्र प्रेम व काम यांच्या सीमारेषा सौंदर्यात्मक मनोवृत्तीने विभागल्या गेल्या आहेत. काम : किंवा Sex : ही एक शारीरिक भूक असली तरी स्त्री–पुरुषांच्या प्रेमाचा तो मूलाधार आहे. प्रेमामध्ये शरीरांतर्गत कामतृप्ती असतेच, पण त्याचबरोबर अतींद्रिय सौंदर्यानंदाची तृप्तीही असते. मात्र प्रेमामध्ये कामुकता असते, तशी संवेदनशीलताही असते. किंबहुना ती कामुकतेपेक्षा बरीच अधिकही राहू शकते. प्रीतीमधील संवेदनात्मक तृप्ती दोन मनांचे मीलन घडविते आणि परस्परांना जवळ घेते. काम ही मूळ प्रवृत्ती तर प्रेम हा एक भाव. एक भावना : ती एक मानसिक स्थिती आहे. अशी स्थिती तारुण्यसुलभ शारीरिक सौंदर्यावरच केवळ आधारित नाही तर शरीर, मन व आत्मा यांच्या तादात्म्यावर ती उभी असते. अर्धनारीनटेश्वर शंकराच्या ठायी शिव : पार्वतीच्या पूर्ण तादात्म्याची कल्पना आहे. महाराष्ट्र देशात रूढ असलेल्या 'गौरीहर' पुजण्याच्या संकल्पनेत हे तादात्म्य अनुस्यूत आहे. केवळ शारीरिक आकर्षणातून उद्‌भूत झालेले प्रेम, भोगलेले : अनुभवलेले प्रेम हे प्राणिशास्त्रीय ठरते : वासनाविकारांचे ते द्योतक राहते. म्हणून तर प्रेमाच्या दृढीकरणासाठी परस्पर व्यक्तींच्या मनात शारीरिक आकर्षणा–बरोबरच चित्ताची शुद्धता व अंतःसौंदर्य ही दोन्हीही वृद्धिंगत होण्याची अट असते.

आधुनिक मानसशास्त्राच्या दृष्टीतून प्रेम काय आहे ? त्यासंबंधात निरनिराळी मते दिसतात. मॅक्‌डुगल ती 'साधित भावना' : Derived emotion : मानतो, 'स्थायीभाव' : Sentiment : मानत नाही. शॅण्ड प्रेमभावनेस 'भावना' : Emotion : न मानता तिला 'स्थिरभाव' : Sentiment : मानतो. स्विफ्ट प्रेमाला 'एक भावना' : a Single emotion : समजत नाही, तर तिच्यामध्ये सुख, दुःख, आशा व भय या चार भावना संमीलित असल्याचे सांगतो. हर्बर्ट स्पेन्सरने प्रेमास 'संपृक्त भावना' : Compound feeling : मानले आहे. तर फ्रॉइड कामप्रवृत्तीसच जीवनशक्ती समजतो.

एकूणच मतमतान्तरांची रटाळ जंत्री न मांडता असे म्हणता येईल की, प्रीतिभावनेसंबंधीचे शॅण्डचे मत अधिक स्वीकारार्ह आहे. त्यामधील तार्किकतेचे बंध व मानसशास्त्रीय मूलाधार अधिक दृढ दिसतो. आणि विशेष भाग असा की, भारतीय आध्यात्मिक तत्त्वज्ञानाशी त्याचा धागा जुळवावा लागत नाही; तो सहजपणे जुळून जातो.

मात्र प्रेम म्हणजे केवळ शृंगार; आणि शृंगार म्हणजे केवळ वासनाजन्य शरीरसंभोग नव्हे. शृंगाराचा हा रूढ अर्थ निपटून टाकायला हवा. मानसशास्त्रदृष्टया भावनांची समृद्धी ही भावनांच्या निर्मळ विशुद्ध उत्सर्जनावर अवलंबून असते. 'भावनांचे उदात्तीकरण' : Sublimation of emotion : असे त्यास नाव देण्यात आले आहे. विशुद्ध प्रेमात ते अनुस्यूत असते. आणि दांपत्यप्रीतीत त्याचा प्रकर्ष होतो : ज्याचा मागोवा प्राधान्याने दृष्टीसमोर राखला आहे.

प्रीतिभावना : मराठी ललित साहित्य

मराठी ललित वाङमयात : विशेषत: काव्य, कथा, कादंबरी, नाटक या क्रमाने प्रीतिभावना सुप्रतिष्ठित झालेली भावना आहे. प्रीतिभावनेची प्रतिमा नवनवोन्मेषशालिनी असल्याने कालपरिस्थिती व व्यक्ती यागणिक तिचा होणारा वैचित्र्यपूर्ण विलास पाहणे मनोहर ठरेल. प्रीतिभावनेच्या नित्यनूतनतेकडे दुर्लक्ष केल्यास साहित्यशास्त्र अपुरे राहण्याचीही शक्यता आहे.

प्राचीन काळापासून स्त्रीपुरुषांमधील आकर्षणाचा : रतीचा : विचार होत आला आहे. रती हा स्थायीभाव, त्यावर अधिष्ठित शृंगार; या साऱ्याचा विचार प्राचीन साहित्यशास्त्रकारांनी आपापल्यापरीने केला आहे. प्रामुख्याने तो शारीरिकतेशी निगडित आहे. त्यातही विप्रलंभ शृंगाराचे अधिक प्राबल्य आहे. बहुतांशी तो वृत्तिनिष्ठ आहे. संस्कृत साहित्यात पूर्वशृंगाराच्या स्मृतींना प्राधान्य मिळून तो प्रसंगनिष्ठ झालेला दिसतो. आधुनिक मराठी काव्य- कादंबरीत, फार कमी प्रमाणात शृंगाराची भावना आविष्कृत झाल्याचे दिसते. त्यातही संयोग आणि विप्रलंभ हे शृंगाराचे प्रकार, विशेषत: मराठी काव्यात अधिक आहेत. मात्र आधुनिक काव्यात व्यक्त झालेल्या प्रेम आणि प्रेमनिराशा ह्या भावना संयोगशृंगार आणि विप्रलंभ यापेक्षा वेगळ्या आहेत तर कादंबरीमधील विप्रलंभ शृंगार हा प्रीतिभावनेहून सर्वस्वी भिन्न आहे. प्रेमाच्या प्रसंगाचे चित्रण करण्याऐवजी प्रेमाची अमूर्त भाववृत्ती मूर्त करण्याकडे आधुनिक मराठी कवीबरोबरच कादंबरीकारांचाही कल आहे. शिवाय प्रेमात शृंगाराप्रमाणेच स्त्रीपुरुष आकर्षण असले तरी त्यात शारीरिक आसक्ती वा सुखापेक्षा मनोमीलनाला प्राधान्य मिळालेले दिसते. शृंगाराच्या तुलनेत प्रीतीची भावना अधिक कोमल, नाजूक आणि सूक्ष्म आहे. प्रेम हे शृंगाराचे उदात्तीकरण आहे. शारीरिक आकर्षणाहून मानसिक आकर्षणाकडे तिचा ओढा आहे. मराठी कादंबरीत त्याचे थोडेबहुत चित्रण आहे. विफलतेचे चित्रणही आढळते. त्याची अनुभूती मात्र अधिक झोंबणारी, पकड घेणारी आहे. रसिकांच्या भावनांना आवाहन करण्याचे तिच्यामध्ये अतुल

सामर्थ्य दिसते. प्रेमनिराशेची ही अनुभूती मराठी कवितेप्रमाणे मराठी कादंबरी-नाटकातही आढळते. विप्रलंभ शृंगारात नायक–नायिकांचे परस्परांवर दृढ प्रेम असते. परंतु प्रवास, शाप वगैरे विरहाच्या पाच हेतूपैकी एक चक्रवाकांमध्ये असणाऱ्या कमलपत्राप्रमाणे त्यांच्या मीलनाच्या आड येत असतो. अशा वेळी वियोगातील दुःखाला वाट करून देणे किंवा पूर्वसुखाच्या स्मृतींची उजळणी करणे एवढेच नायक–नायिकेच्या हाती शिल्लक उरते. विप्रलंभाच्या प्राचीन आविष्कारात शारीरिक ओढीला प्राधान्य आहे. आधुनिक काव्यातही विप्रलंभाची हीच भावना प्रकट झालेली आहे. पण ती बरीचशी मानसिक पातळीवरली आहे. प्रेमनिराशेच्या अनुभूतीला कधी परिस्थिती तर कधी व्यक्ती कारणीभूत होते. सामाजिक परिस्थितीमुळेही प्रेमिकांचे पुरेसे मीलन होत नाही. असा प्रकार प्राचीन काव्यात दिसत नाही. पण मराठी कथा : कादंबरी : नाटक यामध्ये दिसतो. याबाबत विचार करता, सामाजिक जीवनाच्या अवगुंठनात बहुतेक प्रश्न बांधले गेले आहेत. साहजिकच प्रेमात काल्पनिकाचा भाग असला तरी ते सामाजिक अधिक काल्पनिक आहे हे लक्षात हवे. प्रारंभी प्रारंभी स्त्रीला स्वतंत्र व्यक्तित्व, मते, भावना वगैरे असू शकतात; ही गोष्टच मुळी समाजाला मान्य नसल्याने पुरुषाने प्रेमयाचना केल्यानंतर स्त्रीने तिला बिनतक्रार मान्यता देणे हे साहजिक रूप होते. परंतु व्यक्तिस्वातंत्र्याच्या आधुनिक काळात ध्येय, मते, मनोमीलन यास महत्त्व प्राप्त झाले. समाजात स्त्रीपुरुष परस्परांमध्ये मिसळू लागल्यानंतर प्रेम आणि प्रेमनिराशा या गोष्टी काहीशा अपरिहार्य झाल्या. कलावंताच्या व्यक्तिगत जीवनातील भावभावना आणि आसपासचे जग काव्यात प्रतिबिंबित होत गेल्याने प्रेमनिराशेची : विफलतेची:भावना आधुनिक काव्याप्रमाणे कादंबरीतही प्राधान्याने आविष्कृत होत गेली. तीमध्ये नायक प्रेमाला अनुकूल तर नायिका प्रतिकूल असा प्रकारही दिसतो; तर कधी कधी प्रेमाची ही भावना पूर्णतः एकतर्फीही आढळते. नायिकेला नायकाबद्दल प्रेम वाटत नाही हे दिसत असूनही नायक तिच्यावर प्रेमाचा वर्षाव करीत राहताना आढळतो. अर्थात् प्रेमाचे हे रूप मानसिक असते. त्यात शृंगाररसाला स्थान कमी दिसते. साहजिकच विप्रलंभ शृंगाराहून प्रेमनिराशेची भावना, वैफल्याची भावना वेगळी आहे, अशी ही भावना जुन्या रसव्यवस्थेत कुठे बसते? अर्थात् कुठेच नाही. तिच्या व्यवस्थेसाठी रसव्यवस्थेची पुनर्रचना आवश्यक ठरते. आधुनिक मराठी कथा : काव्यात काय किंवा कादंबरी : नाटकांत काय, व्यक्त झालेल्या भावभावनांमध्ये विस्तार आणि उत्कटता या दृष्टीने ह्या भावनेला अग्रस्थान आहे. रूढ रसव्यवस्थेतील करूणरसापेक्षा यामधील करूणरसाचे क्षेत्र व्यापक आहे. प्रेमनिराशेची भावना ही उत्कटतेने आस्वाद्य असून ती बहुजनमनाशी संबंधित आहे, आधुनिक मराठी प्रेमकवितेतील किंवा कादंबरीमधील बहुतांशी भाग शृंगारात (अलिकडच्या नग्न नाटकातील भोगशृंगार वगळायला हवा.) अंतर्भूत होत नाही. प्राचीन साहित्यशास्त्रानुसार त्यास रसहीनही म्हणता येणार नाही.

जुन्या साहित्यशास्त्राची कक्षा पुनर्रचित करून तीत प्रेम हा एक नवीन रस वसविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने मराठी ललित साहित्यामध्ये प्रीतिभावना विविध स्वरूपात पण प्रकार, पद्धती इत्यादी दृष्टीने मर्यादित स्वरूपात आविष्कृत होताना दिसते. ती अशी : संयोग शृंगार, विप्रलंभ शृंगार, प्रेमनिराशा किंवा वैफल्य. आधुनिक शृंगारात मनोमीलनाची व सौहार्दाची भावना मुख्य आहे. त्याचा साक्षात्कार उद्धव शेळके यांच्या 'धग', श्री. ना. पेंडसे यांच्या 'लव्हाळी' किंवा रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा' या ललितकृतींमधून होतो. आधुनिक संयोग शृंगारातील सौहार्दाचे अपूर्व दर्शन हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांमधून होते. शास्त्रीय दृष्टीने संयोग शृंगारात समाविष्ट करता येईल अशी ही भावना असली तरी मूलत: ती संयोग शृंगारहून खूपच वेगळीही वाटते. हीच स्थिती विप्रलंभ शृंगाराच्याबाबतीतही आहे. प्राचीन विप्रलंभात, नायकाच्या शारीरिक दूरतेने नायिका तळमळताना दिसते. पंडिती काव्यातील विरहव्यथा आणि विविध शीतोपचार यांच्या वर्णनातूनही विप्रलंभातील शारीरिक ओढ व्यक्त होते. ही शारीरिक ओढ आधुनिक विप्रलंभाचा अविभाज्य घटक नाही. प्राचीन विप्रलंभात दृष्टोत्पत्तीस येणारे नायिकेच्या सौंदर्याचे आणि उपभोगाचे चिंतनही आधुनिक विप्रलंभात खास करून आढळत नाही. त्यात भेटीची आतुरता आहे. प्रिय व्यक्तीच्या सुरक्षिततेबद्दल वाटणारी काळजी आहे; मनाच्या एकात्मतेची, सौहार्दाची जाणीव आहे. नायकाची प्रेमयाचना नायिकेने झिडकारण्याचा प्रसंग प्राचीन काव्यात औषधालाही सापडत नाही. पण आधुनिक वाङ्मयात प्रेमनिराशेची अनुभूती नित्याचीच झाली आहे. आधुनिक जीवनाचाही तो परिणाम आहे. प्रेमाच्या उपभोगापेक्षा त्याच्या उत्कंठेत, प्रतिक्षेत अधिक सुख असते, त्याच्या उदात्तीकरणात अधिक सुखावह भाग असतो; ह्या सौंदर्यवादी विचारसरणीमुळे एकांगी, एकतर्फी प्रेमाची अनुभूती अधिक व्यक्त झाली असण्याचीही शक्यता आहे. साहजिकच प्रिय व्यक्तीचे प्रेम असो वा नसो, तिच्यावर प्रेम करीत रहावयाचे असा हा प्रकार, कधी अल्पकाल तर कधी चिरकाल टिकणारा असतो. प्रेमनिराशेनंतरच्या उदात्तीकरणातून आणि सौंदर्यवादी विचारसरणीतून ती उद्भवली असेल तर ती चिरकाल टिकते, आणि प्रेमोद्भव व प्रेमयाचना या अवस्थांच्या मधलीच असेल तर अल्पकाल राहते. हे काही असले तरी प्रीतिभावनेचे एकूण आविष्कृत स्वरूप खूपच उत्कट आहे. निरनिराळ्या भाववृत्ती चित्रित करण्याकडे आधुनिक कलावंतांचा कल आहे. भाववृत्तींचा किंवा विशिष्ट मानसिक अवस्थेचा हा आविष्कार सूक्ष्म आणि उत्कट असतो. तो विभाव, अनुभाव व्यभिचारीभाव यांच्या शास्त्रीय साच्यात चपखल न बसला तरी उत्कटतेने आस्वाद्य राहतो. एकूण पाहता, स्त्रीपुरुषांना परस्परांबद्दल वाटणारे शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक आकर्षण हा प्रीतिभावना या नव्या रसाचा स्थायीभाव ठरेल. प्रीतीचा उद्भव, आशंका, ओढ, प्रेमातील भीत्री धडपड, निराशा सारे व्यभिचारी भाव

होत. ते प्रसंगवृत्तीनुरूप मनात उचंबळून येणारे आणि कालान्तराने नाहीसे होणारे आहेत. परस्पराबद्दल आकर्षण असणारे स्त्रीपुरुष किंवा हे आकर्षण एकतर्फी असल्यास नायक वा नायिका हे या रसाचे विभाग राहतील. उद्दीपनविभावात पूर्वी उद्यान, निसर्ग, वसंतऋतु वगैरे काही थोडक्या खास घटकांचाच समावेश होई. त्यात आता वातावरण आणि पार्श्वभूमी घालणे इष्ट होईल. प्राचीनकाळी साहित्यकारांचा लाडका असलेला निसर्ग आधुनिक कलावंतांनी कायम ठेवलेला असला तरी त्यात सूक्ष्मता ओतून कमालीचा भावानुकूल केला आहे. शिवाय सबंध सामाजिक जीवन आणि वातावरणच त्यांनी उद्दीपनविभाव म्हणून वापरलेले दिसते. रणजित देसाईंची 'स्वामी', जयवंत दळवींची 'चक्र', आनंद यादवांची 'गोतावळा' इत्यादी त्याची काही उदाहरणे होत. प्रियकर आणि प्रेयसीच्या मनोमीलनाची आणि बौद्धिक सहजीवनाची अनुभूती उद्दीपित करण्याकरिता त्यांनी केलेले वर्णन पूर्णतः आधुनिक स्वरूपाचे आहे. अनुभवाला नाटकाइतके काव्यात स्थान नसले तरी कादंबरीत असते. प्राचीन काव्यात शृंगाराचे चित्रण विशेषतः प्रसंगनिष्ठ स्वरूपाचे असल्याने, त्यात अनुभवांना बरेच स्थान होते. परंतु आधुनिक काव्यात किंवा कादंबरीत बहुतांश भाववृत्तींचे आणि सूक्ष्म मानसिक अवस्थांचे वर्णन असल्याने त्यात अनुभवांना विशेषसा वाव मिळत नाही. प्रेमभावनेच्या सूक्ष्म चित्रणामुळे आधुनिक कवितेत हातवाऱ्याऐवजी डोळ्यांतून बदलणाऱ्या भावभावनांच्या विविध रंगांना अनुभवाचे रूप मिळालेले आहे. ह्या प्रेमात शृंगाराबरोबरच हास्य, वीर, करूण, भक्ती, वत्सल आणि अद्‌भूत या रसांचे कमीअधिक संमिश्रण झालेले आढळते. त्याचबरोबर प्राचीन साहित्यशास्त्रानुसार नायिकाभेदही आढळतात. उत्कटतेने प्रेम करणाऱ्या स्त्रिया, नायिका मराठी कादंबरीत खूप आढळतात. दुसऱ्यावर अवलंबून असणाऱ्या 'अन्या' नायिका मराठीत अल्प आहेत. मात्र आधुनिक मराठी कादंबरीमधील बहुतेक नायिका अविवाहित तरूणी असून स्वतःच्या प्रियकरावर जीवापाड प्रेम करणाऱ्या आहेत. 'अन्या' नायिकेची व्याख्या 'अप्रकटपुरुषानुराया परकीय' अशी केलेली आढळते. 'सामान्या' प्रकारातील नायिका हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच सापडतील : रूपे पूर्वीचीच पण नव्या रंगारूपात अवतीर्ण झालेली अशी आजची स्थिती आहे. त्याचे रूप अचूक न पकडता येण्याइतपत चंचल आहे, अमूर्त आहे. जाणवावे पण समग्र टिपता येऊ नये अशी त्याची गती आहे. साहजिकच जुन्या चौकटीत ते बसणारे नाही.

कुठलीही कलाकृती, भावनाविचार उत्कट असल्याशिवाय प्रभावी होऊ शकत नाही. मूळ अनुभूती उथळ मात्र तिचा आविष्कार अलंकृत असे घडले तरी कलाकृती आकर्षक बनत नाही. सखोल अनुभूतीत काळजाला स्पर्श करण्याची शक्ती स्वभावतःच असते. उत्कट

स्वानुभव संक्रात होतो तेव्हा रसिकांना जिंकून घेतो. त्यादृष्टीने भावनेची सूक्ष्मताही महत्त्वाची ठरते. सरळसाध्या प्रेमभावनेच्या आविष्कारापेक्षा प्रेमातील एखाद्या विशिष्ट छटेचा आविष्कार रसिक सौंदर्याभिरुचीला मोह घालतो. आधुनिक मराठी ललित साहित्यात त्याचे चित्रण आहे. विविध अंगाने ते झाले आहे. त्यास अनुभूती, भावना यांच्याबरोबर कल्पना, रचना, पार्श्वभूमी, भाषा इत्यादी गोष्टीही कारणीभूत आहेत. विशेषत: समग्र सामाजिक जीवनाच्या वळणात हलणारी : डुलणारी मराठी कादंबरी सामाजिक जीवनातील आणि खास करून सामाजिक जीवनातील प्रीतिभावनेचे रंगरूप घेऊन अवतरते आहे. त्यात प्रीतिभावनेला सर्वप्रथम स्थान आहे; काही कवी : कलावंतांवर स्त्रैणपणाचा आरोप व्हावा इतके मोठे महत्त्व त्यास लाभले आहे. इंग्रजी आदि पाश्चात्य साहित्याच्या प्रभावाने आधुनिक मराठी साहित्य वि टलेले आहे : त्यात उत्तान शृंगार आहे तसा पतिपत्नींचा संयत शृंगारही आहे. मित्रमैत्रिणींमधील मोकळे खेळकर प्रेम आहे, आसक्ती आहे, निरभिलाष आकर्षण आहे. दिव्य तसे बौद्धिक प्रेमही आहे : असे विविध रंग आहेत. कुठल्याही रंगाची उणीव नाही. एक गोष्ट जाणवते ती ही की, त्यातच काहीशा जाणीवपूर्वक व्यक्त झालेल्या प्रीतिभावनेच्या तात्त्विक चिकित्सेलाही वाव आहे. त्याचे स्वरूप द्विविध आहे : काही वेळा भावनेच्या ओघात प्रीतिविषयक विचार व्यक्त झालेले आहेत तर काही ठिकाणी उघड प्रेमाविषयी चर्चा आहे. हे सारे प्रामुख्याने कलावंत या दृष्टीतूनच घडलेले आहे; बव्हंश विचारवंत म्हणून नव्हे. खेरीज हे कलावंत कुठल्याही विशिष्ट विचारसरणीचा पुरस्कार करणारे वा एखादा सिद्धांत प्रतिपादन करणारे तत्त्वज्ञ वा सामाजिक शास्त्रज्ञ नाहीत. त्यामुळे त्यानुसारच्या प्रीतिविषयक चर्चेला तर्काचा निकष तेवढचाशा तीव्रतेने लावता येणार नाही. वळण द्यायचे म्हणून, रूप घडवायचे म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्नांनी देण्यात आलेला हा रूपाविष्कार नसून त्याचे रूप आपतत: बनलेले आहे. स्वाभाविकपणेच प्रीतिभावनेचे सुसूत्र व एकसंघ स्वरूप न भेटल्यास आश्चर्य नाही. मात्र आधुनिक कलावंतांची प्रीतिविषयक विचारसरणी त्यांच्या व्यक्तित्वातून आणि त्यांच्या सभोवती असलेल्या वास्तवदर्शी परिस्थितीतून उत्क्रांत झालेली आहे; साहजिकच ती खास आणि खासकरून मराठी आहे. प्रसंगी विकृततेची वळणे मिळत असूनही, शृंगारिकतेचा अकलात्मक गदारोळ राहूनही सामर्थ्याने उत्कट, उदात्त प्रीतिभावनेचा : जीवनातील शाश्वत, चिरंतन मूल्यांकडे झेपावणाऱ्या प्रीतिभावनेचा : शोध सुरू आहे असे दिसते; हीं खचित आश्वासक बाब आहे.



दोन

॥ प्रागैतिहासिक ते अभिजात वाङ्मय ॥

प्रीतिभावनेची उत्कट, प्रमत्त व उदात्त रूपे

संदर्भ : ३

निरनिराळ्या धर्मात, शास्त्रीय कसोटीवर कुचकामी ठरणाऱ्या पृथ्वीच्या उत्पत्ती व मानवाच्या निर्मितीसंबंधीच्या कल्पना आढळतात. त्यात डार्विनच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून मानवप्राण्याचा जन्म झाला असा शास्त्राधार आहे. दशावताराची कल्पना शास्त्रीय विचारावर आधारलेली असो किंवा निव्वळ कविकल्पना असो; ज्या विकासक्रमातून पृथ्वीच्या पाठीवर माणसाचा जन्म झाला तिचे प्रतिबिंब या दशावतारी कल्पनेतही आढळते. ह्या प्रक्रियेतून जन्म घेतलेला मानव बुद्धीच्या साह्याने हळूहळू इतर प्राण्यापासून दूर झाला; प्रगत बनला. त्याच्या प्रगतीची वाटचाल आजही नीटपणे रेखता येणे अवघड असले तरी त्याने मागे ठेवलेल्या दगडांच्या वस्तू, वाङ्मयीन साधने, प्राचीन मुद्रा व नाणी, स्तूप व लेणी इत्यादी साधनांच्या साहाय्याने या काळातील त्याच्या जीवनाचा अंदाज बांधता येतो. मात्र विश्वसनीय साधनांच्या अभावामुळे इतिहासपूर्व किंवा प्रागैतिहासिक काळातील अंदाज बव्हंश अंदाजाच्या पातळीवरच राहतात. पुढे पुढे माणसाने बुद्धीचा वापर करून आपल्या परिस्थितीमध्ये, अवतीभवतीच्या परिसरामध्ये बदल घडवून आणला. स्वाभाविकपणेच ध्येयधोरण व कार्यपद्धती यामध्ये फरक पडला. त्यासाठी आदिमानवाच्या जन्मापासून माणूस चंद्रावर उतरून पृथ्वीवर परतेपर्यंतच्या सत्याच्या साक्षात्कारासाठी मानवाला लाखो वर्षे चिकाटीने प्रयत्न करावे लागले. मानवाच्या सांस्कृतिक विकासाचा आढावा घेताना चार अवस्थांचा विचार करावा लागतो. त्या पुढीलप्रमाणे :

१. **कृषी–पूर्व संस्कृती** : बाल्यावस्थेतील अवस्था व शेतीचा शोध लागून मोठमोठ्या नद्यांच्या खोऱ्यात शेतीला स्थैर्य येत गेले तोपावेतोचा काळ

२. **कृषी–संस्कृती** : साधारणपणे लिखित इतिहासापासून तो इसवी सनाच्या पंधराव्या सोळाव्या शतकापर्यंतचा काळ

३. **उद्योग संस्कृती :** गेली चारपाच शतके विज्ञानाची व समाजशास्त्रांची अविरत वाढ होत असल्याचा कालखंड

४. **सामाजिक न्याय्य संस्कृती :** गेल्या एकदोन शतकात सामाजिक न्याय्य जीवनात प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांचा काळ

प्रागैतिहासिक काळी घनदाट अरण्ये, दलदलीची जागा यानी पृथ्वीचा बराचसा भाग व्यापला असून घोरपडीसारखे पण १०० ते २०० फूट लांबीचे प्रचंड प्राणी स्वैर संचार करीत असत. इतरही अनेक भयंकर प्राणी पाण्यात व जमिनीवर वास करीत होते. त्या तुलनेत आदिमानव अगदी लहान आणि निर्बळसा प्राणी होता. पण बुद्धीच्या श्रेष्ठ वरदानाच्या आधारावर माणसाने निसर्गाशी झगडा केला, स्वसंरक्षणार्थ इतर प्रचंड प्राण्यांबरोबर सामना दिला. या संघर्षातून मानवी संस्कृतीचा अरूणोदय झाला.

जुने अश्मयुग किंवा पूर्वपाषाण युगाची सुरुवात सुमारे ६ लाख वर्षांपूर्वी झाली असे मानण्यात येते. ख्रि. पू. २ लाख ते २० हजार येथपर्यंतच्या काळातील मानव दिसायला काळा, ठेंगणा व राठ केसाचा होता. शारीरिकदृष्टचा पशूहून तो फारसा वेगळा नव्हता. पोट भरण्यासाठी प्रामुख्याने कंदमुळे, झाडांचा पाला व शिकार करून मिळविलेल्या प्राण्यांच्या कच्च्या मांसावर जगणारा हा माणूस पुरा नग्न होता. या युगाच्या अखेरीस माणसास अग्नीचा शोध लागला. त्याचबरोबर शेती व कुंभाराचे चाक हे क्रांतिकारक शोधही लागले. शेतीमुळे भटक्या मानवजातीस एका जागी राहणे भाग पडले. अन्नासाठी दाही दिशा हिंडणारा मानव अन्न–उत्पादक बनला. जवळ जवळ वास करणारी मनुष्यवस्ती निर्माण झाली. कुंभाराच्या चाकाच्या शोधामुळे त्याने भांडी बनविली. पिकविलेल्या धान्याची साठवणी होऊ लागली. सुरुवातीचे भटकते जीवन स्थिरावत चालले. नदीकाठच्या वस्तीने त्यास अधिकच स्थैर्य आले. हळूहळू कुटुंबसंस्था जन्माला आली आणि आत्मसंरक्षणाच्या गरजेतून टोळी करून राहणे सुरू झाले. कुटुंबे बनली, कुटुंब प्रमुख आला. अनेक कुटुंबांची संघटना बनली. त्याचे राजकीय स्वरूप फारसे ज्ञात नसले तरी सामाजिक स्वरूप समजू शकते : मनुष्याला अज्ञात व अदृश्य शक्तींची जाणीव होती; खेरीज प्राथमिक अवस्थेतल्या मनुष्यालाही स्वतःचा असा धर्म होता असे दिसते. नव्या अश्मयुगाच्या अखेरच्या काळात माणसाला धातूचा शोध लागला. आवर्तात सापडू लागलेल्या जीवनास गती मिळाली. मुळात नग्न असलेला, कंदमुळे खाऊन पोट भरणारा माणूस पुढे झाडपाला शरीराभोवती गुंडाळू लागला, शिकार करून उदरनिर्वाह करू लागला; त्याच्या जीवनात असे हळहळू पण निश्चितपणे बदल होत गेले; भौतिक व आध्यात्मिक संस्कृतीची त्याने मुहूर्तमेढ रोवली.

जुन्या अश्मयुगाच्या उत्तरार्धात आणि नव्या अश्मयुगाच्या प्रथमार्धात कुटुंबपद्धतीचे बीजांकुर उमलले आणि नकळत, अस्पष्ट, अधुरे असे प्रीतिभावनेचे आविष्कारही घडले.

कुटुंबपद्धतीचे बीजांकुर :

सिंधु संस्कृतीत माणसाच्या जीवनाने गती व रूप दोन्ही घेतले आहे. सिंधु संस्कृतीच्या उत्खननात सापडलेल्या स्त्री–पुतळ्यांच्या मस्तकावर मुगुटाकार अलंकार आहेत. काही स्थळी केसांची वेणी घालून वेणीच्या टोकाला 'बो' बांधलेला आहे. पुरुषांचे लांब केस अत्यंत काटेकोरपणे मधोमध विंचरलेले आहेत. भांगावरून रिबन बांधलेली असून, रिबन व्यवस्थित ठेवण्याकरिता 'हेअर पिन्स्' ही आहेत. शृंगार–अलंकारांतही अशीच आसक्ती दिसते. या सौंदर्यप्रसाधनात तोंडाला लावण्याची सफेद किंवा निळसर पावडर, गालाला व ओठांना लावण्याकरिता लाल रंग, डोळ्यात घालण्याचे काजळ असे अनेक प्रकार आहेत. त्यात हिरव्या रंगाच्या काही कांड्याही मिळाल्या असून त्यांचा नेमका उपयोग काय असावा हे सांगणे मात्र कठीण आहे. सांप्रत पाश्चात्य स्त्रियांमध्ये पापणीच्या वरच्या भागावर हिरव्या रंगाची रेघ ओढण्याची फॅशन आहे. तसा कदाचित् त्याचा उपयोग त्याकाळी होत असल्यास नकळे ! एकूण अनेकदा वस्त्राभरणांचा नीटनेटकेपणा उच्च अभिरूचीचा दर्शक आहे; आकर्षणाचा अतएव सौंदर्यदृष्टीचा प्रदर्शक आहे. त्यादृष्टीने सिंधु संस्कृतीच्या काळातील समृद्ध जीवनाला मानवी जीवनातील भावभावनांचे विलक्षण गहिरे रंग असावेत असे वाटते.

उत्तर वैदिक काळात धार्मिक क्षेत्रात बरीच अशांतता निर्माण झाल्याने त्यातून प्रभावशाली धार्मिक मतप्रवाह बाहेर आले आणि सामान्य माणूस काहीसा संभ्रमित अवस्थेत लटकत राहिला. अशा परिस्थितीत उपनिषद्कांनी वैचारिक क्रांती घडवून आणली. वेदप्रामाण्याऐवजी स्वानुभव व यज्ञाऐवजी नैतिक आचरण यांचे महत्त्व उपनिषद्कांनी जाणले व समाजाची दृष्टी भौतिक जगाकडून आध्यात्माकडे वळविली. ऐहिक सुखाच्या प्राप्तीत खरे सुख नसून मोक्षप्राप्तीत खऱ्या सुखाचा ठेवा आहे, ह्या शिकवणुकीचा अम्मल बळावला. समाजात धार्मिक क्रांतीने मूळ धरले. उपनिषद्कांनील तत्त्वज्ञान गूढ व गहन असल्याने सामान्य बुद्धीला ते अगम्य ठरूनही या तत्त्वज्ञानाचा एक परिणाम निश्चित झाला तो हा की, लोकांचा कर्मकांडावरील विश्वास साफ उडाला. एका बाजूने कर्मकांडावरील विश्वास उडाला आणि दुसऱ्या बाजूने नवीन तत्त्वज्ञान बुद्धीला अगम्य राहिल्याने तोही मार्ग खुंटला. त्यामुळे सामान्य माणसाची स्थिती महापुरातील भोवऱ्यात सापडलेल्या माणसासारखी झाली. याचवेळी जैन आणि बौद्ध धर्माचा उदय झाला. महावीर जैन

आणि गौतम बुद्ध यांनी सरळ व सोप्या शब्दात आपले विचार : खऱ्या सुखाचा मार्ग सांगावयास सुरुवात केली.

भारतीय इतिहासातील मौर्य राजवटीच्या सुवर्णकाळी, अभिजात भारतीय कलेचा उत्कर्षबिंदु गाठला गेला. प्राचीन भारतीय स्थापत्य, शिल्पकला, चित्रकला इत्यादीनी नैपुण्याने उत्युच्च शिखर गाठले. स्थिर राजसत्ता, आर्थिक सुबत्ता आणि कलावंतांना मिळालेला राजाश्रय इत्यादीमुळे कलाकौशल्याची फार मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली. परंपरागत आचारातून मुक्त होऊन कलावंतांनी नवीन आदर्श निर्माण केले. त्यांची सौंदर्यदृष्टी व अभिव्यक्ती भारतीय कलाक्षेत्रांत पहिल्या क्रमांकाची मानण्याइतपत थोर बनली. गुप्त शिल्पकलेतील पूर्णाकृती मानवी प्रतिमा ही त्याची साक्ष होय. गुप्तकाळातील माणसाला लागलेल्या पूर्णतेच्या ओढीचे तर ते प्रतीक नव्हे ?

कुटुंबातील संकुचित स्त्रीजीवन

बौद्धकाळात गौतमबुद्धाने स्त्रियांना संन्यास घेऊन भिक्षू संघात प्रवेश करण्यास परवानगी दिल्याने स्त्रीजीवनात क्रांती घडून आली. स्त्रियांना संन्यासापासून परावृत्त करण्यासाठी त्यांची लहानपणीच लग्ने करण्यात येऊ लागली. त्यामुळे जोडीदार निवडण्याचे स्त्रियांचे स्वातंत्र्य जवळ जवळ नष्ट झाले. वेदकाळामधल्या उच्चस्थानापासून स्त्री हळूहळू खाली येऊ लागली. रानटी समाजात स्त्री अबला होती, केवळ उपभोग्य वस्तू होती; मात्र वेदकाळी आर्यसमाज बराच सुसंस्कृत होता. स्त्रीचे समाजातील स्थानही पुरुषाशी भागीदारीचे होते. विवाह हा संस्कार होता. घराची व्यवस्था व मालकी दंपतीकडे सामायिकीने होती. उपनिषद्कालातही : इ. स. पू. १५०० ते ५०० : स्त्रीचा समाजातील दर्जा खालावलेला आढळत नाही. उलट काही बाबतीत तिची स्थिती सुधारल्याचे आढळते. मात्र बौद्धकाळात स्त्रीस्वातंत्र्य बरेच संकोचले. पावित्र्य आणि आज्ञाधारकपणा ह्यांचा प्रभाव वाढला. स्त्रीशिक्षणासही ओहोटी लागली. मौर्यकाळात एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात असून निपुत्रिकास दत्तकपुत्र घेण्यास मुभा होती. साधारणतः आंतरजातीच्या विवाहास बंदी असली तरी अनुलोम विवाह चालवून घेतले जात. हुंडा, कन्याशुल्क या दोन्हीही पद्धती अस्तित्वात होत्या. मात्र स्त्रीचे खालावणारे स्थान सतत घसरतच होते : स्त्रीशिक्षण कमी होत होते. विवाहाची वयोमर्यादा पुरुषांना सोळा व स्त्रियांना बारा इतकी खाली आली होती. वरिष्ठ वर्गात अनेकपत्नीत्व सर्वसामान्य होते.

स्त्रीविषयक चाणक्याची दृष्टी बरीच प्रगतीपर आढळते. पूर्वकालीन नियोगपद्धतीऐवजी

पुनर्विवाहास मान्यताही दिसते. हेरगिरीकरिता सुंदर स्त्रियांची नेमणूक तर होईच पण चंद्रगुप्ताच्या शरीरसंरक्षकांमध्ये धिप्पाड स्त्रियांचा भरणाही होता. स्त्रीविषयक गुन्ह्यांची मोठी गंभीरतेने दखल घेतली जाई. नारीहत्त्या हे फार मोठे पाप समजण्यात येत असून स्त्रियांच्या हितसंबंधांच्या जपणुकीसाठी अशोकाने खास 'स्त्रीमहामात्र' नेमले होते. एकूण 'स्त्री' च्या जपणुकीच्या दृष्टीने बदल असले तरी तिचे स्वातंत्र्य दिवसेदिवस संकुचित होत होते. मौर्योत्तरकाळात बौद्ध आणि जैन धर्मामुळे संन्यासमार्गाचे प्रस्थ वाढले.

उत्तर वैदिक काळापासून समाजातील स्त्रियांचा हळूहळू घसरणारा दर्जा गुप्तकाळातही सावरलेला नाही. गुप्तकाळामध्ये वर्णसंस्था दृढमूल झाली असून जातीतल्या जातीतच विवाह होत असल्याचे ह्युएन् त्संगने लिहून ठेवले आहे. ब्राह्मणाखेरीज इतर वर्णातील लोक आर्थिक परिस्थितीमुळे किंवा शिक्षेला पात्र झाल्यामुळे दास होत. दासाशी लग्न करणारी स्वतंत्र स्त्रीही दासी होत असून आपल्या मालकापासून पुत्र झाला तरीही दासीपणातून मुक्त होत नसे. दासावर मालकाचा पूर्ण हक्क असे. साधारणतः ऋतुप्राप्तीपूर्वी मुलीचा विवाह करण्याची पद्धत रूढ होत होती. अंगीरसाने वधूचे वय वरापेक्षा दोन, तीन किंवा पाच वर्षांनी कमी असावे असे म्हटले आहे तर 'विष्णुपुराणा'त वराचे वय वधूच्या तिप्पट असावे असे सांगितले आहे. वात्स्यायनाने आपल्यापेक्षा तीन–चार वर्षांनी लहान असलेल्या वधूबरोबर लग्न करावे असे म्हटले आहे. साधारणतः जातीबाहेर लग्ने होत नसली तरी अनुलोम आणि प्रतिलोम विवाहांची उदाहरणे गुप्त राजघराण्यात सापडतात. गुप्त वैश्यवर्णीय होते. पण गुप्तकन्या प्रभावती गुप्ता हिचा विवाह ब्राह्मणवर्णीय रुद्रसेन वाकाटकाशी तर कदंबाच्या ब्राह्मणकुलीन काकुस्थवर्मनच्या मुलीचा विवाह गुप्त घराण्यात झालेला आहे. साधारणतः विवाह मातापित्याकडून ठरविले जात. या काळी विवाह हेच स्त्रीचे ध्येय होते.

गुप्तोत्तर काळानंतरच्या, सातवाहन-वाकाटक व अरब–मुस्लिम यांच्या आक्रमणाच्या काळात स्थूलरूपाने आर्यांची वर्णव्यवस्था महाराष्ट्रात दृढमूल झालेली दिसते. अनेक व्यवसायवाचक जाती अस्तित्वात असून शक व यवन यांचे मूळच्या रहिवाश्यांबरोबर वैवाहिक संबंध होऊ लागले. वर्णसंकराविरुद्ध गौतमीपुत्राने सक्त नियमही केले. या काळी बालविवाहाची पद्धत रुढ झाली असावी. विधवाविवाह समाजाला मान्य नव्हता. मात्र विधवेस नवऱ्याच्या मालमत्तेचा वाटा मिळत असे. सतीची पद्धती यादवकालापासून तुरळक प्रमाणात दिसून येतेच. सातवाहन राणी नायनिका हिची अनेक दानपत्रे व नाणेघाट : जुन्नर : येथे कोरलेला तिचा आलेख यावरून निदान राजघराण्यातील स्त्रियांना शिक्षण आणि बरेचसे स्वातंत्र्य असावे असे मानायला जागा आहे.

मुसलमानांच्या आगमनानंतरच्या मध्ययुगीन : काळात : ग्रंथप्रामाण्य व शब्दप्रामाण्य याचे महत्त्व वाढले असून या काळी पडद्याच्या चालीचे मोठे प्रस्थ होते. वधूपित्याने वरास द्यावयाच्या हुंड्याची चालही रुढ होती. उत्तर हिंदुस्थानापेक्षा दक्षिणेत ती अधिक प्रचलित व जाचक होती, असे दिसते. या चालीचा, स्त्रीच्या समाजातील स्थानावर अपरिहार्यपणे परिणाम झाला. सर्वसाधारणपणे तत्कालीन स्त्रीजीवन हे पुरुषावलंबी आहे. तुरळक काही उदाहरणे केवळ अपवादात्मक मानावी लागतात.

मध्ययुगातील मुघलबादशाहीच्या काळात अकबराएवढा सामाजिक प्रश्नांचा स्वतंत्रपणे विचार करणारा दुसरा पुरुष इतिहासात झाला आहे, असे वाटत नाही. त्याने पुनर्विवाहास मान्यता दिली आहे. त्याची कल्पना अबुलफझलने लिहिलेल्या 'ऐने अकबरी' ग्रंथात अकबराच्या तोंडच्या स्त्रीजीवनविषयक वचनांवरूनही येते. : अकबराने सतीच्या चालीस प्रतिबंध केला असून हुंड्याच्या चालीस आळा घातला. उलेमांचा विरोध डावलून सामान्य स्थितीतील मुसलमानानेही एकपत्नीव्रताचे आचरण केले पाहिजे असे त्याने फर्मान काढले. अनेकपत्नीविवाह हे मनुष्याच्या प्रकृतीस अपायकारक व गृहसौख्यविघातक ठरतात; असे अकबराने म्हटले आहे. अकबराने केलेल्या सुधारणासंबंधीचे बरेच तपशिल व्हिन्सेन्ट स्मिथकृत 'अकबर चरित्रा'त नमूद आहेत. साऱ्याच बाबतीत अकबराचा बुद्धिवाद, त्याची वैचारिक सहिष्णुता, दुर्बळांबद्दलची त्याच्या मनातली कणव, मानवाच्या व्यक्तिमत्वाची जाणीव आणि लोकमतास वळण लावीत लावीत सामाजिक सुधारणा करीत जाण्याचे त्याचे धोरण या सर्वांचा नीट विचार केला तर युरोपातील पंधराव्या–सोळाव्या शतकातील इरॅस्मस, मार्टिन ल्यूथर यासारख्या समाजक्रांतिकारकांशी अकबराचे साम्य जाणवते. उत्तरेत असे पुरोगामी वारे वाहत असले तरी दक्षिणेतील शुकशुकाटाबाबत 'हिस्टरी ऑफ साऊथ इंडिया' चे ग्रंथकर्ते प्रा. नीळकंठशास्त्री यानी आवर्जून उल्लेख केला आहे. [१] या काळी आपल्या गुणांनी व पराक्रमाने चमकलेल्या स्त्रियांची उदाहरणे आहेत. मात्र इतिहासातील या अपवादभूत स्त्रियांवरून त्या काळातील स्त्रीजीवनासंबंधी सामान्य विधान करणे बरोबर ठरणार नाही. त्या काळातील सामान्य स्त्रीचे जीवन पुरुषावलंबी म्हणजे स्वातंत्र्यरहित अतएव दिशाहीन असेच होते. शास्त्राचीही त्यास मान्यता होती.

महाराष्ट्रातील सतराव्या व अठराव्या शतकातील मराठेकालीन स्त्रीजीवन वेगवेगळी परिमाणे घेऊन येते. मुसलमानी अंमलाचा नाश करून मराठी राज्याची स्थापना करणे हा नुसता बचावाचा पवित्रा नसून चढावाचे व आक्रमक स्वरूपाचे ते धोरण होते. त्यानुसार नित्य उद्भवणारे सामाजिक प्रश्न वास्तववादी दृष्टीकोणातून धैर्याने सौडविण्याचा

तत्कालीन शासन व समाज या दोहोंचाही प्रयत्न दिसतो. समाज शास्त्रबंधनांनी फार जखडला गेलेला नाही. परंतु त्याने शास्त्रांचा धिक्कारही केलेला नाही. मात्र मराठेकालीन स्त्री पूर्वकालीन स्त्रीइतकी शास्त्र व रूढी यांच्या बंधनात जखडलेली नव्हती. सारांश, तत्कालीन राज्यकर्ते त्याकाळच्या शास्त्रार्थ व धर्मसमजुतीच्या कक्षेबाहेर फारसे जाऊ शकले नाहीत.

एकूण, वैदिक काळातील स्त्रीचा उच्च दर्जा हळूहळू घसरत राहिला, त्याला पुढे धर म्हणून कुठे मिळालाच नाही. स्त्रीचे अस्तित्व भोगासाठी, आपल्या पद्धतीने घ्यावयाच्या भोगासाठी अशी पुरुषांची समजूत राहिली. धर्मग्रंथ, त्यानुसारच्या रूढी आणि प्रत्यक्ष स्त्री यानीही त्याचे पोषणच केले. अधूनमधून जन्माला आलेल्या कर्तृत्ववान स्त्रियांनी सुवर्णाक्षरानी इतिहासाची पाने लिहिली; पण तो नियमाला अपवाद होता. सामान्य समाजाकडून या अपवाद परिस्थितीचे कौतुक झाले पण त्याची कक्षा रूंदावली नाही; उलट मंदावतच गेली. एवढ्या दीर्घ कालखंडात स्वत:ला राबवीत असल्याबद्दल एकही स्त्री बंड करून उठलेली नाही : ती भीरू, भावडी, निःसत्त्व, निर्जीवच राहिली. परिणामी ' पतीसाठी जीवन ' हे तिचे सूत्र बनले असून त्याच्या जीवनाचा विचार हाच तिच्या जीवनाचा विचार राहिला. कामुकतेत दुनिया फिरली पण त्यातून फुलणाऱ्या प्रीतिभावनेचा पारिजात डवरला नाही. तो सर्वकाळ, सर्व ऋतूत निष्पर्ण राहिला. अपवाद वगळता बहर असा आलाच नाही. क्वचित् आला तो सरंजामीपणात गुदमरून मोडून पडला. थोडीफार उमललेली प्रीती सर्वकाळी आणि सर्वस्थळी पापभीरू, लाजरीबुजरी राहिली. तिचा आकार आणि तिचे साधुत्व, तिचे सामर्थ्य आणि तिचे लावण्य यासाठी रसिक सदाचाच पारखा राहिला.

सिंधु संस्कृतीच्या पतनानंतर ऋग्वेदकाळी आर्यांची कुटुंबव्यवस्था स्थिर पायावर उभी झाली. सर्वसाधारणपणे तीन पिढ्या एकत्र नांदत असत. कुटुंबातील सर्वांत वडील पुरुष हा कुटुंबाचा कर्ता असे. यास ' गृहपती ' किंवा ' दंपती ' अशी संज्ञा असे. ' दंपती ' हा शब्द बहुतेक कुटुंबप्रमुख व त्याची पत्नी या दोहोंस उद्देशून असावा. एकत्र कुटुंबपद्धती ही प्राचीन आर्यांच्या समाजव्यवस्थेचे वैशिष्ट्य होते. कुटुंबातील सर्व व्यक्तींवर कुटुंब-प्रमुखाची सत्ता अप्रतिहत चाले. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीस देहदंडाची शिक्षा देण्याचा अधिकार कुटुंबप्रमुखास होता ही गोष्ट नचिकेताच्या आख्यायिकेवरून स्पष्ट होते. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिक आणि आर्थिक स्वास्थ्याचा भाग राज्यसत्ता उचलू शकत नव्हती, अशा काळी कुटुंबपद्धतीने हे कार्य केले; त्याचबरोबर सामाजिक गुणांची आणि चांगल्या संस्कारांची जोपासनाही केली. याकाळी लग्न हा संस्कार होता.

त्यामुळे गृहस्थाश्रमाची सुरुवात होत असल्याने सामाजिक जीवनात त्या संस्कारास महत्त्वाचे स्थान होते. ऋग्वेदातील अनेक सूक्तांवरून बालविवाह त्याकाळी प्रचलित नव्हता असे दिसून येते. स्वयंवराची पद्धत होती. साधारणत: जोडीदार निवडण्याचे बाबतीत मुलीना बरेच स्वातंत्र्य होते. प्रजोत्पादन हे लग्नसंस्थेचे प्रमुख उद्दिष्ट होते. नववधूचे वर्णन 'गृहस्वामिनी' म्हणून केलेले आढळते. पतीच्या सर्व धर्मकृत्यांत स्त्री सहचारिणी असे. ऋग्वेदकाळी सतीची पद्धत बहुधा अस्तित्वात नसावी. विवाह विच्छेदनास परवानगी नव्हती. वैवाहिक बाबतीत स्त्रीवर्गाची नीतिमत्ता उच्च दर्जाची तर पुरुषवर्गाच्या बाबतीत काणाडोळा करण्याकडे प्रवृत्ती होती. सार्वजनिक समारंभात स्त्रिया मोकळेपणाने भाग घेत. यज्ञात भाग घेत. ऋग्वेदाचा काही भाग सिकता, रोमशा, लोपामुद्रा, अपाला, विश्ववारा, उर्वशी इत्यादी अनेक कवयित्रीनीही लिहिलेला आहे. एकूण, समाजामध्ये स्त्रियांचे स्थान चांगलेच उच्च होते.

ऋग्वेदकाळचे 'कुल'

ऋग्वेदकाळी कुटुंबास उद्देशून वापरलेल्या 'कुल' या शब्दाचा मूळ अर्थ 'घर' असाच आहे. नंतर तो एकत्र कुटुंबास उद्देशून वापरला गेला. 'ऐतरेय ब्राह्मण'तील : ७· १२· १८ : शुन:शेपाच्या कथेवरून कुटुंबप्रमुखास कुटुंबातील व्यक्तीवर पूर्ण सत्ता गाजविता येते असे दिसते. कुलाची परंपरा चालू रहावी म्हणून दत्तक घेण्याची प्रथा दिसून येते. कनिष्ठांची ज्येष्ठास प्रत्येक बाबतीत मान देण्याची पद्धती होती; तर ज्येष्ठ कनिष्ठांशी मायेने वागत. शुन:शेपाच्या बाबतीत त्याच्या पित्याने दाखविलेल्या हृदयशून्य वृत्तीचा 'सांख्यायनसूत्रा' मध्ये धिक्कार केला आहे. 'छांदोग्य उपनिषद्' त कुटुंबातील व्यक्तींची अधिकारपरत्वे विभागणी केलेली दाखविली आहे. अनेक पत्नीत्वाची प्रथा विशेषत: क्षत्रिय समाजात रूढ होती. 'मैत्रायणी संहितेत' मनूच्या दहा बायकांचा उल्लेख आहे. प्रथम पत्नीला अर्थात् सर्व धार्मिक अधिकार असत. 'अथर्ववेदा' मध्ये : ५.१७.८ : आलेल्या उल्लेखावरून अनेकपतीत्वाची पद्धती अस्तित्वात असावी असे वाटते. पण बहुत करून ही गोष्ट अपवादात्मक असावी. 'अश्वलायन गृहसूत्रा' त आणि 'धर्मसूत्रा' त विवाहाचे आठ प्रकार सांगितले आहेत. वैदिक वाङमयात स्त्रीचा विवाह वयात आल्यानंतर होत असे, असे वर्णिले आहे. पण नंतरच्या काळातील धर्म आणि 'गृहसूत्रा'तील काही उल्लेखांवरुन लग्नसमयी कन्या ऋतुमती झालेली नसावी असे दिसते. जवळच्या नात्यातील व्यक्तीबरोबर तसेच सपिण्ड आणि सगोत्र विवाहास परवानगी नव्हती. या काळाच्या अखेरी अखेरीस चातुर्वर्ण्य पद्धती रूढ होऊ लागली. त्यामुळे विवाह आपल्याच वर्णातील व्यक्तीबरोबर करावे, अशा प्रघात पडला. तरीसुद्धा पुरुषाने आपल्यापेक्षा

खालच्या वर्णातील स्त्रीबरोबर विवाह करणे फारसे अयोग्य समजत नसत. 'अथर्ववेदा' ने : ९. ५. २७. २८ : विधवेच्या पुनर्विवाहास स्पष्टपणे मान्यता दर्शविली आहे. 'वशिष्ठ धर्मसूत्रा' ने काही विशिष्ट समयी विधवेस पुन्हा लग्न करण्याची परवानगी दिली आहे. इतर धर्मसूत्रात पुत्रांची वर्गवारी करताना विधवेच्या पुनर्विवाहापासून झालेल्या संततीचा उल्लेख केला आहे धर्मसूत्रांनी नियोग पद्धतीस परवानगी दिली आहे. ' धर्मसूत्रा ' मध्ये विधवेच्या मालकी हक्काविषयीही माहिती आहे. त्यावरून सतीची पद्धती अस्तित्वात असल्यास ती सर्हसा नव्हती असे दिसते. ' अथर्ववेदा 'त : १८. ३. १ : सतीचा उल्लेख आहे. या काळात, स्त्रीचा आपल्या आयुष्यातील जोडीदार निवडण्याचा हक्क नक्कीच कमी झाला आहे. योग्य वरास देणगी म्हणून कन्या अर्पण करणे आता सर्वसामान्य ठरले आहे. काही प्रसंगी कन्याविक्रयही होत असे. मात्र हा प्रकार लोकांस आवडत नसे. ' शतपथ ब्राह्मणा ' त पत्नीचा उल्लेख 'अर्धांगी' असा आलेला असून ती पुरुषास पूर्णत्व आणते असे म्हटले आहे. तरीही स्त्रीला राज्यकारभारात भाग घेण्याचा अधिकार नव्हता. ' ऐतरेय ब्राह्मणा ' त : ६. १५ : कन्येचा जन्म म्हणजे 'दुःखाचे मूळ' असा आलेला असून ती पुरुषास पूर्णत्व आणते असे म्हटले आहे. ' अथर्ववेदा 'तही : ६.२.३ : कन्याजन्माचा हीनतेने उल्लेख केला आहे. 'मैत्रायणी संहिते'ने तर द्यूत आणि मद्य याबरोबर स्त्रीचा उल्लेख एक व्यसन म्हणून केला आहे. या सर्वावरून स्त्रियांचे स्थान किती हीन दर्जाचे होते हे दिसून येते. विवाहाव्यतिरिक्त कोणत्याही स्त्रीविषयक संस्कारात वैदिक मंत्र वापरले जात नसत. मात्र घरामध्ये स्त्रीचे स्थान चांगले उंच होते. सर्वप्रकारच्या संस्कारात ती भाग घेई. इतकेच नव्हे तर पतीच्या अनुपस्थितीत काही विशिष्ट प्रकारचे यज्ञही ती करी. स्त्रियांचे शिक्षण साधारणतः घरच्या घरीच होई. पण स्त्रीशिक्षकांचे आश्रमही असावेत, असे ' उपाध्याया ' या शब्दावरून वाटते. तसे ' छात्रीशाला ' या शब्दप्रयोगावरून विद्यार्थिनींची वसतीगृहेही होती असे समजण्यास हरकत नाही. सर्वसाधारणपणे स्त्रियांचे शिक्षण पुरुषांपासून निराळे असे. पण सहशिक्षणाचेही उल्लेख सापडतात. भवभूतीच्या ' मालतीमाधव ' आणि 'उत्तररामचरिता'त कामंदकी व आत्रेयी या स्त्रिया मुलांबरोबर शिकत असल्याचा उल्लेख आहे. विद्यार्थिनींचे दोन वर्ग होते : त्याकाळी मुलींची लग्ने होईपर्यंत सातआठ वर्षात अमुक एवढी वेदविद्या शिकणाऱ्या विद्यार्थिनीस ' स द्योवधू ' म्हणत असत. विद्याभ्यास पुरा होईपर्यंत लग्न न करणाऱ्या विद्यार्थिनीस 'ब्रह्मवादिनी' म्हणत. त्यापैकी काही जणी लग्न न करता आपले सर्व आयुष्य विद्यार्जनात घालवीत. याज्ञवल्क्याबरोबर वादविवाद करणाऱ्या मैत्रेयी आणि गार्गी, वाचक्नवी, लोपामुद्रा, सुलभा, आत्रेयी इत्यादी विदुषींची नावे आढळतात. पुरुषांच्या बरोबरीने विद्येच्या क्षेत्रात त्यांनी स्वतःची नावे अमर केली आहेत. तरीही या काळात स्त्रियांचे ' स्वातंत्र्य ' मर्यादितच झाल्याचे दिसते.

ऋग्वेदकाळानंतरच्या उत्तर वैदिक काळामध्ये वर्णव्यवस्था दृढ झालेली आढळते. ब्राह्मण-वर्गाकडे समाजाचे नेतृत्व असून समाजात त्याना मोठा मान होता; सर्वप्रकारच्या करापासून ते मुक्त होते. पूर्वीप्रमाणे एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. पित्याच्या संपत्तीची वाटणी सर्व मुलांत सारखी होत असली तरी वडिल मुलास वडिलकीचे खास अधिकार असत. सूत्रकालाप्रमाणे विवाहाचे आठ प्रकारही अस्तित्वात होते. विवाह हा एक पवित्र संस्कार होता. व्यभिचारी स्त्रीचे अनेक सामाजिक हक्क नष्ट होत असले तरी तिचे पतीशी असलेले नाते तुटत नसे. तिला पोटापुरते का होईना, पण पतीपासून अन्न, वस्त्र, निवारा मिळत असे. लग्नानंतर दहा वर्षांत जर स्त्रीला पुत्र झाला नाही, तर तिचा त्याग करण्याची प्रथा होती. काही विशिष्ट परिस्थितीमध्ये पुनर्विवाहास मान्यता असावी. परागंदा झालेल्या नलाचा शोध लावण्याकरिता दमयंतीचे पुन्हा स्वयंवर योजिले होते, हा कथाभाग सुपरिचित आहे. स्मृतिकाळी पुनर्विवाहास बंदी घालण्याकडे समाजाची प्रवृत्ती झालेली असून मनु व 'याज्ञवल्क्य स्मृती' पुनर्विवाहास विरोध करतात तर नारद व पाराशर पुनर्विवाहास मान्यता देतात.

या काळातील स्त्रियांचे समाजातील स्थान, पुरुषप्रधान समाजव्यवस्था असल्याने हळूहळू खाली जाऊ लागले होते. पुत्राची माता या नात्याने स्त्रीला समाजात मान होता. अन्यत्र मात्र 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' ही भूमिका समाजाने स्वीकारली होती. याबाबतीत एकच अपवाद म्हणजे 'स्त्रीधर्म.' ते सहा प्रकारचे होते. स्त्रीशिक्षण मात्र चांगलेच पुढारलेले होते. महाभारतात द्रौपदीचा उल्लेख 'पंडिता' म्हणून येतो सीता, तारा, सुमित्रा, सावित्री, दमयंती, लोपामुद्रा या स्त्रियांचा उल्लेख 'मंत्रवेत्या' म्हणून आला आहे. वेदविद्येबरोबर गायन, नर्तन, चित्रकला इत्यादी कलांमध्येही स्त्रिया तरबेज असत. युद्धशास्त्रही त्याना अवगत असे. कैकेयीने युद्धात दशरथाला मदत केलेली आहे; ती गोष्ट रामायणात आली आहे. राजकारणात स्त्रिया प्रत्यक्ष भाग घेत नसल्या तरी अनेक कठीण प्रसंगी त्या पतीस मदत करीत. रागावलेल्या लक्ष्मणास शांत करण्याचे कार्य सुग्रीवपत्नी तारेने केले. द्रौपदी पांडवांस सल्लामसलत देत असे. पण द्यूतात 'द्यूतवस्तू' म्हणून लावण्याइतपत ती पुरुषाच्या अंकितही होती. आणि त्यानंतर भर दरबारात प्रश्न विचारू पाहण्याइतपत ती निर्भय, पंडिता आणि चतुरही आहे. पण हे 'स्वातंत्र्य' मर्यादितच मानायला हवे.

प्रीतिभावनेचे प्रमत्त प्रवाह

ऋग्वेदासारख्या अगदी आदि काळातील वाङ्मयात माणसाच्या अंतःकरणात प्रीतिभावना

बोलकी झालेली आहे. अगदी प्रारंभी पद्यरूपात : काव्यात : ती सहजस्फूर्त, निरलंकृत, मनमोकळ्या रीतीने प्रकट झालेली असून पुढे झुळूझुळू वाहणाऱ्या या झऱ्याला गंगोत्रीचे रूप लाभले आहे. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील पंचावन्नव्या सूक्तातील पहिल्या अठरा कडव्यांतून हे पहिलेवहिले आविष्करण घडले आहे. भारतात मानवी अनुभूती प्रत्ययकारी शब्दात व्यक्त करण्याचा ऋग्वेद हा पहिला प्रयत्न असून, मानवी जीवनाला मूलाधार असलेले प्रीतिभावनेचे प्रमत्त प्रकटीकरण : a passionate expression to the emotion of love : पहिल्यांदा करणारा ऋग्वेद हा पहिला ग्रंथराज होय.

प्रीतिभावनेचे हे पहिलेवहिले आविष्करण ऋग्वेदकार, उर्वशी–पुरुरवा यांच्या संवादकथेतून करतात :

> ...पुरुरवा मर्त्य मानव आहे. उर्वशी गंधर्वकन्या. पुरुरव्याबरोबर ती पृथ्वीवर काही काळ राहते. पण उर्वशीनं, वास्तव्यकाळात पाळावयाच्या घातलेल्या अटींचा पुरुरव्याकडून भंग होताच ती स्वस्थानी जायला निघते. पुरुरव्याची धुंद, गुलाबी स्वप्नं विरून जातात. कणाकणानं जाळणारा वियोग पेटून उठतो. वियोगाच्या आघातानं अंतःकरण दुभंगून जातं. केवळ हलक्याफुलक्या प्रमादाचा आपण बळी आहोत, या जाणीवेनं त्याचं मन खंतावतं. उर्वशी दृष्टीआड झालेली. दूरवर तो तिचा शोध घेतो. उर्वशीनं परत फिरावं म्हणून तिची मिनतवारी करतो, मनस्वी आळवणी आरंभतो. वियोगाच्या दुःखानं जखमी झालेलं त्याचं आर्त हृदय तडफडणाऱ्या पाखरासारखं तळमळत राहतं. पण पालथ्या घडयावरच्या पाण्यासारखं सारं सुळकन् व्यथेच्या गर्गेतच कोसळतं. उर्वशी माघार घेत नाही की माघारी फिरत नाही. पुरुची व्याकुळता, त्याची गलितगात्रता, तिची आर्तता तिच्या कानात शिरत नाही, अंतःकरणाला झोंबत नाही; मस्तकी भिनत नाही. त्यामधील आच उर्वशीला कळते, समजते; तरी वळणं तिला शक्य नाही. निसर्गानंच ते तिच्या हाती ठेवलेलं नाही. ..

देहाच्या मस्तीने धुंदफुंद होऊन त्यापलीकडील काहीही न जाणणे ही पुरुषतत्त्वाची अखेरची प्रतिक्रिया असली तरी स्त्रीला त्यापलीकडली ओढ निसर्गानेच लावून दिली आहे. सृष्टीनेच तिच्या ओटीत ते दान टाकले आहे. कोणते ते दान ? स्त्रीला पौरुषाची मस्ती जरूर हवी असते. पौरुषाची, पराक्रमाची, नेटदार ताठरपणाचीच मुळी ती पूजक असते. म्हणूनच तर ती पुरुषाला उन्मत बनविते. पण म्हणून ती त्यातच रमते असे नाही. तिचे रमणे, रतणे आणि सजणे क्षणकालिक असते. पौरुषाची ही मस्ती, पुरुषार्थाची ही

धुंदी : उन्मादात उभा असलेला पुरुष : स्त्रीला बांधून ठेवू शकत नाही. त्यामुळेच उन्मादाच्या पल्याड असलेली शांती व क्षमा आणि मीलनाच्या पलीकडचे कर्तव्य तो पाहू शकते. पुरुषाची पिंडप्रकृती त्याउलट असल्याने त्याला ते जमणारे नाही. आसक्तीचा उन्माद हे पुरुषरूप. त्याच्या तृप्तीसाठी मोल मिळायचे ते स्त्रीदेहाचे. त्या देहाचे रक्षण त्या तृप्तीसाठी. पण त्या तृप्तीतून सजीव होणारे जे मानव्य, त्याच्या रक्षणाची खरीखुरी जबाबदारी शेवटी स्त्रीवरच आहे. प्रीतीचे साफल्य साधण्यासाठी सृष्टीने स्त्रीला संमोहनाची अस्त्रे दिली आणि उन्मादाचा आवेग सहन करण्याची शक्तीही दिली. म्हणूनच ऋग्वेदकारांच्या 'उर्वशी–पुरुरवा' या संवादकथेत पुरुरव्याच्या दर्दभरी आळवणीवर उर्वशीकडून मोजक्या, संयत शब्दांचा हिमवर्षाव होतो. ऋग्वेद १० वे मंडल, ९५ व्या सूक्तामध्ये पुरुरवा उर्वशीला म्हणतो : 'हे कठोरहृदय प्रिये, थोडा वेळ थांब. आपण परस्पर काही गोष्टी बोलू. अशा गोष्टी आपण पूर्वी कधीच बोललो नाही. त्यामुळं सुखाला मुकलो. आता तरी बोलू.' आणि नंतरचा संवाद असा :

उर्वशी : असल्या शुष्क संभाषणात कसलं सुख मिळणार आहे ? मी तुझ्यापासून उषेप्रमाणं पळत आहे. तरी हे पुरुरवस, तू आपल्या गृहाप्रत गमन कर. मी वायुप्रमाणं दुष्प्राप्यच आहे असं समज.

पुरुरवा : हे उर्वशी, तुझ्या विरहानं जड झालेल्या, मला बलवान असताही, शत्रूंचा पराभव करवत नाही व शत्रूंची संपत्ती हरण करता येत नाही. त्याचप्रमाणं राज्यकारभारामध्येही माझं चित्त रमत नाही; व रणांगणामध्ये मी मनानं किंकर्तव्यमूढ होऊन गेल्यामुळं, माझ्या सैनिकांनाही भीती वाटून ते सिंहनाद करीत नाहीत.

उर्वशी : (उषेला म्हणते), हे उषादेवी, श्वशुरास उत्तम जेवण घालणाऱ्या मला जेव्हा पतीविषयक इच्छा होई तेव्हा मी श्वशुरगृहातून पतीच्या खोलीत जात असे व तेथे रात्रंदिवस पतीबरोबर क्रीडा करीत असे.

(पुरुरवास उद्देशून), हे राजा, प्रत्यही तू माझा तीनदा उपभोग घेत असस. इतर स्त्रियांस सोडून, माझी मन:कामना तुझ्याकडून अगोदर पूर्ण होईल या आशेनं मी तुजकडं आले. राजन्. त्यावेळी तू माझ्या शरीराचा स्वामी होतास.

पुरुरवा : ती (उर्वशी) सुजूर्णि, श्रेणि, सुग्नअपि व हृदेचक्षु या सख्यांसह एकमेकांत मिठ्या मारून निघून गेली.

(परंतु परत जाताना)त्या अरूण वर्णांकित अप्सरा नवप्रसूत गाई ज्याप्रमाणं शब्द करीत जातात त्याप्रमाणं शब्द करीत नव्हत्या.

उर्वशी : हे पुरुरवस्, तुझा जन्म झाल्याबरोबर देवपत्न्या तुजभोवती एकत्र जमल्या. देवांनी मोठ्या संग्रामाकरिता व दस्यूंना मारण्याकरिता तुझ्या सामर्थ्याची वाढ केली. त्याचप्रमाणं वाहणाऱ्या नद्यांनी स्वत: तुझं संगोपन केलं.

...हा पुरुरवस् देवतारूप अप्सरांच्या पुढं जेव्हा मनुष्यरूपानं जात असे, त्यावेळी कामेच्छा उत्पन्न झालेली मृगी ज्याप्रमाणं व्याधापासून दूर पळते किंवा रथास जोडलेले घोडे ज्याप्रमाणं दूर पळतात, त्याप्रमाणं अप्सरा भयभीत होऊन त्याजपासून दूर जात.

...मानव देहधारी पुरुरवस् ज्यावेळी अप्सरांशी कामचेष्टा करावयास जात असे, त्यावेळी ज्याप्रमाणं क्रीडा करणारे घोडे किंवा साप मनुष्यास आपले स्वरूप स्पष्ट दिसू देत नाहीत, त्याप्रमाणं ह्या अप्सरा आपलं स्वरूप दिसू देत नसत.

पुरुरवा : जी उर्वशी वीजेप्रमाणं प्रकाशते व मला प्रिय असे स्वर्गीय भोग संपादन करते, त्या उर्वशीपासून जेव्हा मला सुलक्षणी पुत्र होईल तेव्हा माझं आयुष्य वृद्धिगत होईल.

उर्वशी : हे पुरुरवस्, तू पृथ्वीचं पालन करण्याकरिता जन्मला आहेस व तू माझ्या ठिकाणी ही गर्भस्थापना केली आहेस. त्यावेळी मी सांगितल्याप्रमाणं न ऐकता तू प्रतिज्ञाभंग केलास, अर्थात आता शोक करून काय उपयोग ?

पुरुरवा : प्रिये, तुला केव्हा पुत्र उत्पन्न होईल ? तो मला (केव्हा) सुखवील व मजजवळ रडून हट्ट घेईल ? त्याप्रमाणं हा पुत्र केव्हा आपल्या दोघांचा वियोग करील व श्वशुराचं तेज वाढवील ?

उर्वशी : राजा, तुझा पुत्र रडू लागताच काळजीपूर्वक त्याचं संवर्धन करण्याकरिता मी त्याला तुझ्याकडं पाठवून देईन. परंतु तू आपल्या घरी निघून जा. हे मूढ, आता मी तुला प्राप्त होणं शक्य नाही.

पुरुरवा : उर्वशी, तुझ्याबरोबर क्रीडा करणारा तुझा पती जो मी त्या माझं शरीर पतन पावो किंवा देशांतरी गमन करो किंवा येथेच पृथ्वीच्या अंकावर शयन करो अथवा मला या अरण्यातील हिंस्त्र लांडगे फाडून खावोत !

उर्वशी : हे पुरुरवस्, तू प्राणत्याग करू नकोस, येथे उडी टाकू नकोस. अमंगल लांडगे तुझं शरीर न खावोत. स्त्रियांचं सख्य हे सख्यच नव्हे. कारण त्या लांडग्याच्या हृदयाच्या असतात. राजा, मानवरूप घेऊन मी तुझ्याशी आपलं देवत्व विसरून, विविध प्रकारची रूपं धारण करून चार वर्षेपर्यंत रतिसुखाचा उपभोग घेतला. परंतु आता माझी तेवढ्यानं पूर्ण तृप्ती झाल्यामुळं मी तुझ्यापासून दूर निघून जात आहे.

पुरुरवा : आपल्या तेजानं अंतरिक्ष भरून टाकणाऱ्या व स्वर्गीय उपभोग देणाऱ्या उर्वशीस मी वश करणार आहे. सुकृती असा हा पुरूरवा तुझी प्रार्थना करतो की परत फिर. कारण हे अंत.करण वियोगानं संतप्त झालं आहे.

उर्वशी : राजा, देवांनी तुला सांगितलं आहे की, सांप्रत तू मृत्यूला वश आहेस, देवाकरिता भजन कर व स्वर्ग प्राप्त करून घे, म्हणजे तुला आमच्याबरोबर रममाण होता येईल. अर्थात मद्विषयक अभिलाषा सोडून .देऊन हचा उपायानं सुखी हो.

उर्वशी : पुरुरवा संवादकथा सांगते : प्रीती जडते, तुटते. दिशा सैरभैर होतात. नित्याच्या कामावरचे चित्तच उडते. विरहाने अंतःकरण जड होते. माथा बधिर बनतो. विरहाने जड (आणि त्यामुळेच गलित) झालेले हृदय स्वतःलाच जिकू शकत नाही. त्यामुळे शत्रूचा पराभव होत नाही. एवढेच घडते तरी ठीक होते पण तसे होत नाही. स्वतःच्या सैरभैर वृत्तीचा अवतीभोवतीच्या परिसरावर, स्थळःघटना : वस्तूंवर परिणाम होतो. सारेच कसे विस्कटलेले, विस्कटून गेलेले असते.जीव जाळणारी अस्वस्थता सारे अंग आंदोळून टाकीत असते. व्याकुळतेची आटी डोंब उसळवीत असते. उर्वशी:पुरुरवा कथेतून जाणवते ती गोष्ट ही की, स्वर्गीय भोग भोगूनही तृप्ती म्हणून नसते. ' स्वामी'च्या कब्जात

'स्वामिनी' असूनही स्वामी उन्मत्तच असतो. बेफाम, बेभान, बेफाटच राहतो. देहाच्या मस्तीने धुंद होणे निदान पुरुरव्यापुरते तरी संपलेले नसते. ही धुंदी, हा रंगेल माज चिरकाल राहावा अशी त्याची ओढ असते, आसक्ती राहते. साहजिकच 'ती' प्रतिज्ञा डावलते. मीलनाचे रहस्य गवसूनही त्यापलीकडले पाहायचे नाकारते. आपल्या वाफून निघालेल्या अंगाचे उसासून उठणाऱ्या हृदयाचे प्रदर्शन करून आकाशाच्या मेघःश्याम नेत्रांना पाणी आणण्याचा पृथ्वी अट्टाहास करते तो का उगीच असतो? गौरतांबुस शरीरावर धुक्याचे पारदर्शक वसन लपेटून, ओला केशकलाप मोकळा सोडून उषा रोज पूर्वेच्या उंबरठयावर सूर्याची प्रतिक्षा करीत राहते ते तिला खूळ लागले आहे म्हणून ? नाही. या आणि यासारख्या साऱ्यांना पौरुषत्त्वाची मस्ती हवी असते. त्यासाठीच नाजनखरा करून पुरुषाला त्या उन्मत्त बनवितात पण सृष्टीने त्याना नेमून दिलेले काम तिथेच संपलेले नसते. ते त्यांच्या मनीमानसी तरळत असते. योग्य काळी त्याचे उपयोजन होते. निर्सगाने हरेकाला नियतक्रम लावून दिला आहे. संवत्सभर वर्षा आदळतच राहिला तर जलधारांचे स्वागत करायचे त्राण पृथ्वीतही उरणार नाही. ती वाहून जाईल; तिचे सत्त्व धुवून जाईल. मधुमास नित्यक्रमाने येत राहिला नाही तर वेली वठून जातील. पण तो सदाच तिष्ठत राहिला तर त्या अविरत उन्मादाला तोंड द्यायची शक्ती ओषधीनांही उरणार नाही. सृष्टीचा हा नियम आहे. हे ऋत आहे, हे सत्य आहे. त्यामुळेच नवजीवनाचा बहर फुलवायला स्त्रीतत्त्वाला जोम येतो. सृष्टीचे नियतचक्र चालू राहते. पण माणसाला मिळालेल्या शापातून पुरुरवाही सुटत नाही. त्याच्या प्रतिज्ञेचा भंग म्हणजे त्याला मिळालेल्या शापाचे उच्चारण होय. उच्चारणाबरोबरच सृष्टीने घालून दिलेल्या नियतचक्राला उलटचा गतीने फिरविण्याचा फुकाचा अट्टाहासही होय. पुरुची प्रार्थना पायी तुडवून, उर्वशी पुढेच जाते ती या ऋत रक्षणासाठी. पण देहाच्या स्वामीचे म्हणून काही देणे आहे. जसे सृष्टीचे तसेच हे एक. 'स्वामी'च्या बाहुतून देह सुटला म्हणून ते देणे काही निसटलेले नाही. गर्भस्थापनेचे प्रर्वतक पुरूषतत्त्व आहे. स्त्रीच्या दृष्टीने त्याला अल्प महत्व आहे. गर्भस्थापनेतील एक प्रधान घटक म्हणून पुरुषाला श्रेष्ठत्त्वाची भावना चिटकण्याइतपत स्त्रीच्या मनाची दृढता चिवट आहे. 'तुझं तुझ्याबरोबर सोपवीन' या अलिप्ततेच्या निर्धारियुक्त भावनेत सृष्टीच्या नियतचक्राची गतिमानता अभिप्रेत आहे. कारण ही गतिमानताच अखेर सत्य असून शेष सारे झूठ आहे. साहजिकच, ' उर्वशी, तुझ्याबरोबरच क्रीडा करणारा तुझा पती जो मी, त्या माझं शरीर येथेच पतन पावो ' किंवा 'देशांतरी गमन करो' अथवा 'मला या अरण्यातील हिंस्त्र लांडगे फाडून खावोत', अशी पुरुची धमकी आहे. सर्वस्व फिटल्यामुळे जीवनासंबंधी त्याने तसा वैताग प्रकट केला आहे. असहाय्यपणे गलित होऊन हचा मूढ पुरुच्या धमकीकडे पुरा काणाडोळा असून पुरुषतत्त्वाच्या वैफल्यापोटीच्या वैतागावर स्त्रीतत्त्वाच्या रतिसुखाच्या संतृप्तीने मात केली आहे. त्यातूनच स्त्रियांचे सख्य नव्हे तर, त्यापलीकडले सख्य हेच खरे

दर्शन असल्याचा प्रत्यय मिळतो.

ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील सूक्तात यम आणि यमीची अशीच एक संवादकथा सांगितली आहे. यम आणि यमी यांचे नाते बहीणभावंडाचे. सर्वात पवित्र आणि सर्वात उदात्त नाते. त्यात बदल आणि तोही पतीपत्नी सदृश बदल म्हणजे मोठेच पातक. पण ऋग्वेदातील यम यमी संवादातून असा बदल सूचित होतो. मात्र त्याचा प्रत्यक्ष आचार किंवा व्यवहार घडलेला नाही; ही तत्कालीन समाजस्थितीची निदर्शक गोष्ट होय. तरीही प्रत्यक्ष देवांनाच प्रणाम करून यमीने यमाशी पतीपत्नीसदृश नाते उभे केले आहे. या संबंधात यमी यमाला स्पष्टच सांगते : ' देव अमर खरे पण म्हणून काही त्यानो त्याज्य कृत्य करायचं टाकलेलं नाही. मनुष्याला गर्हनीय वाटणाऱ्या कृत्यांना त्यांचाही हातभार असतो. तेव्हा तुला माझ्यापासून दूर रहायचं कारण नाही. म्हणून तुझं मन माझ्याशी जुळो. उत्पन्नकर्त्या प्रजापतीप्रमाणं तू माझ्या शरीरात प्रवेश कर. ' यमीचा देवाचा हवाला ऐकून यम विचलित होत नाही. दोघांतील खरे नाते तो यमीला समजावून देण्याचा प्रयत्न करतो. जीवनातल्या मूलभूत मूल्यासंबंधी जसा त्यामागे आदर आहे त्याचबरोबर मानवी जीवनातल्या नात्यागोत्यांचे पावित्र्यही आहे. म्हणूनच खरे नाते, शुचिर्भूत नाते तो तिला सद्भावनेने समजावून देऊ पाहातो; पण यमीला त्याचा राग येतो. पौरुषहीनतेमुळे यम हे समजावणे करीत आहे आणि म्हणून त्याचा धिक्कार केला पाहिजे असे तिच्या मनात येते. साहजिकच पौरुषाची, पराक्रमाची पूजा करणारे स्त्रीचे मन हेच यमीचे मन असल्यामुळे तिने यमाला चिडविण्याचा त्याला डिवचण्याचा, प्रयत्न केला आहे. हेतू हा की, उपहासाने चिडून यमाचे पौरुष ताणले जाईल आणि स्वतःवर घालून घेईल; स्वाभाविकच यमीला हव्या असलेल्या ' तू माझ्या शरीरात प्रवेश कर ' ची पूर्ती होईल. म्हणून यमाला ती कठोरपणे सांगत राहते : ' तू अतिदुर्बल झाला आहेस, तुझी मला कीव येते. ' पण यम डगमगत नाही, फिरत नाही, पुरुषार्थाला दंश होऊनही तो तापत नाही; मनाला मन मिळत नाही, शरीर शरीरात प्रवेश करीत नाही, पतीपत्नीच्या अपूर्व मीलनातील सायुज्जता उपभोगता येत नाही. अवघी दुनिया हाती आल्याचा आभास होत नाही. शरीरात शरीर घुसावे, अगदी आत आत घुसून एक होऊन जावे असा मुक्तीचा आनंद प्राप्त होत नाही. यम मूल्ये डागाळीत नाही, ती डागाळली तरी यमीला त्याची फिकीर नाही. तशी तिची धडपड आहे.

ऋग्वेदकारांनी यम : यमीची रोचक संवादकथा अशी दिली आहे :

यमी : गुप्त व प्रशस्त अशा अर्णव प्रदेशात जाऊन माझ्या पूज्य सख्याला मी

(संभोग) सौख्यासाठी अभिमुख करू इच्छिते. पृथ्वीवर उत्कृष्ट गुणवान पुत्र निर्माण व्हावा म्हणून तुझा गर्भ माझे ठिकाणी प्राप्त होवो !

यम : तुझा सखा असले सख्य इच्छित नाही. कारण जी समान नात्याची आहे, ती विषम नात्याची होईल. असुरांचे पुत्र महाबुद्धीवान् आणि शूर आहेत, दयावादी लोकदृष्टी धारण करणारे आहेत; ते सर्वत्र पाहतात.

यमी : अमर असणारा देवही एखाद्या मनुष्याला त्याज्य वाटणारे हे कृत्य करतात म्हणून तुझं मन माझ्या मनाशी जुळो. उत्पन्नकर्त्या प्रजापतीप्रमाणं तू माझ्या शरीरात प्रवेश कर.

यम : जे पूर्वी झालं ते आम्ही करणार नाही. खरे बोलणारे आम्ही खोटं कसं बोलू ? अंतरिक्षात असणारा सूर्य आणि त्याची आमचं पोषण करणारी जी बायको (सख्यू) आमचे (उत्पत्तीकर्ते) आईबाप आहेत. म्हणून आपलं श्रेष्ठ (भाऊबहिणीचे) नातं आहे.

यमी : सर्वप्रेरक आणि सर्वव्यापक आपला उत्पन्नकर्ता त्वष्ट देव यानी आपणास गर्भातच नवराबायको केलं आहे. त्या प्रजापतीची इच्छा कोणी मोडू शकत नाही. आपलं नातं पृथ्वी जाणते आणि द्यूलोकही जाणतो.

.. ..आपला हा पहिला संबंध कोणाला कळणार आहे ? कोण पाहातो; आणि कोण बाहेर फोडणार आहे ? मित्रा वरुणाच्या, विस्तृत असणाऱ्या या जगात अधःपाताच्या कल्पनेनं भारल्या गेलेल्या काय बोलतोस हे ?

... ... एका ठिकाणी सहशयन करण्याचा यमविषयक काम यमीचे ठिकाणी आला आहे. मी माझी तनु पतीपुढे जाया करते त्याप्रमाणे त्वद्धीन करते. रथ आणि चाक याप्रमाणं एकमेकांस आलिंगन देऊ.

यम : देवांचे हेर जे येथे संचार करतात ते (कोठेही) थांबत नाहीत व डोळेझाक करीत नाहीत. हे टोचून बोलणारे, तू त्वरित अन्य पुरुषाकडं जा व त्याला रथाच्या चाकाप्रमाणं आलिंगन दे.

यमी : रात्र आणि दिवस तुला (बुद्धि) देवोत. सूर्यरूपी डोळा पुनः प्राप्त होवो. बांधवभूत असणारी द्यावापृथ्वीची जोडी यमाची यमी बायको करोत.

यम : जेव्हा भाऊ बहिणीशी लग्न करीत नाहीत असा आता पुढील काळ येत आहे. म्हणून हे सुंदर स्त्रिये, माझ्याशिवाय दुसऱ्या मनुष्याची तू इच्छा कर आणि त्याचा हात तू उशाला घे.

यमी : जो भाऊ असूनही बहीण अनाथ होते ती बहीण कसली ? आणि जी बहीण असतानाही भाऊ दुःखी होतो तो भाऊ कसला ? कामवासनेनं वेडी झालेली मी हे बडबडते आहे. माझ्या शरीराशी संलग्न हो.

यम : मी तुझ्या शरीराशी संलग्न होणार नाही. जो बहिणीशी संबंध करतो तो पापी होतो असं म्हणतात. हे सुंदर स्त्रिये, माझ्याशिवाय दुसऱ्याशी तू आनंदाची कल्पना कर. तुझा भाऊ हे करू इच्छित नाही.

यमी : हे यमा, तू अतिदुर्बल झाला आहेस. तुझी मला कीव येते. तुझं मन व हृदय तुझ्या ताब्यात नाही, हे आम्हाला ठाऊक झालं. तंग ज्याप्रमाणं अश्वाला वेष्टितो किंवा लता ज्याप्रमाणं वृक्षाला परिवेष्टून असते त्याप्रमाणं दुसरी कोणीतरी तुला खात्रीनं वेष्टून आहे.

यम : तर मग तू दुसऱ्याच वृक्षाला, लता आलिंगन देते त्याप्रमाणं दृढ आलिंगन दे व तोही तुला तसंच आलिंगन देवो. तू त्याचं मन ओढून घे. तो तुझं घेवो व नंतर त्यासह तू गोड सुखाचा अनुभव घे.

पहिल्यांदा सरळपणे आणि नंतर काहीशा तिरकसपणे यम यमीच्या इच्छेसंबंधी बोलतो. 'जेव्हा भाऊबहिणीशी लग्न करीत नाहीत असा आता पुढील काळ येत आहे.' असे यम म्हणतो तेव्हा वैदिक काळात बहीणभावंडांचे विवाह होत होते : किमानपक्षी अपवादरूपाने तरी तसे चित्र दिसत होते : असे सूचित होत असले तरी यम आपल्या हातून ते घडावे याला मान्यता देऊ इच्छित नाही. पूर्वकाळात काय होते यापेक्षा चालू काळ कसा आहे आणि आपण तो कसा घडविणार आहोत हे महत्त्वाचे आहे, असेच जणू यम 'जेव्हा भाऊ बहिणीशी लग्न करीत नाहीत असा आता पुढील काळ येत आहे,' या सांगण्यातून व्यक्त करू पाहतो आणि म्हणूनच यमीला सरळरीतीने 'म्हणून हे सुंदर स्त्रिये, माझ्याशिवाय

दुसऱ्या मनुष्याची तू इच्छा कर आणि त्याचा हात तू उशाला घे.' असा यम सल्ला देतो. त्यावर 'गुप्त व प्रशस्त' अर्णव प्रदेशात गुप्तपणे पहिला संबंध केल्यास तो कुणाला कळणार आहे? असा प्रश्नही यमी करू पाहते पण यमाचे मन बदलत नाही. त्यासंबंधातल्या एका मूलभूत बाबीचा उल्लेख यमाच्या शेवटच्या उद्‌गारात आहे. यमी यमाचा उपहास आरंभते तेव्हा तो कुठेतरी संपविणे जरूर असल्यामुळे यम सांगतो : 'तर मग तू दुसऱ्याच वृक्षाला, लता आलिंगन देते त्याप्रमाणं दृढ आलिंगन दे ... तू त्याचं मन ओढून घे. तो तुझं घेवो व नंतर त्यासह तू गोड सुखाचा अनुभव घे.' यमाला निखळ व्यभिचार तर मान्य नाहीच पण प्रेमरहित पतीपत्नीचे निखळ नातेही त्याला अमान्य आहे. शरीराचे ते हिणकस पातळीवरले चोचले ठरले तरीही मानवी मूल्यांचा त्यात ऱ्हासच आहे. म्हणून मन ओढून घेणे, मनात मन मिळणे, नंतर सौख्यात रत होणे हा दृढ आलिंगनातला स्वर्ग आहे; 'गोड सुखाचा अनुभव' त्याखेरीज अप्राप्य राहतो. यमीला नकार देऊन निश्चयाला ठामपणे चिकटून राहण्यामागे यमाची ही दृढ धारणा आहे. ती भंगली, भ्रष्ट झाली तर जीवनच शिल्लक उरणार नाही. यमाची ती श्रद्धा आहे.

उर्वशी : पुरुरवा कथेप्रमाणेच यम : यमीची कथा आणखीही काही गोष्टींचे रेखीव टिपण करते : यमीचे यमाशी नाते भगिनीचे. पण ते ती विसरू पाहते. रक्ताचे नाते विसरून शरीरसंबंधाचे नाते जोडू इच्छिते. तिच्या मनाची तशी तयारी झाली आहे. आपला सख्खा बंधू जीवाचा सखा बनावा यासाठी तिची धडपड आहे, अट्टाहास आहे; आटापिटा आहे. त्यासाठी आपल्याकडील सर्व प्रकारचे वाक्‌वैभव तिने राबविले आहे; कोटिक्रम खर्ची टाकले आहेत. पण यमाला मूळ भूमिकाच अशिष्ट वाटत असल्याने त्याच्यावर कशाचाही दबाव नाही. तो स्थिर आहे. निर्भर आहे, निश्चित आहे. मानवी जीवनातील अपूर्व नात्याचा, सगेसोयरेपणाचा तो सन्मान करू इच्छितो. शेवटी यम माणूस आहे, दगडात कोरलेली शिल्पाकृती नव्हे. यमीचे आवाहन त्याला जिंकणारे नव्हे असे नाही पण जेव्हा आकाश कोसळू लागते आणि धरतीचा धर सुटतो तेव्हा माणसाच्या शक्तीचा शोध घेण्यासाठी माणसालाच निर्धाराने उभे रहावे लागते. यमाने ते केले आहे. त्यामागे मानवी जीवनातील श्रद्धा आणि अतूट मूल्यभाव यासंबंधीचा अपार आदर आहे. अन्यथा यम ताठ उभा राहणे कठीण होते. उपनिषद्‌काळापासून चालत आलेली ही भूमिका यमाने काय किंवा भीष्माने काय जपलेली आहे. मृग कस्तुरी जपतो आणि सुगंध पसरवितो तशीच ही भूमिका आहे.

ऋग्वेदात अशा कथा थोड्या आहेत पण आहेत त्या खूप काहीतरी सांगून जाणाऱ्या आहेत. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील यम : यमी संवाद, उर्वशी : पुरुरवा संवाद, पहिल्या

मंडलातील अगस्ती : लोपामुद्रा संवाद, रोमशेची कथा, आठव्या मंडलातील अपालेची आणि आसंग प्लायोतीची अशा, त्यापैकी काही कथांचा उल्लेख इष्ट होईल. अर्थात यामधील व्यक्त भावनेला प्रेम किंवा शृंगार म्हणण्यापेक्षा कामभावना म्हणून संबोधणे सार्थ ठरेल. सौम्यपणे शृंगार म्हणता येईल. अथर्ववेदातील शृंगार मात्र कामभावनेपेक्षा प्रीतिभावनेला अधिक जवळचा आहे : यामधल्या सहाव्या कांडातील नवव्या सूक्तामध्ये प्रकट झालेला शृंगार शारीरिक असूनही निखळ शृंगारिक वाटत नाही.

महाभारतातील कामभावनेचे आविष्करण नैसर्गिक आहे. महाभारतातील बहुतांश स्त्री-पुरुष आपले मनोगत नितळ मोकळेपणानेच प्रकट करतात. कुठे छक्केपंजे, आडपडदा किंवा लपवाछपवी नाही. या स्वैर मोकळेपणाला स्वच्छंदीवृत्तीचीही साथ आहे. निखळ उपभोगप्रवृत्ती सुसंस्कृत नसली, सांप्रत तिला मानसिक आकर्षणाची जोड देण्याची प्रवृत्ती असली तरी महाभारतकालीन कामभावनेचे प्रकटीकरण सरळ, ठेमेठोक आणि सुस्पष्ट आहे. : त्यादृष्टीने हरिवंशाच्या सव्वीसाव्या अध्यायात पुरुरवा : उर्वशी आख्यानात पुरुरव्याचे वर्णन करताना 'सवृत मैथुनः' : म्हणजे पडद्याआड एकान्तात कामचेष्टा करणारा : हा वापरलेला शब्द लक्षणीय वाटतो. कामभावनेच्या उघड आणि निःसंकोच आविष्काराचे ते निदर्शक आहे. मात्र महाभारतातील कौरव : पांडवांच्या मूळ कथेत किंवा द्रौपदी व तिचे पराक्रमी पती यांच्या संसारगाथेत शृंगारभावनेच्या वर्णनाला थारा नाही. ' महाभारतात आढळणारा शृंगार राजा प्रतीप आणि गंगा, पराशर आणि मत्स्यगंधा, भरद्वाज आणि घृताची, भीम आणि हिडिंबा, उलुपी आणि अर्जुन, विश्वामित्र व मेनका इत्यादी उपकथानकांमधून, कधी संयोग शृंगाराच्या रूपात तर कधी कामभावनेच्या निखळ आविष्कारात भेटतो. त्यामध्ये मूलतः प्रीतिभावनेची शाश्वतता, चिरंतनता किंवा उदात्तता आढळते. महाभारतकारांनी घृताचीच्या कथेत रूपयौवनसंपन्न घृताचीचे दर्शन घडताच भरद्वाज ऋषींचे रेतस्खलन झाल्याचे म्हटले आहे. विश्वामित्र : मेनकेच्या कथेत मेनकेला पाहताच विश्वामित्र कामवश झाल्याचे सांगितले आहे, त्याचे हे निदर्शक आहे. अर्थात महाभारतातील सर्वच उपकथानकांस हे सरसकट लागू नाही. महाभारताच्या 'नलोपाख्याना'त विप्रलंभ शृंगाराचा तर आदिपर्वातील कच : देवयानी आणि रूरु व प्रमद्वरा आख्यानात प्रीतिभावनेचा निखळ आविष्कारच भेटतो. महाभारतातील मत्स्यगंधेची कथा तर अपूर्वच आहे. शंतनु आणि सत्यवती ही त्याची नायकनायिका. विचित्रवीर्य हा त्यांचा पुत्र, अंबिका आणि अंबालिका या त्याच्या भार्या. राजयक्ष्म्याने त्याचा, अंत होतो. कुरूवंशाच्या भाळी वारस उरत नाही. पण सत्यवतीच्या प्रतिज्ञेत भीष्मराज अडकलेला आहे. राजभूमीत त्याची मुळे अडकून पडली आहेत; पण त्याला फळे नाहीत. सत्यवती भयभीत आहे. भीष्मराज तिच्या नजरेसमोर आहे. ' अंबा आणि अंबालिका

पुत्रोत्सुक आहेत. म्हणून नियोगव्रतानं तू त्यांना पुत्र दे.' अशी इच्छा सत्यवती भीष्मराजाकडे व्यक्त करते. भीष्माला ते मान्य नाही. भीष्म मानवी जीवनातल्या मूल्यांचा संरक्षक आहे. आकाश कोसळले आणि धरती दुभंगली तरी मागे हटायचे नाही असा त्याचा निर्धार आहे. परिस्थिती बदलेल त्याप्रमाणं भीष्मानं आपले रंगरूप बदलावे, इतका काही परिस्थितीचा तो दास बनलेला नाही. भीष्माप्रमाणे यमालाही जीवनमूल्ये अधिक मोलाची वाटतात. त्यामागील नीतीची बैठक श्रेष्ठ वाटते. म्हणूनच 'तू अतिदुर्बल झाला आहेस. तुझी मला कीव येते.' अशी यमीची टोचणी असूनही किंवा 'तंग अश्वाला वेष्टितो' किंवा 'लता वृक्षाला परिवेष्टून असते याप्रमाणं दुसरी कोणीतरी तुला खात्रीनं वेष्टून आहे,' असा स्त्रीसुलभ, मत्सरी आणि त्याहूनही अधिक जहरी उपहास होत असूनही यम ढळलेला नाही. 'गुप्त व प्रशस्त' अर्णव प्रदेशात देहदान करण्याची यमीची तयारी असूनही 'पूज्यसखा' क्षणिक सौख्यासाठी अभिमुख होऊन उन्मादाचा गुलाम होत नाही, होऊ इच्छित नाही. एकतर या सौख्यरंजनाजोगी परिस्थिती नाही : देहाचा उन्माद नाही. आकर्षण नाही, आहे ती मनाची विशुद्ध, उदात्त, निर्मळ जीवनसृष्टी. मनाची अनुकूलता नाही, म्हणजे आवश्यक पार्श्वभूमीच नसल्याने प्रीतिभावनेचा जोमदार उठाव नाही की जोसदार आवेग नाही. यमीच्या हृदयात जागा झाला आहे तो निखळ काम : सळसळणारा काम, वासनेने माखलेली आसक्ती, शारीरिकतेच्या भोगात लडबडलेला विखार. क्षणिक सौख्यापलीकडे त्यास मूल्य नाही. साहजिकच मानवी जीवनातल्या चिरंतन मूल्यांची समीक्षा त्यास लागू पडत नाही. शरीरसंबंधाचा केवळ विचार धुडकावूनच यम थांबत नाही. जाता जाता यमीला त्याचा उपदेशही आहे : तिने मानवी संबंधांचा : Human Relations : विचार करावा म्हणून! यम म्हणतो : 'हे सुंदर स्त्रिये, तू त्याचं मन ओढून घे. तो तुझं घेवो व नंतर त्यासह तू गोड सुखाचा अनुभव घे.' द्वैतातून अद्वैताचे शिल्प घडले की जीवन उभे राहते, अन्यथा विश्वच उचकटले जाते; प्रीतीला धरच राहत नाही, मिळत नाही.

'मैत्रायणी संहिते' च्या १. ५. १२ मध्ये यम : यमीच्या ह्याच कथेचा थोडयाफार फरकाने थोडा वेगळा अर्थ लावण्यात आल्याचे आढळते. यमाचा मृत्यू, यमीचे आक्रंदन त्यातून दिवस आणि रात्र यांच्या निर्मितीची कथा या संहितेत गुंफली आहे. त्यामध्ये वासनेच्या नियंत्रणावर, त्याच्या उपशमावर भर आहे. आकर्षणाची शक्ती, वासनेची उत्पत्ती, त्याचा परिमित उपशम या प्रीतिभावनेच्या फुलण्याउमलण्यातील प्राथमिक पायऱ्या होत. ते उफाळते, ओसरते व नंतर त्यातून जे शिल्लक ठरते ते मानवी संबंध उभे करते, राखते आणि वाढविते : ते चिरभविष्योन्मुख असते. त्यादृष्टीने ऋग्वेदाच्या संहितेहून 'मैत्रायणी'तील एतद्विषयक संहिता अधिक प्रतिकात्मक आहे. 'मैत्रायणी संहिते' तील कथा साधी, सरळ आहे. ती अशी :

...''यम मरण पावला. यमीला दुःख झालं. तिनं आक्रोश मांडला, यमाला विसरून जावं म्हणून देवाधीदेवांनी प्रयत्न केला. नाना उपाय योजले. यमीला विसर पडेना. जखमावरील खपल्या उकलल्यावर जखम भळभळून यावी तसं तिचं दुःख पुनः पुन्हा उफाळून येऊ लागलं. यासंबंधात देवाधीदेवांनी यमीला काही सांगण्याचा प्रयत्न केला की ती म्हणे : 'आज अगदी आताच, नुकताच तो मेला आहे.' दुःख असं भळभळणं इष्ट नव्हतं. यमीच्या शारीरिक स्थितीच्या दृष्टीनं जसं ते अनिष्ट होतं तसंच अवतीभोवतीच्या परिसराच्या दृष्टीनंही इष्ट नव्हतं. काहीतरी होणं जरूर होतं, करणं आवश्यक होतं. देवांनी मग आपापसात विचार केला. त्यानी ठरविलं, ''अशा आठवणीनं ती त्याला कधीही विसरू शकणार नाही. त्यासाठी आपल्याला रात्र निर्माण करावी लागेल.'' तोपावेतो फक्त दिवस होता, रात्र नव्हती. देवाधीदेवांनी दिवसरात्रीचे चक्र निर्माण केले. उद्या उजाडला, यमी यमाला विसरून गेली. ...''

या साध्या कथेत प्रीतिभावनेच्या विविध अंकुरांचे : भावच्छटांचे : दर्शन आहे. विवाहसूत्राने फुंफाट वासना नियंत्रित होते, निर्बंधित बनते. अपत्यप्राप्तीने तिला 'सामाजिक आशय' आणि 'अर्थ' मिळतो. मानवी जीवनाच्या या उत्क्रांतीचा, ऋग्वेदकारांनी विलक्षण तन्मयतेने वेध घेतला आहे. त्यादृष्टीने ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील चाळीसाव्या सूक्तातील घोषा आणि अश्वी यांची कथाही लक्ष वेधून घेणारी आहे.

यौवनाने कांती तेजोनिधी बनते, शरीर पुलकित होते, विश्व मोहरते; अंग न् अंग फुलून, उमलून, उचंबळून येते. पण फुलणे आणि संपणे एवढाच काही यौवनाचा आणि त्यातून निपजणाऱ्या प्रीतिभावनेचा हेतु नाही तर सुंदर अपत्ये : त्यातून वंशवृद्धी आणि वंशसातत्य ही दृष्टी : यातूनच मानवी संबंधांची राखण होते, मानवी जीवनाची पाठराखण घडते. घोषा–अश्वी संवादात नेमक्या याच बाबीवर, ऋग्वेदकारांनी अचूक बोट ठेवले आहे.

यौवनाला बैठक रूपसुंदरतेची, आकर्षणाची; प्रीतीची भर हा त्याचा गाभा, त्याची फलश्रुती सुंदर अपत्ये; त्यातून मानवी संबंधाचे जोपासन; त्यासाठी आवश्यक असणारे घर : स्त्रीपुरुषांच्या जीवनातील घराला घरपण देणारे आणि मानवी जीवनाला माणूसपण आणणारे घर : घोषअश्वी कथेचा हा सूर आहे. एकूणच सगळ्या कथांचा हा स्वर आहे.

गुप्तधनासारखे धन

ऋग्वेदाहूनही वैदिक वाङमयात प्रीतिच्छटांचे अनेकरंगी सूर आळविले गेले असून त्यांचा मनोहर नाद मनात सतत गुंजारव करताना आढळतो. अथर्ववेदाच्या पंधराव्या मंडलामध्ये विवाहबंध आणि अपत्यप्राप्ती यांच्याशी सोयर राखणारी कितीतरी मनोज्ञ काव्ये आढळतात.[२] त्यादृष्टीने ऋग्वेद मंडल ७, सूक्त ५५ आणि अथर्ववेद : मंडल ४, सूक्त ५ मधील निद्राधीन होऊ पाहणाऱ्या एका तरूण युगुलाची विनवणी लक्षणीय आहे : तारुण्याने संतप्त झालेले एक युगुल झोपी जाऊ पाहणारे, जीवन भोगू इच्छिणारे. यौवनाचा बहर, शृंगाराचा कळस, आर्जवे, विनंत्या, मिनत्या, निवेदने, खोटीखोटी स्तुती, दुनियेत एकटेच असल्याचा आभास, हृदयप्राप्तीची अपेक्षा, हूरहूर, गोंधळलेली वृत्ती, त्यातून सर्वस्व देणे, बाकी काहीच न ठेवणे. हृदय जिंकले की अन्य काही जिंकण्याची गरज नाही. साऱ्याची शरणागती ठेवलेली; ती अपरिहार्यताच; पण रात्र असूनही हवी ती स्वस्थता लाभत नाही. अंधारकन्या उमलत नाही, फुलत नाही. प्रीतीने वाफून निघालेले हृदय हुरहुरणाऱ्या हृदयाशी संलग्न होत नाही, त्याचे संयुग बनत नाही. काय करावे ? कसे घडावे ? युवकाचे निवेदन आहे :

> ...'हे सरमेया, तुझी आई झोपी जावो, बाप झोपी जावो, कुत्रा निजो, घरचा मालक झोपो. तुझे बांधवही निजोत, भोवतालचे हे लोक निजोत.' यापुढेही जाऊन तो म्हणत असतो : 'जो येथे आहे, जो फिरतो, जो आम्हाला पाहतो, त्या लोकांची इंद्रिये जसा हा वाडा निश्चल आहे तशी निश्चित होवोत. ...'

प्रीतीच्या पूर्तीसाठी एकान्त : खास नीरव एकान्तच : केवळ आवश्यक असे नव्हे त्यासाठी पतीपत्नींचे एकलग सामंजस्यही व्हावे लागते. अविश्वासात प्रीती फुलत नाही की उमलत नाही. ती कोमजते, सुकते आणि सुकून नाहीशी होते. नीरव शांततेच्यादृष्टीने इतरांची गात्रे निश्चल झाल्याची खात्री पटावी तेव्हा मीलनोत्सुक युगुलाची गात्रे उत्तेजित व्हावीत, फुलून यावीत, बहरून धुंद बनावीत हे निसर्गप्राप्त आहे. प्रीतीच्या पूर्तीसाठी आवश्यक नीरवतेची गरजच अथर्ववेदातील कवितांतून सांगितली गेली आहे असे नाही; तर मानवी जीवनाला वेढून असणाऱ्या दैवगतीच्या तऱ्हाही तिथे निर्देशित केल्या आहेत : ज्यांचा प्रीतीच्या प्राप्तीशी, त्यांच्या फुलण्याशी दृढ संबंध आहे. 'कौशिकसूत्रा' तूनही प्रीतीमधील धुंदपणाचे अनेकढंगी, अनेकरंगी आणि बहुस्पर्शी चित्रण करण्यात आले असून त्यासोबत अनेक कर्मांची चर्चाही आहे. या कर्मांना 'स्त्रीकर्म' म्हणून संबोधण्यात आले आहे. वैदिक वाङमयातील सूक्ते आणि ऋचा यामध्ये अशा गीतांची अगदी रेलचेल आढळते.

ऋग्वेदकारांनी आठव्या मंडलातील एकतिसाव्या सूक्तात म्हटले आहे :

८·५ हे देवांनो, दुग्धमिश्रित सोम करणाऱ्या सहविचारी आणि यज्ञकर्त्या पतीपत्नींना

८·६ विपुल अन्न प्राप्त होते. त्यांना अन्नदुर्भिक्ष कधीही जाणवत नाही.

८·७ अमृताचा त्याग केलेल्या, हविर्युक्त, देवसेवक, सद्‌बुद्धीसंपन्न

८·८ पतीपत्नींना पुत्रपौत्रादी संपत्ती आणि दीर्घायुष्य प्राप्त होते.

८·९ हविर्युक्त, दानशूर आणि यज्ञप्रिय पतीपत्नी वंशवृक्षार्थ परस्परांशी रत होऊन देवसेवा करतात.

म्हणजे सुखपूर्ण जीवन जगण्यासाठी सामंजस्य हवे, परस्परांची मनमिळणी, विश्वास यांची जोड हवी. जीवनाच्या मूलभूत गाभ्याशी कुठल्याही स्वरूपाची प्रतारणा उपयोगी नाही. अन्यथा जीवनाचा रंग पालटतो, सूर बदसूर बनतो. सुवर्णाप्रमाणे असलेल्या जीवनाच्या अंगकांतीची राखुंडी बनते. त्यासाठी प्रीतीचा धर राखावा, सांभाळावा लागतो. त्याखेरीज जीवनाला मुळी कोंबच फुटत नाहीत, पीक तरारून येत नाही. हे बहरणे येते तिथे जीवन उत्तमरीतीने भोगणेही येते. यामधील पत्नीचा सहभाग अव्वल यात संशय नाही. ऋग्वेदाच्या तिसऱ्या मंडलातील त्रेपन्नाव्या सूक्तातील चौथ्या ऋग्चेत ऋग्वेदकारांनी पत्नीमहात्म्य सांगताना म्हटले आहे :

.. पत्नीमुळेच घराला घरपणा येत असून, पुरुषाचे उत्पत्तीस्थानही पत्नी हीच आहे.

हे मघवन् इंद्रा, आपल्या हरिद्रर्णीय रथाश्वांच्या साह्यानं तू ये. आमचा सोमरस प्राशन करण्यासाठी अग्नीरूपी दूताचं साह्य तू घे. ...

म्हणजे ऋग्वेदकारांनी पत्नी आणि घर यांची दाखविलेली एकात्मता हाच मुळी मानवी जीवनाचा अतएव दांपत्यजीवनाचा आधार ठरतो. त्याविना घर ढासळते आणि कदाचित् उभे राहिलेच तर टिकणेही अशक्य होते. एकात्मतेत मुरलेली प्रीती जीवनाच्या तळाचा शोध घेते. रथाच्या विश्रामस्थानी विमुक्त अश्वांना तृप्ती मिळावी त्याप्रमाणे मानवी जीवनाच्या परस्पर एकात्मतेत प्रीतीला संतृप्ती लाभते. प्रस्तुत ऋचेतील एकात्मतेचा निर्देश 'मनुस्मृती' तील 'न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते' या उक्तीशी मिळताजुळता आहे. 'बृहदारण्यकोपनिषद्' तही स्त्री व पुरुषजीवन या दोहोंच्या संयोगातून पूर्ण जीवनाचा लाभ होत असल्याचा वैदिक संस्कृतीचा सिद्धांत प्रकट होताना आढळतो.

बृहदारण्यकोपनिषद् म्हणते :

१.... परमेश्वर एकटाच स्वतःशी रममाण होऊ न शकल्याने त्याला दोन व्हावे अथवा अनेक प्रकारे होऊन रहावे असे वाटते. त्याप्रमाणे मनुष्यही एकटाच रममाण होऊ शकत नाही. त्याला दुकट् व्हावेसे वाटल्यावर त्याने आपले स्वतःचे दोन भाग केले : पती व पत्नी. स्त्रीपुरुषांचे मीलन म्हणजेच पूर्वजीवन होय. त्यातील कोणतेही एक जीवन हे अपूर्ण असून पुरुषाच्या जीवनातील अपूर्ण भाग स्त्रीमुळेच पूर्ण होतो. स्त्री हीच पुरुषजीवनातील पोकळी भरून काढते. तिच्यापासूनच मनुष्याची उत्पत्ती आहे....

२.... स्त्री ही पुरुषाची अर्धांगी होय. जोपर्यंत जायेचा लाभ नाही; तोपर्यंत जीवन अपूर्ण राहते. ज्यावेळी जायेचा लाभ होतो त्यावेळी स्वतःच पती तिच्या ठिकाणी उत्पन्न होत असल्यामुळे जीवनाच्या पूर्णतेचा त्याला लाभ होतो. [३] ...

वेदवाङ्मयातील हा सृष्टीक्रम भागवत पुराणानेही : श्रीमद्भागवत ३ : १२ : अनुवादित केला आहे. एकूण, या काळातील स्त्रियांना विद्यावती व मंत्रवेत्त्या व्हायला अडचण नव्हती. किंबहुना आपल्या मुली चांगल्या पंडित निघाव्या व त्या ब्रह्मवादिनी असाव्या म्हणून तीळ व तांदूळ एकत्र शिजवून त्यांचा होम करून आईबाप त्यासाठी परमेश्वराची आराधना करीत. त्याचा विधीही त्यात सांगितला आहे. मात्र काही स्त्रिया तपस्या व अध्ययनात सारा जन्म घालवीत असल्या तरी बहुतेक स्त्रिया गृहजीवनात प्रवेश करून गृहिणीपदावरच अधिष्ठित होणे पसंत करीत. पतीपत्नीसंबंध हा वैदिक काळी संस्कार मानण्यात येत असून करार किंवा इहलौकिक जीवनापुरती व्यावहारिक सोय या दृष्टीने विवाहाकडे पाहण्याइतके हिंदू मन वैदिककाळीही हीन नव्हते. दोन जीवांच्या अनंत जन्मीच्या संस्कारित सहजीवनाची विचारप्रणाली वैदिक विवाहाच्या मुळाशी असून पाणिग्रहण संस्काराने जे दोन जीव एकत्र आले तेच पतीपत्नी मानले जात. सख्य हे स्त्री जीवनाचे ध्येय नसून, मातृत्वाच्या कामगंधहीन आविष्काराने साऱ्या संसाराला वात्सल्यरसाने न्हावून टाकणे हे स्त्रीजीवनाचे उदात्त ध्येय होते. पाणिग्रहणसंस्कार ही एक प्रकारे संस्कारदीक्षा होती. पत्नीच्या पाणिग्रहणाच्यावेळी पतीच्या तोंडी ऋग्वेदाने घातलेले विचार गृहजीवन, सौमांगल्य व दांपत्यजीवनासंबंधीच्या वैदिकांच्या आकांक्षा अत्यंत उत्कृष्टरीतीने प्रकट करतात. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील पंचाऐंशीव्या सूक्तात या आशाआकांक्षांचे प्रतिबिंब असून नंतर प्रीतीतील चैतन्य आणि स्त्रीचे हक्क यासंबंधात घ्यावयाच्या जागरूकतेसंबंधी सुंदर विवेचन आढळते.

'घरात तू नेहमी दक्ष स्थितीत रहा' असा ऋग्वेदकारांनी स्त्रीला दिलेला आदेश

उदात्त असून पतीबरोबरच्या एकरूपतेचे ते सूत्र आहे; त्यातून घर उभे राहते; संततीचा दाता ईश्वर प्रसन्न होतो; 'गोकुळ' तयार होते. स्त्री 'घरची राणी' शोभते, घराची मालकीण होते; सर्वांच्या भाग्यदेवतेचे तिला रूप मिळते. प्रेमळ सहजीवन, सहविचार इत्यादीखेरीज हे अशक्य आहे. तसेच एकमेकांविषयीच्या एकनिष्ठेवाचूनही ते दुर्लभ आहे. कामसंतृप्ती आहे पण स्वैराचार नाही अशा ऋग्वेदातील कामप्रवृत्तीच्या चित्रणामागील जाणीव श्रेष्ठ दर्जाची आहे. 'पतिमेकादशं ऋषि' या शब्दातून व्यक्त झालेल्या भावनेला जगाच्या स्त्रीविषयक वाङ्मयात तोड नाही. त्यातून त्यांनी गृहस्थाश्रमाच्या किल्ल्यात राहून विषयनिवृत्ती आणि इंद्रियजय कसा मिळविता येतो हे भारतीय संस्कृतीचे तत्त्व स्पष्टपणे उल्लेखिले आहे. 'पतीपत्नीचं सहजीवन कधीही न संपो' अशी इच्छा व्यक्त करीत असतानाच दंपतीजीवनाची परिणती शेवटी कामगंधहीनतेत होऊन, स्त्रीने आपल्या वात्सल्याच्या शुद्ध पाखरणीखाली पतीलाही घ्यावे व विश्वाकडे तिची पाहण्याची दृष्टी वात्सल्यमय बनावी अशा रीतीची, ऋग्वेदाने स्त्रीविषयक श्रेष्ठ धारणा व्यक्त केली आहे. तिला सर्वस्वी पात्र असणारी आर्य स्त्री वैदिक वाङ्मयात आढळते. त्यातून भारतीय स्त्रीजीवनाचे आदर्श निर्माण झाले आहेत. असे असूनही प्रीतीचा मुक्त व्यापार : सर्व बाजूंनी विमुक्त संचार : इथे भेटत नाही. स्त्रीचे स्थान पुरुषाच्या बरोबरीचे असले तरी अपवादाने ते बरोबर आहे; सर्वसामान्य स्त्रीच्यादृष्टीने त्यास अर्थ नाही. स्त्री पारतंत्र्यात, बंधनात किंवा परवशतेत नसली तरी पूर्ण स्वतंत्रही नाही. 'ब्रह्मवादिनी' पुरती त्याची मर्यादा आहे पण सर्वसामान्यांना त्याचे विशेष नाही; घरातील स्त्रीचे महत्त्व आणि स्थान हे प्रतिष्ठेचे आणि मानाचे असले तरी ते घरातील होते, बाहेर तिच्या वाचेला कुलूप होते, विचारांना मोहर होती. वैदिक वाङ्मयात अशी खूप उदाहरणे सापडतात की, विवाह न झालेल्या, वाढलेल्या कित्येक प्रौढा घराघरात आहेत. प्रीतीचा पारिजात फुलावा, गंधमदाने धुंद होऊन न्हाऊन निघावे असे खूप वाटावे पण पारिजातच वठून जातो. फुले धरत नाहीत, गंध दरवळत नाही, विडा बनत नाही, रंगत नाही अशी अनेकींची व्यथा आहे. विवाहसूत्राने जखडले जावे, जीवनाच्या मादक स्पर्शाने फुलून यावे, स्पर्शबोलीने उमलावे, अवघाचि संसार समृद्धीचा करण्याच्या धुंदीने झपाटून जावे; असे खूपखूप वाटावे; पण हे 'वाटणे' च रहावे; अशी त्याकाळची मुळी स्थितीच आहे. किंबहुना प्रीती द्यावी : घ्यावी अशी ह्या कालखंडाची मनःस्थितीच नाही. प्रौढा घोषा काय किंवा 'वाजसनेय संहिते' तील : ३०.६ : 'कुमारीपुत्रा' चा निर्देश काय; या मनःस्थितीचा द्योतक आहे. वैदिक वाङ्मयातील प्रीतिविषयक कथाव्यथांवरून पाहता ती प्रामुख्याने मूलभूत गाभ्याची सैध्दांतिक चर्चा : कलात्मकतेने केलेले निरूपण आहे : त्यात प्रीतीच्या गाभ्याच्या दर्शनाबरोबरच त्याच्या विविध छटांचे गंभीर चित्रण आहे. ते मादक असूनही उदात्त आणि अधिकतर

जीवनस्पर्शी आहे.

प्रीतिभावना ही मानवी जीवनाची मूळ धारणा आहे. प्रीतीला देण्या-घेण्यामधील हल्लकपणा, थिल्लरपणा सोसत नाही, त्यापासून दहा योजने ती दूर राहते. या कालखंडाची ती शिस्त आहे. तत्कालीन जीवनविषयक मूल्यांचो चौकटच इतकी आखबंद की प्रीतिविषयाच्या मुक्त विचाराला आणि स्वैरसंचाराला तिथे जवळजवळ वाव नाही. स्वातंत्र्याच्या मार्गात अडसर यावेत ही ओघाची बाब दिसते.

'मैत्रायणी संहिते' त : १. १०. ११. ३. ६. ३ : स्त्रीला 'असत्यभाषिणी 'असे संबोधिले आहे तर 'तैतरीय संहिते' त : ६. ५. ८. २ : चांगल्या स्त्रीचा क्रमांकही वाईट माणसाच्या खाली लावून टाकला आहे. स्त्रीसंबंधीचा, हा अविश्वास तिच्या स्वातंत्र्याच्या आड आला आहे, त्यामुळे तिच्या देहावर या ना त्या स्वरूपाचे बंधनांचे जाळे पसरले आहे. केवळ स्त्रीजीवनच नव्हे तर पुरुषाचे जीवनही परवशतेने वेष्टिले आहे. त्यामुळे प्रीतिभावनेची सूत्रे आहेत, पण विस्तार नाही. नाट्य आहे, पण संघर्ष नाही; असे एकूण चित्र दिसते. मात्र प्रीतीभावनेचे एकूण चित्रण जीवनाचा एक मूलाधार, गुप्तधनासारखे धन या दृष्टीतून झाले आहे. म्हणूनच ते उत्कट तितकेच उदात्त आहे; अतएव अभिजात आहे.

प्रवाह : ४

वैदिक वाङ्मयाच्या कालखंडाकडून अभिजात संस्कृत साहित्याच्या प्रवाहाकडे वळले की, संस्कृत साहित्याच्या अभिजातपणाइतकीच त्यामधली निबद्ध प्रीतिभावनाही अभिजात असल्याचे जाणवून जाते.

वैदिक वाङ्मयामध्ये प्रीतीच्या मूळ तत्त्वांबरोबर तिची काही सूत्रे आली आहेत. सूत्रांचा सैद्धांतिक पातळीवर अर्थात्‌च विस्तार नाही; पण त्यामध्ये बेतशीरपणे बसविलेल्या उत्कट कथा : कहाण्या अगदी सहजरीतीने प्रीतिभावनेचा गाभा सांगून जातात. केवळ सूत्रे, तत्त्वे किंवा निखळ तत्त्वज्ञान जनसामान्यांच्या पचनी पडणे कठीणच असते. पचनी तर पडावे, पडायला हवे; पण अरुचीही उत्पन्न होऊ नये म्हणून माणसाच्या आवडणाऱ्या कथा : कहाण्यांचा साज इष्ट ठरतो, ठरला आहे. यातून पुढे आलेल्या प्रीतिविषयक सूत्रांमध्ये तळाशी सूर मारुन जीवनाचा पट नेमकेपणाने पकडण्याची, त्याच्या अंतरीचा वेध घेण्याची विलक्षण शक्ती दिसते.

अभिजात संस्कृत साहित्यात, वैदिक वाङ्मयातील प्रीतिसूत्रांचा विस्तार आहे, व्यवस्थापन आहे. वैदिक वाङ्मयातील सूत्रांवर 'कलम' करून, प्रयोग करून 'सूत्रे' सिद्धांतरूपात प्रस्थापित करण्याचा, ती जीवनाला लावून दाखविण्याचा प्रयत्न अभिजात संस्कृत साहित्यात नीटस रीतीने झाला आहे.

चांदणवेलीचे शिंपणे

अभिजात संस्कृत वाङ्मयाच्या काळातील दांपत्यजीवन परंपरेला धरून असून दंपतीचे आनुकूल्य म्हणजे स्वर्गसुख व प्रातिकूल्य म्हणजे नरक या पद्‌पुराणातील कल्पनेचे तंतोतंत पालन करण्याचा कटाक्ष त्यात आहे. भार्याहीन गृहस्थाचे घर म्हणजे ओसाड अरण्य, सर्व

दुःखांवर भार्येसारखे औषध नाही, या महाभारतातील विचारांचा प्रतिध्वनी अभिजात संस्कृत वाङमयात सारखा ऐकू येतो.

' रघुवंशा ' त कालिदासाने ' गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधी ' : रघुवंश ८.५७ : असे म्हटले असून वेदकालापासून ही कल्पना चालत आलेली आहे. ' ऐतरेय ब्राह्मण ' म्हणते : ' सखा ह जाया ' : ७. ३. १३ : महाभारत सांगते, ' भार्या भवेदाभरणान्तिकः ' : ९. १०१ : गोड शब्दात हितकर सल्ला देणारी पत्नी ही मैत्रीण आहे, असे ' काव्यप्रकाशा 'त मम्मटाने सुचविले आहे. ' कान्तासंमिततयोपदेशयुजे ' या पदाने त्याने ते सूचित केले आहे तर पतीपत्नींच्या अद्वैताचे सुंदर चित्र भवभूतीने ' उत्तररामचरितात ' : ६.३९ : रेखाटले आहे.

पतीपत्नींचे हे अद्वैत : हे नाते : भवभूतीने ' मालतीमाधव ' या नाटकातही उलगडून दाखविले आहे. ' एका घराचे दोन भागीदार म्हणजे दंपती होय.' हे सूत्र अभिजात संस्कृत वाङमयात दृढ करण्याचा प्रयत्न असला तरी तत्कालीन समाजरचनेत बहुपत्नीकत्व नव्हते असे नव्हे. विवाहविधीत एकपत्नीत्व अभिप्रेत आहे एवढेच ! सतीची चाल होती पण पडदा पद्धतीचा पूर्ण अभाव दिसतो. स्त्रियांच्या बुरख्याचा संस्कृत नाटकात कोठेच उल्लेख नाही पण क्वचित अवगुंठनाचा उल्लेख आढळतो. मात्र याकाळी पतीचा संपूर्ण ताबा असल्याने स्त्रियांचे समाजातील व कुटुंबातील स्थान गौणच आहे. अभिजात संस्कृत वाङमयात शिक्षण व कलाध्ययन प्रामुख्याने श्रीमंत व राजे लोक यांच्या कुटुंबियात झालेले असून विवाहाचे स्मृत्युक्त वय क्षत्रिय कुलात व श्रीमंत घराण्यात पाळण्यात येत नव्हते. सर्वसामान्यपणे स्त्री आईवडिलांच्या छायेत, पतीच्या प्रेमात व मुलांच्या आदरयुक्त वागणुकीत सुखी असली तरी विधवाविषयक दृष्टीकोन, सतीपद्धती, बहुपत्नीकत्वाची चाल इत्यादीमुळे तिची परिस्थिती असहाय्यही होत असावी. विवाहविधीचे स्वरूप रूढीला धरून होते.

या पार्श्वभूमीवर, अभिजात संस्कृत वाङमयाचा विचार करता काही वेगळ्या धारणा मनामध्ये गोळा होतात. प्रीती हा संस्कृत वाङमयाचा प्राण, आत्मा आहे. मानवी जीवनाच्या फलश्रुतीची ती साधनमात्र असून अंतिम साध्याचा ती आत्मा आहे. त्याचे प्रकटीकरण शीतल, शांत व संयमी आहे; लोटून देणारा उफाळ नाही की भडभडा आक्रोश नाही, चांदणवेलीचे शिंपणेच आहे. प्रामुख्याने काव्यनाटकांमधून ती प्रकट झाली आहे, फुलली; बहरली आहे. ह्या कथाकाव्य नाटकांची उचल रामायण : महाभारतासारख्या आर्ष महाकाव्यातून करण्यात आली असूनही त्यातून अभिव्यक्त झालेले प्रीतिभावनेचे

चित्रण वेगळे, निराळे आणि स्वयंभू आहे. परंपरेचा वोसंग असूनही त्यावरील नावीन्याचे लेणे अपूर्व आहे. प्रीतिभावना : प्रणय : हा सार्वत्रिक साहित्याचा सार्वकालिक अग्रक्रमाचा भाग आहे, याकडे दुर्लक्ष नाही पण अभिजात संस्कृत वाङमयात झाले आहे तसे त्यापूर्वीच्या वाङमयात, प्रीतिभावनेचे ठसठशीत चित्रणही नाही; हे खोटे नाही. एकूण, अभिजात संस्कृत वाङमयात प्रीतिभावनेचे घसघशीत आविष्करण पहिल्यांदाच भेटते. खरे तर जगात पहिली स्त्री आणि पहिला पुरुष निर्माण झाल्यावेळीच प्रणयभावनाही अस्तित्वात आली. अशा ह्या दुसऱ्या सणाणणाऱ्या सनातन प्रीतिभावनेचे पहिलेवहिले चैतन्यपूर्ण, सघन, समृद्ध आणि घसघशीत रेखांकन अभिजात संस्कृत वाङमयाने केले. त्याचे वैशिष्टय असे की, तिने त्यानंतरच्या १९२० अखेरच्या मराठी कथा : कादंबरी काव्य : नाटक यांवर आपल्या प्रतिमांचे ठसे उमटविले. या ठशांवर शृंगारशास्त्राचा : Science of Erotics : सखोल परिणाम आहे. केवळ तत्त्वज्ञानाच्या पातळीवरचाच तो नसून प्रत्यक्ष लेखनातही त्याचे उपयोजन झाले आहे. हालाची 'गाथा सप्तशती' यासंबंधात खूपसे सांगते. 'गाथा सप्तशती'त प्रीतिभावनेच्या आविष्काराची लयलूट आहे : प्रीतिभावनेतील व्याकुळता, लाजरी विभक्त वृत्ती, शालीन सौजन्यपूर्ण धिटाई आणि धसमुसळेपणा, विरहातुरता, त्यातील दुःखावेग, फार काळ न टिकणारा प्रणयकलह, वर्षाकालीन प्रथम मेघगर्जना ऐकल्यानंतर विरहिणीची होणारी पराकाष्ठेची व्याकुळ अवस्था, अन्यासक्त प्रियकराच्या बाबतीत प्रेयसीने केलेला उपालंभ अशा अनेक छटांचे साम्राज्य गाथेत आहे. त्यातून प्रीतिभावनेची काही सूत्रे तर काही सिद्धांतवजा तत्त्वे उभी राहतात. त्याचे सार असे आहे : प्रीती ही जीवनाला जवळ आणणारी, या हृदयीचे त्या हृदयी घालणारी, त्यास उचलून सावरणारी स्नेहपूर्ण संजीवक घटना आहे. साहजिकच ज्याचे किंवा जिचे हृदय, इतरत्र आहे त्यावर आसक्ती ठेवणे व्यर्थ आहे पुरुषाचे प्रेम बहुविध तर स्त्रीचे एकविध, स्त्रीच्या एकविध प्रीतीला पुरुष जाचक ठरू शकतो. स्त्रीच्या मनातील 'स्वामित्वाची भावना' 'हा आपला, दुसऱ्याचा होऊ नये, आपलाच रहावा' एवढी प्रखर असते. त्यापोटी सारे जीवन ओवाळून टाकण्याची तिची धडपड राहते. 'नदीपूरसदृशे यौवने' असे तिचे स्वरूप असते. मग त्याच्या सहवासाने ती इतकी बेभान बनते की, रात्रीने मनात आणावे आणि संपूच नये असे रात्रीदेवीला ती आळविते. जीवलग जवळी असतो तेव्हा काळकामवेगाची तिला गणतीच नसते. तो दूर जाणार असे म्हटल्यावर टांगणीला टांगलेला स्वतःचा जीव कसा जगवावा असा तिच्यापुढे प्रश्न पडतो. माध्यान्हकाळी अचेतन छाया शरीराखाली लपून राहते तसे त्याने स्वतःच्या शरीरात आपले शरीर मुरवून घ्यावे असे तिला वाटते. क्वचित् प्रणयक्रीडेतील आवेग सहन न होऊन कोमजलेल्या शिरीषपुष्पासारखी तिची स्थिती झाली तरी तिला हे मुरणे आवडते. त्यातूनच आंब्याच्या कोईतून, किंचित उगवून बाहेर आलेल्या लवलवत्या अंकुराप्रमाणे

प्रेम आकार घेते, असे तिला वाटते. पण मोहाचा हा बहर केव्हातरी संपतो, संपावा लागतो. सच्ची प्रीती तिथे उपजते. दुभंगलेल्या प्रेमाची गोडी, तापवून थंड केलेल्या पाण्यासारखी स्वादहीन असते. हृदयाला हृदय मिळण्यात, त्यांची खरी ओळख पटण्यात खऱ्या प्रेमाचा आविर्भाव असतो. तिला मग पूर्तीची इतर भौतिक अभिलाषा नसते. प्रीतीमधील असमाधान मनाला जाळीत राहते, होऊन गेलेल्या उत्सवासारखी मनाला अवकळा आणते, त्यातून पहाटे दिसणाऱ्या निस्तेज पौर्णिमा चंद्रासारखी शरीराला कळा येते. ती घालविण्यासाठी प्रणयिनीकडून प्रियकराची निराशा न करण्याबद्दल उत्कट अभ्यर्थना चालते. : पहिले शतक : गाथा ७१ : प्रणयकलह, प्रणयकोप तात्पुरते ठरतात. बारीक वाळू मुठीत घट्ट घट्ट धरीत जावे आणि ती सुर्रकन् नकळत निसटून गळून जावी, मोकळी मोकळी बोटेच शिल्लक रहावीत, या प्रणयकलह–कोपाचेही तसेच होते. प्रीतीत तृप्तीला अवसर नाही. जे प्रेम आठवावे लागते ते नष्ट झाल्यासारखेच आहे. तसे प्रेम, अनेक कारणांमुळे नष्ट होते. 'गाथा सप्तशती 'च्या ८२ व्या गाथेत त्याची कारणे दिलेली आहेत :

१. प्रियकर वारंवार न भेटल्यास स्त्रियांचे प्रेम नष्ट होते.
२. सतत भेट घेण्याने हलक्या लोकांचे प्रेम नष्ट होते.
३. दुर्जनांच्या बोलण्यावर विसंबून चालल्यामुळे मूर्खांचे प्रेम नष्ट होते.
४. खलपुरुषांचे प्रेम उडून जाण्यास कारणच लागत नाही.

खरे प्रेम मात्र कधीच उडून जात नाही. ते जरूर अनुनय करते, पण पुढे पुढे करीत नाही. तो त्याचा स्वभाव नाही. एकनिष्ठ गाढ प्रेमाचा असा स्वभाव नसतो. प्रियेने प्रियकराचा दंतव्रण आपल्या गालावर ठेवीप्रमाणे जतन करून ठेवावा, इतकेच नव्हे तर त्याच्याभोवती सतत उभ्या राहिलेल्या रोमांचांचे कुंपण घालून त्यास जपावे, असे गाढ, उत्कट आणि एकनिष्ठ प्रीतीचे आहे. योग्य सहचर लाभणे केवळ पुण्याधीन आहे असा दैवी भाव 'गाथा सप्तशती 'च्या पहिल्या शतकातील ९९ व्या गाथेत व्यक्त झाला आहे. उत्कट प्रीतीचा हा भाव केवळ नागर जीवनातच आहे असे नाही. वनचरांच्या ठिकाणीसुद्धा असल्या निर्व्याज प्रेमाची उत्कटता दिसते. 'गाथा सप्तशती 'च्या दुसऱ्या शतकातील २२ व्या गाथेत व्याधाची गोष्ट सांगितली आहे. ती लक्षणीय आहे :

... एक व्याध. रानावनात त्याचा संचार. संचार करताना रानात त्याला एक प्रणयिनी भेटते. दृष्टभेट. प्रेम बसते, वाढीस लागते. विवाहात रूपांतर. अपूर्व सहवास. सहवासाचा, शिकारीचा आणि विलासाचा विलक्षण धुंद आनंद. पण दुर्दैव आड

येते. ती कालवश होते. व्याध मनस्वी दुःखानं भाजून निघतो. विरहाच्या आगीत बरीच वर्षं जळतात. दुसऱ्या घरोब्याला मन राजी नाही पण जनरीत आडवी येते. तिचा रेटा असह्य होतो. दुसरा घरोबा करावा लागतो. तो प्रणयात रमतो; गुंगतो आणि अशक्त बनतो. तरी प्रणयिनीचं गाढ प्रेम काही केल्या विसरू शकत नाही. तिची आठवण त्याला सतावीत राहते, जाळीत राहते. आता ती काही जवळ नाही पण आठवण धनुष्याच्या रूपानं ताजी आहे. पण रतिखिन्नखेद व दुर्बळ व्याधाला ते आता कसं पेलवणार? पण गाढ प्रेम ते पेलायला लावतं. पेलता येत नसतासुद्धा ते घेऊन तो अरण्यात शिकारीला जातो. या धनुष्याशी व्याधाच्या प्रणयविषयक पूर्वस्मृती निगडित आहेत. त्या टाकाव्या म्हणून टाकता येत नाहीत. झुरळासारख्या झटकता येत नाहीत. त्या मनात खूप मुरल्या आहेत, शरीरात खूपभि नल्या आहेत; त्यांचं उच्चाटन क्षणोक्षणी तेवढं सोपंही नाही...

निरपेक्ष, निर्भेळ, निष्कपट प्रेम जगात दुर्लभ असून त्याच्या प्राप्तीसाठी तर मोठा आटापिटा सुरू असतो. प्रेमविकार बहुरंगी, बहुढंगी असून त्याचा थांगपत्ता लागत नाही. 'या चिन्तयामि सततं मयि सा विरक्ता... ... धिक् तां च तं च मदनं च इमां च मां च' असे भतृहरिने म्हणून ठेवले आहेच. कारण स्पष्ट आहे. प्रीती ढिसूळ वा वरवरची नाही. ती उपजताच ठसण्याच्या भावनेने उपजते. तिचे निपजणे 'त्या' आतून होते. प्रीती निपजते आकर्षणातून, त्यासाठी रूपाचे संमोहन लागते. असे रूप नेत्रात ठसते, वज्रलेप होते. त्या प्रियतम व्यक्तीचा स्पर्श, बोल अवयवात जाणवत राहतो. हे दृढतर सामंजस्य विलग करून अन्य कुणाचा त्यात शिरकाव करू देणे ही गोष्ट दुरापास्त राहते. समान सुखदुःखांत वाढलेल्या प्रीतीची ताटातूट करू इच्छिणाऱ्या घटकास वाव न देण्यात दांपत्यप्रीतीची परिसीमा असते. एकाकी जगणाऱ्या व्यक्तीचे जीवन हा जिवंत मृत्यु, प्रेमिकांचे विरहातील जीवन म्हणजे साक्षात् मरण होय. विरहाने सारे जीवनच कोमेजून, मुरझून जाते. त्यातून टिकते, उरते आणि जीवनाला आधार देते, त्यात शाश्वत प्रीतीची निष्ठा अग्रेसर असते. पती प्रिय, त्याची नखक्षतेही प्रिय हे खोटे नाही पण त्यातून व्यक्त होणारी प्रीतिसंबंधीची निष्ठा अधिक खरी असून खूप मोलाची आहे. 'गाथा सप्तशती' च्या दुसऱ्या शतकातील ६१ व्या गाथेत यासंबंधात एक मधुर दृश्य रेखाटले आहे:

...भारताचा प्राचीन काळ. पथिकासाठी सर्वत्र पाणपोया घालण्याची रीत...तेथें प्रपालिका : पाणी पुरविणाऱ्या स्त्रिया : नेहमी नेमल्या जात. हातांची ओंजळ करून पथिक जलपान करीत. असाच एक पांथस्थ. प्रपालिका पाणी देत आहे;

ओंजळीत ओतत आहे पण पांथस्थाची नजर पाण्याकडं नाही, ती लागली आहे प्रपालिकेच्या मुखचंद्राकडं. घटाघटा पाणी प्यालो, नी भूक शमली तर...? समोर प्रपालिका असणार नाही, ओंजळीत पाणी कोण घालणार ? मुखचंद्रावर लक्ष मग कसं द्यायचं ? हे केवळ पांथस्थाचंच होतं काय ? नाही. इकडं मुखचंद्राकडं नजर लागली आहे, तर तिकडं प्रपालिका पाण्याची धार मोठी न करता बारीकच करीत आहे. पाण्याची धारच केवळ बारीक होत आहे असं नव्हे तर पांथस्थ अधिक वेळ तिच्याकडं पहावयास मिळावं म्हणून बोटं विरळ करून ओंजळीतून बुद्धया पाणी गळू देत आहे. पांथस्थाच्या प्रणयी दृष्टीक्षेपाला सहानुभूतिपूर्ण नजरेनं व कृतीनं उत्तर मिळत आहे...

हे आहे सहज दर्शन. पण गुप्त गुन्ह्याच्या टोचणीप्रमाणे परस्परानुराग हृदयातून पळभरही हालत नाही. अश्रूंनी भिजणाऱ्या नी निःश्वासांनी पोळणाऱ्या विरहिणीच्या खडतर व्रतासारखे प्रीती हेही एक व्रत आहे, 'सतीचे वाण' आहे. ते एकदा पडले की, प्रेयसी प्रियकराच्या शरीराचा निर्भ्रांत आश्रय घेते; निष्ठेची शब्दातीत परिसीमा होते. या रूपनिदर्शनात शिवपार्वतीच्या विवाहाचे सौभाग्यसमृद्ध जीवन असते पण त्यात अडथळे येताच विषार भिनल्याप्रमाणे, झेंडू फुटावा तसे परस्परांचे अवयवही गळून जातात. जीर्ण देवळाच्या कळसाचे अग्र पडून गेल्यामुळे आतील सळई : मेख: उघडी पडावी, तिच्यावर पारवा घुमावा आणि जणू सुळी दिल्यामुळे वेदना अनुभविणारे देऊळ पारव्याच्या घुमण्याच्या रूपाने करूण रोदन करीत आहे असे वाटावे तसे जीवन उदास, उजाड आणि उध्वस्त होते.

'गाथा सप्तशती' : शृंगाराचे पैलू

'गाथा सप्तशती' तील पुरा शृंगार हा प्रणयभावनेचे सर्वसाधारण समाजातील स्वरूप चित्रित करणारा आहे. तो अनैसर्गिक, अनैतिक नाही. निसर्गचित्रण, लोकव्यवहार व शाश्वत मानवी भावनांचे गोड आविष्कार या 'शृंगारिक गाथा 'तून होतो. त्यातील प्रणयाचे सांद्र व बहुरंगी स्वरूप, त्याचे रमणीय भावदर्शन अनुभूतिगम्य, स्वसंवेद्य असून त्याची निखळ आस्वाद्यमानता विवरणापेक्षा स्वप्रत्ययाचा विषय व्हावी अशी आहे. गाथेतील शृंगार प्राधान्याने वैवाहिक जीवनातून उत्पन्न झालेला असून त्यातील प्रणय शेतकरी, व्याध, ग्रामणी, आभीर अशा खेडोपाडी सर्वदूर विखुरलेल्या समाजाचा आहे. मात्र त्यातील ऐनजिनसी भावात्मकता निःसंशय विलोभणीय आहे. 'गाथे' त प्रेमिकांच्या विविध लीला दाखविल्या आहेत : झोपेचा बहाणा करणाऱ्या प्रियाचे चुंबन घेतल्यावर तो

रोमांचित झाल्याने त्याची लबाडी जाणणारी प्रेयसी, पाया पडणाऱ्या पतीच्या पाठीवर स्वार झालेल्या पुत्राला पाहून हास्याची उकळी फुटलेली रूष्ट भार्या किंवा अनुनयार्थ लोटांगण घेणाऱ्या पतीचे नुपूरात अडकलेले केस हळुवार हाताने सोडविणारी मुक्तगर्वा तरूणी इत्यादीसारख्या मनोज्ञ लीला लोभस वाटतात.

त्यामधील ग्रामीण जीवनाच्या मनमोकळचा आणि विधीनिषेधहीन चित्रणातील प्रणय इतर अनेक महत्त्वाच्या अंगांपैकी केवळ एक अंग आहे. कृत्रिमतेपेक्षा, प्रच्छन्नतेपेक्षा, घोटीव कलात्मतेपेक्षा वास्तवावर आणि त्याच्या सफाईदार चित्रणावर भिस्त असणाऱ्या गाथेतील प्रणयभावनेचे आविष्करण आपतत: उच्छृंखल वाटले तर नवल नाही. पण तो प्रणय धर्म्य आणि त्याचे चित्रांकन संयत आहे. 'धर्मविरूद्धो भूतेषु कामोस्मि भरतर्षभ्' हे त्याचे रूप : स्वरूप आहे.

भारतीय संस्कृतीत कामजीवनाचे स्थान निश्चित व स्पष्ट असून त्यात प्रसन्नता, अपलाप अथवा गूढता नाही. व्यक्तीचे जीवन धर्म, अर्थ व काम या तीन जीवनमूल्यांशी अर्थात पुरुषार्थांशी निगडित केलेले असून ते माणसाचे ऐहिक जीवन कार्यान्वित व नियमित करतात. पारलौकिक जीवनाची दिशा व वाटचाल ठरविणारा मोक्ष हा चौथा पुरुषार्थ आहे. धर्म आणि अर्थ यांच्या अविरोधाने म्हणजेच सुसंवादाने कामर्जीवन सफल व्हावे असा दंडक आहे. यामुळे व्यक्तिगत कामप्रेरणा समाजाने नियमित केली असून तीवर धर्म आणि अर्थ यांची हितप्रद आणि सुसंवादी बंधने पडली आहेत. साहजिकच 'गाथे'मधील चित्रित प्रणय (अ) विवाहित तरुणतरुणींचा, विवाहितांचा, प्रौढांचा आहे. पण साकल्याने शिष्टसंमत आहे. 'गाथे' त हळुवारपणे रेखाटलेले कामजीवन 'अग्राम्य' वाटले तरी त्यात अत्यंत लोभसवाण्या ऐन्द्रिय स्पर्शसंवेदना आहेत. मात्र 'गाथे' तील भावगीते ही प्राधान्येकरून प्रेमगीते आहेत आणि आढेवेढे घ्यायचे ठरविले तरी त्यामधील काहींचा अभिप्राय लैंगिक आहे, हे मान्य करायला हवे. समाजधारणेला इष्ट, तसेच अनिष्टही लैंगिक आचार 'सप्तशती' च्या काळात प्रचलित होते. त्याकाळी विवाहाच्यावेळी वधूवर सामान्यत: प्रौढ वयाचे असत. रजोदर्शनापूर्वी कन्याचे विवाह करावेत ही उत्तरकालीन प्रथा असून 'गाथे' तील 'आनंदपट' हा त्याचा निर्देशक आहे. वधुवरांचा परस्परांशी परिचय होण्याच्यादृष्टीने 'गाथे' तील दोहदक्रीडेचा अवलंब लक्षणीय आहे. संस्कृत साहित्य व मध्ययुगीन शिल्प यात दोहदाचे अनेक उल्लेख सापडतात. 'मेघदूत' : २.२८ : 'ऋतुसंहार' यामध्ये : ४.१० : असे दोहद आढळतात. भुवनेश्वरच्या राजाराणी मंदिरात अशोकदोहदाची मूर्ती कोरलेली आहे. दोहद हा पूर्णतया भारतीय असा अद्वितीय संकेत आहे. हालाच्या 'गाथा सप्तशती' मधील प्रियकर : प्रेयसी विरहाच्या

यातनात भाजून निघतात, वेदनांनी फुटतात, व्यथात होरपळतात. या जळण्याने त्या त्या माणसांचे जगण्यावरचे, जीवनावरचे प्रेम, आसक्ती किंवा ओढ कमी होत नाही की मिटत नाही. ती अनिवारपणे फुंफाटताना आढळते. यातून कधी आक्रंदन तर कधी द्वैतामधून अद्वैत पुढे येते. कधी वाटचाला काळा गिच्च अंधार येतो तर कधी काजळी धरलेल्या जीवनाला प्रकाशफुले लागतात.

भागवत काव्य : अंगामनाची मिळणी

भागवतातील प्रेमकथांची कहाणीही अशीच आहे. भागवत पुराणात यदुवंशाचे वर्णन, श्रीकृष्णाचे चरित्र आणि त्याच्या लीला याना स्थान मिळाले आहे. भागवताच्या दशमस्कंधाच्या २९,३० व ३१ या अध्यायांमध्ये रासक्रीडेचे वर्णन आहे. पंचकाव्यातील कलात्मक शृंगाराच्या आविष्काराची थोडीफार बीजे भागवतात असून रासक्रीडेच्या अध्यायात शृंगाराच्या उद्दीपनांचे केलेले वर्णन : शरदऋतूतील निरभ्र आकाश, गेंदेदार फुलांच्या सुवासाने कोंदलेले वातावरण, चंद्रप्रकाशाने न्हाऊन निघालेली रात्र, वृंदावनाकडे धाव घेणाऱ्या गोपींच्या धांदलीतून प्रगट होणारी त्यांच्या अंत:करणातली प्रेमाचा उचंबळ, अंगाला चंदनाची उटी लावीत असता पळत सुटणाऱ्या, साडचा नेसताना उलटचा साडचा नेसणाऱ्या, कंचुकीच्या गाठी भलतीकडेच मारणाऱ्या गोपी इत्यादी चित्रण : अतीव लोभसवाणे आहे. त्यामध्ये शारीरिक शृंगाराबरोबर विप्रलंभ शृंगारासहीं स्थान आहे. भागवतातील ' रुक्मिणी स्वयंवरा 'च्या आख्यानात:दशमस्कंधाच्या उत्तरार्धातील ५२, ५३ व ५४ या अध्यायात : त्याचा उत्कटतेने प्रत्यय येतो. श्रीकृष्ण आणि रुक्मिणी यांच्या मनाच्या परस्परांकडील ओढचापासून रुक्मिणीने सुदेवाबरोवर श्रीकृष्णाला पाठविलेली प्रणयपत्रिका, त्यात व्यक्त झालेली रुक्मिणीच्या प्रेमाची ऋजुता, निष्ठा आणि कोवळिक मोहून टाकणारी आहे. प्रणयपत्रिकेच्या पहिल्या श्लोकात आपल्या धैर्यशाली शालिन प्रेमाचे वर्णन करताना रुक्मिणी श्रीकृष्णाला उद्देशून ... ... ' माझं मन निर्लज्जपणं तुझ्या ठिकाणी आसक्त झालं आहे ' असे सांगते. दशमस्कंधाच्या ६० व्या अध्यायात, संस्कृत साहित्यात अपवाद ठरावा एवढा कृष्ण : रुक्मिणीचा खेळकरपणा असलेला शृंगार आहे तर ६२ व्या अध्यायातील उषा व अनिरूद्ध यांच्या आख्यानात शृंगाररसाचा पुरेपूर शिडकावा झाला आहे. मात्र भागवतातील शृंगारात, महाभारताप्रमाणे कामभावनेचा आविष्कार नाही. त्याचप्रमाणे पंचमहाकाव्याच्या कलात्मक शृंगारात आढळणारी सांकेतिकता किंवा तंत्राचे प्राबल्यही नाही. महाभारताचा काळ अगदी प्राथमिक : रबरबीत : असल्यामुळे त्याच्याशी निबद्ध प्रीतिभावना अगदी 'नैसर्गिक' स्वरुपात आविष्कृत व्हावी, केवळ शरीरालाच महत्त्व मिळावे हे स्वाभाविक आहे. मात्र भागवत काव्यामध्ये

शरीराच्या जोडीने मनालाही महत्त्व मिळाले आहे.

भर्तृहरी : सत्यनिष्ठ प्रणय

भर्तृहरिने 'शृंगारशतका'त 'स्त्री हा पदार्थ पुरुषास मोठा मोहक होय' असे सांगितले आहे. तो सांगतो :

सती प्रदीपे सत्यग्नौ सत्सु नानामणिष्वपि ।।
विना मे मृगशावाक्ष्या तमोभूतमिदं जगत् ।।१४।।

साहजिक 'वक्षसि प्रियतमा मनोहरा । स्वर्ग एव परिशिष्ट जगत: ।।' असे पुरुषास झाल्यास आश्चर्य नाही.

भर्तृहरी प्रीतिभावनेचा विचार केवळ प्रीतिभावनेच्या संदर्भातच करीत नाही. अन्य संदर्भाने ते तो करतो. 'अमरुशतका' तील प्रीतिभावना प्रियकर आणि प्रेयसी यांच्याशी मर्यादित आहे तर भर्तृहरी ती कोंडी फोडून त्यापलिकडे जाऊ इच्छितो. भर्तृहरीमध्ये प्रणयाची विचारमग्नता व खेदकारक निराशा हे गुण खूप आहेत. त्याने प्रणय सत्यनिष्ठ बनविला आहे. अमरुकडे खरी कविता तर भर्तृहरीकडे सखोल भावना आहे.

मानवी प्रीतिभावनेचा सूर :

अभिजात संस्कृत वाङमयातील प्रीतिभावनेला भक्कम आधारशिला आहे. ती कल्पनारम्य नाही. तीत विमुक्त अनुरंजन आहे आणि पुरुषोत्तमाची मर्यादाही मोठी आहे. मनुष्य प्रणयप्रिय खराच पण सभ्य संस्कृतीचे उत्तरीय झटकून उघडे पडण्याचा मात्र त्यात प्रयत्न नाही. 'स्वामित्व' हे या प्रीतीचे उद्दिष्ट असून अनुनय त्याची मार्गदीपिका आहे. शिव : पार्वती, विष्णु : लक्ष्मी यांच्या प्रीतिभावनेत काहीशी स्वर्गीयता : Ethereal : अद्‌भुतता आढळली तरी अभिजात संस्कृत वाङमयामधील ऐकूण प्रीतिभावनेचा सूर खास करून मानवी आहे.

अभिजात संस्कृत साहित्यामधील प्रीतिभावनेचा शोध, काही एका विशिष्ट पातळीवरील सुसंस्कृत, सुविद्य आणि समृद्ध जीवन दृष्टीच्या समाजमनाचा कानोसा ठरतो. मात्र सर्वार्थाने सर्वसाधारणांच्या जीवनाचा द्योतक ठरतोच असे नाही. रती हा जीवनाचा स्थायीभाव आहे, त्यातून कुणाची मुक्तता नाही. त्यामुळे कोणत्या ना कोणत्या तरी का होईना रूपात प्रकट होणारे प्रीतिभावनेचे आविष्करण सर्वसाधारणपणे मार्गदर्शनपर राहू

शकते. यादृष्टीने कवीकुलगुरू कालिदासाचा अग्रक्रम लागतो : अभिजात संस्कृत वाङमयाच्या उपलब्ध वैदिक संस्कृत महाकाव्यांच्या रमणीय रचनेचा आद्यप्रवर्तक कवीकुलगुरु कालिदास होय. कालिदासाचा काळ अतिप्राचीन असून 'अभिज्ञान शाकुंतला'ने त्याला विश्वकुटुंबातील सर्वांचा एक जिवलग स्नेही करून सोडला आहे. कालिदासाच्या सरस काव्याला महाकवी बाण मधुर रसाने थबथबलेल्या मंजिरीची उपमा देतो तर जयदेव त्यास 'कविताकामिनीचा प्रत्यक्ष विलास' मानतो. गोवर्धनाचार्य, राजशेखरादी रसिकांनी भारतीय रससिद्ध सत्ककवींच्या अग्रभागी त्याची गणना केली आहे. खेरीज 'उपमा कालिदासाचीच', 'शृंगाररस कालिदासानंच वठवावा', 'स्त्रीहृदयाचं रहस्य कालिदासालाच उमगलं होतं', 'कालिदासाच्या तोडीचा दुसरा कवी नसल्यानं कविगणना करणाऱ्या कोणी रसिकांच्या हाताचं करंगळीनंतरचं बोट' अनामिका हे साधे नाम पावले', 'पृथ्वीवर राहूनही स्वर्गसुखाचा अनुभव घ्यावयाचा असल्यास शरदऋतूतील चंद्राचे किरण, शर्करायुक्त दूध, तारुण्यातील मादक नव्हाळी, कोमलांगी युवती आणि कालिदासाची कविता यांचं रसिकानं सेवन करावं' अशा निरनिराळ्या अभिप्रायांनी कालिदासाचे कर्तृत्व बोलके झाले आहे. जगात रसिकता कायम असेतोपर्यंत, भावी युगांना कालिदासाच्या कलाकृतीकडे साश्चर्य कौतुकाने पाहाण्याखेरीज गत्यंतर नाही. त्यादृष्टीने कालिदासाचे 'शाकुंतल,' 'कुमार संभव' व 'रघुवंश' ह्या चिरंतन आनंद देणाऱ्या ललितकृती आहेत.

'कुमारसंभव' शिवपार्वतीची कथा सांगते : [८]

..."सम्राट नगाधिराज हिमालयाची सम्राज्ञी मैना. ती ब्रह्मवादिनी होती. या मातापित्यांच्या पोटी 'मैनाक' नावाचा सुंदर पुत्र जन्मला. आपल्या सौंदर्यानं खुद्द नागबंधूना त्यानं मोह पाडला. याची धाकटी बहीण पार्वती. पूर्वाश्रमीची 'सती'. पार्वतीच्या रूपानं हिमालयाच्या पोटी ती जन्माला आली होती : पार्वतीचं बाल्य संपतं, तारुण्यात प्रवेश होतो. स्त्रीचं तारुण्य म्हणजे कामदेवाचं अमोघ अस्त्र. भगवान त्रैलोक्याधिपती महेश्वराची ती अर्धांगी होणार आहे असं देवर्षी नारदांचं भाकित. हिमालयाच्या एका रम्य प्रदेशात तपःश्चरण करीत असलेला भगवान शंकरासारखा जामात मिळणार हे भाकित; मग स्थळांच्या शोधात वणवण करण्याची गरज काय ? पण शंकरानं आपल्या मुलीला मागणी घातल्यावाचून विवाहाचं बोलणं शंकरापाशी कसं काढावं असा हिमालयाला पेच. त्यानं त्यावर एक सुंदर तोड काढली. तपाचरणात असलेल्या तेजस्वी ब्रह्मचाऱ्याची : भगवान शंकराची : सेवा करण्याला त्यानं पार्वतीला अनुज्ञा दिली. पार्वती आनंदली. तिनं सेवेला प्रारंभ केला. सेवेनं तिचा नाजूक देह शिणल्यास भगवान शंकराच्या मस्तकावरील चंद्राच्या

किरणांनी ती लगेच ताजीतवानी होई. दरम्यान तारकासुरानं त्रिभुवनाला 'त्राहि भगवन्' करून सोडल्यानं देवइंद्र कंटाळले होते. पण त्याला मारण्याचं सामर्थ्य जितेंद्रिय व संयमी शंकराच्या वीर्यातच होतं. त्याचं वीर्यधारण करण्यास फक्त उमा समर्थ होती नी त्यांच्या पोटी उत्पन्न झालेला पुरुषच तारकाचा वध करणार होता. ब्रह्मदेवाच्या विचारानुसार कामदेव ही जबाबदारी पत्करतो. वसंत व रती यासह तो तडक शंकराच्या तपोभूमीत येतो. पण भगवान शंकराचं तप सहजासहजी मोडणारं नव्हतं. मदनाचाच बळी जातो. पार्वती निराश झाली नाही. घोर तपःश्चरणाला तिनं प्रारंभ केला. तपाची पराकाष्ठा झाली. तिनं लावलेल्या झाडानांही फळं आली, पण तिनं जोपासलेल्या मनोरथाला फळ सोडाच पण फूलही येण्याचं चिन्ह दिसंना. पण काळ लोटला आणि शेवटी एका तेजस्वी ब्रह्मचाऱ्याच्या वेषात भगवान शंकरानं पार्वतीजवळ येऊन तपःपूत शंकराची निर्भत्सना आरंभिली. पण 'ते कसंही असलं तरी तेच मला हवे आहेत. मी इतर कोणाच्याच मताची कदर करीत नाही.' असे पार्वती निक्षून म्हणते तेव्हा वेषधारी शंकर प्रकट होतात. 'पुरे झाला हा राग' असे म्हणून हसत हसत पार्वतीचा हात हाती घेतात आणि म्हणतात : 'आजपासून मी तुझा दास झालो. तू मला तूझ्या तपानं विकत घेतलंस ना ?' पार्वती लाजते. तिचे तपःक्लेश कोठच्याकोठे जातात.

शिव : पार्वतीच्या या प्रीतिकथेत मानवी जीवनाची मूलभूत उदात्त प्रेरणा आहे. हव्या असलेल्या जिव्हाळचाच्या माणसाच्या प्राप्तीसाठी विरहाने भाजून निघालेला माणूस कोण दुःख, वेदना आणि व्यथा सहन करू शकतो, त्याचे 'कुमारसंभव' प्रात्यक्षिक ठरते. वस्तुत शंकर तपस्वी. ओंगळ. म्हणजे त्याच्यासाठी कुणाची घाई व्हावी किंवा धावपळ घडावी असे त्याच्याजवळ काहीच नाही. तरीही तो 'महात्मा' आहे अशी पार्वतीची धारणा. वल्लभाच्या : प्रियकराच्या : मनात आपल्याविषयी आवड उत्पन्न करणे हे स्त्रीच्या अंर्बाह्य सौंदर्याचे खरे कार्य आहे. 'प्रियेषु सौभाग्यफला हि चारूता' : ५:१ : असे 'कुमारसंभवा'त म्हटले आहे ते ह्या अर्थाने. पार्वतीने शंकराच्या प्राप्तीसंबंधात 'कुमारसंभवा'त ते साधले आहे. 'कुमारसंभवा'त प्रमुख वीर रसाबरोबरच प्राधान्य शृंगाररसाला आहे. 'कुमारसंभवा'च्या तिसऱ्या सर्गात मदनाने शंकराच्या तपोवनात प्रवेश केल्यानंतर वनातील सर्वांची मदनविद्ध स्थिती, सेवेकरिता आलेल्या सुकुमार आणि रूपसंपन्न पार्वतीला पाहून शंकराच्या मनाला क्षणकाल का होईना परंतु पडलेला मोह इत्यादीमधील शृंगार संयमित आणि मधुर आहे शंकराच्या मनात उद्भवलेल्या पार्वतीविषयक रतीला चंद्रोदयामुळे अधीर झालेल्या सागराची दिलेली उपमा समर्पक, सूचक, मार्मिक आणि अर्थवाही आहे. यामधील भावनेचा नाजूकपणा, प्रणयाची सूक्ष्मता आणि अंतःकरणाला

मिळणारा दिलासा लक्षणीय आहे.

'रघुवंशा' त अनेक कथांची गुंफण आहे :

दिलीप राजा व सुदक्षिणा यांच्या नशिबी अपत्यप्राप्तीचे सुख नाही. दिलीप राजाच्या राज्यात योग्यवेळी पर्जन्य पडतो. प्रजा सुखी व दीर्घायु आहे. राज्यकारभार सुरळीत चालू आहे. उणीव म्हणून कसली नाही. पण अपत्यप्राप्ती नसल्याने अनेक रत्नांना प्रसविणाऱ्या समुद्रवलयांकित पृथ्वीपासूनही राजाला सुख नाही; कारण पिण्डप्रदानाचा लोप होणार या चिंतेने राजा ग्रस्त आहे. वंध्य आम्रवृक्ष पाहूनही तो त्रस्थ होतो आहे.कारण प्रीतीची परिणती सुंदर अपत्यप्राप्तीत आहे; वंध्यत्वात नाही. फुलण्यात, बहरण्यात प्रीतीचे वैभव आहे, सार्थक्य आहे. प्रीतीला पानाफुलांनी बहरलेल्या रूपाची आकांक्षा आहे. त्याखेरीज ती केवळ शून्य ठरते. म्हणून राजा महर्षी वसिष्ठ ऋषीकडे धाव घेतो : सुंदर अपत्यांच्या सृजन साधणाऱ्या उत्कट प्रीतीकडे राजाची धाव आहे.

'रघुवंशा' तील अग्निवर्णाचे उदाहरण वेगळे सूत्र सुचवून जाते: अग्निवर्ण हा सुदर्शनानंतर राज्यावर आलेला रघुवंशातील जवळजवळ अखेरचा राजा. सुदर्शनाने निष्कंटक करून ठेवलेल्या पृथ्वीला आणि राज्यकारभाराची घडी सुव्यवस्थित लावून दिलेल्या राज्यपदाला अग्निवर्णाने विलासाचे : अतिरिक्त विलासाचे : साधन मानले. सारा राज्यकारभार पूर्णपणे सचिवांवर सोपविला. वाड्यातून मृदंगाचा नाद आणि नाचरंग याखेरीज अन्य शब्द ऐकू येईनासा झाला. त्याच्या आणि प्रजेच्या गाठीभेटीचा योग जमून येई तोही विलासमंदिराच्या गवाक्षातून पाय बाहेर काढून उत्सुक प्रजेला चरणदर्शनाचा अलभ्य लाभ अग्निवर्ण करून देत असे तेव्हा. दिवसा, रात्री, सर्व ऋतूंत आणि सर्व स्थळी कामुक अग्निवर्णाला उपभोगाव्यतिरिक्त काहीच सुचले नाही. व्हायचा तोच परिणाम झाला. क्षय झाला. अंत घडला. प्रीती अतिरिक्त विलासात नसून संयमशील वर्तनात आहे. कामिनीच्या विलासात, शरीराच्या तृप्तीचा भास असला तरी अतृप्तीला आमंत्रणही आहे; जीवन नासण्याची क्रिया आहे. अग्निवर्णाच्या कथेतून हेच सूचित होत नाही काय ?

कालिदास : मोहक गूढरम्यतेचा प्रकर्ष

कालिदासाने लिहिलेल्या काव्यसंभारात 'अभिज्ञान शाकुंतल' या नाटकाखालोखाल 'मेघदूता' ला खूप महत्त्व आहे. आपल्या प्रेयसीपासून दुरावलेल्या एका भावनाप्रधान प्रेमिकाचे 'मेघदूत' हे विरहगीत आहे. प्रेयसीच्या स्मृतीमध्ये तल्लीन होऊन मनाला

विरंगुळा देण्याचा व विरहामुळे दीर्घ भासणारे दिवस कसेबसे घालविण्याचा यक्ष प्रयत्न करीत आहे. त्या दरम्यान वर्षाकाठच्या आगमनाची सूचना देणारा जलपूर्ण मेघ त्याच्या नजरेस पडतो. मेघदर्शनाने त्याचे मन उचंबळून येते. तो अस्वस्थ होतो ! साहजिकच उत्तरेच्या रोखाने चाललेल्या मेघास पाहताच, कैलास पर्वतावर बसलेल्या अलका नगरीत विरहाने झुरणाऱ्या आपल्या प्रेयसीला तो केव्हातरी भेटणार असे यक्षाला वाटत राहते. त्याचे व्याकुळ मन आर्त बनते. मेघाकडून तिला प्रेमाचा निरोप पाठवावा असा मोठा रमणीय विचार यक्षाच्या मनात चमकून जातो. मेघ हा आपला प्रिय मित्र; आपला निरोप तो अलका नगरीतील आपल्या प्रियेकडे घेऊन जाण्यासाठी उत्सुक झाला आहे. या कल्पनेने यक्षाचे मन भारून टाकल्यामुळे शक्याशक्यतेचे सारे व्यावहारिक विचार लुप्त होतात. मेघ हा भावना व बुद्धी असलेला मनुष्यच आहे असे त्याला वाटू लागते आणि मेघाशी तो मोठ्या जिव्हाळ्याने बोलू लागतो.

> ...यक्ष हा वयानं तरुण आहे. सुंदर आहे. स्वत:च्या धर्मपत्नीवरील अतिरिक्त आसक्तीमुळं कुबेरानं नेमून दिलेल्या कामात त्याच्या हातून चूक होते आणि त्याचं प्रायश्चित म्हणून एक वर्षभर पत्नीपासून शेकडो मैल दूर : रामगिरीवर : राहण्याची कडक शिक्षा कुबेर त्याला फर्मावितो. शिक्षेचे आठ महिने कंठल्यावर, पावसाळ्याच्या तोंडाला रामगिरीच्या शिखरावर टेकलेला पावसाळी मेघ बघून कामी, विरहातुर यक्षाला मेघाबरोबर आपल्या पत्नीला संदेश धाडण्याची कल्पना सुचते : त्याप्रमाणं तो करतो. यक्षाच्या मनात वियोग आणि संयोग या कल्पना जागृत आहेत. आपण विरहवेदना सहन करीत आहोत याची पुरेपूर जाणीव असूनही तो माणूसघाणा, चिडखोड. जगाला विटलेला किंवा दोषैकदर्शी नाही. आपण वियुक्त आहोत हे सत्य दृष्टीआड न करताही दुसऱ्याच्या सुखानं, संगमानं आनंद मानण्याची किमया त्याला साधलेली आहे. दूत मेघानं, अलकेपर्यंतचा मार्ग काटताना वाटेतील नद्यांचा प्रियकर होऊन त्यांचं समागमनसुख अनुभवावं असं तो खुल्या दिलानं, परोपरीनं सांगत आहे. मेघ आणि सिंधु, निर्विन्ध्या, विद्युत्, अभिसारिका आणि त्यांचे रमण, सूर्य आणि नलिनी इत्यादी अनेक जोडप्यांच्या शृंगारिक विलासांची वर्णने यक्ष स्वमुखाने करतो....

शरीर विरहाने कृश झाले असले तरी यक्षाचे मन आणि विचार रोडावलेले नाहीत. तो विचारांनी पूर्ण आहे. तो तिला मैथिली म्हणतो. वैवाहिक निष्ठेच्या बाबतीत चक्रवाक या आदर्श जोडप्याचे स्मरण त्याला होते. त्याच्या विचार : वाणीत स्वत: विरही असल्यामुळे नेहमी काल्पनिक व प्रत्यक्षातील इतर कांतकान्ताचे संयोग येतात.

यक्ष असा तर यक्षपत्नी, मैथिली सीतेसारखी साध्वी, आदर्श पतिव्रता, धर्मपत्नी आहे. विरहकाळात विरहिणीला साजेशी केशवेषभूषा, आहार आणि आचार ती निष्ठेने करीत आहे. पतीच्या दृष्टीसुखासाठी चित्र काढणे, साळुंकीला बोलविणे, वीणा वाजविणे इत्यादी तिच्या कर्तव्याचे आणि मनोविनोदनाचे वर्णन तिच्या पतीनिष्ठेचे द्योतक आहे. 'मेघदूता' तील शृंगाराचा विषय म्हणजे यक्ष पतीपत्नी. त्यांची परस्परावरील अव्यभिचारी अढळ निष्ठा व प्रेम यांच्या दर्शनाने सहृदयाला आनंद होतो. अलकेत राहणारी, ऐश्वर्यात लोळणारी सर्व गुणसंपन्न कलावती, रूपखनी यक्षस्त्री विरहकाळात कोणत्याही मोहाला बळी पडत नाही, व्रतस्थ राहते. तिची पतीनिष्ठा त्यामुळे उठून दिसते.

'मेघदूत' मधील इतर लोभसवाण्या भागाबरोबर : १०६ पासून ११७ अखेरच्या बारा श्लोकांत : यक्षाचा आपल्या प्रियेला निरोप आहे. तो विलक्षण रुचिरमधुर आहे. त्यामधील कित्येक मनोरम स्मृतिचित्रे निसर्गदृश्यांवर आधारलेली पण प्रायः शृंगारिक असली प्रसंगी काहीशी उत्तान व अनिबंध असली तरी त्यातून प्रकट होणारी प्रीतिभावना प्रमत्त आर्त आणि उत्कट आहे. ती जीवनातल्या विविध रंगांचा आस्वाद घेणारी आणि मोहक गुढरम्यतेचा प्रकर्ष साधणारी आहे.

विवेकी भारवीचे सामर्थ्य

कालिदासाखालोखाल थोडक्या शब्दात पुष्कळ अर्थ व्यक्त करण्याचे सामर्थ्य सांभाळणारा विवेकी भारवीचा विचार येतो. महाकवी भारवीच्या 'किरातार्जुनीय' मध्ये असहाय्य निर्वासित पांडव, द्रौपदीची भरसभेत विटंबना करणाऱ्या दुष्ट कौरवांच्या पारिपत्याचा विचार करताना दिसतात. द्रौपदीसारख्या मानिनी, कामिनी आणि भामिनी स्त्रीने आपल्या पतीच्या केलेल्या निर्भत्सनेतून काही प्रीतिच्छटा मिळतात. अपमानाने अंगाचा भडका उडालेली द्रौपदी पाची पांडवांना ताडताड बोलते, कर्तव्याची जाणीव करून देते. द्रौपदी धर्मराजाला उद्देशून बोलत असली तरी इतरांनाही ते संबोधून आहे. दुर्योधनाच्या उत्कर्षाची, नेकीने राज्य करण्याच्या त्याच्या रीतीची आणि त्यामुळे प्रजा संतुष्ट असल्याची हेराकरवी आलेली यथातथ्य वार्ता धर्मराज आपल्या बंधूसमक्ष द्रौपदीला सांगतो. वाळलेला शमीवृक्ष अग्नीच्या ज्वालांनी पेट घेतो त्याप्रमाणे क्रोधाने अंग भडकावे असे द्रौपदीला वाटते कारण 'तेजस्वी पुरुषाला सर्व जनता आपण होऊन वश होते' असे तिचे गणित आहे. म्हणून पांडवांच्या थंडवृत्तीबद्दल 'जळो हा मनःसंचय' आणि 'आग लागो त्या प्राप्त परिस्थितीत संतोष मानण्याचा वृत्तीला,' असे ती म्हणते. ती धिक्कारही करते, 'ज्ञान' हे देहाचं भूषण, या भूषणाचं भूषण न्यायानं मिळविलेला विजय' असे यावर धर्मराज सांगतो. द्रौपदीची निर्भत्सना

शांतपणे ऐकून घेतो. घाई व अविचार घातक आहेत, असे म्हणतो. प्रवासाला निघालेल्या पार्थालाही द्रौपदी कर्तव्याची जाणीव देताना दिसते. यामधून तत्कालीन स्त्रीला मिळालेले 'स्वातंत्र्य', त्यातून उपजलेली निर्भयता दिसते. त्याप्रमाणे स्त्री ही पुरुषाची प्रेरणाशक्ती कशी हेही दिसून येते. साहजिकच प्रेरणाशक्तीचे स्थान, त्यामागे प्रीतीचे आत्मबळ उभे असल्याखेरीज येत नाही. स्वतःच्या कर्तृत्वामागे सामर्थ्य असल्याखेरीज शब्दांना अर्थ मिळत नाही. ते सजीव होत नाहीत की अंतःकरणाला झोंबत नाहीत. प्रीतीने परिप्लुत द्रौपदीच्या तेजस्वितेचा हा प्रत्यय तर अर्जुनाचे तप भंगविण्यासाठी विलासिनींचे विलास होतात, कामीजन वनाचे उपवन करून टाकतात, रात्र संपूनही उपभोगेच्छा पाझरत राहते. पाशुपतास्त्राच्या प्राप्तीनंतर अर्जुन इंद्राच्या रथातून स्वर्गलोकीही जातो पण विचलित होत नाही, यामागे कोणते सामर्थ्य दडले आहे? लादलेला उसना नखरा, ओढूनताणून आणलेला जिव्हाळा, पकडून उभी केलेली प्रीती कुचकामी असते. क्षुद्रतेचा, उथळतेचा साठा प्रीतीला मूलतः विरोधी आहे.

प्रीती केवळ करायची आहे, म्हणून ती व्हावी, असे म्हटल्याने होत नाही. त्यासाठी मनाला आच : Urge: असावी लागते. तिला उत्कटत्व यायलाही विशिष्ट मानसिक अवस्था आणि त्यासाठी पोषक वातावरण हवे.

प्रीतीची आच, जीवनाला लागलेला काच सोडविण्याचा प्रयत्न करते. त्यादृष्टीने माघकृत 'शिशुपालवध'मधील श्रीकृष्ण–रुक्मिणी' या उत्तम प्रकृत्ती पात्रांमधील शृंगारगर्भ विनोद चिंतनीय आहे. 'शिशुपालवधा' तील शृंगाराचा शिडकावा, एकूण कथावस्तुशी मधूनमधून मेळ न राखणारा असला तरी प्रीतिभावनेच्या आविष्करणाशी त्याचा दृढसंबंध आहे.

श्रीहर्ष हा कालदृष्ट्या माघानंतरचा तर गुणदृष्ट्या माघापूर्वीचा ठरतो. विलक्षण धारणाशक्तीच्या श्रीहर्षाजवळ उज्ज्वल कवित्वशक्ती आणि गाढ पांडित्य याचा सुंदर संयोग जमून आला आहे. श्रीहर्षाने 'नैषधीय चरिता'मध्ये नलराजाची सर्वश्रुत गोड कथा सांगितली आहे : निषध देशाचा नल हा महाप्रतापी विचारवंत अधीश्वर आहे. रुपसंपन्न, गुणसंपन्न आणि धीरललित असे त्याचे रूप. शत्रूवर चाल करून जाणाऱ्या त्याच्या अफाट सैन्यामुळे उडालेला धुरळा क्षीरसमुद्रावर जाऊन बसे आणि तेथे त्याचा चिखल होईल असे त्याचे शौर्य; तर अतिवृष्टी हे त्याच्या सुराज्याचे रूप होते. सोन्याच्या पर्वताची खांडे करून ती अद्याप याचकांना वाटून दिली नाहीत आणि दानोदकाच्या सिंचनाने अद्याप निर्जल मारवाडाचा समुद्र बनविला नाही अशी रूखरूख लावणारे आकाशाएवढे त्याचे दातृत्व ! वयाच्या सोळाव्या वर्षी, गुणैश्वर्यसंपन्न नलाने सगळे भूमंडळ

पादाक्रांत केले. दरम्यान नलाने तारुण्यात पदार्पण केले : मदनसुंदर नळाला पाहून त्रिभुवनातील सुंदरी, स्वर्गातील देवांगना, मृत्युलोकातील मानुषी ललना व पाताळातील नागकन्या यांना चोरटा अभिलाष वाटू लागला. त्यांचा गूढस्थ भाव उत्कटतेने व्यक्त होऊ लागला. पण भीमराजाच्या लावण्यवती कन्येची : दमयंतीची : गोष्ट थोडी वेगळी होती. यौवनात पदार्पण करणाऱ्या दमयंतीने नलराजाच्या गुणांची कीर्ती ऐकून आपल्यास सर्वथैव अनुकूल हाच 'राजपुत्र' अशा निश्चयाने तिने आपले मन नलावर ठेविले होते. स्वत:च्या रूपगुणांचा गर्व वाहणारी दमयंती आरशात रोज स्वत:चे रूप न्याहाळी व हातातील नलाच्या चित्राकडे नजर टाकून 'मी याना साजेशी आहे काय?' असा स्वत:च स्वत:च्या मनाला प्रश्न विचारी. पण उत्तर नकारार्थक व निराशाजनक. तिच्या सख्यांनी सहज बोलता बोलता 'देवनळ' नावाच्या तृणाच्या जातीच्या तृणाचा उच्चार केला तरी ती हातातील काम टाकून टवकारून आपल्या प्रिय नलाबद्दलच ह्या काही तरी बोलताहेत या समजाने ती कान टवकारून त्यांचे भाषण लक्षपूर्वक ऐकू लागे. तिला दिवसरात्र नलावाचून दुसरा विषय नव्हता.

तिच्यासारखीच नलाचीही अवस्था होती. नल दमयंतीवर अनुरक्त आहे. या अनुरागाची प्रकट होणारी लक्षणे दिवसा कशीतरी तो लोकांपासून लपवी पण स्मरणव्यथेने घायाळ झालेल्या नलाचे हाल प्रत्यक्ष रात्रीला नि त्याच्या कोमल शय्येलाच सहन होत नव्हते! उद्यान विहाराच्या उद्देशाने तो नगराजवळील एका क्रीडोद्यानात जातो. एका हंसीच्या मागे चाललेला एक सोन्याचा राजहंस पाहतो. त्याची कोमल तांबडीलाल चोच आणि चरण अनुरागवृक्षाच्या पाने फुटलेल्या अंकुरासारखी होती. नळ मोहित होतो. हंसाला तो आपल्या करकमलात बंदिस्त करतो. त्याच्याकरवी दमयंतीला निरोप जातो. निरोपानंतर दमयंती मदनबाधेने गळून जाते. विवाहाचा अंतिम उपाय जाणून भीमराज दमयंतीचे स्वयंवर मांडतो. इंद्रादी देवांना दमयंतीची आसक्ती वाटल्याने, प्रत्यक्ष स्वयंवराच्यावेळी दमयंतीपुढे अनेक मठ्ठ उभे राहतात. नेमका नळ कोणता याचा दमयंतीला संभ्रम पडतो. तो सुटतो. अखेर नळाच्या गळचात माळ पडते. पुढे नळाला अनेक भोग भोगावे लागतात. पण दांपत्यजीवनातील सामंजस्य आणि सहनशीलता यांचे अपूर्व नाट्य निसटत नाही, एकनिष्ठा तडकत नाही. भावकोमल प्रीतिभावनेच्या रेषा पुसट होत नाहीत. मानवी जीवनाला आदर्श ठरावे असे इंद्रधनुष्य नजरेसमोर तरळत राहते. डॉ. के. ना. वाटवे यांनी यातील प्रेमाचा शाश्वत त्रिकोण स्पष्ट करून सांगितला आहे : [१]

...श्रीहर्षाने आपल्या 'नैषधीय चरिता'ची उभारणी वनपर्वातील नलोपाख्यानाच्या पूर्वभागावर केली आहे. हा भाग म्हणजे सुप्रसिद्ध नलदमयंती स्वयंवराची अपूर्व व

गोड कथा. आजच्या भाषेत सांगावयाचे तर ही एक अत्यंत अद्‌भुतरम्य प्रीतिकथा आहे. प्रथमदर्शनात प्रेमाचा उद्‌भव : Love at first sight : हा एक जो अभिनव प्रेमप्रकार : Romantic : आमच्या नव्याजुन्या वाङ्मयात व पाश्चात्यांच्या प्रेमकथांतूनही दाखविण्यात येतो त्यापेक्षाही या कथेतील प्रेमोद्‌भव अभिनव आहे. नल व दमयंती यांना परस्पराकृष्ट होण्यास प्रथम दर्शनही लागत नाही. केवळ एकमेकांच्या रूपगुणांच्या श्रवणानेच ती अनुरक्त होतात व सोन्याच्या हंसाच्या सोन्यासारख्या मध्यस्थाने त्यांचे प्रेम दृढ होते. प्रेमकथेला प्रेमाच्या मार्गात आलेल्या अडथळ्यावाचून खरी लज्जत नसते ना? मग तोही अडथळा येतो. कारण प्रियकर, प्रेयसी व प्रियकराचा प्रतिस्पर्धी या प्रेमाच्या शाश्वत त्रिकोणातील प्रतिस्पर्ध्याची उणीव प्रत्यक्ष इंद्रासारख्या देवाधिदेवाने या कथेत भरून काढली आहे. पण या कथेचे सारे खरे अपूर्वत्व इंद्राच्या विरोधात आहे. प्रियकराशी युद्ध करणे, प्रेयसीचा अपहार करणे, त्यापैकी एकास किंवा दोघासही अटकाव करून त्याना धाकदपटशाने किंवा जबरदस्तीने वश करू पाहणे असला कोणताही स्थूल, बाह्य व शारीरिक विरोध इंद्राने येथे केलेला नाही. इंद्राचा प्रेमविरोध सूक्ष्म, आंतर व मानसिक आहे. येथील प्रतिस्पर्धी इंद्र नेहमीचा खल नाही. असा दुष्ट व क्रूर विरोध शिशुपाल, शकार वगैरे प्रतिस्पर्धी करतात. इंद्राचा विरोध कपटीपणाचा असला तरी तो एका सुसंस्कृत, थोर, प्रतिष्ठित व अधिक रूपगुणसंपन्न व्यक्तीचा आहे आणि म्हणूनच तो प्रेमिकांना अधिक तापदायक झाला आहे. नलाच्या औदार्याला, त्याच्या धर्मनिष्ठेला व त्याच्या थोर कुलाभिमानाला इरेला घालून आणि त्याच्या ठिकाणी भक्तीचाच उपयोग करून घेऊन इंद्र त्याला मोठ्या हिकमतीने आपला दूत करतो. प्रथम वचनबद्ध झालेला पण नंतर सत्यनिष्ठेच्या इरेस पडलेला नल आपल्या प्रेयसीचे मन आपल्या प्रतिस्पर्ध्याकडे वळविण्याचे अत्यंत निष्ठुर व्रत धर्मबुद्धीने पत्करतो. विरोधाच्या या विलक्षण योजनेने या कथेत नलाच्या मनात 'प्रेम का कर्तव्य?' असा मोठा मानसिक लढा उत्पन्न झाला आहे. दमयंतीपुढील प्रश्नसुद्धा, इंद्रासारख्या अधिक संपन्न देवेंद्राकडे ओढ घेणारे आपले मन आवरून धरणे असा सामान्य नाही. असला प्रश्न टेनिसनच्या काव्यातील राणी सिनेव्हिअर इच्यापुढे होता. कर्तव्यनिष्ठ व कठोर आर्थर राजा व मोहक लान्सलॉन्ट यापैकी कोणास आपल्या खऱ्या प्रेमाचा विषय करावा याबद्दल तिचे मन द्विधा झाले, ते दाखविले आहे. पण दमयंती मुळी देवेंद्राला प्रथमपासून केवळ वंद्य व आदरणीयच मानते. त्याला प्रेमविषय मानीतच नाही.

साहजिकच संस्कृत पंचमहाकाव्यांपैकी श्रीहर्षाच्या 'नैषधीय चरिता' मध्ये प्रीतिभावनेचे

आविष्करण अर्थातच आधिक्याने आढळते. 'नैषधीय चरिता' तील नल व दमयंती यांना : आणि इतरांनाही : परस्पराकृष्ट होण्यास प्रथमदर्शनाचीही गरज नाही, त्यासाठी केवळ रूपगुणांचे श्रवणही पुरेसे आहे असे नवे सूत्र पुढे येते : ते अद्‌भूत अतएव अभिनव आहे. उजळून टाकणे हे सर्वसाधारण अवस्थांना क्वचित कधीकधी मागेही टाकणारे असते. प्रीतीचा उगम, वसतिस्थान मानवी जीवन व मानवी मन आहे. सुवर्णाच्या हंसाकरवी नलराजाने प्रियेला निरोप देणे किंवा मेघाकरवी यक्षाने प्रियसखीला तो धाडणे ह्या गोष्टी काव्यात्म असल्या, लोभसवाण्या असल्या तरी शेवटी अद्‌भुताच्या पराकोटीत जमा होऊ शकतील अशा आहेत. मात्र त्यांचे आवाहन मानवी मनाच्या परिवर्तनशीलतेला आहे. प्रीती ही एकान्तात फुलत असली, संघर्षात बहरत असली तरी जीवनाच्या अपूर्व, अमर्याद व असीम कक्षा ही तिची परिसीमा आहे. जीवनाचा स्तर जितका उंच आणि आवाका मोठा तितकी प्रीतिभावनेची खोली आणि व्यापकता अधिक. त्यादृष्टीने केवळ संस्कृत पंचमहाकाव्यांतच नव्हे तर एकूण अभिजात संस्कृत वाङमयातच प्रकट झालेली प्रीतिभावना अतिशय समृद्ध आणि संपन्न आहे. बव्हंश सर्वांगांनी तृप्त समाजाची ती संतृप्त भावना आहे. तीत विकृती नसून संस्कृती आहे, कारण त्यामागे कर्तव्यबुद्धी व धर्म यांचे अधिष्ठान आहे. एकूण अभिजात जीवनाला किंवा अभिजातपणाकडे झेप घेऊ पाहाणाऱ्या जीवनालाच अधिष्ठाने संभवू शकतात. अंतिम शाश्वत मूल्यांचे सुभग दर्शन देण्याकडे अभिजात संस्कृत साहित्याचा कल आहे, ओढा आहे तो त्यामुळेचे !

प्रीतिभावनेची ठळक रूपे

त्यादृष्टीने अभिजात संस्कृत नाटकांचा विचार करताना भास-कालिदासास अग्रमान द्यावा लागतो.

भासाच्या 'स्वप्नवासवदत्ता' ह्या शेवटच्या नाटकाचा विचार प्रस्तुत आहे. त्यामध्ये सर्वपरिचित उदयनाची कथा आहे :

> ...उदयन वासवदत्तेला घेऊन उज्जयिनीहून आपल्या कोशाम्बी राजधानीत येऊन थोडा वेळ लोटला आहे. दरम्यान एका बलाढ्य शत्रूनं चाल करून त्याच्या राज्याचा बराचसा भाग जिंकून घेतला आहे. वासवदत्तेच्या हरणानंतर, तिच्या रूपगुणांनी आणि प्रमत्त यौवनाच्या मादक विलासांनी तो मोहून गेला आहे, मूढ बनला आहे. कारभाराकडं अक्षम्य दुर्लक्ष. शत्रूला संधी. परिणाम हा की, राजा उदयनाला आपली राजधानी सोडून आपल्या अन्तःपुरादि परिवारांसह मगध राज्याशी लागून

असलेल्या आपल्या देशाच्या सीमेवरील लावाणक नावाच्या गावात जाऊन राहणं भाग पडतं. त्याच्या मंत्र्यांपैकी यौगंधरायण हा अत्यंत चतुर व राज्यकार्यधुरंधर तर सेनापती रूमण्वान शूर योद्धा आहे. काय करावं अशी चर्चा सचिव मंडळात सुरू होते. काही सिद्ध पुरुषांनी केलेल्या भविष्याची यौगंधरायणाला आठवण होते. 'मगध राजपुत्री पद्मावती ही आपल्या स्वामीची राणी होणार' हे ते भविष्य आहे. ते खरं होणार याचीही त्यास खात्री आहे. का? कारण ज्या सिद्धांनी पद्मावतीसंबंधी भविष्य वर्तविलं आहे; त्यानीच राजा उदयनावर व त्याच्या राज्यावर एक महान संकट कोसळणार असल्याचं भाकित केलं आहे. उदयनाच्या राज्याचा झालेला संकोच ही ह्या भाकिताचीच सूचना आहे. साहजिकच आपल्या राज्याचा गेलेला भाग पुन्हा मिळवावयाचा असेल तर पद्मावतीशी विवाह घडवून आणण्याच्या दिशेनंच आपल्याला पावलं टाकली पाहिजेत, असा सचिव मंडळाचा पक्का विचार होतो पण अडचणीही मोठ्या असतात. राजा उदयनाची वासवदत्तेविषयीची कमालीची आसक्ती त्यास अन्य स्त्रीशी विवाह करण्यास उद्युक्त करील ही त्यास अशक्य गोष्ट वाटते. मग वासवदत्तेच्या संमतीनं, काही कालपर्यन्त राजापासून तिला दूर करून अज्ञातवास पत्करावयास लावणं व आपला हेतु साध्य करणं असा मनसुबा होतो. वासवदत्ता नाहीशी झाल्याचं प्रसिद्ध झाल्याखेरीज राजा उदयनाची आसक्ती तुटणार नाही आणि मगध देशाचा राजा आपली बहीण पद्मावती उदयनाला देणारही नाही. हे उघड चित्र. पहिली पत्नी जिवंत असता व तिच्यावर नवऱ्याचं पूर्ण प्रेम असता सवतीमत्सराच्या खाईत जाणूनबुजून आपली मुलगी लोटण्यास कोण तयार होईल? त्यासाठी वासवदत्ता नष्ट झाली व उदयन विधुर बनला असं सर्वत्र प्रसिद्ध होईल, अशा तजविजीस यौगंधरायण लागतो. वासवदत्ता अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडली अशी आवई उठविली जाते. उदयनापासून तिला तो दूर करतो. पद्मावतीशी विवाह करवितो, राज्य परत मिळवायला साहाय्य देतो. शेवटी भेट व आनंदीआनंद होतो....

'स्वप्नवासवदत्ता' मधून राजा उदयनाचे स्वप्नवासवदत्तेवरील उत्कट प्रेम, एकनिष्ठ प्रेम चित्रित केले आहे. पद्मावती व उदयन यांच्या विवाहाच्याद्वारा उदयनाला राज्यलाभ व्हावा असे नाटकाचे कार्य असले तरी त्यामागील वासवदत्तेच्या उत्कट, उच्च कोटीच्या प्रीतीच्या अधिष्ठानाचे दर्शन लोभसवाणे आहे. त्यासाठी वासवदत्ता उदात्तपणे सर्व सुखांचा त्याग करते. हा त्याग व्यर्थ नव्हे, त्याचे द्विविध फळ तिला मिळते: एक आंतरिक: Psychological: व दुसरे वास्तव: Practical:

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८८०
वा. क्र. २७१८२
निबंध
१७।१।७१

वासवदत्ता पतीवरील दृढ प्रेमाने अमर होते : हे झाले आंतरिक फल. पण वासवदत्तेला केवळ मानसिक समाधान लाभले एवढ्यावरच तिच्या उदात्त त्यागाचे सार्थक होत नाही. त्या दोघांच्या पुनर्मीलनात तिच्या त्यागाचे फल आहे. पाचव्या व सहाव्या अंकातील घटना या वास्तव फलाकडे नेतात. राजा उदयन मृगयेला गेला असता त्याच्या राजवाड्याच्या अंत:पुराला आग लागते, त्यात वासवदत्ता जळून खाक होते. हा वृत्तांत कळतो तेव्हा राजा उदयनाच्या दु:खाला पारावार उरत नाही. आगीतून तिच्या अंगावरील काढलेल्या दागिन्यांना कवटाळून तो आकांत करतो, त्यास मूर्च्छाही येते. एकसारखे जमिनीवर अंग टाकून 'हा वासवदत्ते, हा हा अवन्तिराजपुत्री, हा प्रिये, हा प्रियशिष्ये' असे ओरडत राजा दिवस कंठू लागतो. चक्रवाकीच्या विरहाने चक्रवाक अत्यंत उद्विग्न होऊन आक्रोश करतो पण राजाने आपल्या शोकाने त्यालाही मागे टाकले आहे.

वासवदत्तेच्या वेडाने विकल झालेल्या उदयनाच्या अवस्थेचे भासाने प्रत्ययकारीपणे केलेले वर्णन मुळातून पहावे असे आहे. : ४·५४ : वासवदत्तेचे उदयनावरील प्रेम इतके उत्कट की त्याला कुणी सहज कुरूप वगैरे म्हटलेलेही तिला सहन होत नाही. ती आपली त्याच्या स्तुतीत, गौरवात आणि संकीर्तनात गढून रहते. राजा उदयनावरील अलौकिक व एकान्तिक प्रेमामुळेच त्याला सुधारण्यासाठी, त्याच्या मूळच्या पदासह त्याला प्रतिष्ठा लाभण्यासाठी ती एक दिव्य आरंभते. आत्मार्पणाची तयारी करते. यौगन्धरायणादि मंत्र्यांच्या कटात सामील होऊन खडतर अज्ञातवास व स्त्रियांना अत्यंत उपमर्दकारक, शल्यासारखा बोचणारा सापत्नभावही मुकाटचाने स्वीकारते. स्वत:च्या पतीप्रेमात अन्य वाटेकरी असणे यासारखे सौभाग्यावर घाला घालणारे दुसरे दुर्भाग्य नाही. वासवदत्ता उदयनाची केवळ पट्टराणीच नसून त्याची प्रिया, प्रेयसी व दक्ष गृहिणी आहे. उदयनाच्या वासवदत्तेवरील अढळ प्रेमाने : पराकाष्ठेच्या प्रेमाने : तिच्या प्रीतीला कृतार्थपण लाभले आहे. 'स्वप्नवासवदत्ता' च्या पाचव्या 'स्वप्नांक' मधील राजा उदयनाला पडलेले स्वप्न, त्यानुसारची त्याची कृती ही त्याच्या वासवदत्तेवरील प्रीतिभावनेची अढळ कृती आहे. त्यामुळे तीव्र दु:खातही वासवदत्तेला एका सुखसंवेदनेचा आधार मिळतो. तिचा प्रियकर : तिच्या अनुभवविश्वातील एकमेव वस्तु की जिच्यावर तरळणारी सुखस्वप्ने देखील स्थिर व्हावीत : त्याचे प्रेम तिच्या मानीव वियोगातही अमर राहते. राजा उदयनाचे प्रेमही त्याच तोडीचे आहे. प्रेम नाव धारण करणारा प्रेम हा काही केवळ मनोविकार नव्हे किंवा वासनाही नाही. उभयतांच्या प्रेमात सारे सुखनिधान साठविले आहे. त्यात आख्खे त्रिभुवन आहे.

कालिदासासंबंधी 'शेवटला शब्द' कधी बोलला जाणार नाही असेच त्याचे कर्तृत्व आहे. त्याच्या व्यक्तिमत्वात विद्धत्व आणि कवित्व, त्याची सौंदर्यासक्त दृष्टी आणि जीवनात

आनंद घेणारी संपन्न, खेळकर दृष्टी व समृद्ध निसर्गविषयक जीवनसंबद्ध भावना इत्यादी गोष्टींचा सुरेख संगम झालेला आहे.

'अभिज्ञान शाकुन्तल' मध्ये कालिदासाने दुष्यंत : शकुंतलेची रसाळ प्रीतिकथा मोठ्या उत्कटतेने सांगितली असून हजारो वर्षानंतरही तिची अवीट गोडी थोडीही मंदावलेली नाही. दुष्यंत : शकुन्तला यांची रुचिरमधुर प्रेमकथा सर्व परिचित आहे :

...दुष्यंत राजा, शकुन्तला तापसी कण्वकन्या, तपस्व्यांच्या विनंतीनं शिकारीच्या निमित्तानं आलेला दुष्यंत राजचिन्हं उतरवून कण्वाच्या आश्रमात येतो. शकुन्तला आपल्या दोन सख्यांसह वृक्षवेलींना पाणी घालत असताना दुष्यंताच्या नजरेस पडते. दुष्यंताला मोहात टाकते. अभिलाषा उत्पन्न होते. दरम्यान शकुन्तलेच्या मुखाभोवती एक भ्रमर गुंजारव करीत असून झाडांना पाणी घालणं तिला अवघड होताना दिसतं. भ्रमराला दूर लोटायचं, झाडांना पाणी घालायचं ह्या कसरतीत तिचा जीव मेटाकुटीला येतो. तारांबळ उडते. भय, कणव, लज्जा, चीड इत्यादी अनेक भावांनी तिचं मुख फुलून येतं. आतापर्यंत दूरवर केवळ पाहत उभा असलेला दुष्यंत नेमक्या यावेळी शकुन्तलेसह तिच्या सख्यांच्या रक्षणासाठी एकदम सामोरा येतो. आश्रमात आणि तोही परपुरुष असा सामोरा आलेला पाहून शकुन्तला व तिच्या सख्या गोंधळतात. सावरल्यावर शकुन्तलेच्या सख्या अनसूया आणि प्रियंवदा दुष्यंताचं गोड शब्दांनी स्वागत करतात. शकुन्तलेच्या मनात आश्रमविरोधी विकाराचा प्रादुर्भाव होतो. तिच्या तोंडून शब्दही निघत नाही. शकुन्तलेला दुष्यंत नाममुद्रांकित अंगठी देतो. दुष्यंताचं शिक्षणावरील लक्ष्य उडतं. विदूषकाबरोबर सगळ्या सैन्याची राजधानीकडं रवानगी होते. काही निवडक मंडळींबरोबर, राक्षसापासून यज्ञाचं रक्षण करण्यासाठी, काही दिवसांसाठी दुष्यंत आश्रमात प्रवेश करून घेतो. प्रथमदर्शनानं उद्भुत झालेलं प्रेम दीर्घदर्शनानं दृढ होऊ लागतं. दरम्यान शकुन्तलेची अस्वस्थता पराकोटीला जाते. मैत्रिणी नाजुकपणे तिच्याकडून बिकट अवस्थेचं कारण काढून घेतात. उपाय म्हणून दुष्यंताला प्रेमपत्र लिहायला सांगतात. लिहून पुन्हा त्यातील मजकूर शकुन्तला वाचून दाखवीत असता प्रत्यक्ष राजाच समोर उभा राहतो. प्रेमाची खात्री देतो. शकुन्तलेचा स्वीकार व्हावा, तिला चांगल्या पद्धतीनं वागविलं जावं अशी दुष्यंतराजाला विनंती करून काही तरी निमित्त काढून मैत्रिणी निघून जातात. एकान्त मिळतो. शकुन्तला किंचित अस्वस्थ होते. 'मी पराधीन असल्यानं तू अविनय करू नयेस' असं ती राजाला सांगते. त्यावर क्षत्रियकन्यका वडिलांना न विचारताही गांधर्वविवाह करू शकतात असं

दुष्यंत सुचवितो. विवाह होतो. दुष्यंत नगराला परततो. दुर्वास मुनी आश्रमात येतात. पण स्वागताला कुणीच नसतं. अतिकोपिष्ट दुर्वास भडकतात : 'ज्याचं तू चिंतन करीत आहेस तो तुला ओळखणार नाही', शकुन्तलेला शाप मिळतो. सख्यांच्या तो कानी पडतो. दुर्वास मुनींचा राग शांत करण्यासाठी शकुंतलेची सखी प्रियवंदा धावते : 'अभिज्ञानाच्या दर्शनानं शापाचा अंत होईल' असा उःशाप घेऊन परत येते. शचितीर्थात हरवलेली अंगठी, दुष्यंताला पडलेले विस्मरण, शकुन्तलेची उपेक्षा, मुलांमुळं ओळख इत्यादी प्रसंगांतून 'अभिज्ञान शाकुन्तल' ची अखेर होते. ..

कालिदासाने 'शाकुन्तल'मध्ये प्रथमदर्शनी प्रीतीचे महात्म्य रेखीवपणे वर्णिले असून अगदी पहिल्या अंकापासूनच प्रथमदर्शनी प्रेमाचा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीच्या आविष्करणाला प्रारंभ होतो.

कालिदासकृत प्रथमदर्शनाची गोडी अपूर्व किमया करते. चित्रविचित्र भावनांचे सुरेख चित्र रेखांकित करते. तशी स्वप्नेही पडतात. प्रीतीचे गोत्र सांधल्याखेरीज स्वप्नांचे मनोरे उभे राहत नाहीत : सभोवतालच्या परिसरातून आणि अंगप्रत्यंगांतून हे सारे जुळून येते. या प्रथमदर्शनातील सौंदर्याचे स्थान नाकारता येत नाही. ते निसटणारे पकडू पाहते, पापण्यातून सुटणारे डोळ्यांच्या कडात साठवू इच्छिते. स्वाभाविक बनते : आकर्षणाला सौंदर्याच्या जडीबुटीची गरज पडावी हे नैसर्गिक असते. सौंदर्याचे खरे आकर्षण, आकर्षणातून ओढ, ओढीतून परस्परानुराग, अनुरागातून मीलनाची आसक्ती, आसक्तीतून देहबंधन अशी ही प्रक्रिया आहे. अर्थात सौंदर्य केवळ बाह्य सौंदर्य नव्हे, तर अंतर्बाह्य सौंदर्य असाही त्याचा 'आतला' अर्थ आहे.

त्या अर्थाचे गर्भ हाती देणाऱ्या कित्येक गोष्टी 'अभिज्ञान शाकुंतल' मध्ये आहेत :

शकुन्तलेची काचोळी तटतटते आहे ही काही गमतीची तक्रार नव्हे. नर्मशृंगाराची ती द्योतक आहे : प्रीतिभावनेचे अंकुर फुटू लागले आहेत. बोंडे धरू लागली आहेत, त्यातून तटतटणे घडते आहे. शकुन्तलेचे अलौकिक सौंदर्य, सौकुमार्य आणि नवतारूण्य यांच्या प्रथमदर्शनाने राजा वेडावून जातो. तपोवनात असले काही पाहावयास मिळेल अशी मुळी कल्पनाच नसल्याने तो स्तिमित होतो. शकुन्तलेला वनलतेची उपमा देऊन तो तिच्या सौंदर्यातील अकृत्रिमपणाही सूचित करतो. 'अव्याजमनोहर वपुः' असे दुष्यन्त म्हणतो. : १.१८ : त्रिभुवनातील सारे सौंदर्य मनात एकवटून विधात्याने त्या सारभूत सौंदर्याला

मूर्त स्वरूप देण्यासाठी प्रथम शकुंतलेचे चित्र काढून मग त्या चित्रात त्याने प्राण ओतला असला पाहिजे असे त्याला वाटते. त्याच्यादृष्टीने शकुंतला ' अपरा स्त्रीरत्नसृष्टी ' आहे. केसरवृक्षाजवळ ती उभी राहिली असता एखाद्या लतेचा त्या वृक्षाशी संयोग झाला की काय ? असा प्रियंवदेला भास होतो. राजा दुष्यन्ताने तिला 'अनाघ्रात पुष्पा' ची उपमा दिली आहे. ती खरी ' मुग्धा ' आहे. शकुन्तला आम्रवृक्षाशी वनलतेचा विवाह लावून देते; वनज्योत्स्नेचे अत्यंत रमणीयवेळी आम्रतरूशी मीलन झाले, फुलांनी बहरलेल्या तिच्या यौवनाचे सार्थक झाले या विचाराने तिला फार फार समाधानही मिळते. त्यामध्ये यौवनाने फुललेली मुग्ध प्रणयभावना आहे. मैत्रिणींच्या समवेत पर्णकुटीमध्ये परत जाण्याचा प्रसंग आल्यावरही काहीतरी निमित्त काढून शकुंतला राजा दुष्यंताकडे पुनः पुन्हा वळून पाहते ते उगीच नाही. अगदी थोडी पावले जाताच शकुंतला एकाएकी थबकते. दर्भांकुर पायात रुतल्याचा बहाणा करते. झाडांच्या फांद्यामध्ये वल्कल खरोखर गुंतले नसतानासुद्धा मागे मुरडून पाहून वल्कल सोडविण्याचा देखावा करते. : १.१२ :

शकुंतलेची प्रेमबाधा भलत्या थराला गेल्याचे तिच्या मैत्रिणींच्या ध्यानी येते, त्याबरोबरच दुष्यंतासारख्या पुरुवंशातील श्रेष्ठ राजावर तिचे प्रेम जडले आहे हे समजताच त्यांना बरे वाटते. पुढे एका प्रसंगी, त्या दोघांना एकान्तात सोडून शकुंतलेच्या मैत्रिणी निघून गेल्यावर राजा दुष्यंत आपले प्रेम मोकळेपणाने व्यक्त करतो; नव्हे तिचे पाय चुरण्याचीही तयारी दाखवितो. त्याला ती तसे करू देत नाही. संकोचाने शकुंतला तेथून जाऊ लागते तेव्हा दुष्यंत तिला बळेच मागे फिरवितो. त्याबरोबर ती त्याला आपल्यावरील जबाबदारीची जाणीव करून देते, ही सगळी चित्रे ' अभिज्ञान शाकुंतल ' हे ' दीड हजार वर्षापूर्वीचे आधुनिक नाटक ' कसे आहे ते विशद करते. संस्कृत साहित्याच्या इतिहासात डॉ. दासगुप्ता व डे यांनी कालिदासाच्या वैशिष्ट्यांचा चिकित्सक आढावा घेताना दुष्यंत शकुंतलेच्या संकेतपूर्ण तपःपूत प्रीतीचा सुंदर आलेख काढला आहे.

कालिदासाने ' मालविकाग्निमित्रा ' त शुंग घराण्यातील राजा अग्निमित्राचा ' मालविका ' या राजकन्येशी झालेला प्रणयोत्तर विवाह रंगविला आहे. नाटकास पार्श्वभूमी ऐतिहासिक असली तरी कथानक सामाजिक स्वरूपाचे असून नायिकेला पाहून प्रेमात पडलेल्या नायकाच्या प्रणयाची प्रगती, त्यातील विविध अडथळे व शेवटी प्रेमिकांचे मीलन असे नाटकाच्या संविधानकाचे स्थूल स्वरूप आहे :

... राजपुत्र यज्ञसेन व माधवसेन हे चुलतभाऊ. विदर्भ राज्याच्या वारसाबाबत त्यांच्यात कलह निर्माण होतो. ' यज्ञसेन ' त्यात यशस्वी होऊन विदर्भाधीश बनतो. अयशस्वी

माधवसेन शेजारच्या विदिशेच्या शुंग सम्राट पुष्यमित्राच्या पुत्राला : अग्निमित्राला : आपली बहीण मालविका देऊ करून त्याची मदत मागतो. अग्निमित्राचा यज्ञसेनावर मूळचा दात. चालून आलेल्या संधीचा तो फायदा घेण्याचं ठरवितो. माधवसेनाचा पक्ष उचलून धरतो. अग्निमित्राकडं तो येण्यास निघाला असता यज्ञसेनाच्या सीमारक्षकांकडून अचानक हल्ला चढविला जातो. माधवसेन कैदेत पडतो. या चकमकीतून माधवसेन मंत्री 'सुमती,' सुमती भगिनी 'कौशिकी' व माधवसेनभगिनी 'मालविका' ही मात्र निसटतात. घोर अरण्यातून ते विदिशेकडं मार्गक्रमण करतात. परंतु एकामागून एक कोसळणाऱ्या संकटांमुळं ते रानात लुटारूंच्या तावडीत सापडतात. दरोडेखोरांशी झालेल्या झटापटीत मंत्री सुमती कामास येतो. कौशिकी व मालविका कशाबशा निसटतात : पण दोघींची ताटातूट होते. कौशिकी दुःखावेगानं संन्यास घेते. मात्र मार्ग काढीत काढीत राणी धारिणीच्याच आश्रयास येते, 'पंडिता कौशिकी' म्हणून राहू लागते. धारिणीकडून मालविकेला नृत्यकलेचे शिक्षण देण्यासाठी गणदासनायक नाट्याचार्याची योजना होते. दरम्यान एकदा चित्रशाळेत परिवारासह रेखाटलेल्या स्वतःच्या चित्राकृतीचं राणी धारिणी अवलोकन करीत असता तिथं राजा येतो. त्या चित्रात राजाला राणी–परिवारात सामील झालेली एक अदृष्टपूर्व, सुस्वरूप कन्यका आढळते. औत्सुक्यानं चौकशी होते. पण धारिणीकडून थांगपत्ता मिळत नाही. राजकन्या वसुलक्ष्मी बालसुलभ धीटपणानं ती मालविका असल्याचं सांगते. केवळ चित्रदर्शनानं राजा मालविकेच्या प्रेमात पडतो. तिच्या भेटीसाठी तळमळू लागतो. धारिणीला त्याची चाहूल लागते. मत्सर जागा होतो. मालविकेवर सक्त नजर ठेवली जाते. राजवाड्यात राजाच्या प्रणयाची कुजबूज कर्णोपकर्णी पसरत जाते. राणीची मर्जी सांभाळून मालविकेचा सहवास कसा संपादन करता येईल ही चिंता राजाला बेचैन करीत राहते. सत्तेच्या जोरावर मालविकेची प्राप्ती करून घेणं राजाला प्रशस्त वाटत नाही. या अडचणीत एक मार्ग सापडतो. राजाचा नर्मसचिव विदूषक गौतम राजाचा इष्ट हेतु सिद्ध व्हावा म्हणून त्याला मदत करण्याचं ठरवितो. या योजनेचं : कल्पनेचं : स्वरूप असं होतं : राणीचा आश्रित नाट्याचार्य गणदास व राजाचा आश्रित नाट्याचार्य हरदत्त या दोघांत श्रेष्ठतेविषयी कलह निर्माण करावयाचा, तो विवाद निर्णयार्थ राजाकडं आल्यावर दोघा आचार्यांनी आपली श्रेष्ठता आपापल्या शिष्यांच्या नृत्याभिनयाच्या प्रात्यक्षिकानं सिद्ध करावयाची. त्यानिमित्तानं मालविकेचं नृत्य राजापुढं होईल, निरगाठ सुटेल ही आशा. प्राश्निक कौशिकीच्या सुचविण्यावरून 'छलित' नामक कठीण भावदर्शी नृत्य मालविका चतुष्पदी गीतिकेच्या साहाय्यानं सर्वासमक्ष करून दाखविते. त्यावेळची तिची विरल वेषभूषा, अंगप्रत्यंगातून

ओसंडणारी मोहक यौवनकांती, सुडौल ठेवण, अप्रतिम रूप, कमनीय सौंदर्य आणि अजोड कलावैदग्ध्य यांची प्रतीति येऊन राजा पूर्णपणे मोहून जातो, आर्त बनतो, प्रणयविव्हल होतो. त्याप्रसंगानं मालविकेच्या हृदयातही राजाविषयी प्रणयोद्भव झाल्याचं दृष्टोपत्तीस येतं. मग नायकनायिका परस्परविरहानं झुरल्यावर दोघांची गाठ पडणं मुष्किलीचं होतं. यातना बळावते, वसंतऋतु असूनही धारिणीच्या आवडत्या सुवर्णशोकवृक्षाला मोहोर येत नसल्यानं त्याची दोहदपूर्ती करावयाची राणी ठरविते. विदूषकाच्या खोडसाळपणानं धारिणी हिंदोळ्यावरून पडून तिचा पाय दुखावतो. ओघानंच दोहदपूर्तीचं काम मालविकेवर येतं, त्यासाठी मालविका प्रमदवनात अशोकाच्या रोखानं जाते. दरम्यान विदूषकानं राजाला दोलाक्रीडेसाठी प्रमदवनात आणलेलं असतं. अशा घटनाक्रमातून गाठीभेटीचा योग येतो. मालविकेनं केलेल्या दोहदपूर्तीमुळं पाच दिवसातच सुवर्णशोकाला बहर येतो. मालविकेचं भाग्य उजळतं. तिला राणीपद मिळतं...

'मालविका' राजकन्या असून तिच्याठायी अप्रतिम लावण्य, देहसौष्ठव व कमनीय सौंदर्य वास करीत आहे. त्याबरोबर स्त्रीसुलभ शालिनता, कलासक्त व नैसर्गिक लज्जा यानीही ती युक्त आहे.

कालिदासाने तिच्या व्यक्तिमत्त्वातील छटा : भासाने अज्ञातवासातील वासवदत्तेच्या प्रकट केल्या आहेत तशा : चित्रित केलेल्या नाहीत. मदनदाहाने जळणाऱ्या तिच्या मनाचे चित्रण अंक तीनमधील तिच्या 'स्वगता'मध्ये भेटते. ती स्वतःच्या प्रणयसाफल्यासाठी अनेक अडचणीमुळे काहीच प्रयत्न करू शकत नाही. उलट राजाच्या प्रेमात पडून विरही अवस्था नशिबी आल्यावर दुसरा आधार नसल्याने तिला काहीशी भ्रमिष्टावस्थाच प्राप्त होते. 'कुत्र नु खलु प्रस्थितास्मि' या उद्गारातून ते स्पष्ट होते. प्रीतिभावनेमुळे धारिणी व इरावती यांच्याकडून तिला छळ सोसावा लागतो. अंधारकोठडीत तिची रवानगी होते. शेवटी साफल्य लाभले तरी मालविकेच्या प्रणयभावनेच्या प्रगतीचे चित्रीकरण बरेचसे सांकेतिक राहते. प्रीतीचे नाजूक धोहाळे 'मालविका' मध्ये तीव्रतेने जाणवतात. कमलवेळ दृष्टीला पडल्यावर हत्ती मगराची भीती बाळगीत नाही तसे मनाचे होते. गुंतागुंती वाढतात. मनच मनाशी छळवाद आरंभते. हुरहुरीचा हा छळ समजतो, जाणवतो पण शब्दात कुठे पकडता येतो? त्याला निश्चित रूप देणे कठीण जाते. स्वतःच वैफल्याचे, विलापाचे लक्ष्य बनायला होते. शृंगार फुलतो. पण कधीकधी तो मरणशृंगारही ठरतो. शिवाने भस्मसात केल्यावर मदनवृक्षाच्या पालवीच्या पहिल्यापहिल्या धुमाऱ्याप्रमाणे दिसणारे प्रेम क्रमाने दाट, गहन, गडद बनते.

प्रीतीचे सामर्थ्य इतके अजोड की, शांभवीच्या कैफाने इरावतीचे मन मरगळून गेले असताना, आर्यपुत्रांना भेटायला ती आसुसलेलेही राहते. दोलाघरात आल्यावर शांभवीचा कैफ मंदावून इरावती निपुणिकेला 'निपुणिके, नात्रार्यपुत्रो दृश्यते' असा प्रश्न विचारते. आर्यपुत्र 'प्रेमाची कसोटी प्रेमानंच लावावी,' हे सज्जनांचे बोलणे प्रमाण मानतात. आरक्तता : अनुराग : वृद्धिगत झालेला आणि उपभोगाला योग्य अवस्थेत असलेला आर्यपुत्र मालविकेच्या समोर दाखल झाल्याचा भास होतो. मालविकेला हा भास आभास आहे हे कळते. भासातील महाराज महाराज नसून अशोकाच्या डहाळीवर डोलणारा पालवीचा घोस आहे हेही कळते; तेव्हा राजाच्या दृष्टीने या भासाचेही वेगळे महत्त्व राहते. प्रीतिभावनेत त्यास मिळणारे प्रतिकरूप काही परिमाणे धारण करते.

कालिदासाच्या प्रीतिभावनेचे एकूण स्वरूप, मानवी भूमिकेतून मुक्त प्रेमाचा पुरस्कार असे दिसते. ते भावकोमल आणि उदात्तरमणीय आहे.

भवभूतीः ते हि नो दिवसा गताः।

कालिदासाच्या बरोबरीने येणाऱ्या महाकवी भवभूतीच्या नाटचकृतीत प्रीतिभावनेच्या प्रखर दर्शनाला उदात्ततेचा स्पर्श आहे. 'उत्तररामचरिता'त त्याचा सर्वार्थाने प्रत्यय मिळतो. मानवी जीवनमूल्यांचा आदर्श आपल्या कृतीतून जगापुढे मांडण्यात भवभूतीने उत्कृष्ट यश संपादिले आहे : भवभूतीने रामकथेवर आधारित 'महावीरचरित' व उत्तररामचरित' ही दोन नाटके व 'मालतीमाधव' हे प्रकरण अशा तीन नाटचकृती रचल्या आहेत. रामरावणांचे शत्रुत्व सीतास्वयंवरापासून उत्पन्न होते. सीताहरणानंतर लंकेत जाऊन राम रावणाचा वध करतो; इथपर्यंतचे कथानक 'महावीरचरिता'त आले आहे. 'मालतीमाधव' मध्ये नायक माधव याचे मालतीवर जडणारे प्रथमदर्शनी प्रेम अनेक अडचणीतून प्रगट होते व मित्राच्या साहाय्याने माधवाचे मालतीशी मीलन होते असे चित्रण आढळते. काल्पनिक कथानकावर शृंगाररसाचा साज चढवून भवभूतीने एक अद्‌भूतरम्य संविधानक या 'प्रकरण' नामक नाटचप्रकारात ग्रथित केलेले आढळते. मात्र अक्षरवाङ्‌मयाची सारी गुणलक्षणे 'उत्तररामचरिता' स लागू पडतात. वाल्मीकीचा राम हा उदात्त आदर्श नायक असे पटल्यावर, रामकथेला नाटचरूप देण्याचे ठरवून भवभूतीने राम चरित्राचे दोन भाग पाडले असून पहिल्या 'महावीरचरिता' त उदात्त नायकाचे वीरोचित गुण रंगवून 'उत्तररामचरिता' त रामाच्या जीवनातील शोकात्म प्रसंग चित्रित केले आहेत. रामाच्या उत्तरकालीन जीवनाचा पल्ला मोठा, खेरीज त्यास नाटचरूप देण्याचे कार्य अवघड. म्हणून त्यातील निवडक घटनांच्याद्वारा रामाचे व्यक्तिमत्त्व प्रभावी रीतीने

मांडण्याचे धोरण भवभूतीने स्वीकारले. 'उत्तररामचरित' त्यातून घडले गेले : 'चित्रदर्शन', 'पंचवटीप्रवेश', 'छायांड.क', 'कौसल्यजनक योग', 'कुमारविक्रम', 'कुमारप्रत्यभिज्ञान', 'संमेलना'दी सहा अंकांतून ' उत्तररामचरित ' उभे झाले आहे.

...अयोध्येत रामचंद्राच्या राज्याभिषेकाचा सोहळा आटोपून राक्षस, वानरादी सैन्यप्रमुखांनी सैन्यानिशी आपापल्या प्रदेशात परत जाण्याचं प्रस्थान ठेवलं. उत्सवास जमलेली मंडळी परतू लागली. वसिष्ठ : अरुंधती इत्यादी वडिलधारी मंडळी ऋष्यशृंगाच्या आश्रमात बारा वर्षे चालणाऱ्या सत्राला उपस्थित होण्यास निघून गेली. त्यामुळं राजप्रासाद सुना आहे. सीतेला दिवस गेले असून तिचे डोहाळे पुरवावेत असा रामाला वसिष्ठादिकांनी निरोप पाठविला आहे. तिला रंजविण्यासाठी लक्ष्मण, महालात मुद्दाम काढवून घेतलेली त्यांच्या पूर्वजीवनातील चित्रं, संततीत उत्क्रांत होणारी जृंभकास्त्रं, रामलक्ष्मणादिकांचा विवाहप्रसंग, परशुराम पराभव, मंथरेचं कारस्थान, वनवास, शूर्पणखा प्रसंग, जटायूवध, चित्रकूट, शबरी, हनुमान इत्यादी घटना, व्यक्तींचं चित्रण राम-सीतेस दाखवीत आहे. ती पाहताना रामसीतेच्या स्मृती चाळविल्या जाऊन विविध भाव मनात उचंबळून येतात. विशेषत: गंगेचं दृष्य पाहून सीतेला तिच्या सन्निध जाऊन राहावं अशी इच्छा होते. राम, लक्ष्मणाला सीतेची दोहदपूर्ती करावयाचा आदेश देतो. चित्रदर्शनानं शिणलेल्या सीतेला झोप आल्यामुळं रामाच्या बाहूवर मान विसावून ती निद्राधीन होते. इतक्यात दुर्मुख नागरिकांची ऐकलेली मतं रामाला सांगण्यासाठी येतो. त्यातून सीतेच्या चारित्र्याविषयी प्रजाजन साशंक असल्याचं रामाला ज्ञात होतं. रघुकुलाचं नाव निष्कलंक राहून प्रजापालनाचं कर्तव्य पार पाडत असता नागरिकांच्या आराधनेचं ध्येय साध्य करण्याच्या हेतुनं राम सीतेचा त्याग करण्याचं ठरवितो व दोहदपूर्तीच्या मिषानं तिला लक्ष्मणाबरोबर रथातून वनात पाठवून देतो. सीतात्यागाला बारा वर्षे लोटतात. दरम्यान वाल्मीकी, रामायणकथा काव्यात ग्रथित करून लव-कुश या बालकांचा प्रतिपाळ करतात : त्याना धनुर्वेद आदि सर्व शिकवितात. राम अश्वमेध यज्ञ करताना सीतेची सुवर्ण प्रतिकृती पत्नी म्हणू योजतो. राम जनस्थानात येण्याच्यावेळी सीतेला त्याचं दर्शन घडविण्यासाठी, त्याला मूर्च्छा आल्यास आपल्या मृदु हस्तस्पर्शानं त्याला संजीवन देण्यासाठी गंगेनं तिची अदृश्य अवस्थेत रामसन्निध उपस्थिती योजिली आहे, तर तमसा नदी देवतारूपानं सीतेला दिलासा देण्यासाठी तिची सोबत करीत आहे. पंचवटीतील आगमनानंतर रामाला सीतेसह पूर्वी उपभोगलेल्या प्रणयाचे साक्षीदार असा, विविध भूप्रदेश व निसर्गदृश्य पाहून वारंवार मूर्च्छा येते. छायारूप सीता आपल्या हस्तस्पर्शानं त्याला सावध

करते. साहजिकच सीता जिवंत असून जवळपास कुठं तरी आहे असा रामाला वारंवार भास होतो, शंका येते. वासंतीला ते पटत नाही, तिला ती उन्मादावस्था वाटते. त्याची कठोर शब्दात ती हजेरी घेते पण सीतेसारख्या आर्य पतिव्रतेला ते रूचत नाही, मात्र राम : वासंती संवादातून रामाची मनोभूमिका व प्रणयातील निष्ठा विदित होऊन सीतेचं मन साफ होतं व परित्यागाचं तिच्या मनाचं शल्य समूळ नष्ट होतं. ...

भवभूतीचे समृद्ध जीवन व उत्कट अनुभूती, सुखी वैवाहिक जीवन व अपत्यस्नेह यांचे आशयसंपन्न दर्शन प्रतिकरूपाने ' उत्तररामचरित ' मध्ये आढळते. जीवनात दोन व्यक्ती एकत्र येतात तेव्हा काही आंतरिक हेतु असावा असे भवभूती सांगतो. तो म्हणतो : ' काही अवर्णनीय अंतःस्थ कारण वस्तूंना एकत्र बांधून टाकतं, बाह्य उपाधींची प्रीतीला गरजच लागत नाही. सूर्य उगवताच श्वेतकमळ प्रफुल्लित होतं, अन् चंद्र उगवला की चंद्रकांत मणी द्रवू लागतो.' साहजिकच प्रिय व्यक्ती हा एक अलौकिक ठेवा आहे असे भवभूती मानतो. तो म्हणतो : ' एकमेकांसाठी : काही न करता देखील : एक माणूस : दुसऱ्याला सुखावून त्यांची दुःखं दूर करतो. जे माणूस ज्याला आवडतं ते म्हणजे त्याचा एक अलौकिक ठेवाच होय.' प्रीतिभावनेत त्यानुषंगाने मनाचे सामंजस्य घडण्यास दीर्घकाल जावा लागतो; हे खरेच, पण नेहमीसाठीच ते खरे नव्हे. स्नेहरज्जूंचे सामर्थ्य इतके प्रभावी आणि चिवट की हृदयाची मर्मे तो शिवून टाकतो. भवभूती ' हृदयाची मर्मे ' शिवून टाकणारी सूत्रे सांगतो.

हे सारे घडते ते अपत्यसंभवामुळे. केवळ 'तो' आला नि 'ती' आली व मजा झाली, म्हणजे सारे झाले असे होत नाही. अपत्य हा दोघांना बांधणारा आणि त्यांना उत्तरदायित्वाची जाणीव देणारा पूल आहे. प्रीतिभावनेची वाटचाल ही एकमार्गी यातायात नसते. त्यादृष्टीने अपत्य ही दांपत्यांना बांधून टाकणारी आनंदग्रंथी होय. ' ते हि नो दिवसा गताः ' अशीच मुळी साऱ्या प्रीतीची धुंदी असते. भवभूतीने ' उत्तररामचरिता ' च्या पहिल्या अंकातील एकोणिसाव्या श्लोकात मांडलेली प्रणयाची कल्पना साऱ्याच वाङ्मयात अजोड ठरणारी आहे. तो लिहितो:

जीवत्सु तातपादेषु नवे दारपरिग्रहे
मातृभिश्चिन्त्यमानानां ते हि नो दिवसा गताः ।

अशी रम्य दिवसांची आठवण करून देणारे भवभूतीच्या नायकनायिकांचे परस्पर प्रेम हे अत्यंत विशुद्ध, आदर्श, दिव्य स्वरूपाचे आहे. ते उत्कट तितकेच उदात्त आहे. अशा प्रेमाची

परिणती वियोगात व्हावी हे पटण्यासारखे नाही. वियोगोत्तर शेवट अंतिम मीलनात व्हावयास हवा, भवभूतीने नेमके हेच करून दाखविले आहे. भवभूतीच्या एकूण काव्याचा सारा नूरच सूचकतेपेक्षा आविष्करणाकडे अधिक असतो. घटनांच्या प्रगतीपेक्षा भावनांचे चित्रीकरणच तो करीत जातो. म्हणून उत्कट भावनाविष्कार त्याच्या काव्याप्रमाणे नाटकांतही दिसतो. रसाच्या परिपोषाकरिता रोदन, मूर्च्छा, शोक यांचा सतत उच्चार कंटाळवाणा वाटत असूनही ते सगळे करीत भवभूती पात्रांचे भावविश्व व घटनाप्रसंगांमधील कारणसंगती उत्कटतेने उकलत नेतो. प्रीतिभावनेच्या आविष्कारासाठीही भवभूतीने निसर्गाचा वापर, हृदयाच्या मर्मस्थानीचा वेद सहज वाचता यावा इतक्या कौशल्याने करून घेतला आहे. ' उत्तररामचरिता ' तील ' चित्रदर्शना ' त त्याचा प्रत्यय मिळतो. त्यात प्रियानाशाने दुःखाचा तर पार कडेलोट होतो.

त्यादृष्टीने 'उत्तररामचरिता' मधील तिसरा अंक 'छायाङ्कः' प्रीतिभावनेचे आविष्करण आणि प्रणयनिष्ठेचे व्यक्तिकरण या दृष्टीने विशेष महत्त्वाचा आहेः या अंकातील पंचवटीच्या प्रदेशात सीता गंगेच्या अदृश्यरूपाने वावरत आहे. मात्र रामाला सीता दिसत नसली तरी भासमान होत आहे व सीतेला राम दिसत असला तरी उघडपणे बोलत नाही किंवा भेट घेता येत नाही आणि तरीही रामाचे संपूर्ण भावदर्शन सीतेला आपोआप होत आहे. या भेटीचे हे वैशिष्ट्य आहे. त्यातून राम आपल्यावरील दृढ प्रेमाचा, ते यत्किंचित्ही ढळले नसल्याचा सीतेला प्रत्यक्षच प्रत्यय देतो. आर्य पुरंध्रीला शोभेशी तिची पतीनिष्ठा अभंग राहिल्याचे रामचंद्राला जाणवते. आपल्या स्पर्शातील विलक्षण जादूचा तिला पुनःप्रत्यय मिळतो व ' आपण दोघं एकमेकांची हृदयं नीट ओळखतो ' याचीही ती ग्वाही देते. निसर्गातील हत्ती, मोर यासारखे तिचे स्नेही कुश-लवांची व तद्द्वारा पतीनिष्ठेची तिला आठवण करून देतात. पतीसान्निध्यात ती गृहिणीः कुटुंबिनीः होते. भवभूतीची प्रीतीची कल्पना भौतिक पातळीवरली वाटली तरी मूलतः ती आध्यात्मिक, आदर्श स्वरुपाची आहे. स्त्रीपुरुष संबंधांचे, मैत्रीचे गोडवे गाताना त्याची लेखणी अतिशय हृद्य रुप धारण करताना आढळते. त्यामुळेच 'उत्तररामचरिता' त बहुरंगी प्रेमाचे दर्शन घडते.

सर्व प्रकारच्या प्रीतिभावनेच्या आविष्काराचे मूळ तत्व म्हणजे त्याला कुठलेही तार्किक कारण नसते, त्या कारणाचे वर्णनही करता येत नाही, असे भवभूती मानतो. पण कुठल्या ना कुठल्या कारणानेच दोन व्यक्ती एकत्र येतात व परस्परांच्या मनात प्रीतिभावना जागृत होते. त्या कशा येतात, का होतात हे अचूकपणे सांगणे तसे कठीणच ! त्यास कुठलातरी अंतर्गत हेतूच कारणीभूत असतो. बाह्य कारणावर प्रेम कधीही अवलंबून असत नाही. सूर्य उगवल्यावर श्वेतकमल आपोआप विकसित होते. ते का व्हावे याचे कारण सूर्याला

श्वेतकमलाविषयी वाटणारे प्रेम की श्वेतकमलाला सूर्याविषयी वाटणारी ओढ, यापैकी निश्चित कोणते ते सांगता येत नाही. खरे तर प्रेमाचे मूळ शोधणे ही सृष्टीतील अनाकलनीय गूढ क्रिया आहे.

श्रीहर्ष : अवीट प्रीतीची तृप्ती

श्रीहर्षाने 'रत्नावली' नाटिकेत भासाच्या 'स्वप्नवासवदत्ता' प्रमाणे राजा उदयनाचीच कथा सांगितली आहे. श्रीहर्षाने 'रत्नावली', 'प्रियदर्शिका' व 'नागानंद' अशी तीन नाटके लिहिली. त्या सर्वात संविधानक रचना, स्वभावपरिपोष इत्यादी अंतर्गत गुणांवरून पाहता 'रत्नावली' श्रीहर्षाच्या परिणत प्रज्ञेची द्योतक वाटते. 'रत्नावली' तील राजा उदयनाच्या कथेत, आपल्या नकली प्रियेवर भावनोत्कट प्रेमाची फुले उधळत असता उदयनाला वासवदत्तेचा आठव होतो; तर पतीने केलेले परस्त्रीचे रसोत्कट प्रेमाराधन ऐकण्याचे दुर्भाग्य नशिबी येऊनही, क्रोधायमान बनूनही वासवदत्ता पतीच्या अवीट प्रीतीच्या तृप्तीत डुंबताना भेटते. अधिक ताणून धरण्याने वैवाहिक सुखाला मनुष्य आचवतो हे जाणून ती पश्चातापदग्ध होऊन माघारी फिरते. 'रत्नावली' तील उदयन वासवदत्तेला मानतो. तिच्याशी सौजन्याने वागतो, तिला भितो व तिच्या पायाही पडतो. पण हा देखावा सागरिकेच्या प्रेमप्राप्तीसाठी असतो. सागरिकेवरील राजाचे प्रेम बहुतांशी शारीरिक आहे, इतकेच नव्हे तर स्वपत्नीच्या पूर्वपरिचित समागमापेक्षा नव्या स्त्रीच्या समागमाची लज्जत कामीजनांना विशेष मोलाची वाटते, असे उद्गारही तो आत्मसमर्थनार्थ काढतो. त्याचे त्यास विशेष काही वाटत नाही. पण श्रीहर्षाने, आपल्या साहित्यातून अवीट प्रीतीची तृप्ती दिली आहे.

वेणीसंहार : ऊर्जस्वल क्षात्रतेजाचा आविष्कार

या जोडीने श्रीभट्टनारायणप्रणित 'वेणीसंहार' मधील भीमाचा, कृष्णेच्या प्रीतिभावनेच्या संदर्भातील ऊर्जस्वल क्षात्रतेजाचा आविष्कार, खासच दिपवून टाकणारा आहे. या प्रीतिनाट्यात वादळ तर त्यामधील काव्यात स्वप्न आहे. एका बाजूला दुर्योधन व त्याच्या पत्नीची : भानुमतीची : पतीपरायणवृत्ती : अंक २ : व दुसऱ्या बाजूला भीम आणि त्याच्या तेजसंपन्नतेला आवाहन करणारी कामिनी : भामिनी : मानिनी द्रौपदी असे भेदक चित्र आहे. त्यादृष्टीने दुसऱ्या अंकातील शृंगाररसाचे दर्शन परंपरेला रूचणारे नसले तरी त्याच्या स्वप्नदर्शनातील आणि पताकास्थानातील सूचकता अतिशय परिणामकारक आहे. आपल्या कर्तृत्ववान पतींची नालायकी क्षणाक्षणाला पुकारीत एखाद्या विरहिणीप्रमाणे

द्रौपदी केस मोकळे सोडून सगळचा 'वेणीसंहार' मध्ये वावरत राहते. भीमाने नकळत दिलेली धुमसणाऱ्या अंगाराची उपमा द्रौपदीस सर्वथैव लागू पडते. स्वतः जळत राहून भीमाला उद्दीपित करण्याचे कार्य ती सतत करीत राहिली आहे. भीमावर तिचे जीवाभावाचे प्रेम आहे. भीम गेल्याची खोटी बातमी ऐकूनही ती दुःखाने वेडीपिशी होते. : अंक ६ : शोकाने ती टाहो फोडते आणि चितेत स्वतःला जाळून घ्यायला निघते. भीमाबद्दल तिला वाटणाऱ्या प्रीतीचा पाया भीमाचा भीमपराक्रम आणि त्याबद्दलचा तिचा विश्वास यात आहे. या विश्वासावरच भीमाने अजाणता केलेली उपेक्षाही ती आनंदाने सहन करते. मात्र पराक्रमावरील या जिव्हाळ्यानेच भीमाला तेवढे 'नाथ' म्हणायला आणि बाकीच्यांना 'आर्यपुत्र' किंवा 'महाराज' अशी सभ्य संबोधने वापरायला ती कमी करीत नाही. नकुल : सहदेवाबद्दल तर ती अविश्वास आणि अनादर स्पष्टपणे प्रकट करते. कोणाही एका पांडवाशी युद्ध करण्याची सवड भीमाने दुर्योधनाला दिली हे ऐकल्यावर, 'दुर्योधनानं नकुल : सहदेवाशी लढण्याचं ठरविलं असतं तर कहर गुदरला असता' असे म्हणायला ती कचरत नाही. या स्पष्ट उल्लेखातून युधिष्ठिराला ती वगळते, ते स्त्रीदाक्षिण्यामुळे यात शंका नाही. भीम हाच तिचा खरा 'नाथ', म्हणजे रक्षणकर्ता. तो नाही तर ती 'अनाथ' आहे. दुर्योधनाच्या रक्ताने माखलेल्या हाताने भीम तिचे केस हातात घेतो तेव्हा तिची सूडाची भावना खऱ्याखुऱ्या अर्थाने शांत होते. त्या आनंदाच्या क्षणी, लाडिकपणे भीमाच्या हातून वेणी घालून घेण्याची स्वतःची मनीषा ती पुरी करून घेते. या उलट दुर्योधनाची पत्नी : भानुमती : हिचे चित्र असून तिच्या रूपाने संस्कृत लेखकांना प्रिय असलेल्या आदर्श हिंदु पतिव्रतेचे चित्र भट्टनारायणाने रंगविले आहे. भानुमतीची भीरूता इतकी मोठी की, अशुभ स्वप्नाने तिच्या जीवाचे पाणी झाले आहे. ती इतकी भेदरली आहे की दहादा थांबून श्वास घेतल्याशिवाय तिला स्वप्नाचा वृत्तांत सुद्धा नीट सांगता येत नाही. त्यात भरीला वादळ. तिची छाती धडधडते, पाय लटपटतात, पतीचा आधार घेतल्याशिवाय तिला चालणेही मुष्किल होते. दारूपर्वतावरील सुरक्षित प्रासादात गेल्यावर कितीतरी वेळ तिचा थरकाप थांबलेला नाही. भानुमतीच्या नाजूक सुंदरपणाचा वाटाही यात कमी असे नाही. तिला उद्देशून काढलेल्या दुर्योधनाच्या उद्गारात तिच्या सर्वस्पर्शी सौंदर्याचा ग्वाही आहे. भानुमतीचे हे चित्र आर्यपतिव्रतेचे चित्र असून पतीच्या कल्याणासाठी व्रत, पूजा आणि नियम यांचे पालन करण्यात ती जीवाचे रान करते. प्रभातकाळच्या मंगलवेळी ती स्वतः व्रतस्थ असता, दुर्योधनाने येऊन व्रतभंग करावा, इतकेच नव्हे तर सखी : दासींच्यासमोर अवेळी प्रेमाचे चाळे करावेत हे तिच्या आर्जवी, शालीन स्वभावाला पसंत नाही. पण निषेधाचा एक शब्दही ती तोंडावाटे काढीत नाही. दुर्योधनाला तिने प्रेमाने जिंकून घेतले आहे. 'वेणीसंहार' च्या दुसऱ्या अंकातील श्लोक ९, १०, १६ व १८ मधील दुर्योधनाचे प्रेमालाप त्याचे प्रत्यंतर

ठरावे. द्रौपदीच्या भीमावरील प्रेमात दाहक हुकूमत आहे, म्हणून तिच्या मनासारखे करायला भीम प्राणपणाने झगडतो. द्रौपदीचे प्रेम तिच्या पतीला पराक्रमाची प्रेरणा देते. उलट भानुमतीच्या स्वभावातील मृदुता व शालिनता, दुर्योधनाच्या भोगप्रियतेलाच भडकावतात. भानुमतीचे प्रेम हे तिचे तिलाच बंधनरूप होते. अर्थात काहीही असले तरी भानुमतीची पतीनिष्ठा अढळ ठरते.

विशाखदत्ताच्या 'मुद्राराक्षस' या ऐतिहासिक नाटकात, आर्य चाणक्याच्या संदर्भाने इतिहासातील राजकीय विषयावर भर दिलेला असून 'वेणीसंहार' प्रमाणे त्यात प्रीतिभावनेचा भाग अल्पांशाने आढळतो, पण आहे त्यात मात्र चांगला रंग भरलेला आहे. आणि त्या रंगाला त्याची म्हणून विशिष्ट बाजूही आहे. हा बाज 'मुद्राराक्षस' मधील पहिल्या अंकातील पहिल्या श्लोकातून व्यक्त होतो. शिव व त्याची पत्नी पार्वती यामधील एक चतुर संभाषण या श्लोकात आहे. आख्यायिका अशी आहे :

> ...पूर्वी गंगा नदी स्वर्गलोकात होती आणि तेथे तिला 'मंदाकिनी' असं म्हणत असत. उग्र तपश्चर्या करून भगीरथानं तिला पृथ्वीवर येण्यास भाग पाडलं, परंतु तिच्या प्रवाहाचा जोर पृथ्वीला सहन करता येणं शक्य नसल्यामुळं शंकरानं तिला आपल्या जटेत धारण करण्यास संमती दिली. अशा रीतीनं शिवाचं मस्तक हे स्वर्गीय गंगेचं आश्रयस्थान झालं. परंतु ती पार्वतीची प्रतिस्पर्धिनी झाल्यामुळं पार्वतीला तिचा मत्सर वाटू लागला. म्हणून गंगेविषयीच्या असूयेनं ग्रस्त होऊन पार्वती आपल्या पतीला त्याच्या नूतन प्रेयसीविषयी 'खोचक' प्रश्न विचारीत आहे...

या प्रश्नामधील 'धन्या' शब्दात सारा खोचकपणा भरलेला असून आपल्या पतीने कुणा अपरिचित नव्या स्त्रीला स्वतःच्या डोक्यावर बसण्याची परवानगी दिली हे अघटित आश्चर्यच आहे असे पार्वती म्हणू पाहते आहे. साहजिकच शंकराकडून तिच्याविषयी माहिती मिळविण्यासाठी पार्वती हरतऱ्हेचे प्रयत्न करते आणि मोठ्या चातुर्याने टाळाटाळीची उत्तरे देऊन शंकर तिला हवी असलेली माहिती लपविण्याचा प्रयत्न करतो पण त्यातून प्रकट होत जाणारी प्रीतीची घालमेल फारशी उत्कट नाही पण आहे ती वेधक आहे.

प्रीतिभावना : 'संस्कृत' व 'संस्कृति'निष्ठ आत्मा

सारांश, एकूण संस्कृत पंचमहाकाव्ये ब नाटचकृती वगैरे अभिजात संस्कृत साहित्याकडे प्रातिनिधिक दृष्टिक्षेप टाकला की प्रीतिभावना मानवी जीवनाची मूळ प्रवृत्ती आहे;

अधिष्ठान आहे हे जाणवते. प्रारंभीचे मोहग्रस्त प्रेम निष्फल ठरते पण समृद्ध प्रीतीच्या जीवाला उदात्ततेचा स्पर्श होतो आणि मांगल्याने ते झळाळून निघते, परिपूर्ण बनते. प्रीतीचे शांत, संयमित व कल्याणप्रद श्रेष्ठ रूप अवघ्यांना कृतार्थ बनविते. 'प्रेमाचे अंतिम ध्येय प्रेम' असे भारतवर्षातील पूर्वसुरींनी मानलेले नाही. प्रीतीचा परमोच्च बिंदू म्हणजे मांगल्य अशी त्यांची उद्घोषणा आहे. प्रेम वंध्य असेल, ते स्वतःच दग्ध होऊन जात असेल, कल्याणाला ते जन्म देणार नसेल, नित्याच्या संसारात ते पुत्र, कन्या, अतिथी किंवा शेजारी यांच्यामध्ये विविध सौभाग्यऐश्वर्याने नटून वावरत नसेल, तर स्त्रीपुरुषांमधील प्रेम सुंदरही म्हणता येणार नाही वा स्थिरही म्हणता येणार नाही. संस्कृत साहित्यात, प्रीतिभावनेला उदात्ततेकडे खेचणारा सूर सर्वत्र आढळतो. स्त्रीपुरुष संबंध संयमीच असला पाहिजे, असा कठोर उपदेश भारतवर्षातील आर्षग्रंथांतून वारंवार करण्यात आला आहे. संस्कृत साहित्यातील या संबंधाला सौंदर्याची जोड लाभली असून शोभा, विनय आणि पावित्र्य यानी तो खुलून राहिला आहे. त्यागाने त्यास संपूर्णत्व लाभले आहे. स्त्रीपुरुषांच्या दुर्निवार उच्छृंखल प्रेमाचा प्रलयवेग संयत बनल्याने नितान्त शुद्ध होत जातो. त्यामुळे बंधनरहित उन्मत्त प्रेमसंबंधापेक्षा त्याची योग्यता नि प्रतिष्ठा अधिक व्यापक व अपूर्व ठरते. प्रणयतृषार्त स्त्रीहृदय चिरवंचित असते, तर पुरुष नव्या नव्या प्रेमशोधार्थ लीलायुक्त कंपित मानसिक वातावरणात सतत वावरत असतो. यौवनमत्तेच्या आकस्मिक वादळात स्त्री काय किंवा पुरुष काय, क्षणकाल उचलले गेले म्हणून सारे लाभते असे थोडेच आहे? त्यासाठी साधनेचीही गरज लागते. क्षणकालाच्या आकर्षणातून स्वर्गसुखाची आर्जवी प्राप्ती उत्तम पत्नीच्या लाभात असते. 'इहलोकाला स्वर्गाची पात्रता स्त्रीमुळंच येते' असे कालिदास म्हणतो. त्यामागील अर्थ याहून वेगळा नाही. अर्थात 'शाकुन्तल' पासून 'उत्तररामचरिता' पर्यंत आणि 'मेघदूता' पासून 'कर्पूरमंजरी' पर्यंत सर्वत्र आढळणाऱ्या प्रणयभावनेत उपभोगेच्छा निश्चित आहे. पण केवळ उपभोगेच्छा म्हणजे प्रीतिभावना नव्हे. उपभोगेच्छेबरोबर नवीन निर्मितीची आकांक्षा, जगदुपयोगी गोष्टींचे निर्माण आणि तद्नुषंगिक सुंदर स्वप्नांना रेखीव रूप देण्याची मनीषा इत्यादी बाबींचा शुभसमवाय प्रीतिभावनेत अंतर्भूत असतो. समाजकाळ परिस्थितीचे चिवट पदरही त्यात आहेत. म्हणूनच वासनांचा थयथयाट, थिल्लर भावनांचा गदारोळ यापलिकडे जाऊन संस्कृत सारस्वतकारांनी प्रेमाच्या उदात्तरूपाचे चित्रण केले आहे. प्रीतीच्या छोट्यामोठ्या बहुतांश साऱ्या छटा दाखविण्याकडे त्यांचा कल असून त्यातल्या त्यात उदात्तीकरणाकडे झुकणारी छटा त्यामधील विशेष आहे.

प्रागैतिहासिक काळापासून उत्क्रान्त प्रीतिभावनेचे अभिजातपण अभिजात संस्कृत साहित्याने मनस्वीपणे जपले आहे, पुढील सगळ्या मराठी साहित्यामधील प्रीतिभावनेचा आत्मा 'संस्कृत' आणि 'संस्कृति' निष्ठ असा राहिला आहे.

॥ सामान्य विवेचन ॥

प्रीतिभावना : आदि ते अन्त

निष्कर्ष : ५

... माणसाची गोष्ट वेगळी आहे; म्हणूनच त्याच्याशी संबंधित कलादि गोष्टींची कथा त्याच्याहून वेगळी नाही.

...मानवी जीवनातील अग्रक्रमाच्या प्रीतिभावनेचा रूपवेध काय सांगू पाहतो ?

या ग्रंथाच्या, 'एक' : प्रीतिभावना: मूळ, प्रेरणा आणि स्वरूप ' या प्रास्ताविक भागामध्ये ' भूमिका ': १ व ' मागोवा ': २ ही प्रकरणे समाविष्ट आहेत. पैकी पहिल्या प्रकरणामध्ये विषयाची महत्त्वपूर्णता व त्याच्या प्रतिपादनामागील भूमिका यांचे स्पष्टीकरण केले आहे. दुसऱ्यामध्ये प्रीतिभावनेचे स्वरूप, व्युत्पत्ती, उत्क्रान्ती, व्याप्ती, सामर्थ्य इत्यादींची नोंद झाली आहे. तशी ती करताना, प्रीतिभावनेत सर्वोच्च प्रीती जी दांपत्यप्रीती ती श्रेष्ठ प्रतीची, विशुद्ध स्वरूपाची व उच्च दर्जाची का त्याचा ऊहापोह आहे.

'दोन': ' प्रागैतिहासिक ते अभिजात वाङमय: प्रीतिभावनेची उत्कट, प्रमत्त व उदात्त रूपे ' या विस्तार भागामध्ये 'संदर्भ':३ व 'प्रवाह':४ अशा दोन प्रकरणांमधून भाग 'एक' मधील 'मागोवा':२ मधील प्रतिपादनाच्या अनुषंगाने प्रीतिभावनेला कोणकोणते संदर्भ आहेत आणि कोणकोणत्या प्रवाहांनी कसकसे रुपरंग धारण केले आहे, त्याचा परामर्श घेतला आहे. प्रागैतिहासिक काळापासून ऋग्वेद काळातील वाङमयापर्यंत आणि तिथून अभिजात संस्कृत साहित्याच्या अखेरीपर्यंत प्रीतिभावनेच्या अनेकस्तरीय विविधस्पर्शी वाटा-वाकणांचा आलेख काढण्याचा प्रयत्न आहे.

मात्र या प्रयत्नामागील मर्यादा व सामर्थ्य या दोहोंचे कळसूत्र जाणून घ्यायला हवे. ते हे की, हा प्रयत्न आध्यात्मिक भक्ती किंवा प्रीती यांच्याशी निगडित नाही तर लौकिक स्वरुपाच्या प्रीतिभावनेच्या, प्रामुख्याने त्यामधील दांपत्यप्रीतीच्या अलौकिक रूपाच्या

अग्रेसरत्वाचा, विशुध्दतेचा व श्रेष्ठत्वाच्या स्थानाचा शोध हा यामधील चिन्तनीय मुद्दा आहे.

त्यानुषंगाने, या अंगाने जाता जाता अधिक एक बाब लक्ष्यात घ्यायला हवी. ललित वाङमयाच्या आधाराने प्रीतिभावनेचा शोध घेतला असला तरी त्या वाङमयाचे समीक्षण हा काही त्यामागील हेतु नाही; तर समाज आणि साहित्य यांच्या परस्परसंबंधात प्रीतिभावना कशी रुजलेली असते, तिची आविष्करणे परस्परांशी कशी निबध्द असतात आणि त्या अंगाने तिचे प्रकटीकरण कसकसे होत जाते ते तपासून घेणे हा त्यामधील प्रमुख उद्देश आहे. 'सामाजिक दृष्टया ललित साहित्याच्या आधारे केलेला प्रीतिभावनेचा अभ्यास' ही ग्रंथाची वैचारिक बैठक आहे.

वैध प्रीतीचा वेध

खेरीज आपल्या भारत देशामध्ये विवाहबंधनाला संस्काराचे पावित्र्य असल्याने वैध प्रीतिभावनेच्या : दांपत्यप्रीतीच्या अंगाचाही : Legal aspect of Love feeling : तो मुख्यत्वे विचार ठरतो. त्यानुषंगानेच समाज, त्याचे विविध प्रश्न, त्यामधील कुटुंब, कुटुंबपद्धती, स्त्रियांचे ' स्वातंत्र्य ' व 'स्थान', समाजातील संकेत अशा एकमेकात गुंतून असलेल्या या प्रश्नोपप्रश्नांचा आवश्यक तिथे आलेख काढला आहे. त्यामागचे प्रयोजन निखळ इतिहास सांगणे हे नसून त्या इतिहासामधून प्रीतिभावनेने घडणीची कोणती अंगे स्वीकारली आणि धरून ठेवली हयाचा अभ्यास हे आहे.

या संदर्भ : आधारानेच मराठी ललित साहित्यामधील प्रीतिभावनेची वाटचाल अंकित होत गेली असल्याने जाता जाता, जरूर तिथे मराठी साहित्यामध्ये डोकावून पाहिले आहे. हे डोकावणे ही हरिणगतीची धावती : पळती निरीक्षणे आहेत. समग्रतेचा काही अंशभाग एवढेच त्याचे मर्यादित स्वरूप आहे; हे नमूद करायला हवे.

अखेरच्या विवरणात्मक भागातील: 'तीन': 'सामान्य विवेचन: प्रीतिभावना: आदि ते अन्त' 'निष्कर्ष:'४ मध्ये एकूण विवेचनाचे सार नोंदले आहे. प्रागैतिहासिक काळापासून अभिजात संस्कृत वाङमयाच्या काळाअखेर ' भाग दोन ' मधून केलेल्या चिकित्सक विवेचनावर ते आधारित आहे. पण तोच तेवढा त्याचा आधार नव्हे. या आधारात, न मांडलेल्या मराठी साहित्यामधील एतद्विषयक चिंतनाचा भागही आहे. अनेकविध कारणांमुळे, विस्तार टाळून शक्य तेवढया आटीव विवेचनातून सहजस्वाभाविक निष्कर्षाकडे सरकता

यते का पाहणे ही ग्रंथाची मुळातली बैठक नसल्याने मांडामांड त्या दिशेची आहे. वैचारिक भट्टी बिघडू न देता किंवा ढिली पडू न देता लालित्य राखून ग्रंथाची घडण व्हावी असा प्रयत्न आहे.

खुरटलेपणाचे परिणाम

मानवी जीवनातील प्रीतिभावना ही अनन्यसाधारण भावना आहे. मानवी संबंधांची ती जपणूक करते. मानवी जीवनाचे सातत्य ती टिकवून धरते. सातत्याच्या या रक्षणात मानवी जीवन खंडित होऊ नये, सतत चालते-बोलते राहावे, वाहते बनावे अशी धनात्मक दृष्टी आहे. पाण्याअभावी वेल सुकते, पर्जन्याअभावी धरणी फाटते, तसेच मानवी जीवनाचे आहे. प्रीतिभावनेच्या अभावी मानवी जीवन चिरफाळून जाऊ शकते; दुभंगून, फुटून, भेगाळून जाण्याची शक्यता असते पण प्रीतिभावनेच्या वर्षावाने ते सावरते. त्याला धर मिळतो, बैठक लाभते, भूमिकेची प्राप्ती होते. प्रीतिभावनेने मानवी जीवनात ओलावा राहतो, जीवात जीव गुंतले जातात. आरूस्या जीवनालाच एक सुभग, सुंदर रूप मिळते.

मानवी जीवनात : आणि काही मर्यादेपर्यंत मानवेतर सृष्टीतही : प्रीतिभावनेचा वावर आहे. प्रीतिभावना ही चिरंतन चीज आहे. या चिरंतनावर मानवी जीवनाचा प्रवाह सतत वाहत राहिला आहे. समाजजीवनाच्या धारणेत म्हणूनच प्रीतिभावनेला अनन्य महत्त्व आहे. साहजिकच चिरंतन प्रीतिभावनेमागील प्राणसूत्र सर्वत्र सारखे आहे, अपरिवर्तनीय आहे. पण आविष्करण बदलते आहे; परिवर्तनीय आहे. समाजकाळस्थितीपरिस्थितीनुसार त्याची रूपे बदलतात.

त्यादृष्टीने आजकालच्या मराठी साहित्यामध्ये प्रीतिभावनेचा एक उत्कट भाग असला तरी विकृतीचे अंगही थोडे नाही.किंबहुना प्रीतिभावनेचे मूळ रूपच विकृत असल्याचा भास करवून देणारे ते आहे. आमच्या समाजालाच प्रीतिभावनेच्या सच्च्या रूपाचे भान न आल्याचे ते साक्षीरूप नसेलच असे नाही. मानवी जीवनातील सूक्ष्मातिसूक्ष्म भावभावनांचा वेध घेण्याची भेदक दृष्टी येण्याइतकी, आमच्या समाजाचे वय वाढलेले असले तरी संस्कृती वाढलेली नाही, खुरटलेली आहे. साहजिकच प्रीतिभावनेसंबंधीच्या अद्भूत किंवा क्षूद्र कल्पनांना वाव मिळावा हे अस्वाभाविक होत नाही. संस्कृतीच्या मागासपणात आणि 'विज्ञाननिष्ठे'ला सामोरे न जाण्यातून निर्माण होणाऱ्या खुरटलेपणात सूक्ष्मतेला वाव नसतो, स्थूलपणाचा आवाकाच मोठा असतो; त्यामुळे मुख्य बीज पकडणे ही असाध्य गोष्ट होते. संस्कृतीच्या समृद्धीने सारे साधते असे नाही; त्यासाठीही मनाची

विशिष्ट बैठक तयार व्हावी लागते. ती होण्यासाठी मनाने स्थूलाकडून सूक्ष्माकडे, आंकुचितपणाकडून विशालतेकडे धाव घेण्याची इर्षा बाळगावी लागते; तशी आच लागते. मनाच्या ह्या आचेतून सूक्ष्मता उपजते. तिच्या उपजण्यातून रसरंगगंधस्पर्शादी भावनांची स्पंदने उसळून येतात, जाणवतात, भावतात, मनाशी भिडतात; त्यासाठी संस्कृतीचे नुसते वय वाढून उपयोग नसतो, तर वयाबरोबर येणारी प्रौढता आणि संयमही वाढावा लागतो. संस्कृती आशयसमृद्ध व्हावी लागते. आमच्या संस्कृतीला, समाजाला प्रदीर्घ परंपरा आहे पण प्रयोग करण्याची : पुनःपुन्हा प्रयोग करण्याची : त्यास भीती वाटते. प्रीतिभावनेच्या संदर्भात स्थूलाकडून सूक्ष्माकडे जाणे हा प्रयोगच आहे. पण आमच्या समाजाने, संस्कृतीने त्यासंबंधात हिरीरीने पावले टाकण्यात कुचराईच केल्याचे दिसते. त्यासाठी जी 'जीगर' लागते तिचा अभाव पुनःपुन्हा सामोरा येतो. स्वाभाविकपणेच आमच्या कथा : कादंबरी : काव्य : नाटक आदि मराठी ललित साहित्यामधील प्रेम सशासारखे भित्रे आहे. लबलबत्या अंतःकरणाने जीवन जगणारे आहे. परिणामतः प्रीतिभावनेच्या विविधरंगी आविष्काराने मराठीमधील एखादा वाङमयप्रकार उजळून निघाला आहे, झळाळून गेला आहे असे दृश्य दिसणे ही, कपिलाषष्ठीची पर्वणी ठरावी इतकी महाग बाब आहे. त्यासंदर्भात प्रीतिभावनेच्या अनुरोधाने मराठी ललित साहित्याची प्रकृती कसदार नाही, समृद्ध नाही; वाळवंटातील वाट पुनः पुन्हा चुकणारी ती जिप्सी आहे. कारण खास प्रीतिभावनेच्या दृष्टीने आणि खासकरून प्रीतिभावनेच्याच दृष्टीने बहुतांश मराठी कलावंतांनी खास असा विचार केलेला नाही. मराठी निबंधवाङमयात चिन्तनशील निबंधकाराची वाण जाणवते तशी मराठी ललित साहित्यात, प्रीतिभावनेचे तत्त्वज्ञान उभे करणाऱ्या तत्त्वचिंतक साहित्यिकाचीही वानवा आहे. साहजिकच प्रीतिभावनेच्या सामर्थ्याचे आणि स्वरूपाचे सांगोपांग यथार्थ आकलन करून देणाऱ्या, ललितकृतींतून त्याचा प्रत्यय देणाऱ्या मराठी साहित्यकाराची निपज अजून झालेली नाही. अजून पुरे कलावादी किंवा समग्र जीवनवादी यांच्या निर्मितीची जिथे मराठी साहित्य वाट पाहते आहे, तिथे ही गोष्ट फार लांबची म्हणायला हवी.

मात्र मराठी साहित्यिक मूलतःच समाजाभिमुख असल्याने : अर्थात तेही अंग मर्यादित आहे : ज्या थोडयाफार प्रीतिभावनेचे आविष्करण मराठी साहित्यात झाले आहे ते मराठी समाजाच्या काळपरिस्थितीनुसार हालणारे चालणारे आहे. तत्कालीन समाजस्थितीची स्पंदने न्याहाळता यावीत आणि काही सूत्रे नमूद करणे अशक्य बनू नये इतके हे आविष्करण समाजसन्मुख आहे. ते 'संस्कृत' व 'संस्कृति' निष्ठ असले तरी खास मराठी रंग त्यात नाहीतच असे नाही. पण भाबडया भीरुतेमुळे सारे रंग बेरंग झाले आहेत : प्रसन्न मोकळा आविष्कार क्वचितच भेटतो. दबलेपणाची दाट जाणीवच जबर दिसते. समाजातली 'सपाट

गतिहीनता' : अशी गतिहीनता कुण्या एका क्षेत्रातच किंवा क्षेत्रालाच व्यापून असते असे नाही : माणसाला अद्‌भुतात, असंभाव्य घटनाप्रसंगांत आणि अघटित रीतीरिवाजात रमवून टाकते. गतीच मान मोडून पडल्यावर, पारंपारिक पद्धतीने दळण दळले गेल्यास आश्चर्य नाही. कुटुंबाच्या रिंगणात पडून राहावे, तिथेच रमावे, कौटुंबिक जीवनातील पारंपरिकच पण उदात्ततेच्या स्पर्शाने नथळणाऱ्या प्रेमातच बुडून जगावे, चौकटीच्या फार बाहेर पडू नये अशी सावधदृष्टीच सांभाळण्याकडे मराठी मनाचा कल आहे. १८१८ पासून १९६५'७० अखेरच्या दीडशेहूनही अधिक वर्षांत स्थूलमानाने हीच स्थिती आहे.

दुनियेतील बदलत्या हवेने, पुढे उभ्या जीवनावर कायाकल्पाचा प्रयोग केला आहे. त्यातून नवा पुरुष आणि नवी स्त्री उदयास आली आहे. अस्मिता हुंकार भरू लागली आहे. हातापायात खळखळणाऱ्या सात शृंखलांपैकी काही सुटून पडू लागण्याच्या बेतात आहेत ह्या काळाने भोगी व त्यागी प्रीतिभावनेचे अविष्कारण : काही अहेतूपूर्वक ओतलेले अविष्कारण : केले आहे. कालत : तत्कालीन प्रवृत्तीची प्रातिनिधीक अशी दोनही रुपे आहेत. १९२० ते १९४५ हे कालपर्वच मुळी, साऱ्या जीवनाचा अर्थच शोधणे क्रमप्राप्त व्हावे आणि भाष्यरूपाने विकासशील वळण प्रकट होत जावे असे आहे. १९४५ ते १९८० अखेरच्या कालखंडात त्यास मोठीच गती मिळाली आहे कामप्रेरणा आणि प्रीती यांचे सारे स्वरूपच पालटून गेले आहे. एका बाजूने ढासळणाऱ्या जीवनाचे मनोरे आणि दुसऱ्या बाजूने उभविले जाणारे इमले या दोहोंच्या बेचक्यात उध्वस्त भावविश्वाला अपरंपार महत्त्व आले आहे. निव्वळ पाचोळ्यावानी जीवनातील अस्वस्थ, कातर, एकाकी भावसंबंध विलक्षण देखणेपणाने चित्रविषय झाले आहेत. उलटचापालटचा होणाऱ्या काळचक्रातील कळाहीन माणसांना आणि जमीनअस्मान व्यापून उरणाऱ्या त्याच्या दारिद्र्यकळांना प्रत्ययरूप मिळाले आहे. त्यामुळे या कालयुगातील बहुतांश मराठी वाङ्मयाला प्रतिकात्मता लाभली आहे. भोवतालचे जग साफ नामंजूर असलेल्या, सामान्य माणसाच्या पेटलेल्या आत्म्याचे रणांगण नाट्यरुपाने मोठ्या चपखलपणे इथे प्रकट झाले आहे. हे प्रकटीकरण विलक्षण स्फोटक आहे. अत्यंत प्रांजळ, निर्भीड आहे. चित्रित व्यक्तीचा 'तो' 'तसला' तपशील गळून पडावा, विसरला जावा आणि एक स्वयंपूर्ण कलाकृतीचे सौंदर्य अनुभवण्याचा पडताळा यावा, ती कलाकृती पूर्णपणे ऐंद्रिय प्रतिमांतून फुलण्याची सच्ची साक्ष मिळावी; त्याबरोबरच प्रीतिभावनेसह इतर अनेक अंगांचे दर्शनही व्हावे, असा हा ढंगदार चित्रफलक आहे. १९८० अखेर, अपवाद करता हेच चित्र आढळते.

द्वांपत्यप्रीती : व्रतवेडी सोनकेळ

स्त्रीपुरूष संबंध हा विषय मोठा गुंतागुंतीचा आणि हाताळायला कठीण असा

आहे. तो नाजूक तितकाच तरल आहे. साहित्यातील कल्पित व्यक्तीबरोबर कलावंतही रक्तबंबाळ होऊ शकतो. साहजिकच अशा विषयाची हाताळणी एका विशिष्ट पातळीवरच होऊ शकते. या पातळीवर त्यातील तथाकथित अश्लिलता मिटते, विकृत विषयपिपासेच्या शमनात प्रीती असल्याची भावना संपते आणि विषय–विकार स्वच्छ आणि शुद्ध स्वरूपात उभा राहू शकतो. त्यामुळे त्याला अश्लिल,अवर्ज्य, अर्वाच्य शृंगारिक गलथानपणाचा स्पर्श होत नाही. खेरीज ' वरलिया रंगा' वरचा भ्रमही फिटतो. ' नखरेल नारी ' च्या प्रदर्शनात, शृंगाराच्या नागडयाउघडया वर्णनात, वासना, विकारांच्या विकृत काळोखात प्रीतिभावनेचे दर्शन नाही, ते आहे 'व्रतवेडेपणा'त आणि 'व्रतवेडे मन' तसेच व्रताधीन राहण्यात ! खरे तर प्रीतिभावना 'व्रतवेडी सोनकेळ' असते : बिलोरी विश्व तडकते, फुटते, अवशेष भोवती विखरुन पडतात, विविध रीतींनी जिवंत होऊन मनाशी जीवघेणा खेळही खेळतात, जात्याच अनावर हट्टी मन आक्रंदत, स्फुंदत राहते पण प्रीतीची व्रतवेडी सोनकेळ स्वत:च स्वत:ला जिंकत असते : रक्ताचा पहारा ठेवून जिंकते. टिनोपॉल दुनियेतल्या कठपुतळी प्रीतिभावनेहून या जिवंत, जातिवंत आणि उदात्त प्रीतीची जपणूक मराठी साहित्याने सातत्याने केली आहे, वाढ सतत जोपासली आहे. दुसऱ्या अंगाने, त्याविरोधी भोगलंपटतेची अविरत आक्रमणे सुरु असताही ह्या जपणुकीला, वाङ्मयाचा अभिजात वारसा, जीवनविषयक दृष्टी, मराठी मनाची समाजशील ठेवण अशा घटकांचा हातभार लागत आला आहे.

मात्र मराठी कविता वगळता जवळजवळ १९३५ अखेर प्रकर्षाने मराठी साहित्यात प्रीतिभावनेचा म्हणून स्वतंत्र, खास किंवा वेगळा असा विचार झालेला नाही. आजही मराठी साहित्यामधील प्रीतिभावनेचे रेखांकन तत्त्वज्ञानाच्या पातळीवर जाण्याची शक्यता नाही. मराठी प्रतिभावंत साहित्यिकांनी तेवढी आस्था किंवा रस दाखविलेला नाही. बाजारू जगाने ती ओढ टांगणीला लावली असेल किंवा त्याप्रत पोचण्यासाठी मनाची जी धारणा असावी लागते, त्याच्या अभावी त्या जागी पोचणे शक्य होत नसेल ! कारणे हीच असतील असे नव्हे; वेगळीही राहतील; पण घडते आहे ते असे आहे. मात्र मराठी साहित्यामधील प्रीतिभावना मराठी माणसाच्या भोवती असणाऱ्या परिस्थितीच्या संगतीने वाढली आहे. साहजिकच सामाजिक परिस्थिती वगळून प्रीतिभावनेचा विचार करता येत नाही. त्या उपद्व्यापाला काही अर्थही उरत नाही.

खेरीज आधुनिक साहित्यकारांमध्ये बौद्धिक प्रणयाचे आकर्षणही दिसत नाही. त्यांच्यामध्ये ' सेक्स ' चे, शरीराचे वर्णन : दर्शन विपुल आहे. काही थोडे अपवाद वगळता ' फडके फॉर्म्युले ' वापरून बहुसंख्य मंडळी 'उपजीविका' वादी साहित्याची जोमाने पैदास करून

राहिले आहेत. सामान्य वाचकांची थिल्लर अभिरूची, त्यासाठीचा बेचव पण सुसंगत पुरवठा, त्यातून धड चांगले रंजनही न होणारे. अशा डुकरी पैदाशीत प्रेमाचा बेंगरूळ त्रिकोण, चुंबने, आलिंगने, उलथेपालथे होणे, रागाने अनावर होऊन चारदोन झटापटी करणे, कळाहीन संभोग यांच्या चघळणीची लयलूट व्हावी; ह्यात आश्चर्य कोणते ? ओंगळवाण्या कामवाङ्मयाच्या निर्मितीत गुंतलेले, उत्कट प्रीतिभावनेचे सोपान कसे आक्रमू शकतील हा प्रश्न आहेच.

"... जिच्यावर नायकाने प्रेम केले ती शारीरिक सौख्य देण्यास असमर्थ ठरली म्हणून नायकाचे मन नव्या मैत्रिणीच्या शोधात फिरले असे कधी चित्रित करायचे तर कुठेतरी नायक : नायिकेची गाठ घालून द्यायची आणि मग सहवासाचे रूपांतर प्रीतीत आणि प्रीतीचे रूपान्तर मिठीत अशा मार्गाने प्रणयकथा खरडायची, तर कधी एखाद्या कादंबरीत दोन : दोन, तीन : तीन प्रणयी जीवांच्या कथा एकत्र गुंफायच्या, तर कधी एखाद्या नायिकेने तीन चार जणांची शय्यासोबत कशी केली ते मिटक्या मारीत सांगायचे. शृंगारकथेच्या नावाखाली किळसवाण्या कामकथांची निर्मिती करणारे हे युगप्रवर्तक कादंबरीकार 'ज्या साहित्याच्या वाचनाने अगर श्रवणाने, कामवासना जागृत होते ते वाङ्मयदृष्टीने सरस होय' असे मोठ्या अभिमानाने सांगतात तेव्हा त्यांची कीव करावीशी वाटते, उपजीविकेसाठी किती किळसवाणे लिहायचे ? ... [१]

असा प्रश्न डॉ. भालचंद्र फडके यांनी विचारला आहे, प्रश्न ठीक आहे. बाजार मांडून अहमहमिकेने लिहिले जाते आहे ते थांबण्याची शक्यता नाही. मराठी साहित्यिकांच्या खुज्या आणि क्षुद्र अनुभवविश्वाचे या वेगळे शहामृगी पलायन अन्यत्र कुठे सापडेल ? सामाजिक बांधिलकीचे सोडाच पण कलामूल्यांविषयीचीही इतकी अनास्था मराठी साहित्याची पातळीही दर्शविते; हे खचित लक्षात हवे. वैषयिक वासनेपासून अलिप्त, नाट्यमय उदात्तीकरणापासून दूर एक 'मानव' या नात्याने प्रीतिभावनेकडे पाहाणे मराठी साहित्यकारांना जमू शकलेले नाही; त्यामुळे 'पशुत्वा' चे दर्शन अधिक आहे आणि तेच वास्तव असल्याचा आग्रह आहे. दुराचार आणि अत्याचाराच्या : Sex & Violence : दृष्टचक्रात अडकलेल्या मराठी साहित्यामधील प्रीतिभावना साहजिकच कुचंबलेली आहे. जातिवंत कलावंत आपल्या कालाच्या जाणिवांचा वेध, बुडत्या जहाजातही घेत असतो. त्यातून विदग्ध साहित्याची वाटचाल : Classical Literature : होत असते, वाट पाहाणे जरूर आहे.

पळते लक्ष्य : चुकते नेम

या साऱ्या परिस्थितीमुळे असेल किंवा मराठी। हिंदू मनावर अहोरात्र पडलेल्या परंपरागत आध्यात्मिक भक्तिभावनेमुळे असेल, गेल्या दीडशेहून अधिक वर्षांचा आधुनिक मराठी साहित्याचा इतिहास प्रीतिभावनेच्या सामर्थ्याचे आणि स्वरूपाचे सांगोपाग यथार्थ आकलन करून देण्याच्या दृष्टीने खूपच थिटा आहे. 'संस्कृत' व 'संस्कृति' निष्ठ प्रीतिभावनेच्या आविष्करणाच्या अंगानेही त्याचे थिटेपण जाणवावे इतके जबर आहे. मराठीतील स्त्री-लेखिकांचाही, काही अपवाद करता त्यास अपवाद नाही. 'ही प्रीती की हा दुराचार ?' : Is it love or is it Just Sex ? : असा प्रश्न पडावा अशीच स्थिती आहे. प्रीतिभावनेच्या टवटवीत रूपावर खूप बेगड साचली आहे. तिची प्रकृती बहुतांश 'स्थिर' च : Steel : राहिल्याचा प्रत्यय येतो. प्रीती करणे, देणे-घेणे, तिचे आविष्करण ही सुंदर गोष्ट आहे असा निर्मळ सूर लागण्याची प्रसादचिन्हे आहेत. पण पुरेशा स्वरूपात त्याचा अमल अद्याप सामोरा यायचा आहे.

मराठी साहित्यामधील प्रीतिभावनेचे शोधन, अवलोकन, वर्णन, दर्शन आणि आविष्करण हे सांप्रत तरी धावत्या लक्ष्यावर नेम धरून लक्ष्य टिपण्यातील : Snap Shooting : असफलतेचे चिन्ह आहे; ते 'पळते चित्रदर्शन' : Passing Eposide : झाले आहे.

मात्र एका विकसनशील अवस्थेच्या सीमारेषेवर मराठी साहित्य उभे राहू पाहात असल्याने चित्र आशादायक आहे; निराशा करणारे नाही; म्हणून दूर निघून जाऊन अदृश्य होणाऱ्या नागिणीचा शोध घेण्यात अर्थ नाही. पावसाच्या पहिल्यावहिल्या चारदोन सरी पडल्यावर, करपून टाकणाऱ्या : उन्हाळ्याने तापलेल्या जमिनीमधून : विशेषत: ती नांगरून उफणली जात असता : दमदार मधुर वास दरवळतो; तसे मराठी साहित्यात घडू घातल्याची चिन्हे आहेत. भुई नांगरली जात आहे. त्यातून प्रीतिभावनेचे सोनकेवडयाचे फड उगवतील, चहूकडे घमघमाट दरवळून राहील आणि साजशिणगार सजेल असा, वर्षा-चातक संबंध मनांशी जागा राहण्यात, प्रसंगी तो विफल ठरला तरी हानी काहीही नाही.

टीपा

... मागील विवेचनात पुनः पुन्हा आलेल्या निवडक संदर्भांची विभागवार प्रकरणशः नोंद पुढे केली आहे...

...पृष्ठ २१ (४) व ९२ (८) या नोंदी मुद्रणदोष आहेत...

भूमिका : १

1. J. B. Pristley : A View from the Bridge : Millar : Preface : P. 10
२. वि. स. खांडेकर : 'अभिषेक' : प्रस्तावना : पृ. ३२२

मागोवा : २

3. Richardson : New English Dictionary : vol 11 : P. 64
४. डॉ. वि. पां. दांडेकर : 'मनोरंजन' : १९२९ : 'प्रेमाच्या पावित्र्यात' : पृ. ६८
५. आचार्य रामचंद्र शुक्ल : 'चितामणि' : १९५८ : 'लोभ और प्रीति' : पृ. ८९-९०
२८. कित्ता : पृ. १०८
6. Bertand Russel : Marriage & Morals : P. 121
७. ग. त्र्यं. माडखोलकर : 'भंगलेले देऊळ' : पृ. २८
८. भगवद्गीता : अ. ७ : श्लोक ७
९. रा. गो. कोलंगडे : ऋग्वेददर्शन : पृ. ६ : १९८
10. Schwarz Oswald : Psychology of Sex : P. 34
11. Bolsche Willhem : Love Life in Nature : P. 43
१२. टीप क्र. १० : कित्ता : पृ. ११५
१४ : १५... ... ... : पृ. ११६

२३. ... ... : पृ. १२०
३०. ... ... : पृ. १२३
१३. वि. वि. दीक्षित : 'लोकशिक्षण' : जुलै, १९३८ : 'घटस्फोट आणि विवाह बंधन' : पृ. १८
16. Plato : Symposium : P. 48
17. Verrier Elewin : Philosophy of Love : P. 38
२९. कित्ता : पृ. ४८
१८. डॉ. प्र. न. जोशी : 'मराठी साहित्यातील मधुराभक्ती' : पृ. ४१८
19. Friud Singmund : A General Introduction to Psycho- Analysis : P. 84
२७. कित्ता : पृ. १०२
20. V. S. Apte : Practical Sanskrit English Dictionary : 1024 : P. 348
21. R. R. Diwakar : 'Hindustan Times' : 15 Aug. 1954 : 'Art for the People' : P. 18
22. Tolstoy : What is Art : P. 32
२४. डॉ. भगवान दास : Science & Emotion : पृ. ३० : १००
25. Carle Meaningar : Love Against Hate : P. 271
२६. ब. ह. पंडित : 'विविध ज्ञानविस्तार' : पु. ४५, अं. ४ : 'प्रेममीमांसा' : पृ. १४०
३१. रा. अ. राईरकर : 'प्रेमाचे तत्त्वज्ञान', १९३५ : पृ. १०८

संदर्भ : ३

---

1. Prof. Nilkanth Shastri : History of South India : P. 235
२. श्री. दा. सातवळेकर : अथर्ववेद संहिता
३. बृहदारण्यकोपनिषद् : १·४·३

प्रवाह : ४

---

१. डॉ. के. ना. वाटवे : संस्कृत काव्याचे पंचप्राण : पृ. १७५

पार्श्वभूमी

...तशी प्रत्येक गोष्टीची एक कहाणी असतेच. त्यासाठी काही अंगभूत गुणदोष असावे लागतात एवढेच !

' ...प्रीतिभावना : प्रेरणा आणि स्वरूप ' या प्रबंधाचीही तशी एक गोष्ट आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या पी एचडी पदवीसाठी, १९७२-७३ मध्ये मी सादर केलेल्या प्रबंधाचे हे ग्रंथरुप. मराठी कादंबरी, कविता, कथा, नाटक इत्यादी ललित वाङमयप्रकारांच्या संदर्भाने प्रीतिभावनेचे मूळ, प्रेरणांची बीजे, स्वरूपाचे वर्णन, अवस्थांची स्थित्यन्तरे आणि आविष्करणाची रूपे वगैरे गोष्टींचा, महाजनांना वाट पुसत घेतलेला हा मागोवा. 'सामाजिकदृष्टचा ललित साहित्याच्या आधारे केलेला प्रीतिभावनेचा अभ्यास ' ही या वैचारिक ग्रंथाची बैठक. त्या संदर्भातला एक अभ्यास किंवा अनेक दिशांपैकी थोडयाफार दिशांचे ते दिग्दर्शन आहे : समग्र, संपूर्ण असे त्याचे स्वरूप असल्याचा दावा मात्र नाही.

...मी मुळात पदवीपरीक्षेपर्यंतही पोचेन की नाही याची खात्री वाटावी अशी घरची स्थिती नव्हती. वडिलांच्या अकाली निधनाने हलाखीत भर होती : त्याच्या वर्णनाची गरज नाही. त्यामुळे मॅट्रिक होऊन कुठेतरी लटकणे एवढीच शक्यता होती. माझ्याबरोबरच माझ्या घरच्यांन्याही अपेक्षा मोठचा असल्या तरी शक्यता एवढी आणि एवढीच होती. पण अंशकालिक मास्तरकी, वृत्तपत्रांत वार्ताहरी, भाऊसाहेब खांडेकरांकडे लेखनिकी असे नाना उद्योग करीत मी बी. ए. / एम. ए. झालो त्याचे सगळे श्रेय माझ्यापेक्षा माझी शिक्षिका वहीण सौ. ताई, माझे मामा डी. एस्. सावन्त आणि राजाराम महाविद्यालयातील माझे प्रेमळ प्राध्यापक संभाजीराव टिकम यांना आहे.

...मुळातला मी अर्थशास्त्र—समाजशास्त्र या विषयांचा विद्यार्थी. एम्. ए. मराठी होऊन बाहेर पडलो; त्याचे श्रेय प्रा. टिकम सरांनी, पुस्तकांचे आपले कार्ड कायमचे माझ्या स्वाधीन केले होते, त्याकडे जाते.

माझ्या आई, ती. वहिनी यांनी, त्यासाठी वेचलेले श्रम हा, रातराणीच्या गंधाइतकाच समृद्ध अध्याय आहे.

...प्री-डिग्रीपासून कै. भाऊसाहेब खांडेकरांच्याकडे लेखनिक म्हणून मी कामास लागलो. पहिले सहाएक महिने भाऊसाहेब काही बोलले नाहीत; पण नंतर मी एम्. ए. झालो आहे हे स्वप्नरंजन पक्के करून भाऊंनी सारखा धोशा लावला : " पी एच्डी व्हायचं.

आपला प्रबंध संदर्भ ग्रंथ झाला पाहिजे. तसं काम करू." पण मी काही त्यासाठी उत्सुक नव्हतो. प्रश्न अनेक होते : रोज नवनवीन निर्माणही होत होते. तसे पाहिल्यास कसलीच किंमत नसलेल्या पी एच्‌डी चा विचार करायला मला उसन्तच नव्हती.

पण मला उत्सुकता नसली तरी भाऊंची चेतावणी थांबलेली नव्हती. ते 'गाईडस'ची माहिती मिळवत होते. माझ्याकडून काढून घेत होते. पत्रे टाकत होते : पण कुठे 'भोसले' नाव आडवे आले; कुठे भाऊसाहेब, भोसल्यांचे नाव सुचवताहेत; म्हणजे तेच त्यांचे खरे मार्गदर्शक असणार; आपले ठिगळ तिथे कुठे लागणार ? अशी धास्ती; परिणामी थातुरमातुर उत्तरे. माणसांनी पुरोगामीपणाचा टेंभा मिरविला म्हणून काही ती पुरोगामी ठरत नसतात. शेवटी प्रा. भगवन्त देशमुख यांच्याकडे, अगदी तारेने विद्यार्थी म्हणून दाखल झालो तोही भाऊसाहेबांच्यामुळेच ! त्याचीही एक गमतशीर कहाणी आहे. ती पुढे कधीतरी नोंदता येईल.

...प्रा. देशमुख सरांच्याकडे मी नाव नोंदले. प्रबंधाचे विषय भाऊंनीच सुचविले. मी फक्त क्रमाने मांडले. क्रमात पहिला विषय होता : 'मराठी निबंध : प्रेरणा, स्वरूप आणि विकास' आणि शेवटचा होता : 'प्रीतिभावना : प्रेरणा आणि स्वरूप – मराठी ललित साहित्याच्या संदर्भाने.' मधल्या विषयांचे क्रम होते : 'मर्ढेकरांच्या सौंदर्यविचाराच्या संदर्भाने त्यांच्या कवितेचा विचार,' 'रा. ग. गडकरी यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास', 'मराठी गद्यशैलीचा विकास' वगैरे.

...पहिल्या 'निबंध' विषयाची नोंद झाल्यानंतर सहासात महिन्यांनी विद्यापीठाकडून रूक्षपणे कळविण्यात आले की, "या विषयावर पुणे विद्यापीठात काम सुरू आहे; तेव्हा तो विषय घेता येणार नाही." तेव्हा तसा काही नियम होता !

...मग माझे मार्गदर्शक प्रा. देशमुख यांना प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार त्यांनी क्रमाने शेवटचा प्रीतिभावनेचा विषय पहिला केला. त्यात भाऊसाहेबांचा हात होता. मला ते सारे मान्य होते.

पण माझ्या वृत्ती–प्रवृत्तीला प्रीतिभावनेचा नाजुक विषय मानवणारा नव्हता. मात्र एकदा घेतल्यावर त्यावर मी मनःपूर्वकतेने कसून काम केले : भाऊंचे पाठराखेपण, देशमुख सरांचा 'दटावणारा' पण काहीही न बोलता काम करून घेणारा मृदु चेहरा; आणि त्यामागे लपलेला त्यांचा सात्त्विक स्वभाव ही त्याची कारणे. आणखीही एक नाजुक कारण आहे : प्रीतिभावनेचा शोध घेता घेता प्रेम आटू लागल्याच्या वाढत्या तक्रारी 'घरा'तून येऊ लागल्या; त्या चुकाव्यात म्हणून प्रीतिभावनेचे 'प्रकरण' लवकरात लवकर आटोपते घेण्याखेरीज गत्यन्तरच नव्हते.

... आणि हे सगळे वेळेत करून घेण्याचे सगळे श्रेय माझ्यावर अपत्यवत् प्रेम करणारे शिवाजी विद्यापीठाचे पहिले शिल्पकार कुलगुरु डॉ. बॅरि. आप्पासाहेब पवार यांचे आहे. जिथे भेटेल तिथे पकडायचे, आठवण द्यायची, दटवायचे. अगदी 'पोस्ट ग्रॅज्युएट टीचिंग रेकग्नेशन' च्या 'पर्सनल डिस्कशन' च्या वेळीही सज्जड दम (या 'रेकग्नेशन कमिटी' त त्यावेळी कै. प्रा. श्री. के. क्षीरसागर प्रभृती मंडळी होती.) डॉक्टरसाहेब द्यायचे. भाऊसाहेब, प्रा. देशमुखसर यांच्या 'मवाळपणा' ची भरपाई डॉक्टरसाहेब पुरेपूर काढायचे. निर्दयपणे कसून भरपाई करायचे.

... दरम्यान रयत शिक्षण संस्थेच्या पंढरपूर/सातारा येथील महाविद्यालयांतून कोल्हापूर येथील श्री. शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाचा मी 'अनुभव' घेत होतो. डॉ. पवार यांचा पुनः पुन्हा मिळणारा सज्जड दम ध्यानात घेऊन, लोकांच्या ये-जाचा ससेमिरा चुकविण्यासाठी काही काळ कुलूपबंद होऊन मी 'प्रीतिभावने' चे लेखन मग पुरे केले.

... प्रबंध विद्यापीठाला सादर केल्यावर डॉ. पवार यांना मी कर्तव्यभावनेने भेटलो तेव्हा त्यांनी मला ज्या अनेक गोष्टी सांगितल्या त्यापैकी दोन कधीही विसरल्या जाणार नाहीत. त्या अशा आहेत :

... "प्रबंधलेखनानं तुमच्या ज्ञानात विशेष काही भर पडली असं मुळीच नाही. ते आहेच."

... "आता पुढली दिशा निश्चित करून कामाला लागा ..."

डॉ. पवार यांचा पाठीवरून फिरलेला हात, त्यामधला स्पर्श अजूनही प्रेरणा देतो. या प्रेमामुळेच, पुढे शिवाजी विद्यापीठात येणाऱ्या कित्येक उच्चपदस्थांच्या द्वेषाला मी पात्र झालो. एखादा अपवाद वगळता, कित्येकांनी संधी मिळेल तिथे सूड उगवून घेण्याचे पुण्यकृत्य केले. डॉ. पवार यांच्यावरील द्वेषाचे उट्टे काढल्याचे ते समाधान होते ! रुपये-आणे-पैत जिंदगीचा आणि प्रतिष्ठेचा विचार करणाऱ्याला फालतू गोष्टींची चिन्ता असते. दगडावर आपटले तरी मरण नसल्याचा अनुभव भोगलेल्या तत्त्वनिष्ठ वैचारिक जीवन जगू इच्छिणाऱ्याला बहुतांश गोष्टी कःपदार्थच असतात. म्हणून त्याची मी कधी क्षीति बाळगली नाही, की मला कधी चिन्तेच्या ढगांनीही घेरले नाही.

... आणि मौखिक परीक्षेत कै. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी माझा पुरेपूर कीस काढला. घासूनपुसून त्यांनी माझी परीक्षा घेतली याचा मला आनंद झाला. ७०।८० मिनिटांच्या तोंडी परीक्षेत कै. भाऊसाहेब माडखोलकर यांनी तळामुळापासून सगळे विचारले. शिल्लक म्हणून काही ठेवले नाही. माडखोलकरांचा पहिलाच प्रश्न होता: "संभाजीराव, प्रबंधाचा

विषय असा आहे की कुणी ना कुणी प्रकाशक प्रकाशनासाठी प्रबंध मागणारच. तुम्ही तो देणार ."आणि माडखोलकरांचे वाक्य अपुरेच ठेवून मी झटकन् म्हणालो, 'नाही.' त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून माडखोलकर म्हणाले, " समजा, प्रसिद्ध करायची इच्छा आहे, मग यातलं काय काय कापून प्रसिद्ध कराल ? "

आणि मधल्या अनेक बारीक प्रश्नांनंतर शेवटचा प्रश्न होता : " प्रीतिभावनेवर तुम्ही उत्तम लिहिलंत; मग राधा-कृष्णाच्या प्रीतीचं स्वरूप आणि आविष्करणाच्या रीतीचं वर्णन सांगा पाहू." मी किंचित हललो, सावरलो आणि म्हणालो, ' ही पी एचडी मिळाली की, अधिक चिन्तनासाठी तो विषय मी राखून ठेवला आहे. '

.. आणि माडखोलकर नेहमीचे मिस्किल हास्य करीत म्हणाले, " एवढ्या उत्तरासाठी सुद्धा तुम्हाला पी एचडी द्यायला हवी. "

... पंढरीधर होणेच जिथे अशक्य तिथं पी एचडी झालो; त्याचे अगदी वरवरचे हे रंग.

... पंढरपुरला असताना प्रबंधाची झालेली चोरी, तीनचार तास बसल्यानंतर पोलीस हवालदाराने फिर्याद घेताना माझे स्नेही प्रा. नदाफ यांना, ' काय राव, आठवारा आण्याच्या कागदाची किंमत ती काय ? आणि बोलताय काय ? ' असा प्रबंधाच्या प्रकरणांना : त्याच्या भाषेत कागदांना : उद्देशून केलेला प्रश्न, यासंबंधात ' इंटरनॅशनल दीक्षित ' यांच्याकडे नोंदवला गेलेला पण अद्यापही येत असलेला एक ग्रंथ, माझ्या प्राथमिक शाळेमधील काही मास्तर, आंबी गुरुजी, घस्ते बाई, संकपाळ बाई, सौंदलगेकर मास्तर या सर्वांनी माझ्या कागल गावच्या हिंदूराव घाटगे प्राथमिक शाळेत माझा केलेला हृद्य सत्कार, प्राचार्य देशमुखांचे मराठवाड्यातले प्रबंधकाळातील आदरातिथ्य, भाऊसाहेबांशी होणाऱ्या चर्चा, दैनिक 'समाज' मधील प्रीतिविषयक लेख वाचून कोल्हापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष ' : नंतरचे महापौर : कै. दत्तोपन्त कणेरकर यांनी बेहद्द खूष होऊन, घरी गोधत येऊन कौतुक करता करता नोकरीची दिलेली एक ' ऑफर ' अशा किती किती तरी गोष्टी आहेत. पुढे कधीतरी सांगायच्या आहेत ....

..गोष्टी केव्हाही सांगितल्या तरी त्या रोचकच असतात ...

..तूर्त अनेकांचे ऋण मनात बागवत आहे.

१ मार्च, १९८१
औरंगाबाद

एस्. एस्. भोसले

REFBK-0023292

डर, मराठी विभाग
राठवाडा विद्यापीठ : औरंगाबाद

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
दा. क. 23292
निबंध
शाखा

...या ग्रंथाच्या 'प्रीतिभावना : मूळ, प्रेरणा आणि स्वरूप' या प्रास्ताविक भागामध्ये 'भूमिका': १ व 'मागोवा': २ ही प्रकरणे समाविष्ट आहेत. पैकी पहिल्या प्रकरणामध्ये विषयाची महत्त्वपूर्णता व त्याच्या प्रतिपादनामागील भूमिका यांचे स्पष्टीकरण केले आहे. दुसऱ्यामध्ये प्रीतिभावनेचे स्वरूप, व्युत्पत्ती, उत्क्रान्ती, व्याप्ती, सामर्थ्य इत्यादींची नोंद आहे. तशी ती करताना, प्रीतिभावनेत सर्वोच्च प्रीती जी दांपत्यप्रीती : ती श्रेष्ठ प्रतीची, विशुद्ध स्वरूपाची व उच्च दर्जाची का त्याचा ऊहापोह आहे.

'प्रागैतिहासिक ते अभिजात वाङमय: प्रीतिभावनेची उत्कट, प्रमत्त व उदात्त रूपे' या विस्तार भागामध्ये 'संदर्भ':३ व 'प्रवाह':४ अशा दोन प्रकरणांमधून प्रास्ताविकमधल्या 'मागोवा':२ मधील प्रतिपादनाच्या अनुषंगाने प्रीतिभावनेला कोणकोणते संदर्भ आहेत आणि कोणकोणत्या प्रवाहांनी कसकसे रुपरंग धारण केले आहे, त्याचा परामर्श घेतला आहे. प्रागैतिहासिक काळापासून ऋग्वेद काळातील वाङमयापर्यंत आणि तिथून अभिजात संस्कृत साहित्याच्या अखेरीपर्यंत प्रीतिभावनेच्या अनेकस्तरीय विविधस्पर्शी वाटा-वाकणांचा आलेख काढण्याचा प्रयत्न आहे.

'सामान्य विवेचन : प्रीतिभावना : आदि ते अन्त' या अखेरच्या विवरणात्मक भागामधील 'निष्कर्ष' : ५ मध्ये एकूण विवेचनाचे सार नोंदले आहे. त्याला मागील तसाच या ग्रंथामध्ये न मांडलेल्या मराठी साहित्यामधील एतद्विषयक चिंतनाचाही आधार आहे. हा प्रयत्न आध्यात्मिक भक्ती किंवा प्रीती यांच्याशी निगडित नाही तर लौकिक स्वरुपाच्या प्रीतिभावनेच्या, प्रामुख्याने त्यामधील दांपत्यप्रीतीच्या अलौकिक रूपाच्या अग्रेसरत्वाचा, विशुध्दतेचा व श्रेष्ठत्वाच्या स्थानाचा शोध हा त्यामधील चिन्तनीय मुद्दा आहे.

त्यानुषंगाने, एक बाब लक्ष्यात घ्यायला हवी : समाज आणि साहित्य यांच्या परस्परसंबंधात प्रीतिभावना कशी रुजलेली असते, तिची आविष्करणे परस्परांशी कशी निबध्द असतात आणि त्या अंगाने तिचे प्रकटीकरण कसकसे होत जाते ते तपासून घेणे हा त्यामधील प्रमुख उद्देश आहे. 'सामाजिक दृष्टचा ललित साहित्याच्या आधारे केलेला प्रीतिभावनेचा अभ्यास' ही या ग्रंथाची वैचारिक बैठक आहे...

रणजित बुक स्टॉल • रणजित प्रकाशन
१७२३ / ७, 'ई', सिटी बस रोड, राजारामपुरी, कोल्हापूर